

यशवंतराव चव्हाण

भास्कर लक्ष्मण भोळे

यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य

भास्कर लक्ष्मण भोळे

साकेत प्रकाशन

923.2
BHO
9506



''... आम्हां
राजकारण्यांचे मार्ग किती पसंत पडतात कोण जाणे. कांही जीवन निष्ठा आणि परिस्थितीचे निदान यांच्यावर अवलंबून राहून निर्णय घ्यावे लागतात. माझ्या जीवनांत असे प्रसंग अनेक आलेले आहेत. अशाच एका प्रसंगातून मी आज चाललो आहे. अनेक मित्रांचे गैरसमज झाले परंतु त्याची चिंता करता उपयोगी नाही...''

यशवंतराव चव्हाण

साकेत प्रकाशन

यशवंतराव चव्हाण

राजकारण आणि साहित्य

लेखकाची इतर पुस्तके

- नवी घटना दुरुस्ती : अन्वय आणि अर्थ
- दुसरे स्वातंत्र्य
- राजकीय भारत १९६७-७७
- आधुनिक भारतातील राजकीय विचार
- सत्तांतर आणि नंतर
- संशोधनाची क्षितिजे (संपादित)
- भारतीय संविधान
- राज्यशास्त्र : सिद्धांत आणि व्यवहार
- भारताचे शासन आणि राजकारण
- महात्मा जातीराव फुले : वारसा आणि वसा
- भारताचे स्वातंत्र्य : पन्नास वर्षांचा मागोवा
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर : अनुभव आणि आठवणी (अनुवादित)
- साहित्य प्रत्यय
- १९ व्या शतकातील मराठी गद्य - दोन खंडात (संपादित)
- मोरनामा आणि इतर कथा (अनुवादित)

यशवंतराव चव्हाण

राजकारण आणि साहित्य

यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय व साहित्यिक
कर्तबगारीचे चिकित्सक विहंगमावलोकन

भास्कर लक्ष्मण भोळे

साकेत प्रकाशन

यशवंतराव चव्हाण
राजकारण आणि साहित्य
भास्कर लक्ष्मण भोळे

■

प्रकाशन क्रमांक - ९४०
पहिली आवृत्ती - १९८५
सुधारित दुसरी आवृत्ती - २००४
तिसरी आवृत्ती - २००७

■

प्रकाशक : 9606-0
साकेत बाबा भांड,
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
११५, म. गांधीनगर, स्टेशनरोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
फोन : २३३२६९२, २३३२६९५.
Email : saketpublication@gmail.com
Website : www.saketpublication.com

■

अक्षरजुळणी :
धारा प्रिंटर्स प्रा. लि.,
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५.

■

मुद्रक :
प्रिंटवेल,
जी-१२, एम.आय.डी.सी.,
चिकलठाणा, औरंगाबाद.

■

मुखपृष्ठ : गणेश विसपुते

■

किंमत : १३० रुपये

Yashwantrao Chavhan
Rajkaran Aani Sahitya
Bhaskar Laxman Bholay

© विजया भास्कर भोळे
१६, ब, विद्याविहार,
प्रतापनगर, नागपूर - ४४० ०२२.

ISBN-81-7786-179-4

लेखकाचे मनोगत

महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्याही राजकारणात आपले वेगळेपण सांभाळून अनेक महत्त्वाच्या भूमिका पार पाडलेले यशवंतराव चव्हाण हे एक असामान्य नेते होते. १९८४ च्या अखेरीस त्यांचे निधन झाले. निधनप्रसंगी यशवंतरावांचा अनेक परींनी तेजोभंग झालेला होता. बहुजन-समाजातून वर आलेला आणि अनेक अतुलनीय अभिजात गुणांची स्वतःच्या व्यक्तिमत्वात जाणीवपूर्वक जोपासना केलेला हा धुरंधर मुत्सद्दी श्रीमती गांधींच्या विधिनिषेधशून्य राजकारणामुळे सर्वस्वी निःसंदर्भ व एकाकी ठरून राजकीय विजनवासात कालक्रमणा करीत असताना त्यांचा देहांत झाला. यशवंतरावांच्या या अशा, परिस्थितिवशात अधिकच शोककारी ठरलेल्या निधनामुळे प्रस्तुत लेखकाला त्यांच्या व्यक्तिमत्वाचे व नेतृत्वाचे विश्लेषण करण्याची बुद्धी झाली आणि तो तेव्हापासूनच साधनांच्या जुळवाजुळवीस लागला.

या वर्षी दिवाळी अंकांसाठी संपादकांनी केलेल्या मागण्या पूर्ण करताना निरनिराळ्या विषयांवर संकीर्ण लेखन करून काळ आणि श्रम घालवण्याऐवजी यशवंतरावांच्याच व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंवर स्वतंत्र लेख लिहून ते सार्थकी लावावेत, असे ठरवले. त्यानुसार काही लेख दिवाळी अंकांमधून प्रसिद्ध झाले. सदर पुस्तक हे त्या लेखांच्या निमित्ताने केलेल्या परिश्रमांचेच फलित आहे.

दिवाळी अंकांमधून प्रसिद्ध झालेल्या लेखांचे हे केवळ संकलित पुनर्मुद्रण नसून त्यांचे संपूर्ण व सविस्तर पुनर्लेखन व फेरमांडणी येथे केली गेली आहे. **यशवंतराव : नेतृत्वाची उभारणी** या शीर्षकाचा लेख **दोंडाईचे लोकमानस** साप्ताहिकाच्या या वर्षीच्या दिवाळी अंकात प्रकाशित झाला होता. त्यातून त्याच शीर्षकाचा या संग्रहातला पहिला लेख

आणि **यशवंतराव : राजधानी दिल्लीत** या नावाने इथे असलेला क्रमांक तीनचा लेख असे दोन लेख केलेले आहेत. स्वाभाविकच मूळ लेखापेक्षा त्यांची मांडणी अधिक तपशीलवार व मुद्देसूद झाली आहे. दिवाळी अंकांमधील पृथक लेखांमध्ये काही जागी अपरिहार्यतः झालेली पुनरुक्ती संकलन- संस्करण करताना काढून टाकली आहे.

यशवंतराव आणि महाराष्ट्राचे राजकारण हा लेख नागपूरच्या **तरुण भारत** दिवाळी अंकात या वर्षी प्रसिद्ध झाला होता. येथे त्यात बरीच नवी भर घालून पुनर्प्रकाशित करीत आहोत **यशवंतराव आणि समाजवाद** हा अर्धापूरहून प्रकाशित होणार असलेल्या **यशवंतराव स्मृतिग्रंथा**साठी लिहिलेला लेख असून किरकोळ फेरफार करून तो या संग्रहात समाविष्ट केला आहे.

यशवंतरावांविषयी त्यांच्या राजकीय कर्तृत्वासंबंधीच्या उपर्युक्त लेखांबरोबरच त्यांच्या तितक्याच मौलिक महत्त्वाच्या वाङ्मयीन भूमिकांविषयीचा सविस्तर लेख या संग्रहाच्या अखेरीस अंतर्भूत केलेला आहे. **यशवंतरावांच्यातील ललित लेखक** शीर्षकान्तर्गत प्रस्तुत लेखकाचा एक लेख नागपूरहून प्रकाशित होणाऱ्या **अक्षरछाया** नामक वार्षिकात प्रसिद्ध झाला होता. यशवंतरावांच्या लेखन-भाषणांमधून लालित्यगुण कसा स्वाभाविक, सहजपणे उतरत असे, याचे प्रतिपादन मुख्यत्वे केलेले होते. **साहित्यिक यशवंतराव** या प्रस्तुत संग्रहातल्या लेखाची व्याप्ती त्या लेखापेक्षा बरीच समावेशक आहे. यशवंतरावांचे प्रत्यक्ष ललित लेखन, त्यांची वाङ्मयीन समीक्षादृष्टी आणि साहित्यिकांच्या बांधिलकीसंबंधीचा त्यांचा दृष्टिकोन वगैरे अनेक आनुषंगिक बाबींचाही सदर लेखात ऊहापोह करण्यात आला आहे. या स्वरूपात तो **समुचित** या नागपूरहून प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयीन नियतकालिकाच्या दिवाळी अंकात प्रकाशित होत आहे. कराडच्या साहित्य संमेलनात तेव्हाच्या विशिष्ट राजकीय परिस्थितीच्या परिणामस्वरूप राजकारणी व्यक्तींनी साहित्याच्या व्यासपीठावर लुडबुड करावी, की करू नये? या प्रश्नावर बरीच चर्चा झाली होती. राजकारण्यांच्या उपस्थितीस तत्त्वतः विरोध करणे रास्तच होते. परंतु सदर लेखातून यशवंतरावांच्या विदग्ध वाङ्मयाभिरुचीचे व त्यांच्या साहित्यक्षेत्रातील चतुरस्र भूमिकांचे जे प्रत्यंतर मिळते, ते पाहिल्यावर किमान त्यांच्या संदर्भात वरील प्रश्नाची चर्चा अप्रस्तुतच ठरते.

यशवंतरावांसंबंधी चिकित्सक लिहिण्याचा प्रयत्न आजवर फारसा झालेला आढळत नाही. त्यांची चरित्रे, राजकीय चरित्रे, अभिनंदन ग्रंथ वगैरे प्रकाशित साहित्याचे स्वरूप बरेचसे एकांगी गुणगौरवपर आहे. त्यांच्यावर जे टीकात्मक लेखन समकालीनांनी केले आहे, ते अकारण अभिनिवेशी आणि बहुधा पूर्वग्रहदूषित असे आहे. समकालीन राजकारणात प्रतिद्वंद्वी व्यक्तीकडून होणारे लेखन सामान्यतः असे असणे अटळच असते. प्रस्तुत लेखकाचा

दृष्टिकोन प्राथमिकतः एका सत्यान्वेषी अभ्यासकाचा (अॅकॅडेमिक) आहे. कोणत्याही प्रकारे पक्षपाती पूर्वग्रह डोकावू न देता यशवंतरावांच्या राजकीय व वाङ्मयीन कर्तृत्वाचे परिशीलनच त्याला येथे अभिप्रेत होते. यशवंतरावांच्या यशाचा गौरव करीत असतानाच त्यांच्या अपयशाचेही माप त्यांच्या पदरात त्याने घातले आहे.

अर्थात यातून यशवंतरावांची प्रतिमा डागाळण्याचा किंवा त्यांच्या कर्तबगारीचे अवमूल्यन करण्याचा मुळीच हेतू नाही. लेखकाच्या मनात त्यांच्या महान व धोरणी नेतृत्वाबद्दल नितांत आदरच आहे. यशवंतरावांइतका स्वच्छ चारित्र्याचा, निरपवाद धवल राजकीय कीर्तीचा आणि तळागाळातल्यांविषयी अखंड आत्मीयता बाळगणारा सज्जन पुढारी कॉंग्रेसच्या अलिकडच्या राजकारणात शोधून सापडणार नाही. खंत एवढीच वाटते, की असा सर्वगुणसंपन्न जाणता नेता महाराष्ट्रासाठी आणि राष्ट्रासाठी अहर्निश इतका दीर्घकाळ झटत होता, यावर वर्तमान राजकारण पाहून कुणाचा विश्वास बसणार नाही! हे असे का व्हावे, याचा शोध म्हणजे हे छोटेखानी पुस्तक आहे. लेखक आपल्या प्रयत्नात कितपत यशस्वी झाला आहे, हे वाचकांनी ठरवायचे आहे.

वर ज्या सर्व नियतकालिकांचा पूर्वप्रसिद्धीच्या संदर्भात उल्लेख केला आहे, त्यांच्या संपादकांचे आभार मानणे आमचे कर्तव्य आहे. पुस्तकरूपाने हे लेख एवढ्या अल्पावधीत आमच्याकडून लिहवून घेण्याचे श्रेय आमचे दोस्त रा. ना. धों. महानोर, रा. चंद्रकान्त पाटील आणि प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारणारे रा. बाबा भांड यांचे आहे, याचीही कृतज्ञतापूर्वक नोंद केलीच पाहिजे. त्यांनी तगादा लावला नसता, तर करायच्या म्हणून मनाशी योजलेल्या इतर अनेक कामांप्रमाणेच हेही कदाचित मागे राहून गेले असते.

- भास्कर लक्ष्मण भोळे

नागपूर,
दि. १६ डिसेंबर १९८५

दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

१९८५ अखेर प्रकाशित झालेल्या प्रस्तुत पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचे महाराष्ट्रातील विचक्षण वाचकांनी फार चांगले स्वागत केले आणि यथावकाश त्याची पहिली आवृत्ती संपली. त्यानंतरही या पुस्तकाला वाचकांकडून मागणी सुरूच होती. दुसरी आवृती काढावी अशा सूचनाही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मिळत होत्या. त्यानुसार आज ही दुसरी आवृत्ती आम्ही सर्व संबंधितांच्या हाती सोपवत आहोत.

ही आवृत्ती तयार करताना पहिल्या आवृत्तीतील मजकुराचे जसेच्या तसे पुनर्मुद्रण न करता त्याच्या जोडीला एका नव्या प्रदीर्घ प्रकरणाची जोड दिली आहे. पहिल्या आवृत्तीतील लेखनाला यशवंतराव चव्हाण यांच्या निधनाची ताजी पार्श्वभूमी होती, त्यामुळे ते लेखन प्रयत्न करूनही पूर्वग्रहानुकूल, भावनिक आणि काहीसे तात्कालिक होणे टाळता आले नव्हते. आज यशवंतरावांच्या निधनाला वीस वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. त्यांच्या राजकीय कार्याचे व निर्णयांचे अधिक तटस्थ व साक्षेपी मूल्यांकन करणे आज तुलनेने सोपे झाले आहे. त्यांनी काहीएका ध्येयवादाने सुरू केलेल्या अनेक उपक्रमांचे पुढे काय झाले हेही तपासणे आवश्यक वाटले. त्यामुळे या आवृत्तीत **'यशवंतरावांनंतरचा महाराष्ट्र'** असे एक नवे प्रकरण समाविष्ट केले आहे. यशवंतरावांनी केलेली काँग्रेसची पक्षबांधणी, सहकार, शिक्षण व लोकशाही विकेंद्रीकरणाच्या क्षेत्रात त्यांनी जाणीवपूर्वक सुरू केलेले काही प्रयोग, महाराष्ट्राच्या भाषिक, भावनिक व प्रादेशिक एकात्मतेची त्यांनी केलेली पायाभरणी, मराठी भाषा व संस्कृती यांच्या समृद्धीचे त्यांनी केलेले डोळस प्रयत्न या सर्वच गोष्टींचे गेल्या चाळीस-पंचेचाळीस वर्षांत काय झाले आणि जे काही झाले त्याची संभाव्य कारणे कोणती व परिणाम काय झाले याचा शोध या नव्या प्रकरणात घेतला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाने अतिथी प्राध्यापक म्हणून बोलावल्यामुळे अभ्यास व लेखन यासाठी लागणारी सवड लाभली आणि हे दीर्घकाळ रेंगाळलेले काम मी पूर्ण करू शकलो; याबद्दल सर्व संबंधितांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

प्रकाशकापेक्षा मित्र म्हणूनच जवळचे असलेले रा. बाबा भांड आणि 'साकेत' मधील त्यांचे सहकारी यांचा मी आभारी आहे.

औरंगाबाद — लेखक

१० एप्रिल ०४

अनुक्रम

लेखकाचे मनोगत

१. यशवंतराव : नेतृत्वाची उभारणी ११

२. यशवंतराव आणि महाराष्ट्राचे राजकारण ३०

३. यशवंतराव : राजधानी दिल्लीत ५७

४. यशवंतराव आणि समाजवाद ७८

५. साहित्यिक यशवंतराव ९७

६.यशवंतरावां नंतरचा महाराष्ट्र ? १२४

निवडक संदर्भग्रंथ १५६

१. यशवंतराव : नेतृत्वाची उभारणी

राजकारणात नेते अनेक असतात, पण ज्यांच्या नेतृत्वाचा जडणघडणीच्या अनुषंगाने अभ्यास करणे शक्य आणि आवश्यकही असते, असे नेते अपवादात्मकच असतात. अनुवंश, अपघात वा यदृच्छा आणि कर्तृत्व यांच्या कमी-अधिक युतीतून सामान्यपणे नेतृत्व उदयास येत असते. अनुवंशाधारे उभे राहिलेले नेतृत्व पुढे जरी कर्तबगारीतून मोठे झाले, तरी नेतृत्व-घडणीच्या दृष्टीने अभ्यासविषय सहसा ठरत नाही, कारण घराण्यात चालत आलेली सत्ता कालक्रमाने त्याच्या हाती आलेली असते. उमेदवारी, टक्केटोणपे, धडपड वगैरेंमधून नेतृत्वाची पायाभरणी अशा वारसदारीतून नेतेपदी आलेल्या व्यक्तीला करावीच लागत नाही. अपघातातून किंवा यदृच्छेने नेतृत्वाची संधी ज्यांना आकस्मिकपणे लाभते, त्यांनाही जाणीवपूर्वक आपल्या व्यक्तिमत्वाची जडणघडण किंवा अंगच्या नेतृत्वगुणांची नीट जोपासना करण्याची उसंत मिळाल्याचे दिसत नाही. एखाद्या चळवळीतून वा आंदोलनातून अचानक प्रकाशझोतात आलेल्या अशा व्यक्तींच्या नेतृत्वाचा उभारणीच्या अंगाने अभ्यास केलाच जाऊ शकत नाही. सामान्यतः असे पुढारी राजकीय क्षितिजावर जितक्या अनपेक्षितपणे प्रकाशमान होतात, तितक्याच अभावितपणे इतिहासजमाही होतात. स्वकर्तृत्वावर, प्रतिकूल परिस्थितीशी यशस्वी झुंज देत नेतृत्वाची पायरीपायरीने वाटचाल करीत मोठे होणारे नेतृत्व मागे आपल्या विकासाचा आलेख उभा करीत असते.

यशवंतरावाच्या नेतृत्वरचनेत अनुवंशाचा भाग जवळपास नव्हताच. पुढारी निर्माण होण्यासाठी जे कौटुंबिक पर्यावरण पैसा, प्रतिष्ठा, परंपरा वगैरेंच्या स्वरूपात पोषक ठरत असते, ते यशवंतरावांच्या वाट्याला आलेले नव्हते. अपघात वा यदृच्छा थोड्याफार प्रमाणात त्यांना लाभलेल्या संधीच्या स्वरूपात त्यांच्या नेतृत्वाच्या उभारणीत

साह्यकारी ठरली होती. पण मुख्यत्वे त्यांचे नेतृत्व स्वकष्टार्जित होते. त्यांनी हेतुपूर्वक आपल्या व्यक्तिमत्वाची पद्धतशीरपणे आकारणी केली होती. त्यामुळेच यांच्या नेतृत्वाचा विकासक्रम अभ्यासणे शक्य होते. तो तसा अभ्यासणे आवश्यकही ठरते, कारण एकतर त्या विकासातील काही बलस्थाने व दौर्बल्यस्थाने त्यांच्या राजकीय यशापयशाचे कार्यकारण स्पष्ट करू शकतात; आणि दुसरे अधिक महत्त्वाचे कारण असे, की बहुजनसमाजातून नव्या उमेदीने, नवी ध्येये व आकांक्षा घेऊन पुढे येण्याची धडपड करीत असलेल्या तरुणांना यशवंतरावांच्या नेतृत्वाच्या उभारणीतून बरेच काही शिकायला मिळू शकते.

नेतृत्वाचा थारेपालट

यशवंतरावांची पिढी राजकारणात अग्रेसर होईपर्यंतच्या काळात आपल्या देशात उच्चभ्रू, शहरी मध्यमवर्गीय, उच्चवर्गीय नेतृत्वाची सनातन परंपरा टिकून होती. या नेतृत्वाची बैठक जन्मनिष्ठ श्रेष्ठत्वावर आधारित किंवा त्या श्रेष्ठत्वापोटी मिळालेल्या शिक्षण-नोकऱ्या वगैरे संधींमधूनच उपलब्ध झालेली होती. स्वाभाविकच त्या नेतृत्वाचे चिंतनविश्व मर्यादित होते आणि दृष्टीची कक्षा आपल्या सीमित वर्तुळाबाहेर जाणारी नव्हती. एकंदरीत त्यांचा दृष्टिकोन 'जैसे थे'- वादी होता. महाराष्ट्रापुरते बोलायचे, तर ती परंपरा तोडणाऱ्या पहिल्या पिढीचे पुढारीपण इथल्या इतिहासाने यशवंतरावांना बहाल केले होते. एका परीने लोकशाही तत्त्वाच्या अवलंबामुळे मूठभरांच्या हातून बहुजन-समाजाकडे नेतृत्वाचा थारेपालट होणे अपरिहार्य झाले होते, असे आपणांस म्हणता येईल. पण तेवढे सांगून आपल्याला यशवंतरावांच्या पुढारीपणाचे रहस्य उलगडणार नाही. अनुकूल ऐतिहासिक शक्तिप्रवाहांची जोड मिळाल्यामुळे यशवंतरावांच्या नेतृत्वाचा विकास भरघाव होताना दिसला असला, तरी त्यामागे लहानपणापासून त्यांनी केलेल्या तपश्चर्येचे सामर्थ्य होते. विटेवर वीट ठेवून त्यांनी आपल्या पुढारीपणाची जी पायाभरणी केली होती, तिच्याकडे दुर्लक्ष करून भागणार नाही. तत्कालिक लाभहानीला सर्वस्व समजून आणि व्यक्तिगत हेवेदावे वा जातीय वैमनस्य म्हणजेच राजकारण, असे समजून काँग्रेसमध्ये शिरलेले बहुजन-समाजाचे नेते या संक्रमणकाळात काही कमी नव्हते. ब्राह्मणविरोधाचे राजकारण करून फक्त स्वतःला समाजात व राजकारणात ब्राह्मणांच्या बरोबरीने प्रतिष्ठित करवून घेणे हेच त्यांच्या खटपटीचे साध्य होते. त्यांना लोकप्रियतेच्या या ना त्या लाटेवर स्वार होऊन नेतृत्वाची धुरा सांभाळण्याची संधीही काही काळ लाभत होती. यशवंतराव त्या सर्वांपेक्षा निराळे होते आणि त्यामुळेच ते अन्य समकालीन बहुजन-समाजातील नेत्यांपेक्षा अधिक व्यापक अर्थाने व अधिक दीर्घकाळ नेतृत्व गाजवू शकले होते. सवंग लोकप्रियतेचा हव्यास किंवा नेतृत्वाचे लघुरस्ते शोधण्याचा

आटापिटा चव्हाणांनी कधीच केला नाही. त्यापेक्षा दरवेळी परिस्थिती नीट पारखून आणि परिस्थितीशी कधी जुळते घेऊन, तर कधी माफक संघर्ष करून, नेतृत्वाची एकेक पायरी चढण्याचे तंत्र त्यांनी अवगत करून घेतले होते.

सत्तेची सूत्रे इतिहासक्रमाने बहुजन-समाजाच्या हाती येणे अटळ आहे. लोकशाहीत कोणी अडवायची म्हटली, तरी ही प्रक्रिया अडवता येणार नाही; पण यशवंतरावांना महत्त्वाचा वाटत होता तो प्रश्न असा, की हे आव्हान पेलण्यासाठी लागणारी क्षमता बहुजन-समाजाच्या नेतृत्वापाशी आहे काय? आणि जर ती नसेल, तर त्यांच्या मते प्रामाणिकपणे ते मनाशी मान्य करून ती मिळवण्याच्या खटपटीस बहुजन-नेत्यांनी लागायला पाहिजे. कुणी जर या समाजाला हजारो वर्षे वेठीस धरले असेल; तर बहुसंख्य असलेल्यांनी कठोर आत्मपरीक्षण करून आपले दोष आणि आपल्यावर वर्चस्व गाजवणाऱ्यांचे गुण समजावून घेतले पाहिजेत.

यशवंतरावांनी असे कठोर आत्मपरीक्षण करायला लहानपणापासूनच सुरुवात केलेली दिसून येते. बहुजन-समाजातील तरुणांमध्ये धैर्य, धाडस, हिंमत, निष्ठा व समर्पणभाव असतो; पण अध्ययन व्यासंगाबाबत ते कमी पडतात; एखाद्या विषयाचा एखाद्याने व्यासंग केलाच, तरी बाकीच्या क्षेत्रांची तो अक्षम्य उपेक्षा करतो. त्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्वात एकारलेपण येते; अनेकदा अनेक गोष्टी समजलेल्या असतात, बरीच माहिती मनात तयार असते; पण आविष्करणाची हातोटीच नसल्यामुळे मुखस्तंभ होण्याची पाळी त्यांच्यावर येते; वक्तृत्वगुणाची कदर न झाल्यामुळे बहुजन-समाजातील तरुणांच्या ठिकाणी सहसा वाक्पटुत्व नसते. यशवंतराव हे सारे अनुभवित होते, आपली इतर समाजगटांशी तुलना करीत होते आणि उणिवा भरून काढण्याचा आपल्या परीने प्रयत्न करीत होते.

बहुजन-समाजात जन्म लाभण्यातून अनायासेच पदरात पडलेल्या गुणांची जपणूक करीत असतानाच बहुजन-समाजात अभावाने आढळणारे व्यासंग, बहुश्रुतपणा, वक्तृत्व, लेखन, ऋजुता, भाषाभान, प्रसंगावधान, तारतम्य, मुत्सद्दीपणा, इत्यादी गुणांची प्रयत्नपूर्वक संपादणी करण्याचा प्रयत्न यशवंतरावांनी केलेला दिसून येतो. त्यांनी हे गृहीत धरले होते, की ज्यांच्या हाती आजपर्यंत नेतृत्वाची मक्तेदारी होती, ते वर्ग नेतृत्ववंचित झाल्यानंतर स्वस्थ बसणार नाहीत. नव्या बहुजन-समाजी नेत्यांच्या कारभाराकडे व वागण्या-बोलण्याकडे ते डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवतील. त्यांच्या छिद्रान्वेषी नजरेतून आपली एकही लहानसहान चूक सुटणार नाही. उलट, राईचे पर्वत केले जातील. राजकीय नेतृत्व त्यांच्या हातून निसटले, तरी समाजजीवनाच्या असंख्य आघाड्या आज त्याच वर्गांच्या

हाती आहेत, अजून बरीच वर्षे त्या तशाच राहणार आहेत. वृत्तपत्रे त्यांच्याच हाती आहेत, व्यासपीठे त्यांच्याच ताब्यात आहेत. तेव्हा सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही, की बहुजन-समाजातील पुढाऱ्यांनी असा कटाक्ष ठेवावा, की जेणेकरून आक्षेपकांना संधीच मिळू नये. आपण जर आपल्या परीने चोख राहिलो, तर टपून बसलेल्या टीकाकारांना हात चोळीत बसावे लागेल आणि त्यांच्यांत जे प्रामाणिक आहेत, त्यांना जर आपल्या सचोटीचा प्रत्यय आला, तर ते स्वतःहून आपल्या मदतीला येतील.

नेतृत्व : अर्थ आणि आशय

अशा भूमिकेतून यशवंतरावांनी स्वतःच्या राजकीय जीवनाची आखणी नेतृत्वाच्या अत्यंत प्राथमिक टप्प्यावरच केलेली दिसून येते. नेतृत्वाचा त्यांना अभिप्रेत असलेला अर्थ फारच व्यापक होता. पुढे तो त्यांनी नेमक्या शब्दांत व्यक्तही केला आहे. पण ज्या वयात त्यांना तो शब्दबद्ध करता आला नसता, त्याही वयात त्यांनी आचरणातून नेतृत्वाचा तोच अर्थ व्यक्त केलेला दिसून येतो. ते म्हणतात :

"आजकाल नेतृत्व याचा अर्थ फारच मर्यादितपणे केला जातो. राजकारणात एखादे पद प्राप्त झाले, की त्याला नेता म्हणायचे, ही सवय जितक्या लवकर दूर होईल, तितकी त्याची गरज आहे.... नेतृत्व हा शब्द व्यापक अर्थाचा आहे.... सामूहिक परिणाम घडविणारे त्या त्या क्षेत्रातील जे कोणी आदर्श असतील, तेच खरे नेते. नव्या आदर्शांचा संपूर्ण समाजजीवनावर परिणाम करण्यासाठी, त्याचा वापर करणारी जी माणसे असतात, त्यांच्या ठिकाणीही नेतृत्व असतेच... विचारांची, माणसांच्या मनांची मशागत करणे आणि त्याचे आदर्श परिणाम घडवून आणणे या नेतृत्वाच्या कसोट्या असतात. ('ऋणानुबंध,' ६०)

यशवंतरावांना नेतृत्वाची संकल्पना इतक्या व्यापक अर्थाने अभिप्रेत असल्यामुळेच आपल्या नेतृत्वाची पायाभरणी करीत असताना त्यांनी काही गोष्टींकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरवले होते. त्यांच्या मते नेतृत्व जर हेतुपूर्ण नसेल, तर ते कुचकामी आहे. नेतृत्वाला स्वार्थापलीकडचे काही ना काही प्रयोजन असायला पाहिजे. त्याच्यासमोर आदर्श समाजव्यवस्थेचा आराखडा असायला पाहिजे आणि त्या आदर्शाप्रत जाण्याच्या मार्गांची त्याने नीट ओळख करून घ्यायला पाहिजे. समाजकारणात व राजकारणात घर करून बसलेले सरंजामी अवशेष निकालात काढायचे आहेत, ग्रामीण शेतकऱ्यांच्या जीवनाला आलेली अवकळा दूर करायची आहे, शिक्षण व आरोग्याला पिढ्यान् पिढ्या वंचित झालेल्यांना विकासाच्या वाटा दाखवायच्या आहेत, जातीय वैमनस्याला वाव न मिळू देता

अल्पसंख्याक उचवर्णीयांची सर्वक्षेत्रीय मिरासदारी मोडीत काढायची आहे, बहुजन- समाजाच्या सामाजिक- आर्थिक- सांस्कृतिक वगैरे प्रश्नांचा निपटारा करायचा आहे- इत्यादी प्रयोजने यशवंतरावांनी स्वतःच्या पुढारीपणासाठी फार पूर्वीच निर्धारित केली होती आणि हयातभर इमानेइतबारे त्यांनी त्यांचा पाठपुरावाही केला होता. आधीच्या नेतृत्वाशी तोडीस तोड खंबीर, विवेकी व कल्पक नेतृत्व बहुजन-समाजातून उभे राहिले नाही, तर ही साध्ये समूर्त होणे असंभवनीय आहे, याची यशवंतरावांना स्पष्ट जाणीव होती. या जाणिवेतूनच महाराष्ट्र-निर्मितीच्या वेळी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना असा इशारा केला होता :

"मी जे नेतृत्व म्हणतो, त्याचा अर्थ आपण नीट समजावून घ्या. नव्या नेतृत्वाकरिता निश्चित कार्यक्रम असावा लागतो, कार्याची दृष्टी असावी लागते; आणि त्याचबरोबर समाज समतेच्या तत्त्वावर चालण्याकरिता कार्याला वाहून घेणाऱ्या शीलवान शूरवीरांची आवश्यकता असते. महाराष्ट्र राज्याची जी स्वप्ने आहेत, त्यांच्या पूर्तीसाठी मी आपणा सर्वांना हाक देत आहे." ('सह्याद्रीचे वारे')

नेतृत्व-संगोपन

देवराष्ट्र हे यशवंतरावांचे जन्मगाव आणि आजोळ. लक्षावधी गरीब कुटुंबांतील मुलांचे असते, तसेच बालपण त्यांच्याही वाट्याला आले होते. शहरी उच्चवर्णीय / वर्गीय घरांतल्या मुलांना आपापतःच संभाषणचातुर्य, सभाधीटपणा व बहुश्रुतता येते, ती कौटुंबिक संस्कारांतून यशवंतरावांसारख्या खेडुताच्या मुलाला मिळणे दुरापास्तच होते. पण ते नसले, तरी जमेच्या इतर बऱ्याच बाजू आपल्यापाशी आहेत, याचे भान ठेवल्यामुळे त्यांच्यासारख्या पर्यावरणात वाढणाऱ्या मुलाच्या ठिकाणी जो न्यूनगंड अपरिहार्यतः फोफावतो, तो यशवंतरावांनी कटाक्षाने दूर ठेवला. ग्रामीण परिसराविषयीचे कुतूहल आणि जिव्हाळा, लहानपणी प्रत्यक्ष दारिद्र्य व काबाडकष्टाचे ओढघस्ती जीवन जवळून पाहिल्यामुळे अशा स्तरातील व परिसरातील मुलां-माणसांबद्दलची आत्मीयता आणि या समाजाचे धुरीणत्व या समाजाशी जैविकरीत्या जोडल्या गेलेल्यालाच खऱ्या अर्थाने करता येऊ शकेल, असा आत्मविश्वास यशवंतरावांच्या मनात निर्माण झाला. घरचे वातावरण सत्यशोधकी असल्यामुळे महार, मांग, चांभार, रामोशी, मुसलमान, धनगर, सणगर वगैरे भिन्न जातिधर्मीय मंडळीला मुक्तद्वार होते, याचा फार मोठा उदारमतवादी संस्कार बालपणीच घडला. वडीलबंधू सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते असल्यामुळे सामाजिक प्रश्नांचा खल चालायचा. त्यातूनही बरेच शिकता आले.

कराड येथे शिक्षणानिमित्त आल्यावर तर चौफेर वाचनाची नामी संधी मिळाली.

ब्राह्मणेतरांच्या वृत्तपत्रांप्रमाणेच इतरही वृत्तपत्रे वाचता आली. चळवळींची तोंडओळख झाली. सार्वजनिक कार्यात भाग घेता आला. ग्रामीण संस्कृतीचा साक्षात आणि सखोल संस्कार आणि त्याच्या जोडीला हे चौफेर वाचन यातून खेड्यातल्या एका तरुणाचे रूपांतर स्वातंत्र्यसैनिकात होण्याची प्रक्रिया खास देशी पद्धतीने घडून येत होती. पुढारीपणासाठी लागणारे गुण भोवतालच्या पर्यावरणातून त्यांना सहजोपलब्ध होत होते. बाहेरच्या वृत्तपत्रांतून मिळणारे ज्ञान आणि घरीच असलेली ब्राह्मणेतर चळवळीची शिकवण यात कुठे तरी अंतर्विरोध आहे, असे यशवंतरावांना जाणवू लागले होते. आपले बंधू गणपतराव यांच्याशी ते यासंबंधी सविस्तर चर्चा करीत.

बंधूंनी यशवंतरावांना महात्मा फुल्यांचे चरित्र वाचायला दिले. 'महात्मा फुल्यांचा विचार मूलगामी आहे व तो काही नवीन दिशा दाखवतो आहे... त्यांनी उभे केलेले काही प्रश्न तर निरुत्तर करणारे होते. शेतकरी-समाजाची होणारी पिळवणूक, दलित समाजावर होणारा अन्याय आणि शिक्षणापासून वंचित ठेवलेला बहुजन-समाज व स्त्रिया यांचे प्रश्न सोडवल्याखेरीज देशाचे कार्य होणार नाही,' हा त्यांच्या विचारांचा सारांश.' ('कृष्णाकाठ', ३४) यशवंतरावांच्या मनावर ठसला. मात्र ते ब्राह्मणेतर चळवळीशी सहमत होऊ शकले नाहीत. सत्यशोधकी तत्त्वज्ञानाची मूळ प्रेरणा रास्त असली, तरी ब्राह्मणविरोधात पर्यवसित झालेली ती चळवळ त्यांना आपली कधीच वाटली नाही. जवळकरांनी 'देशाचे दुष्मन'मधून टिळकांवर केलेली टीका त्यांना पटली नाही. इंग्रजांविरुद्ध लढणारे एक सेनापती अशी टिळकांविषयी भावना झालेल्या यशवंतरावांना टिळकांवर टीका करणारी माणसे इंग्रजांचे मित्र वाटू लागली. त्यांचे मन त्या संकुचित संस्कारांमधून बाहेर ओढ घेऊ लागले.

देशात वेगाने घडामोडी घडत होत्या. क्रांतिकारकांच्या चळवळी उग्र होऊ लागल्या होत्या. सरकारी दमनसत्रही तीव्र होऊ लागले होते. अनेक क्रांतिकारकांना तुरुंगांत डांबून सरकार त्यांचे अनन्वित छळ करीत होते. यशवंतराव या काळात मनाने अस्वस्थ होते.

संवेदनक्षम मन आणि मनमिळाऊ स्वभाव या दोन गोष्टींचा चव्हाणांच्या नेतृत्वाच्या उभारणीत फार मोठा वाटा आहे. त्यांचा मूळ पिंड आंदोलनात उडी टाकून पुरुषार्थ करण्याचा कधीच नव्हता, किंबहुना तो काहीसा अंतर्मुख, चिंतनशील व एकांतप्रिय असाच होता. सार्वजनिक जीवनात पाय ठेवतानाची त्यांची प्रेरणा भावनावेगापेक्षा बौद्धिक जाणिवेचीच होती. भोवतालच्या परिस्थितीचे यथार्थ भान आणि ती बदलायलाच पाहिजे, ही जिद्दही त्यामागे होती. ही परिस्थिती केवळ बहुजन-समाजापुरती आणि तीसुद्धा फक्त मराठी प्रदेशापुरती मर्यादित चळवळ करून बदलता येणे त्यांना दूरापास्त वाटल्यामुळेच

अधिक व्यापक चळवळींचा मागोवा त्यांचे मन घेत होते. मात्र क्रांतिकारकांच्या मार्गांशी एकरूप होण्यालाही त्यांचा स्वभाव अनुकूल नव्हता. त्यामुळे या काळात त्यांची काहीशी कोंडी झाली होती.

ती कोंडी फुटण्यास एक घटना कारणीभूत झाली. ती घटना म्हणजे यतींद्रनाथ दास यांनी तुरुंगात सुरू केलेले आमरण उपोषण. १९२० च्या असहकाराच्या चळवळीत यतींद्रनाथांनी भाग घेतल्यामुळे सरकारचा त्यांच्यावर रोष होता. पाच वर्षांत चार वेळा त्यांना तुरुंगात डांबले होते. अतोनात छळामुळे बेभान होऊन जेल सुपरिटेंडेंटवर त्यांनी हात उगारल्याबद्दल त्यांना अंधारकोठडीची कडक शिक्षा दिली गेली होती. राजकीय कैद्यांना गुन्हेगारांसारखी वागणूक दिली जाते, याचा संताप येऊन यतींद्रनाथ आमरण उपोषणास बसले होते. त्यांच्या दिवसेंदिवस खालावणाऱ्या प्रकृतीमुळे सबंध देशभर अस्वस्थता परसली होती. अखेर एक दिवस यतींद्रनाथ लाहोरच्या तुरुंगात मरण पावल्याची बातमी आली. ती ऐकून यशवंतराव बेचैन झाले. 'आपल्या भावविश्वात क्रांती करणारी एक घटना' असे या घटनेचे वर्णन करून यशवंतराव लिहितात :

"या घटनेमुळे माझ्या मनोवृत्तीत आमूलाग्र बदल झाला. देशात घडणाऱ्या घटनांचे अर्थ समजावून घेण्याच्या मनःस्थितीपर्यंत मी पोहोचलो. जातीय विचारांच्या संकुचित कोंडवाड्यातून बाहेर पडण्याचा माझा विचार पक्का झाला. आपण आपले जीवन देशकार्यालाच वाहायचे, हा निर्णय माझ्या मनाने घेतला." (कित्ता, ४४)

राष्ट्रव्यापी प्रश्नांसाठी खटपट करणाऱ्या चळवळीचा एक सामान्य सैनिक होण्याचे यशवंतरावांनी ठरवले आणि या आपल्या निर्धाराशी ते तहहयात प्रामाणिक राहिले. त्यावेळी त्यांनी आपल्या निष्ठार्पणासाठी जी भारतीय राष्ट्रसभेची (इंडियन नॅशनल काँग्रेस) निवड केली, ती त्यांनी आयुष्यभर निभावली. हातचे काहीही न राखता ते त्या संस्थेला समर्पित झाले.

राजकारण आणि पद-सोपान

राष्ट्रसभेच्या राजकारणात तोपर्यंत महात्मा गांधी-पर्व जोमात आले होते. खेड्यापाड्यांतील निरक्षर व दरिद्री समाजाला जागृत केले, तरच चळवळीची ताकद वाढू शकेल, हे काँग्रेसच्या इतिहासात गांधीजींनीच सर्वप्रथम ओळखले होते आणि त्या दृष्टीने संघटनेची पावले पडू लागली होती. यशवंतरावांसारख्या तळागाळातून आलेल्या कार्यकर्त्यांच्या स्वप्नांचे आलंबन गांधींची काँग्रेस सहजासहजी ठरू शकली. त्यांना कुठेतरी आपल्या राजकीय जीवनाची जणू गुरुकिल्लीच गांधींच्या चळवळीत सापडली. ही चळवळ काँग्रेसची

असली, तरी ती आता पांढरपेशांपुरती सीमित नव्हती. ग्रामीण शेतकऱ्यांचेही प्रश्न ती आता हाती घेऊ लागली होती. पांढरपेशांना अभिप्रेत असलेले स्वातंत्र्य, म्हणजे पुन्हा पुरोहितशाहीची व पेशवाईची प्रतिष्ठापना, या 'ब्राह्मणेतरी' समीकरणाचा आता वृथा बाऊ करण्याचे कारण नव्हते. त्या स्वातंत्र्यात आर्थिक व सामाजिक समता आणि न्याय, तसेच दलित-शोषित समाज-घटकांचा अभ्युदय, इत्यादी जोतीरावप्रणीत संकल्पनांचाही अंतर्भाव होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

यशवंतराव सर्व सामर्थ्यानिशी या चळवळीत पडले. गावोगाव हिंडून त्यांनी लोकांच्या चळवळविषयक जिज्ञासेची परिपूर्ती केली. कार्यकर्त्यांशी व्यक्तिगत संबंध जोडले. ब्रिटिश सत्तेविषयी जनमानसात वसलेली दहशत निकालात काढणारे कार्यक्रम आखून पार पाडले. सातारा जिल्ह्यात नव्या दृष्टीच्या तद्दण कार्यकर्त्यांची एक फळीच त्यांच्या प्रयत्नातून निर्माण झाली.

इथून सुरू झालेली यशवंतरावांच्या नेतृत्वाची वाटचाल थेट त्यांच्या मृत्यूपर्यंत सुरू होती. त्यात जशी त्यांच्या नेतृत्वाने यशाची चढती कमान उभी केली, तशीच काही वेळा राजकीय आडाखे चुकल्यामुळे अपयशाची खोल कोसळणही अनुभवली; पण त्यांचा गंभीर धीरोदात्तपणा त्यांना कधीच सोडून गेला नाही. व्यक्तिगत आकांक्षा - मग ती सत्तेची असो, की मत्तेची, ही त्यांच्या राजकीय जीवनामागील प्रेरणा कधीच नसल्यामुळे राजकीय यशाखातर जनतेने डोक्यावर घेऊन दिलेली दाद पाहून ते जसे हुरळून उन्मत्त झाले नाहीत, त्याचप्रमाणे प्रसंगवशात राजकीय विजनवासात एकाकी पडण्याची पाळी आली, तेव्हा व्यक्तिगत हताशपणाने ग्रस्त होऊन आततायी आकांत करण्याच्या फंदात ते पडले नाहीत. राजकीय यश आणि अपयश त्यांनी सारख्याच समधाततेने पचवले.

१९४६ च्या निवडणुकीत ते स्वतः निवडून आले, तेव्हा मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी त्यांना संसदीय सचिव (पार्लमेंटरी सेक्रेटरी) नेमायचे ठरवले. त्या वेळी प्रभार घेण्यासाठी यशवंतराव सचिवालयात गेले असता मुख्यमंत्र्यांकडे कसलीशी बैठक सुरू होती. तेवढ्या वेळात मोरारजी देसाई यांना भेटून घ्यावे, म्हणून ते त्यांच्या कक्षात गेले, तर देसाईंनी त्यांना आपल्याच गृहखात्यात संसदीय सचिव होण्याची गळ घातली. त्यांनीच परस्पर मुख्यमंत्र्यांना तसे कळवून टाकले. चव्हाणांच्या नेतृत्वाच्या उभारणीतील हा एक यदृच्छेचा क्षण म्हणता येईल. त्या वेळी जर त्यांची खेरांशी आधी भेट झाली असती, तर चव्हाणांच्या राजकीय वाटचालीचे रूळ बदलून त्यांची गाडी अगदीच निराळ्या दिशेने गेली असती. मोरारजी आणि चव्हाण यांच्यांतले साहचर्य चव्हाणांच्या नेतृत्वाच्या जडणघडणीच्या दृष्टीने निर्णायक महत्त्वाचे ठरले, याबद्दल शंकेला जागा नाही. राज्यकारभाराचे बारकावे,

कार्यक्षमता, कामाचा उरक, निर्णय घेण्यातील तत्परता वगैरे गुणांचा संस्कार मोररजींनींच गृहखात्याच्या संदर्भात यशवंतरावांवर केला आणि तो त्यांना जन्मभर उपयुक्त ठरला.

पुढे काही काळाने यशवंतराव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव झाले, १९५२ च्या निवडणुकांनंतर नागरी पुरवठा व स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री झाले. या प्रत्येक वेळी मोरारजींच्या मार्गदर्शनाचा त्यांना लाभ झाला. एवढेच नव्हे, तर भाषावार प्रांत-पुनर्रचना झाल्यानंतर जेव्हा द्वैभाषिक मुंबई राज्य करायचा निर्णय वरिष्ठ काँग्रेस-नेत्यांनी घेतला, तेव्हा त्या राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर यशवंतराव येण्यालाही मोरारजी देसाईच कारणीभूत झाले. मोरारजींनी असा हट्ट धरला, की मुख्यमंत्रिपदावर आपली निवड व्हायची, तर ती अविरोधच झाली पाहिजे. आपल्याविरुद्ध जर कोणी उमेदवार उभा राहिला, तर आपण निवडणुकीतून बाहेर पडू. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्रातल्या प्रश्नावर जनभावना खूप तीव्र झालेल्या होत्या. मोरारजी हे संयुक्त महाराष्ट्राचे विरोधक असल्यामुळे महाराष्ट्र काँग्रेसचे मत त्यांच्या विरुद्ध संतप्त होते. अशा परिस्थितीत आपली अविरोध निवड होऊ शकेल, असे मोरारजींना वाटावे, याला राज्यातील राजकीय वस्तुस्थितीचा मुळीच आधार नव्हता; पण ते आपल्या आग्रहावर अडून होते. काही अंशी त्यांचा तो अहंकारच होता. भाऊसाहेब हिरे त्यावेळी मराठी जनतेत लोकप्रियतेच्या शिखरावर होते, कारण ते संयुक्त महाराष्ट्रवादी होते. त्यांनी मोरारजींविरुद्ध मुख्यमंत्रिपदाच्या निवडणूक-स्पर्धेत उतरण्याचा निर्णय जाहीर केला. मोरारजींनी आपले नाव मागे घेतले. यशवंतराव चव्हाण निवडणुकीत उतरले. मोरारजींनी आपला दुराग्रह सोडला असता, तर गुजराती आमदारांच्या पाठिंब्यावर भाऊसाहेब हिरेंना पराभूत करूनही त्यांना निवडणूक जिंकता आली असती. यशवंतराव त्याच पाठिंब्याच्या आधारे भाऊसाहेब हिरेंना शह देण्यात यशस्वी झाले.

मोरारजींच्या या अप्रत्यक्ष अनुग्रहाने का मिळालेले असेना, द्वैभाषिकाचे मुख्यमंत्रिपद चव्हाणांनी आपल्या अंगभूत गुणांच्या जोरावरच निभावले. ते पद म्हणजे मोठीच जोखीम होती; पण यशवंतरावांनी ती अवघड जबाबदारी कुशलपणे पार पाडली. प्रक्षुब्ध जनमताच्या झंझावाताला यशस्वीपणे तोंड देत त्यांनी द्वैभाषिकाची नौका सहीसलामत संयुक्त महाराष्ट्र-निर्मितीच्या किनाऱ्याला लावली. संयुक्त महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर त्यांनी आधीच आपल्या कर्तबगारीच्या बळावर दावा प्रस्थापित केला होता आणि त्या पदावर आपला कायमचा ठसा उमटविणारी त्यांची कारकीर्द पाहून नेहरूंनी अत्यंत संकटाच्या क्षणी त्यांच्यावर देशाच्या संरक्षणमंत्रिपदाची अवघड जबाबदारी विश्वासाने सोपवली होती. गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान अशी पदे यशवंतरावांनी केंद्र सरकारात सांभाळली आणि अखेरचे

पद वगळता बाकीच्या पदांच्या कारभारावर त्यांनी स्वतःच्या व्यक्तित्वाची व नेतृत्वगुणाची छाप पाडली होती. आयुष्यात प्रत्येक पद जणू एकेक प्रचंड आव्हान घेऊनच यशवंतरावांच्या पुढ्यात उभे ठाकले होते आणि त्यांनी आपल्या कमावलेल्या कर्तृत्वाच्या जोरावर त्या आव्हानांवर यशस्वी मात करण्याची मर्दुमकी गाजवून टीकाकार- विरोधकांनाही चकित करून सोडले होते. परिणामी त्यांचा लौकिक 'संकटमोचक नेतृत्व' ('मॅन ऑफ क्रायसिस्') असा झाला असल्यास नवल नाही. प्रत्येक पदासोबत आलेल्या संकटाचा मुकाबला करण्यातूनच जणू त्यांच्या नेतृत्वाला नवनवे आयाम प्राप्त होत गेले. जबाबदाऱ्यांच्या वाढत्या ओझ्यानुसार त्या पेलणाऱ्या त्यांच्या बाहूंचे बळ वृद्धिंगत होत राहिले. आधीच्या प्रत्येक पदाने त्यांची पुढील नव्या पदासाठीची पूर्वतयारीच जणू करून दिली होती!

जननिष्ठा व पक्षनिष्ठा समानार्थीच

जननिष्ठा हे यशवंतरावांच्या नेतृत्वाचे सर्वाधिक नजरेत भरणारे वैशिष्ट्य दिसते. राष्ट्रसभेचे स्वातंत्र्य-आंदोलन लोकाभिमुख करण्यातून त्यांनी आपल्या नेतृत्वाची पायाभरणी केली होती. स्थानिक स्वराज्य संस्था हाती ठेवण्यातून पुढे अटळपणे उभ्या राहणाऱ्या जन-आंदोलनासाठी लागणारी तरुण माणसे जोडता येतील आणि जनमानसातील आपल्या कार्याचा पाया अधिक खोल करता येईल, हा विचार त्यांनी १९४१ च्या जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुकांसाठी धावपळ करताना मनात ठेवला होता. राष्ट्रसभा म्हणजे निवडणुकांमधील केवळ एक स्पर्धक पक्ष नसून लोकांच्या आशा-आकांक्षांशी जैविकरीत्या जोडली गेलेली आणि लोकांच्या रागालोभाची तक्रार-गाऱ्हाणी व मागण्यांची कदर करणारी ती एक प्रभावी चळवळ आहे, हीच राष्ट्रसभेची प्रतिमा त्यांनी मनात बाळगली होती. त्यामुळेच तिची एखाद्या बांधीव विचारसरणीशी परिबद्धता असता कामा नये आणि कालपरत्वे बदलता येण्याचा आपला लवचिकपणा तिने गमावून बसता कामा नये, असा त्यांचा कटाक्ष होता. पोथीनिष्ठ विचारसरणीच्या झापडा लावून वावरणारे पक्ष जिवंत जनजीवनाच्या प्रवाहापासून दुरावतात, हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते.

स्वतः यशवंतराव हे जन-सामान्यांची नाडी अचूक सापडलेल्या मोजक्या नेत्यांपैकी एक असल्यामुळे जनतेशी प्रभावी हृदयसंवाद करणे त्यांना सहज शक्य होई. जनसामान्यांच्या परिस्थितीची त्यांची माहिती अन्य शहरी नेत्यांप्रमाणे ग्रंथप्रबंधांच्या अध्ययनातून नव्हे, तर प्रत्यक्ष स्वानुभवावर आधारित होती. मुख्यमंत्रिपदासोबत येणाऱ्या समृद्ध उच्चभ्रूपणाच्या वलयात वावरत असतानादेखील त्यांना आपल्या मुळांचे कधीच विस्मरण झाले नव्हते. अर्थात हेही तितकेच खरे आहे, की ज्या जननिष्ठेपोटी त्यांनी स्वतःला जनमताच्या

गाड्याला बांधून घेऊन लोकानुनयाखातर आपली फरफट मात्र कधीच होऊ दिली नाही. आयुष्यात अनेकदा त्यांना प्रतिकूल लोकमताच्या कुत्सेला व क्रोधाला सामोरे जावे लागले आणि धीरगंभीरपणे त्यांनी ते दिव्य पत्करले. प्रवाहाविरुद्ध जाण्याची अशी हिंमत फारच थोडे राजकीय नेते दाखवू शकतात.

लोकशाहीतील नेत्याला आपल्या पाठीराख्यांशी प्रतारणा करून चालत नाही, हे यशवंतरावांच्या राजकीय वाटचालीचे मुख्य सूत्रही त्यांच्या जननिष्ठेचेच द्योतक मानावे लागेल. 'चले जाव' आंदोलनाच्या घोषणेनंतर स्वपक्षात दीर्घकाळ आलेले शैथिल्य असह्य होऊन साम्यवादी पक्षात जावेसे यशवंतरावांना वाटले होते. त्या पक्षाच्या नेत्यांशी त्यांनी बोलणीही केली होती. पण जेव्हा त्यांनी आपल्या सोबतच्या कार्यकर्त्यांचा विचार घेतला, तेव्हा त्यांच्या लक्षात आले, की त्यांना हे मुळीच मान्य होणारे नाही. त्यांनी मग तो विचार सोडून दिला. सहकाऱ्यांना न पटणारे आपण काही केले, तर आपण एकाकी पडून काहीही करू शकणार नाही, अशी त्यांची सदैव धारणा होती. या संदर्भात आपल्या आत्मचरित्रात ते लिहितात :

"...आज पन्नास वर्षांनंतरही हे मी कबूल केले पाहिजे की माझ्या आजपर्यंतच्या अनुभवाने ही कसोटी माझ्या जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाची आणि व्यवहार्य कसोटी म्हणून नित्य वावरत राहिली आहे." ('कृष्णाकाठ', १८५)

आयुष्यात जेव्हा जेव्हा त्यांच्यासमोर दोन वा अधिक पर्यायांमधून एकाची निवड करण्याचा प्रसंग आला, तेव्हा त्यांनी याच कसोटीवर निर्णय घेतला. रॉयवादी, शे. का. पक्ष व समाजवादी हे गट काँग्रेसबाहेर पडले, त्या प्रत्येक वेळी काँग्रेसमध्येच राहण्याचा त्यांचा निर्णय आणि त्यानंतरचा फेरबदलाचा निर्णय हे सारे त्यांनी वरील कसोटी लावूनच घेतलेले दिसतात.

जननिष्ठा आणि पक्षनिष्ठा या दोन संज्ञा चव्हाणांसाठी समानार्थीच होत्या. संस्कारक्षम वयात निष्ठासमर्पणार्थ निवडलेल्या काँग्रेसशी त्यांची बांधिलकी त्यामुळेच इतरांपेक्षा अधिक दृढ होती. राष्ट्रव्यापी पक्षनिष्ठेखातर पूर्वायुष्यात त्यांनी सत्यशोधकी संस्कार जसे टाकले, तद्वतच बहुजन-समाजाचा रेटा काँग्रेसबाहेर जाण्यास अनुकूल असण्याच्या काळात ते काँग्रेसला धरून राहिले, द्वैभाषिकाचा निर्णय त्यांना स्वतःला अमान्य असूनही पक्षनिष्ठेपायी त्यांनी तो निर्णय अमलात आणला आणि संयुक्त महाराष्ट्राची मागणी महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून उग्र स्वरूपात मांडली जात असतानाही ते शांत चित्ताने पक्षश्रेष्ठीचा कौल मिळवण्यात मग्न राहिले. प्रसंगी जननिष्ठेवरही मात करणारी ही त्यांची प्रामाणिक पक्षनिष्ठा पाहूनच संघपातळीवरच्या श्रेष्ठींनी- विशेषतः नेहरूंनी- त्यांना अचूक हेरले आणि तशी

वेळ येताच केंद्र शासनाची एक जोखीम बिनधास्तपणे त्यांच्या हवाली केली.

वैचारिकतेची डूब असलेले नेतृत्व

वैचारिकतेची डूब हा यशवंतरावांच्या नेतृत्वाचा असाच एक लोभस पैलू होता. तरुणपणीच गंभीर वाचनाची आवड जडलेल्या यशवंतरावांना १९३२-३३ च्या कारावासात बुद्धिमंतांच्या सान्निध्यातून आणि उदंड ग्रंथाध्ययनातून भरपूर वैचारिक खुराक मिळाला. राजकीय विचारांच्या वेगवेगळ्या छटा आणि त्यांचा परस्परांशी असलेला संबंध त्यांना उमगला. समाजवाद, साम्यवाद, मार्क्सवाद, गांधीवाद वगैरे विचारसरणींमधील बारकावे त्यांच्या लक्षात आले. पुढे जन्मभर त्यांनी चिंतनप्रधान प्रबंधांपासून काव्य-कथा-कादंबऱ्यांपर्यंत चौफेर वाचन सुरूच ठेवले. त्यांच्याइतके विविधांगी वाचन करणारा नेता महाराष्ट्र काँग्रेसमध्ये तर सोडाच, पण त्या पक्षाच्या अखिल भारतीय पातळीवरही विरळाच म्हणावा लागेल. नेहरूंच्या निधनानंतर तर या पक्षाला बुद्धिविरोधानेच ग्रासले. ग्रंथांविषयी व वैचारिक विश्वाविषयी प्रच्छन्न घृणा बाळगणाऱ्या या पक्षात, 'नेता कोणास म्हणावे?' या प्रश्नाचे उत्तर 'ज्याला अमूर्त विषयांचे वाचन-मनन करण्याची उसंत वा इच्छाच नसते, तो' असेच रूढ झाले होते. ग्रंथ वाचणारा कृतिवीर असूच शकत नाही, असा संकेत पक्षात प्रचलित असतानाही यशवंतराव निष्ठेने व्यासंग करीतच होते.

या वैचारिकतेतून चव्हाणांना अनेक लाभ झालेले आढळतात. एक तर प्रश्न कोणताही असो, त्यातल्या मूलभूत मुद्यांचे त्यांना चटकन आकलन होत असे आणि त्यांच्या आधाराने स्वतंत्रपणे निर्णय घेणे त्यांना शक्य होत असे. विद्यार्थि-आंदोलन, नक्षलवाद, प्रादेशिक-भाषिक-धार्मिक पिसाटपणा वगैरे प्रश्नांची यशवंतरावांनी केलेली मांडणी या संदर्भात लक्षणीय ठरते. दुसरे असे, की कोणत्याही प्रसंगाकडे व्यापक व साक्षेपी दृष्टीने पाहणे त्यांना शक्य झाले होते. त्यांच्या नेतृत्वाचा प्रादेशिक पाया किंवा मराठी माणसाच्या मनात काही ऐतिहासिक कारणांनी पक्की पेरून ठेवलेली आत्मकेंद्रितता यांच्या मर्यादा ते आपल्या वैचारिक प्रगल्भतेतूनच ओलांडू शकले. मराठी अस्मिता आणि राष्ट्रनिष्ठा यांत त्यांना कधीच अंतर्विग्रह जाणवला नाही. तिसरा लाभ असा, की या त्यांच्या व्यासंगामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्वात, इतर चंचल व शब्दशूर नेत्यांच्या तुलनेने, घनगंभीर संयम आणि लोभस अबोलपणाही प्रादुर्भूत झाला असावा. शिवाय, जातीयतेकडे स्वाभाविक कल असणाऱ्या राजकारणाला जात्यतीत करण्याची निकडही त्यांना या परिपक्वतेतून भासली असावी. परिणामी खालच्या पातळीवरचे कुटिल कपट-कारस्थान किंवा आपमतलबी छक्केपंजे असे स्वरूप त्यांच्या राजकारणाला कधीच आले नाही. त्यांचे व्यक्तिमत्त्व व राजकीय चारित्र्य

इतके तगडे विरोधक सामन्याला असतानादेखील, कधीच टीकास्पद ठरले नाही. मराठीच नव्हे, तर भारतीय राजकारणातही त्यांच्या या निरपवाद शुचितेला बहुधा तोड नसावी.

संसदीय नेतृत्व आणि अभ्यासपूर्ण वक्तृत्व

व्यक्तिमत्त्वाची ठेवणच वैचारिक आणि व्यासंगी अशी असल्यामुळे यशवंतराव कोणत्याही व्यासपीठावरून जे बोलत असत, ते अत्यंत मुद्देसूद, मर्मग्राही आणि प्रसंगोचित असायचे. प्रसंगावधान व समयसूचकता बाळगणारा त्यांच्याइतका राजकीय पुढारी विरळाच! मुख्यमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री वगैरे पदांवरून त्यांनी विधिमंडळांमध्ये जी वेळोवेळी भाषणे केली, त्यातून त्यांचे संसदीय नैपुण्य पुरेपूर व्यक्त होते. विरोधी पक्षसदस्यांना विश्वासात घेण्याचे त्यांचे आपले स्वतःचे खास तंत्र होते. ज्या खात्याचा प्रभार त्यांच्याकडे असायचा, त्याच्याशी संबंधित सर्व प्रश्नांचा व बाजूंचा ते सूक्ष्म अभ्यास करीत असत. विधिमंडळाच्या कामकाजात ते मनःपूर्वक सहभागी होत असत. पूर्वतयारी पुरेशी नसणे, उडवाउडवीची उत्तरे देऊन वेळ मारून नेणे, विरोधकांचा अकारण अधिक्षेप करणे वा अरेरावी करणे असे प्रकार त्यांच्या संसदीय कारकीर्दीत त्यांच्या हातून सहसा घडले नाहीत. ते एक मातब्बर संसदपटू असल्याची साक्ष त्यांच्या अनेक समकालीनांनी दिली आहे.

ते महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर मोरारजींच्या नंतर व मोराजींच्याच अनुग्रहाने आले असले, तरी त्यांची विरोधकांशी वागण्याची शैली मात्र मोरारजींपेक्षा मूलतः निराळी होती. विरोधकांची भूमिका ते आस्थेवाईकपणे समजावून घेत असत. मोरारजी आपल्या फटकळपणामुळे आपल्या समर्थकांनाही तोडीत, तर यशवंतराव आपल्या सौहार्दाद्वारे आपल्या विरोधकांनाही जोडीत असत, हा फरक अल्पावधीतच स्पष्ट झाला. आपल्या संसदीय कारकीर्दीत विरोधी आमदार-खासदारांच्या भाषणांच्या वेळी सभागृहात आवर्जून हजर राहणे, सभागृहाच्या कामकाजात यावच्छक्य जास्तीत जास्त काळ भाग घेणे, विरोधकांनी प्रसंगी उपहास वा टवाळी केली, तरी आपला तोल जाऊ न देता मार्मिक व नर्म विनोदी शैलीत हल्ला परतवून लावणे व आपली बाजू ठामपणे मांडणे, इत्यादी गोष्टी यशवंतरावांनी कटाक्षपूर्वक केल्या. सभागृहातील त्यांचे वर्तन परमसहिष्णू व आत्मविश्वासपूर्ण असूनही समतोल व संयत असायचे. सत्तारूढ, तरीही विनम्र ही मंत्रिपदाची आदर्श प्रतिमा चव्हाणांनी निर्माण केली होती. त्यांच्या राजकीय यशात या प्रतिमेचा वाटा फार मोठा होता. चर्चेच्या वेळी शाब्दिक वितंडवादापेक्षा वादास्पद प्रश्नाच्या साधकबाधक गुणवत्तेवर त्यांचा अधिक भर असायचा. अर्थात तरीसुद्धा तार्किक युक्तिवाद किंवा कोरडी आकडेवारी फेकून प्रतिपक्षाचे तोंड बंद करण्यापेक्षा सौहार्द हेच त्यांचे विरोधकांना गारद करण्याचे प्रभावी अस्त्र होते.

आपल्या खात्याची माहिती सभागृहासमोर यथातथ्य ठेवण्यासाठी ते कमालीचे कष्ट घेत असत. प्रश्न कितीही नवखे व गुंतागुंतीचे असोत, सतत माहिती मिळवणे, वस्तुस्थिती टिपत जाणे, स्वयंशिक्षण अखंड चालू ठेवणे, तक्रारींच्या अनुषंगाने आपल्या खात्याच्या कार्याची चिकित्सा करणे, लोकमताच्या सतत संपर्कात राहणे हा उद्योग चव्हाण निरंतर करीत असत. (हँजेन, १४८). सभागृहातले त्यांचे वक्तव्य त्यामुळे अभ्यासपूर्ण व वस्तुनिष्ठ तर असायचेच, शिवाय जनहितैकबुद्धी त्याच्या मुळाशी असल्याची साक्ष ऐकणाऱ्याला ताबडतोब मिळत असे. 'स्टेट्समन'च्या संपादकाने म्हटल्यानुसार 'त्यांच्या भाषणात खोचक वाक्यांच्या फैरी नसल्या, तरीही ती प्रभावी होत, कारण त्यातून त्यांचे प्रसंगावधान, वैचारिक समतोलपणा, क्लिष्ट समस्यांची उकल करण्यासाठी लागणारा चिवटपणा, त्याच्या विधानांचा समयोचितपणा व संयतपणा श्रोत्यांच्या प्रयत्यास येत असे.' (उद्धृत, कुन्हीकृष्णन, २२८). त्या काळात सत्तारूढ बाकांवरचे ते सर्वोत्तम वक्ते ठरले होते. सभागृहातच नव्हे, तर बाहेरसुद्धा वक्तृत्व हे चव्हाणांच्या नेतृत्वाचे मौलिक साधन झाले होते. श्रोत्यांसमोर लांबलचक प्रवचने ते कधीच झोडीत नसत. मोजके आणि प्रसंगोचित तेवढेच बोलत. हँजेन यांनी एक मार्मिक तुलना केली आहे, ते म्हणतात, 'मुलींच्या शाळेचे उद्घाटन असेल, तर चव्हाण स्त्रीशिक्षण विषयावर बोलतील, मोरारजी कदाचित आत्मसुखत्यागाचे बोधामृत अशा प्रसंगी पाजतील, तर नेहरू आपण कशाचे उद्घाटन करतोय्, हेच साफ विसरून अणुबॉम्ब-चाचणी आणि आशियाचे भवितव्य असल्या विषयावर विचार मांडतील.' (हँजेन, १४३).

व्यक्तिमत्व हेच अधिष्ठान

यशवंतरावांच्या नेतृत्वाचे मुख्य अधिष्ठान अर्थात त्यांचे व्यक्तिमत्व आणि व्यक्तिगत गुण हेच होते. पारंपरिकदृष्ट्या जिथे वय, सामाजिक प्रतिष्ठा व आर्थिक दर्जा या आधारेच नेतृत्व प्राप्त होई, अशा समाजात यशवंतराव आपल्या अंगच्या सद्गुणांवर अल्पवयातच नेतृत्व काबीज करू शकले, ही घटना लोकविलक्षण ठरावी. धाडस, निष्ठा, आस्था, विवेक आणि चातुर्य हे त्यांचे उपजत गुण त्यांना या कामी मोलाचे ठरले. ते एकटे आपल्या दूरदर्शित्वाच्या बळावर महाराष्ट्र काँग्रेसचा डळमळीत डोलारा सावरू शकले, हे इतिहासाला नाकारताच येणार नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत त्यांच्या प्रशासकीय कार्यक्षमतेपेक्षाही त्यांच्या राजकीय कौशल्याचाच अधिक उपयोग झाला. वाद अनेक मिटवायचे होते. भावना तीव्र होत्या; पण यशवंतरावांच्या मध्यस्थीतून समेटाच्या वाटा खुल्या होत होत्या. एखाद्या गंभीर चर्चेतही वादातल्या सर्व पक्षांना चव्हाण आपल्याच बाजूचे वाटत असत, हे

त्यांचे खास कौशल्य होते. (हॅजेन, १३३). वाटाघाटींसाठी लागणारी बुद्धीची, कुशाग्रता, प्रसंगी जुळते घेण्याचा उदारपणा हे दोन्ही गुण चव्हाणांपाशी पुरेपूर असल्याचा निर्वाळा ग. त्र्यं. माडखोलकरांनी दिला होता. (चव्हाण अभिनंदन ग्रंथ, १५).

"यशवंतरावांच्या ठिकाणी पहिला बाजीराव आणि नाना फडणवीस यांच्यांतले गुण एकवटले आहेत" या आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या विधानाचा हवाला देऊन हे विधान यशवंतरावांबाबत कसे समर्पक व मार्मिक ठरते, हे माडखोलकरांनी पुढील शब्दांत नमूद केले होते :

"बाजीरावाने मिळालेल्या प्रत्येक संधीचा फायदा घेऊन मराठी राज्य वाढविले व आपल्या संग्राहक धोरणाने सर्व जातींची नवी सरदार घराणी निर्माण करून त्या राज्याला बळकटी आणली. (पण) बाजीराव हा पराक्रमी असला, तरी हिशेबी नव्हता; धाडसी असला, तरी कारस्थानी नव्हता व दिलदार असला, तरी विवेकी नव्हता. उलट, नाना फडणवीस हा भित्रा खरा, पण पाताळयंत्री, हिशेबी व सावध होता...." यशवंतरावांची चार वर्षांची व्यवहारनीती व राज्यकारभार त्यांच्या अंगी बाजीराव व नाना यांच्या सद्‌गुणांचा समन्वय असल्याचे सिद्ध करणारी आहे, असा निर्वाळा देऊन "शब्दाला जागणारा व चारित्र्याला जपणारा (त्यांच्या) इतका संग्राहक वृत्तीचा, पण सावध राज्यधुरीण मी तरी पाहिलेला नाही," असे म्हटले होते. प्रसंगी लोकनिंदा व लोकविरोध पत्करूनही आपल्या ध्येयावर अडिग राहणारा, स्वतःच्या राजकीय चारित्र्याचा आपले शत्रू आणि मित्र दोहोंवरही सारखाच वचक निर्माण करणारा लोकनेता असेही यशवंतरावांचे वर्णन त्यांनी केले आहे (कित्ता).

लवचिकत्व

अधिक पावसाळे खाल्ल्यामुळे कडक न होता मऊ व चिवट होणाऱ्या सागवानाप्रमाणे यशवंतरावांचे व्यक्तिमत्व होते. या त्यांच्या लवचिकपणाचे श्रेय सतत सिंहावलोकन करीत, परिस्थितीचा अदमास घेत आणि परिस्थितीशी मिळतेजुळते घेत वाटचाल करण्याची त्यांनी लहानपणापासून जोपासलेल्या सवयीला द्यावे लागते. "गावात शिरून मोठाल्या हवेल्या पाहिल्या, तरी जिथून शिरलो, ती वेस विसरायची नाही" ('ऋणानुबंध' : २०) हा स्वभावधर्म झाल्यामुळे सत्ता वा वैभवाचा ताठरपणा त्यांच्या आयुष्यात कोणत्याच टप्प्यावर शिरला नाही.

चव्हाणांच्या या लवचिकपणावर त्यांच्या टीकाकारांनी बराच आक्षेप वेळोवेळी घेतला होता. स्वतः चव्हाणांनी या आक्षेपकांना कधी प्रत्युत्तर दिलेले आढळत नाही. पण

अन्यत्र तात्यासाहेब केळकरांबद्दल लिहीत असताना केळकरांच्या तडजोडवादी स्वभावाचे समर्थनपर स्पष्टीकरण चव्हाणांनी दिले आहे, त्यातून अप्रत्यक्षतः त्यांच्या स्वतःच्याही भूमिकेची कैफियत मिळू शकते. ते म्हणतात, :

"केळकरांना 'तडजोड' प्रिय होती, याचे कारण त्यांची विचारशैलीच तशी होती. भावना जेव्हा उद्दीपित झालेल्या असतात, तेव्हा अशा विचारशैलीच्या लोकांची उपेक्षा होते.... पण मध्यममार्ग पत्करणाऱ्यांना हा धोका पत्करावाच लागतो..... अशा विचारवंतांची किंमत व्यवहारातील चलनी नाण्याप्रमाणे कमी-जास्त कधीच होत नाही, तर त्यांची किंमत वस्तुगुणनिष्ठ (इंट्रिन्झिक) असते" (कित्ता, २४०).

नेतृत्वगुण-समुच्चय

राजकीय दूरदृष्टी, मनाचा पक्केपणा, स्व-पर-बलाबल पारखण्याची सावधगिरी, परिस्थितीचा अचूक अंदाज घेऊन टिपण साधण्याचे कौशल्य, लाघवी भाषा, सौम्य तरीही तेजस्वी वाणी, विजिगीषू कर्तृत्व, रसज्ञता, अभिरुचिसंपन्नता वगैरे अनेक 'यशवंत' गुण चव्हाणांच्या व्यक्तिमत्त्वात असल्यामुळेच एक लोकोत्तर नेतृत्व त्यातून उभे राहू शकले. या गुणांमध्ये जन्मसिद्धतेपेक्षा कष्टसाध्यतेचाच भाग मोठा होता, हे विशेषच लक्षणीय ठरते. किंबहुना त्यामुळेच 'कर्षकाच्या कुळीचा (हा) महाधोरणी धूर्त लोकाग्रणी' समकालीन शाहिरांच्या पोवाड्यांचा विषय झाला होता.

- आणि या गुणसमुच्चयामुळेच यशवंतराव नेहरूंच्या नंतर संबंध देशाचे समर्थपणे नेतृत्व करू शकतील, असा होरा अनेकांनी व्यक्त केला होता. हँजेनसारख्या अभ्यासकाने 'हू आफ्टर नेहरू?' या आपल्या ग्रंथात नेहरूंच्या सर्व संभाव्य वारसदारांच्या गुणावगुणांचा परामर्श घेताना चव्हाणांबद्दल म्हटले होते, की इतर कुणाहीपेक्षा नेहरूंचे वारसदार म्हणून पुढे येण्याची संधी यशवंतराव चव्हाणांनाच सर्वाधिक आहे. 'मँचेस्टर गार्डियन'नेसुद्धा या विधानाला पुष्टी देऊन असे म्हटले होते, की नेहरू आणखी एखादी निवडणूक होईपर्यंत जगले, तर त्यांच्यानंतर चव्हाण हेच त्यांचे वारसदार होण्याच्या योग्यतेचे असतील.

खुद्द यशवंतरावांनाही बहुधा या आपल्या बलस्थानांची यथोचित जाणीव असावी, हे त्यांच्या पुढील निवेदनावरूनच दिसून येते. ते लिहितात :

"गेल्या चाळीस वर्षांत... दहा निवडणुका मी लढवल्या.... मी (त्या) सर्व जिंकल्या आहेत .... १९४६ (ची) निवडणूक आणि नासिकची पार्लमेंटरी निवडणूक सोडली, तर माझ्या सर्व निवडणुका वादळी होत्या. प्रतिपक्षांनी आपापल्या मुलुखमैदानी तोफा डागल्या होत्या. अभद्र आणि कटुतेच्या प्रचाराचा त्यांनी कळस केला. या सर्व निवडणुकांत माझा

मोठा प्रचारक मीच असे. संभाषण-शैलीतील मनमिळाऊ, सुसंस्कृत, तत्त्वनिष्ठ आणि प्रांजळ प्रचार ही माझी मोठी शक्ती आहे, असे माझ्या लक्षात आले आणि या सर्व वादळांत... मी अपराजित ठरलो" ('कृष्णाकाठ' : ३०८).

नेतृत्व-बांधणीतील कच्चे दुवे

उपर्युक्त गुणांच्या बळावर यशवंतरावांच्या नेतृत्वाचा आलेख झपाट्याने उंचावत गेला, हे खरे असले, तरी त्यांच्या राजकीय जीवनाच्या अंतिम पर्वात त्याची ऊर्ध्वगामी दिशा बदलून ती अधोगामी झाली होती, हे तटस्थ अभ्यासकाला नाकारता येणार नाही. आणि या दिशांतरांचे रहस्य त्यांच्या नेतृत्वबांधणीतील काही त्रुटींमध्ये शोधणे त्याला क्रमप्राप्त ठरते. नेहरू-शास्त्रींच्या काळापर्यंत भारतीय राजकारणात सद्‌गुणांची कदर होत असे, पण श्रीमती गांधींच्या राजकारण-शैलीत सदाचरणी व सत्प्रवृत्त नेतृत्वगुणांना मुळी स्थानच नसल्यामुळे चव्हाणांच्या नेतृत्वाला ग्रहण लागले, असे एक ठोक स्पष्टीकरण दिले जाऊ शकते. ते खोटे नसले, तरी अपूर्ण खचितच आहे. चव्हाणांच्या नेतृत्वाच्या उभारणी-क्रमात राहून गेलेले कच्चे दुवे त्यांच्या राजकीय विजनवासाची अधिक समर्पक उकल घडवू शकतात.

यशवंतरावांच्या नेतृत्व- बांधणीतील पहिले वैगुण्य असे दिसते, ते असे, की त्यांनी केलेले सर्व प्रयत्न व्यक्तिगत पातळीवरचेच होते, सामुदायिक पातळीकडे त्यांचे दुर्लक्ष झाले होते. त्यांनीच केलेल्या नेतृत्वाच्या व्याख्येत ज्या सामुदायिक परिणामक्षमता नेतृत्व-बांधणीद्वारे चव्हाणांना साध्य होऊ शकली नाही. असाधारण व्यक्तिगत गुण, अतुलनीय बौद्धिक पूर्वतयारी, अथवा व्यक्तिगत परिश्रम, निष्ठा व सचोटी यांच्या बळावर व्यक्तित्वप्रधान नेतृत्व प्रभावशाली अवश्य ठरत असते, पण त्याला सामूहिक पुरुषार्थाचा आयाम कधीच येऊ शकत नाही. आपल्या भोवतालच्यांना आपल्या पातळीपर्यंत उंचावणे अशा नेतृत्वाला कधीच शक्य होत नाही. यशवंतरावांचे हेच झालेले आढळते. त्यांना व्यक्तिगत लोकप्रियतेच्या आधारे निवडणुका जिंकता आल्या, तरी तत्त्वनिष्ठ पक्षसंघटना उभारण्यात यश मिळू शकले नाही. त्यांनी माणसे जोडली, मैत्री जोपासली; पण संघटना बांधली नाही. विषण्ण स्वरात ते सांगतात,

"राजकारणामध्ये यशस्वी होणे हे एक कष्टसाध्य काम आहे. संघटनेतील कार्यकर्त्यांमध्ये स्नेहाचे जाळे विणावे लागते, माणसे सांभाळावी, वाढवावी लागतात व त्यासाठी असंख्यांच्या मनांची जपणूक वर्षानुवर्ष करावी लागते. पण त्यांतले काही थोडे पण मोठे लोक त्यांच्या महत्त्वाकांक्षेला किंचितसा ओरखडा जाताच वैरभावाची फणा उभारतात.

अशा स्वभावाचे काही नमुने पाहिल्यानंतर मी निराश होतो..." ('ऋणानुबंध' : ३१). सामाजिक-आर्थिक विषमतेबद्दल तिडीक निर्माण करणारी कार्यकर्त्यांची फळी आपण आजवर उभी करू शकलो नाही, याची खंत १९७८ साली लिहिताना त्यांना अशी व्यक्त करावी लागली होती. (कित्ता, ६१)

संसदीय नेतृत्व-आघाडीला प्राथम्य देऊन सामाजिक- आर्थिक चळवळींची आघाडी दुर्लक्षित ठेवणे ही यशवंतरावांच्या नेतृत्व- बांधणीतील दुसरी त्रुटी जाणवते. १९४२ साली ज्या साथीदारांबरोबर चव्हाणांनी आपल्या पुढारीपणाची उमेदवारी केली, ते जवळपास सगळेच त्यांना पुढील राजकीय आयुष्यात दुरावले होते. असे घडण्याचे स्पष्टीकरण या त्रुटीतच सापडते. चव्हाणांना ग्रामीण-शोषित बहुजन-समाजाच्या प्रश्नांबद्दल पोटतिडीक असली, तरी त्यांच्या वतीने चळवळी करण्याकडे त्यांचा फारसा कल नव्हता. सत्यशोधक चळवळ ही मुळात दलित-शोषितांवरील अन्यायाच्या निराकरणार्थ सुरू झालेली झुंजार चळवळ होती. तिच्याबद्दल सार्वजनिक जीवनाच्या आरंभापासूनच चव्हाणांच्या मनात अढी होती. सत्यशोधक समाजाची विचारसरणी 'एकांगी, जातीयवादी, राष्ट्रद्रोही व संकुचित आहे,' या पूर्वग्रहापोटी यशवंतराव त्या चळवळीचा पुरोगामी, क्रांतिकारी, परिवर्तनाग्रही व बहुजन-समाजाला नवे आत्मभान देणारा मूळ गाभा समजून घेऊच शकले नाही. विकसनशील समाजातील शोषितांच्या चळवळी सकृद्दर्शनी जातिवाचक वाटल्या, तरी तेवढ्यावरून त्यांचे क्रांतिकारकत्व नाकारणे चूक ठरते. इतकेच नव्हे, तर आपल्यासारख्या समाजात चळवळ कितीही क्रांतिकारक असली, तरी तिचा प्रथमाविष्कार जातीय परिभाषेत होणे अपरिहार्य असते. चव्हाणांनी अशा दृष्टिकोनातून या चळवळींचा विचार न केल्यामुळे ते त्यांच्याशी तादात्म्य पावू शकले नाहीत. व्यापक निष्ठेचे अधिष्ठान म्हणून त्यांनी काँग्रेसला जवळ केले आणि काँग्रेस जसजशी संसदीय मनोवृत्तीच्या आहारी गेली, तसतसे यशवंतरावही तिच्या मागे फरफटत गेले.

बहुजन-शोषितांच्या चळवळीपासून आलेला हा दुरावाच त्यांना सत्ताकारणात व्यग्र ठेवण्यास कारणीभूत ठरला. सत्ताकारण ही चव्हाणांच्या नेतृत्वाची गंभीर मर्यादा होऊन बसली. काँग्रेसच्या बाहेर जायचे, तर सत्तेवर राहता येणार नाही. सरकारच्या विरोधात उभे राहून चळवळी कराव्या लागतील. सत्तेवाचून समाजहिताचे कार्य कसे करायचे? असा प्रश्न बहुधा चव्हाणांना दरवेळी पडला असावा. पंख छाटलेल्या पक्ष्यागत त्यांची राजकीय स्थिती झाली होती. विचारसरणी काय होती? तिचे वर्गीय अंतरंग कसे होते? वगैरे प्रश्न त्यांनी वेळीच विचारले असते, तर "ज्या वातावरणात आम्ही वाढत होतो, त्या दुखणाऱ्या हिंदू समाजातील उच्चनीचपणामधील विषमता, गरीब- श्रीमंत, महात्मा फुले

यांचे विचार या बाबतीत फार काही करू शकलो नाही. हा अपुरेपणा, त्याची तीव्र जाणीव, विफलतेची भावना आजही बोचते. म्हणूनच कर्तृत्वाचे पूर्ण सार्थक झाले नाही, असे वाटते" (कित्ता, ६१). असा विषाद त्यांना राजकीय वानप्रस्थाश्रमात करावा लागला नसता जन-आंदोलनांचे नेतृत्व करून त्यांचा पुरोगामी आशय वाढवीत नेणे आणि त्यांच्यांतील हीण क्रमशः कमी करीत जाणे यशवंतरावांना शक्य होते. पण ते त्यांच्या नेतृत्व-बांधणीत बसले नाही. परिणामी संसदीय राजकारणात ते गुंतून पडले. तिथे त्यांची सरशीही वेगाने झाली. पण परिवर्तनाग्रही बहुजन-चळवळीला त्यातून फारशी चालना मिळू शकली नाही. 'नेतृत्व हे समूहकार्य असते' (लीडरशिप इज् ए ग्रूप-फंक्शन) असे मानल्यास या निकषावर चव्हाणांचे नेतृत्व अपुरे पडले, हे मान्य करणे भाग ठरते.

प्रवाहाबाहेर पडण्याच्या भीतीमुळेच यशवंतरावांच्या नेतृत्वातील अंगभूत लवचिकपणा कसोटीस लागला. त्यांच्या राजकीय कारकीर्दीत असे अनेक प्रसंग उद्‌भवले होते, की जेव्हा तत्त्वनिष्ठेचे राजकारण करून वेळ पडल्यास पदावरही पाणी सोडण्याचा तडफदारपणा त्यांना दाखवता आला असता. आणि त्यांनी तसे केले असते, तर इतिहास बदलला असता. पण त्यांनी तसे करायचे टाळले. हातची सत्ता सुटली, तरी आपण पुन्हा नव्याने पर्यायी ताकद खडी करू शकू, अशी धमक, आत्मविश्वास व निर्धार यशवंतरावांनी उमेदीच्या काळात दाखवला नाही आणि शेवटी जेव्हा दाखवला, तेव्हा फार उशीर झाला होता. 'संधिसाधू', 'कुंपणावरचे', 'तडजोडवादी', 'कचखाऊ' ही त्यांची प्रतिमा घडवण्यास यशवंतरावांच्या नेतृत्व-बांधणीतील हा कच्चा दुवाच कारणीभूत ठरला.

●●●

२. यशवंतराव आणि महाराष्ट्राचे राजकारण

यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्राचे राजकारण यांच्यामधील अन्योन्याश्रयी संबंध देशात बिनतोडच म्हणावे लागतील. एक नेता आणि एक राज्य यांच्या राजकीय वाटचालीची इतकी घनिष्ठ सांधेजोड इतक्या प्रदीर्घ कालावधीसाठी अन्यत्र क्वचितच घडलेली असावी. यशवंतराव महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात नऊ वर्षे होते किंवा मुख्यमंत्रिपदावर सहा वर्षे होते, एवढ्यापुरता हा संबंध मुळीच सीमित नव्हता. गृहखात्याचे सांसदीय सचिव म्हणून यशवंतराव जगाला माहीत होण्याच्या कित्येक वर्षे आधीपासून ते आपल्या पद्धतीने आपल्या मर्यादित कार्यक्षेत्रात महाराष्ट्राच्या राजकारणाला वळण देण्याची धडपड करीत आले होते आणि १९६२ साली देशाचे संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला गेल्यानंतरसुद्धा महाराष्ट्राच्या राजकारणावर यशवंतरावांची पकड अनेक वर्षे कायम होती. तसे पाहू गेल्यास त्यांचे निधन होईपर्यंत त्यांच्याशी इमान ठेवून असणारा एक शक्तिप्रवाह मराठी राजकारणात कमी-अधिक प्रभाव गाजवीतच होता. त्यामुळे यशवंतराव आणि महाराष्ट्राचे राजकारण या विषयाचा परामर्श घ्यायचा, तर उण्यापुऱ्या अर्ध्या शतकात घडून गेलेल्या घडामोडींचा संदर्भ अपरिहार्यतः घ्यावा लागेल.

यशवंतरावांची राजकीय वाटचाल निष्कंटक कधीच नव्हती. उलट, ती धकाधकीचीच होती. कमाल लोकप्रियता आणि तितकीच लोकनिंदा दोहोंचा वर्षाव चव्हाणांवर झाला होता. महाराष्ट्राच्या राजकारणाने अत्युत्कट आनंदाचे क्षण जसे त्यांना उपभोगायला दिले, तद्वतच अवहेलनेचे व मानहानीचे दाहक अनुभवही त्यांच्या पदरात घातलेले आहेत. 'महाराष्ट्रात काँग्रेस जिवंत ठेवणारे धुरंधर मुत्सद्दी' असे गौरवोद्गार जसे त्यांच्या वाट्याला आले, त्याचप्रमाणे 'महाराष्ट्राचे मारेकरी, विश्वासघातकी सूर्याजी पिसाळ' अशा

शेलक्या विशेषणांनी त्यांची निर्भर्त्सनाही मराठी माणसांनी प्रसंगोपात्त केली आहे. महाराष्ट्राचे राजकारण करीत असताना त्यांनी संकुचित प्रांतनिष्ठेपेक्षा व्यापक राष्ट्रनिष्ठेला सदैव प्रमाण मानल्याचे सांगून त्यांच्या चुकांवर पांघरूण घालणारे राजकीय भाष्यकार जसे आढळतात, तसेच अखिल भारतीय पातळीवर एकाहून एक वरचढ महत्त्वाच्या भूमिका पार पाडीत असतानाही चव्हाण आपल्या संकुचित प्रादेशिक प्रतिमेच्या चौकटीतून बाहेर पडू शकले नाहीत, असा बोल लावणाऱ्या टीकाकारांचीही कधीच वाण भासत नाही.

बौद्धिक वकूब आणि शैलीदार आविष्कारशक्ती अंगी असूनही चव्हाणांनी आपल्या आक्षेपकांना प्रत्युत्तर दिल्याचे सहसा कधीच आढळत नाही. वेळोवेळी वादास्पद ठरलेल्या त्यांच्या भूमिका, विधाने वा निर्णय यासंबंधी त्यांची अधिकृत भूमिका त्यांनी कुठेच संगतवार नमूद करून ठेवलेली सापडत नाही. त्यांच्या राजकीय वर्तनाच्या संदर्भात असंख्य प्रश्न अभ्यासकांना पडतात. उदाहरणार्थ, सत्यशोधक चळवळ आणि ब्राह्मणेतर पक्ष यांच्याशी त्यांचे मतभेद नेमके कोणत्या मुद्द्यांवर होते आणि त्यांच्याविषयी यशवंतरावांचे निश्चित मूल्यमापन कसे होते? सातारच्या प्रतिसरकारच्या आंदोलनात यशवंतरावांचा सहभाग कितपत होता आणि मतभिन्नतेचा नेमका आशय काय होता? रॉयवादी गट, काँग्रेस समाजवादी पक्ष व शेतकरी कामगार पक्ष काही निश्चित भूमिका घेऊन काँग्रेसबाहेर पडले, त्या प्रत्येक वेळी या बंडखोरांशी वैचारिक जवळीक असूनही चव्हाण काँग्रेसला चिकटून का राहिले आणि आपल्या प्रतिष्ठेचे व लोकप्रियतेचे बळ त्यांनी काँग्रेसच्या पाठीशी कशासाठी उभे केले? स्वतः मनाने संयुक्त महाराष्ट्रवादी असूनही द्वैभाषिकाचे जोखड त्यांनी का पत्करले आणि जिवाच्या आकांताने ते यशस्वी करण्याचा खटाटोप त्यांनी का केला? संयुक्त महाराष्ट्रापेक्षा नेहरूंना मोठे मानण्याची घोषणा करून लोकमताला त्यांनी का डिवचले? काळाची गरज म्हणून देव-देवगिरीकर प्रभृतींच्या नेतृत्वाला शह देणे समजू शकते, पण भाऊसाहेब हिरे यांना शह देण्यामागे यशवंतरावांची नेमकी कोणती प्रेरणा होती?

महाराष्ट्रात मराठा अहंकाराची मुहूर्तमेढ कळत-नकळत यशवंतरावांनी रोवली, या आक्षेपात कितपत तथ्यांश आहे? तळापासून पक्षबांधणीचे संकल्प अनेकदा सोडणाऱ्या यशवंतरावांना त्या कार्यात कोणत्या कारणांमुळे अपयश पत्करावे लागले? ते मुख्यमंत्रिपदावर असताना राज्याच्या यशाची जी चढती कमान आढळली, ती ते त्या पदावरून जाताच खाली घसरण्यास कोणती परिस्थिती कारणीभूत झाली? मराठा समाज हा महाराष्ट्र काँग्रेसचा खंबीर पाया आहे, हे ठाऊक असूनही आपल्यानंतर मराठेतर समाजाचे एक नव्हे, तर दोन मुख्यमंत्री महाराष्ट्रावर लादण्यामागे चव्हाणांचे कोणते राजकीय गणित

होते? पुढच्या काळात महाराष्ट्र काँग्रेसमध्ये सुरू झालेल्या सुंदोपसुंदीचे अपश्रेय यशवंतरावांना टाळता येईल काय?

यशवंतरावांकडून वरीलपैकी कोणत्याच प्रश्नाचे समाधानकारक व तर्कसंगत उत्तर अभ्यासकांना मिळालेले नाही आणि या प्रश्नांची समर्पक उत्तरे मिळाल्यावाचून महाराष्ट्राच्या राजकारणाच्या संदर्भात यशवंतरावांनी पार पाडलेल्या भूमिकेचे साक्षेपी मूल्यमापन होण्याची शक्यताच दिसत नाही. ही उत्तरे शोधण्यासाठी यशवंतरावांचे संकीर्ण प्रासंगिक उद्‌गार आणि वक्तव्ये, त्यांचे आत्मकथनपर लेखन, परिस्थितिजन्य पुरावे, काही सविस्तर मुलाखती, चरित्रात्मक लेखन आणि घटनाक्रमातील कार्यकारणाची चिकित्सा एवढ्यावरच भिस्त ठेवावी लागते.

राजकारण-प्रवेशाची पूर्वतयारी

विद्यार्थी असतानाच यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या राजकारणात प्रवेश केला होता. मॅट्रिकला पोचेपर्यंतच्या शालेय जीवनातली तीन वर्षे त्यांनी निरनिराळ्या चळवळींच्या निमित्ताने तुरुंगात व्यतीत केली होती. यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या राजकारणात उमेदवारी करण्याचा हा कालखंड तत्पूर्वीच्या साठसत्तर वर्षांच्या तुलनेत खूपच संस्कारक्षम होता. या काळात अभूतपूर्व वेगाने घटना घडून येत असल्यामुळे अल्पावधीत जे शिकणे नवोदित नेतृत्वाला शक्य झाले होते, ते आधीच्या पिढीला दीर्घकाळ घालवूनही साध्य झाले नव्हते. यशवंतरावांना याचा बराच लाभ झाला. वाढदिवसांनी मोजले जाणारे त्यांचे वय जरी लहान असले, तरी त्यांची राजकीय समज मात्र मजल मारून बरीच पुढे गेली. त्यांचे जिल्हा काँग्रेसमधील नेतृत्व निर्विवादपणे मान्य केले होते. 'मनाने प्रौढ व वयाने लहान असे उमेदीने भरलेले हे तरुण गृहस्थ आमच्या नव्या गटाचे नेतृत्व आत दाखल होताच थोड्याच वर्षांत करू लागले.' (श्री यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ, ७). अशा शब्दांत महाराष्ट्रातील ज्येष्ठ पंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सातारा जिल्हा काँग्रेसमधील यशवंतरावांच्या स्थानाबद्दल गौरवोद्‌गार काढले आहेत. अन्य क्षेत्रात आपण कितीही मोठे असलो, तरी जिल्हा काँग्रेसपुरते चव्हाणांनाच आपले नेते मानीत असू, अशी कबुलीही त्यांनी दिली आहे.

बहुजन-स्तरातून आले असल्यामुळे यशवंतरावांना स्वातंत्र्याचा सकारात्मक आशय पांढरपेशा नेत्यांच्या नकारात्मक स्वातंत्र्य-कल्पनेपेक्षा अधिक भावला होता. ब्रिटिशांना देशातून हाकलून लावणे हा स्वातंत्र्याचा नकारात्मक किंवा अभावात्मक अर्थ होता, तर सामान्य जनतेच्या जीवनातील क्रांती व आर्थिक बंधमुक्ती, समता, सामाजिक व आर्थिक

न्याय व शोषणमुक्ती हा त्याचा सकारात्मक किंवा भावात्मक संदर्भ होता. १९३० साली गांधींच्या नेतृत्त्वाखाली सुरू झालेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीद्वारे काँग्रेसचे शहरी मध्यमवर्गीय स्वरूप जाऊन तिला जन-आंदोलनाचे स्वरूप येईल, अशी शक्यता बहुजन-समाजाच्या अनेक नेत्यांप्रमाणेच यशवंतरावांसारख्या कार्यकर्त्यालाही जाणवली होती.

तत्पूर्वी काँग्रेसने ग्रामीण जनसामान्यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न कधीच फारसा केला नव्हता. यशवंतरावांना ती काँग्रेस चळवळीची मोठीच उणीव वाटायची. शेतकऱ्यांशी केलेल्या चर्चेतून हा वर्ग काँग्रेस चळवळीत का सहभागी होऊ इच्छित नाही, याची कारणे यशवंतरावांना उमगली होती; आणि हेही त्यांना पक्के समजले होते, की जोपर्यंत ग्रामीण समाज काँग्रेसच्या झेंड्याखाली उभा राहत नाही, तोपर्यंत ती चळवळ वाढण्याची सुतराम् शक्यता नाही. खेड्यापाड्यांत जाऊन लोकजागृतीचे कार्य त्यांनी सुरू केले. लोकांना चळवळीसंबंधी समजणे ही संप्रेषणाची (कम्युनिकेशन) एक बाजू होती. तितकीच महत्त्वाची दुसरी बाजू म्हणजे लोकांच्या प्रश्नांना चळवळीने हातांत घेणे. त्याखेरीज संप्रेषणाची क्रिया प्रभावीपणे घडून येणे अशक्य होते. पण त्यासाठी आधी लोकांच्या मनात ब्रिटिश सत्तेविषयी असलेले भय आणि धाक घालवणे आवश्यक होते.

प्रत्यक्ष चळवळीत

वारणेच्या काठी शिराळे पेठ्यातील बिळाशी या गावी एक अभिनव प्रकार घडून आला. मोठ्या प्रमाणावर जंगल-सत्याग्रह होऊन एका परीने त्या भागातील ब्रिटिश सरकारचा अंमल संपला. सरकारने त्यास बंड ठरवले, तरी तो जनतेने पुकारलेला शांततामय असहकार होता. पाटील-तलाठ्यांना लोकांचे सहकार्य मिळेना, म्हणून त्यांनी राजीनामे दिले होते. 'जन-आंदोलनातून एकदा का ही नवी शक्ती निर्माण केली व सरकारला असलेल्या सहकार्याचा हात काढून घेतला, की राज्य कोलमडू शकते,' या गांधीजींच्या असहकार मूलमंत्राचे प्रात्यक्षिकच जणू बिळाशी प्रयोगातून यशवंतराव व त्यांचे सहकारी यांना पाहायला मिळाले ('कृष्णाकाठ,' : ७५) सरकारने दडपशाही सुरू केली. सरकारी अत्याचाराने चिडलेल्या लोकांना यशवंतरावांनी भूमिगतरीत्या भेटून धीर दिला. पोलिसी नजरा चुकवून भाषणे दिली. जिल्ह्यातील अन्यत्र चालू असलेल्या चळवळींची माहिती सांगून त्यांचा हुरूप वाढवला.

१९३२-३३ साली कारावासात केलेला अभ्यास, घडलेला विचारवंतांचा सहवास, डाव्या विचारसरणीबद्दल मनात असलेल्या आकर्षणाला लाभलेली वैचारिक स्पष्टता, मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा जवळून परिचय, इत्यादी संस्कारामुळे स्वतः यशवंतराव

आणि त्यांच्या भोवताली जमलेला सातारा जिल्हा काँग्रेसमधील तरुणांचा गट पुरोगामी आकांक्षांनी प्रेरित झाला होता. प्रांतिक पातळीवरच्या व मध्यवर्ती नेत्यांना हा पुरोगामी दृष्टिकोन मान्य होणे शक्यच नव्हते. त्यांनी भाऊसाहेब सोमण व बुवा गोसावी यांच्याकरवी जिल्हा काँग्रेसमध्ये उजव्या गटाचे बहुमत घडवून पुढारीपणाची सूत्रे 'जैसे थे' वादी शक्तींच्या हाती सोपवली होती. १९३७ च्या निवडणुकीच्या वेळी या दोन प्रवाहांमधील संघर्ष अटळ ठरला.

या काळात प्रांतिक पक्षनेतृत्वाच्या जागी तशी पोकळीच होती. यशवंतरावांनी पुढील शब्दांत तत्कालीन स्थितीचे विश्लेषण केले होते :

"प्रांताच्या पातळीवर गांधींचा विचार न स्वीकारलेले जुने पुणेकर नाममात्र काँग्रेस पुढारी होते, त्यांनी अजून व्यवहार्यतः काँग्रेस सोडलेली नाही, पण त्यांचा काँग्रेसच्या जन-आंदोलनावर विश्वास नाही... गांधीजींचे नेतृत्व मानणारे शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ यांचे नेतृत्व अजून निःशंकपणे प्रस्थापित व्हावयाचे आहे... त्यांची अजूनही नेतृत्व-संघटनेच्या दृष्टीने जिल्ह्याजिल्ह्यांतील कार्यकर्त्यांची साखळी निर्माण झाली नाही..." ('कृष्णाकाठ' : १६८).

चव्हाणांचे हे विश्लेषण वस्तुनिष्ठ होते. प्रत्येक जिल्ह्याप्रमाणेच साताऱ्यातही पूर्वापार वृद्ध वकील किंवा डॉक्टर यांच्याकडेच काँग्रेसचे नेतृत्व चालत आलेले होते. जिल्ह्यात १९३० नंतरच्या काळात, कार्यकर्त्यांची जी पिढी प्रत्यक्ष चळवळींमधून निर्माण झाली होती, तिचे काम आणि कर्तृत्व या जिल्हा-पुढाऱ्यांना जवळून ठाऊक नव्हते, त्यामुळे त्यांच्यामध्ये जवळीकही नव्हती. जुनाट पद्धतीनेच ती मंडळी निवडणुकांचा विचार करीत होती. मतांचे ठेकेदार असलेले जे कुणी प्रत्येक खेड्यात वा गावात जमीनदार, सावकार, व्यापारी, डॉक्टर वा वकील असतील, त्यांना गाठून मते मिळवणे हाच त्यांचा निवडणूक-प्रचाराचा अर्थ होता. ही परिस्थिती बदलायला पाहिजे, हे यशवंतरावांच्या मनाने घेतले.

पुढारी विरुद्ध कार्यकर्ते

बदलत्या काळाचे भान ठेवून पक्षश्रेष्ठींनी शेतकऱ्यांचा प्रतिनिधी असलेल्या आत्माराम बापू पाटील या तरुण कार्यकर्त्याला निवडणुकीचे तिकीट द्यावे, असा प्रयत्न यशवंतरावांनी केला. जिल्हा-पातळीवर त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. सोमण-गोसावी प्रभृतीचा कल जुन्या ब्राह्मणेतर पक्षातल्या कूपर गटाकडे होता. एका अर्थाने पुढारी व कार्यकर्ते यांच्यांत एक संघर्ष उभा राहिला होता. ग्रामीण महाराष्ट्रात नव्या विचाराने भारलेली व नव्या शक्तीने संघटित झालेली नवीन माणसे उभी राहिली आहेत, हे सत्य

स्वीकारायला प्रांतिकचेही पुढारी तयार नव्हते. शेवटी सरदार पटेल यांनाच प्रत्यक्ष भेटून आपले म्हणणे सांगण्याचे धाडस यशवंतरावांनी केले. नव्या उमेदवाराच्या यशाची हमी त्यांनी कार्यकर्त्यांच्या वतीने सरदारांना दिली. सरदारांनी त्यांचा प्रस्ताव स्वीकारला.

यशवंतरावांनी आत्माराम बापूंच्या उमेदवारीवर केलेले भाष्य त्यांच्या त्या वेळच्या मनःस्थितीचे द्योतक होते. ते लिहितात :

"जनजीवनाला ढवळून काढणाऱ्या एका आंदोलनानंतर त्या आंदोलनात सैनिक असलेल्या कार्यकर्त्यांला जर लोकप्रतिनिधी म्हणून मान्यता मिळाली नसती, तर त्या आंदोलनाचा तो अपमान झाला असता. ... सातारा जिल्ह्यातील नव्या ग्रामीण नेतृत्वाचा उदय या उमेदवारीने केलेला आहे, ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. ही उमेदवारी आत्माराम पाटलांना न मिळता जर जुन्या ब्राह्मणेतर चळवळीतील कुणा जुन्या प्रतिष्ठिताला मिळाली असती, तर चळवळीमध्ये एक प्रकारचे निराशेचे वातावरण निर्माण झाले असते" (कित्ता, १७६).

विधिमंडळात गोरगरीब शेतकऱ्यांचे प्रश्न पोटतिडकीने मांडण्यासाठी त्यांचेच प्रतिनिधी निवडून जाणे आवश्यक आहे, हे सूत्र पकडून यशवंतराव आणि त्यांचे सहकारी यांनी प्रचार केला. आत्माराम बापू निवडून आले.

पण लवकरच यशवंतरावांच्या हे निदर्शनास आले, की पक्षश्रेष्ठींच्या शहरी उच्चभ्रू भूमिका आणि देशाची परतंत्र अवस्था यामुळे विधिमंडळाच्या द्वारे ठोस काहीही घडून येण्याची मुळीच शक्यता नाही. ही परिस्थितीच पालटणे आधी आवश्यक आहे आणि चळवळीचा रेटा वाढवूनच ती पालटणे शक्य आहे; आणि अल्पावधीतच चळवळीतून राष्ट्रीय स्वातंत्र्य-लढ्याची ताकद वाढवण्याची संधी १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनाने चव्हाणांसमोर चालून आली.

प्रतिसरकार

सत्याग्रह करून कारावास पत्करण्याऐवजी भूमिगत राहून चळवळ पुढे न्यायची, असे सातारा जिल्ह्यातील तरुण कार्यकर्त्यांनी ठरविले. यशवंतराव सांगतात,

"आमच्यापुढे दोन पर्याय होते. एक, म्हणजे ब्रिटिश सत्ता खिळखिळी करण्यासाठी त्या सत्तेला आधारभूत असलेल्या गोष्टींचा विध्वंस करणे किंवा स्वातंत्र्य-लढ्याचा संदेश जनतेपर्यंत नेऊन तिला लढ्यासाठी संघटित करणे. माझ्या दृष्टीने दुसरा पर्याय महत्त्वाचा व आवश्यक होता आणि तोच आम्ही स्वीकारला" ('ऋणानुबंध', ६५).

सातारा जिल्ह्यातील या काळातल्या स्वातंत्र्य-लढ्याचे दोन टप्पे पडतात. पहिला,

जागृत जनतेने उठवलेल्या आवाजाचा; आणि दुसरा, ह्याच जनतेने ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीला दिलेल्या प्रत्युत्तराचा- असे सांगून आपला संबंध यांपैकी पहिल्याच टप्प्याशी जवळचा होता, असे यशवंतरावांनी नमूद केले आहे.

परंतु वस्तुस्थिती अशी दिसते, की चळवळीच्या दुसऱ्या टप्प्याशीही यशवंतराव बराच काळ संबंधित होते; पण त्यांनी स्वतः व त्यांच्या चरित्रकारांनी बहुधा बदलत्या काळाची पावले ओळखून त्यांचा या टप्प्यातील सहभाग कमी करून सांगण्याचा प्रयत्न केला असावा.

ब्रिटिश सत्ता, आपण समजतो, तेवढी अभेद्य व सर्वसमर्थ नाही, असा आत्मविश्वास जनमानसांत निर्माण करण्याच्या हेतूने कराड, तासगाव, वडूज, इस्लामपूर, पाटण, सातारा वगैरे ठिकाणी तालुका कचेऱ्यांवर निदर्शने केली गेली. तिरंगी ध्वज लावण्यात आले. सरकारने प्रचंड सामर्थ्यानिशी चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला.

मोर्च्यांमधला प्रत्यक्ष अनुभव पाहिल्यानंतर यापुढे सभा, मोर्चे वा सत्याग्रह या निःशस्त्र मार्गांनी लढा यशस्वी होणे नाही, हे कार्यकर्त्यांना कळून चुकले. नाना पाटील, जी. डी. लाड, नाथाजी लाड, अप्पासाहेब लाड, शंकरराव लुपणे, शाहीर शंकरराव निकम, आत्माराम बापूजी पाटील, नागनाथ नायकवाडी, बर्डेमास्तर, पांडुरंग मास्तर वगैरे मंडळींनी सशस्त्र क्रांतीचा निर्णय घेऊन अमलात आणला; नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'प्रतिसरकार' ('पत्री सरकार') आंदोलन जिल्ह्यात उभे राहिले. गनिमी पद्धतीने काम करणाऱ्या हजारो तरुणांचे बळ या चळवळीला लाभले होते.

कार्यकर्ते आधीच गोंधळलेल्या मनःस्थितीत होते, त्यातच दडपशाहीमुळे त्यांची माथी भडकली होती. काही ठिकाणी प्राणांची पर्वा न करता त्यांनी घातपाती कृत्ये केली. रेल्वे-रूळ उखडले, सरकारी खजिने लुटले, पोस्ट-ऑफिसे व पोलिस-चौक्या यांना आगी लावल्या, सरकारी व सावकारी दप्तरे भस्मसात केली, समाजकंटकांना व चळवळ-शत्रूंना पऱ्या ठोकल्या. पण त्याचबरोबर या प्रतिसरकारने जनसामान्यांना न्याय दिला, संरक्षण दिले, सामाजिक सुधारणा केल्या, लोकाभिमुख अशी सरकारी यंत्रणा उभी केली, चोर-दरवडेखोरांचा बंदोबस्त करून कायदा व सुव्यवस्थाही निर्माण केली. परिणामी या चळवळीचे कार्यकर्ते सामान्य लोकांमध्ये अत्यंत लोकप्रिय होते. लोकांचे त्यांना संरक्षण असल्यामुळे सरकार त्यांना पकडू शकत नव्हते.

या चळवळीसंबंधी यशवंतरावांची भूमिका संदिग्ध आढळते. जिल्हा काँग्रेसमधील एक बुद्धिमान नेता अशी त्यांची प्रतिमा त्यावेळपावेतो निर्माण झाली होती. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वामुळे त्यांनी जनमानस जिंकले होते. त्यांच्या उमद्या नेतृत्वावर विश्वास ठेवून हजारो

तरुण चळवळीत प्रविष्ट झाले होते. भूमिगत चळवळीचे ते काही काळ 'डिक्टेटर' होते. पण नंतर ते बाहेर पडले. त्यांचा या चळवळीत नेमका सहभाग किती होता, हे अजूनही अधिकृतरीत्या स्पष्ट झालेले नाही. तरी पण वेल्स हॅन्जेन यांनी 'आफ्टर नेहरू, व्हू?' (पृ. १३८) या आपल्या ग्रंथात, या चळवळीने नेमलेल्या एका दहशतवादी नासधूसकारी टोळीत आपण होतो, अशी चव्हाणांची स्पष्ट कबुली उद्धृत केली आहे. हा लेखक पुढे असेही म्हणतो, की

"आज चव्हाण मान्य करतात, त्यापेक्षा अधिक क्रियाशील, उत्साहपूर्ण स्वरूपाचा सहभाग त्यांनी प्रतिसरकारच्या उपक्रमात केला होता, असे मानण्यास सबळ कारण माझ्यापाशी आहे."

अर्थात एक गोष्ट तितकीच खरी, की त्यांचे हे दहशतवादी कार्य अल्पकाळ चालले. या चळवळीने सुसंगत, चोख व जबरदस्त संघटनाबांधणी केली, तोपावेतो चव्हाण तिच्यापासून दुरावले होते.

सत्ताकारणात प्रवेश

१९४६ च्या निवडणुका काँग्रेसने जिंकल्यानंतर राज्याराज्यांत काँग्रेसची अंतरिम सरकारे सत्तेवर आली. महाराष्ट्रात बाळासाहेब खेर मुख्यमंत्री होते. त्यांनी यशवंतरावांना संसदीय सचिव म्हणून घ्यायचे ठरवले. गृहमंत्री मोरारजी देसाई यांच्या खात्यात ते संसदीय सचिव झाले. महाराष्ट्राच्या भावी राजकारणाच्या दृष्टीने यशवंतराव व मोरारजी यांचे या टप्प्यावर घडून आलेले हे साहचर्य फारच परिणामगर्भ ठरले. या नेमणुकीतून चव्हाणांचे कार्यक्षेत्र विस्तारले, कार्यक्षम प्रशासनाचे पाठ त्यांना मोरारजींकडून मिळाले, आणि मोरारजींचा त्यांनी संपादिलेला विश्वास त्यांना पुढे दीर्घकाळ उपयुक्त ठरला. हे तर झालेच; पण गुजरात विरुद्ध महाराष्ट्र या स्पर्धेत महाराष्ट्राची बाजू बरीचशी कच्ची होण्यासाठीही ही युती पुढे कारणीभूत ठरलेली आहे, हे नाकारण्यात हशील नाही. आज मुंबई महाराष्ट्रात असली, तरी मराठी नाही, याची कारणमीमांसा थेट या दोन व्यक्तींच्या त्या साहचर्यापर्यंत जाऊन पोचते. वस्तुतः यशवंतराव आणि मोरारजी यांचे राजकीय पार्श्वभूमी, नेतृत्व-बांधणी, वैचारिक ठेवण वा सामाजिक-आर्थिक दृष्टिकोन यांपैकी कोणत्याही बाबतीत साधर्म्य नव्हते. तरीही चव्हाणांनी दीर्घकाळ सरकारी कामकाजात मोरारजींना एकनिष्ठ पाठिंबा दिला, याचे अनेक दूरगामी परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणावर झाले आहेत.

तसे पाहिल्यास गांधीजींचे नेतृत्व प्रभावी झाल्यापासूनच गुजराती मंडळी काँग्रेसच्या राजकारणात आघाडीला आली होती. काँग्रेसला पैसा पुरवून त्यांनी ती संघटना वेठीस

धरायला सुरुवात केलीच होती. अ. भा. काँ. क.साठी मुंबईची गुजराती मंडळी निवडून येत असे आणि महाराष्ट्र काँग्रेसच्या कारभारात ती हस्तक्षेप करीत असे. मुंबई प्रदेश काँग्रेस तर त्यांची बटीकच झाली होती.

"पुढे (स. का.) पाटलांचा मुखवटा व मागे गुजराती भांडवलवाले हे तिचे स्वरूप १९३५ नंतर स्पष्ट दिसू लागले ... ... मुंबईच्या महाराष्ट्रीय मंडळीत मग एक न्यूनगंड उत्पन्न झाला. कॉर्पोरेशनमध्ये ... ... काँग्रेस पक्ष बहुसंख्य व त्यात महाराष्ट्रीय अल्पसंख्य. परिणामी काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रीय प्रश्न हेटाळले, त्यांबाबत तो उदासीन होता. पण अधिक आश्चर्य म्हणजे त्याने भ्रष्टाचार व भांडवलवाले यांचे प्रस्थ वाढविले." ('पथिक'-२, : ५२७) अशा शब्दांत न. वि. गाडगीळ यांनी गुजराती वर्चस्वाचे दुष्परिणाम सांगितले आहेत.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात गैरमराठी लोकांची प्रचंड प्रमाणावर आवक मुंबईत झाली होती, मराठी माणसांची प्रत्येक क्षेत्रातून हकालपट्टी झाली होती. त्यांना सर्व राजकीय व सार्वजनिक क्षेत्रांतून ढकलण्याचे कार्य महाराष्ट्र द्रोही काँग्रेसवालेच मुख्यत्वे करीत होते.

मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांचे नेतृत्व मराठी जनसामान्यांपासून दुरावलेले असल्यामुळे आणि त्यांचा कारभाराही अभिजनहितैषी (एलीटिस्ट) व भांडवलदार-धार्जिणा ठरल्यामुळे जेधेंच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र काँग्रेस असंतुष्ट होती. गुजराती व्यापाऱ्यांसाठी ही राजवट म्हणजे पर्वणीच होती. ग्रामीण शेतकरी समाजाला न्याय वा दिलासा तिच्याकडून मिळण्याची शक्यताच नव्हती. मंत्रिमंडळाच्या या लोकहितविरोधी व गैरलोकशाही राजकारणावर जनतेच्या दृष्टीने अधिक प्रभावी दडपण आणण्याच्या हेतूने ज्या समविचारी आमदारांनी व कार्यकर्त्यांनी संघटित करण्याचे मनसुबे आखले, त्यांत केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव प्रभृती मुख्य होते. यशवंतराव चव्हाणही काही काळ त्यांच्यासोबत होते. परंतु या बहुजन-समाजवादी गटाला जेव्हा काँग्रेसबाहेर पडणे अपरिहार्य झाले, त्या वेळी चव्हाणांनी पाय मागे घेतला होता. समाजवादी गटही त्याच सुमारास काँग्रेस सोडून गेला. त्याच्याशी वैचारिक जवळीक असूनही चव्हाण त्यांच्यासोबत बाहेर पडले नाहीत.

चव्हाणांच्या या वर्तनाचा अन्वय राजकीय भाष्यकारांनी आपापल्या धारणांप्रमाणे लावला आहे. शेकापच्या नेत्यांचे खेर मंत्रिमंडळाविरुद्धचे आक्षेप चव्हाणांना मान्य होते; पण काँग्रेस-श्रेष्ठींशी लढा देण्याची त्यांची तयारी नव्हती. त्यांना मंत्रिमंडळात न घेतल्यामुळे शेकापच्या प्राथमिक निर्मिती-प्रक्रियेत ते सहभागी झाले असले, तरी पुढे त्यांनी माघार घेतली, याची वेगवेगळी कारणे सांगितली गेली आहेत. सत्यशोधक चळवळीपेक्षा किंवा

पत्री सरकार आंदोलनापेक्षा त्यांचा कल नेहमीच व्यापक राष्ट्रीय प्रश्नांकडे व पक्षाकडे राहिला असल्याचे सांगून चव्हाणांच्या परावृत्तीचे समर्थन त्यांच्या काही चरित्रकारांनी केले आहे. खेर यांच्या कार्यपद्धतीत बदल घडवायचा, तर ते काँग्रेसमध्ये राहूनच शक्य होईल, नवा पक्ष प्रादेशिक व जातीय आहे, तर काँग्रेस अखिल भारतीय पक्ष असून तिला नेहरूंचे समाजवादी नेतृत्व लाभले आहे; या मुख्य प्रवाहापासून आपण फुटू नये, असा विचार यशवंतरावांनी केल्याचे त्यांचे एक चरित्रकार सांगतात (रामभाऊ जोशी, 'यशवंतराव-इतिहासाचे एक पान,' ९६); तर वेगळा पक्ष काढल्यास राष्ट्राचे तसेच खुद्द बहुजन-समाजाचेही नुकसान होईल, अशी चव्हाणांची खात्री होती, (बाबुराव काळे, 'यशवंतराव चव्हाण', १२४), असे त्यांच्या दुसऱ्या चरित्रकाराचे म्हणणे आहे. शेकापच्या पुढाऱ्यांसह अनेकांना मात्र असे वाटते, की जेधे-मोरे-जाधव प्रभृती बहुजन-समाजाचे दिग्गज काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर नेतृत्वाची तिथे जी पोकळी निर्माण होईल; आणि शेकाप-निर्मितीच्या हादऱ्यामुळे सावध झालेल्या काँग्रेस-श्रेष्ठींना ती पोकळी बहुजन-समाजाच्या पुढाऱ्यांना हाताशी धरून भरून काढण्याची जी निकड भासेल, ती आपल्या पथ्यावर पडेल, अशा विचारानेच चव्हाणांनी इरादा बदलला असावा.

समाजवादी व शेकाप या दोन पक्षांचे काँग्रेसमधून बहिर्गमन, गांधी-हत्येतून उफाळलेला जातीय तणावांचा वणवा आणि प्रस्थापित काँग्रेस नेतृत्वाचे थिटेपण यामुळे महाराष्ट्र काँग्रेस अक्षरशः गलितगात्र झाली होती. ३० मार्च, १९४८ रोजी यशवंतरावांच्या सूचनेवरून त्र्यं. र. देवगिरीकर यांनी मुंबई येथे तांबे आरोग्य भवनात मराठी काँग्रेसजनांची एक बैठक घेतली. आमदार व कार्यकर्ते मिळून एकाहत्तर जणांची उपस्थिती असलेल्या या बैठकीने नव्या आव्हानांना तोंड देण्यासाठी काँग्रेसने एकात्म व संघटित राहण्याचे आव्हानपत्रक प्रसृत केलेले होते. हे पत्रक यशवंतरावांच्या राज्यपातळीवरील नेतृत्वोदयाचे प्रतीक ठरले. या पत्रकास अन्य काँग्रेसजनांचा पाठिंबा मिळवण्याची जबाबदारी या बैठकीने यशवंतरावांवर सोपवली होती, असे द्वा. भ. कर्णिक म्हणतात ('यशवंतराव चव्हाण : ए पोलिटिकल बायॉग्राफी,' ३५). या बैठकीतूनच यशवंतरावांनी समविचारी साथीदारांची फळी महाराष्ट्र काँग्रेसमध्ये उभारली. जेध्यांनी काँग्रेसत्याग केल्यानंतर भाऊसाहेब हिरे महाराष्ट्र प्रांतिकचे अध्यक्ष झाले. यशवंतरावांना प्रांतसचिवपद मिळाले. संसदीय सचिवपदावरून त्यांनी घेतलेली ही फार मोठी झेप होती. पक्षातले त्यांचे स्थान एकदम उंचावले. प्रांताध्यक्ष भाऊसाहेब हिरे व प्रांतसचिव चव्हाण हे दोघेही ग्रामीण जनतेतून आलेले राष्ट्रवादी नेते म्हणून सर्वांसमोर आले होते.

मंत्रिमंडळात प्रवेश

१९५२ च्या निवडणुकीनंतर मोरारजी मुख्यमंत्री आणि यशवंतराव त्यांच्या मंत्रिपरिषदेत नागरी पुरवठा, नियोजन व सामुदायिक विकास या खात्यांचे मंत्री झाले. पक्षकार्यात हिरे व शासन कारभारात मोरारजी यांच्याशी निष्ठा ठेवून यशवंतराव कार्य करीत होते; पण हिरे व मोरारजी यांच्यांतील मौलिक विग्रह जसजसा वाढत गेला, तसतशी ती तारेवरची कसरत अवघड होत गेली.

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे आंदोलनात रूपांतर होऊ लागले होते. सर्वपक्षीय संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन झाली होती. काँग्रेसचे देव-देवगिरीकर आणि भाऊसाहेब हिरे प्रभृती नेते त्यात सहभागी झाले होते. याबद्दल मोरारजींचा त्यांच्यावर रोष झाला होता. संप, मोर्चे, हरताळ वगैरेंऐवजी आपसांत बोलणी व वाटाघाटी करून सामोपचाराने हा प्रश्न मिटवण्याचा प्रयत्न शंकरराव देव करीत होते. पण "(राज्य पुनर्रचना) कमिशनचा अहवाल प्रसिद्ध होण्यापूर्वीपासून व नंतर मुंबई सरकारने अतिरेकी पोलिस बंदोबस्त ठेवून आपल्या पाशवी बलाचे (फिजिकल माइट) मुंबईत व महाराष्ट्रात ठिकठिकाणी जे प्रदर्शन केले होते, ते लोकांना चीड आणणारे व ... ... प्रक्षुब्ध करणारे असेच होते ..." (शंकरराव देव : 'देव देते, कर्म नेते', ३२०). मोरारजींनी सुरुवातीपासूनच संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला चुकीच्या पद्धतीने व अकारण ताठरपणाने हाताळले. देवांनी म्हटल्याप्रमाणे-

"महाराष्ट्रात तर श्री. मोरारजीभाई यांचे नेतृत्व, त्यांची इच्छा व प्रयत्न काहीही असले, तरी केव्हाच मान्य झालेले नव्हते आणि भाषावार प्रांतरचना व तिच्या संदर्भात मुंबई राज्याचे भवितव्य व संयुक्त महाराष्ट्र या विषयांवर तर त्यांचे व महाराष्ट्र काँग्रेसचे स्पष्ट मतभेद होते. परंतु मोरारजीभाईंच्या नेतृत्वाबद्दलच्या कल्पना व स्वतःबद्दलचा आत्मविश्वासही असा काही विलक्षण होता, की महाराष्ट्रातील या परिस्थितीबद्दल त्यांना एक प्रकारचे अंधळेपण आले होते व महाराष्ट्र काँग्रेस आपले म्हणणे फार मोठ्या प्रमाणावर मान्य करील, अशी त्यांनी आपली दृढ समजूत करून घेतली होती" (कित्ता, ३३२).

मोरारजींसंबंधीचे एवढे सविस्तर अवतरण येथे देण्याचे प्रयोजन असे, की मनाने संयुक्त महाराष्ट्रवादी असूनही यशवंतरावांनी पूर्णत्वे मोरारजींचीच री या काळात ओढलेली दिसून येते. एवढेच नाही, तर महाराष्ट्र काँग्रेसच्या बिनीच्या नेत्यांना गारद करण्याच्या मोरारजींच्या राजकारणाला कळत नकळत साह्यभूत होण्याचेही धोरण त्यांनी स्वीकारले होते.

१० ऑक्टोबर, १९५५ रोजी रा. पु. आयोगाने आपला अहवाल प्रसृत

केला. द्वैभाषिक मुंबई राज्यासह १६ घटक राज्ये आणि विदर्भाचे स्वतंत्र राज्य अहवालात सुचवलेले होते. मुंबई हे औद्योगिक महत्त्वाचे शहर महाराष्ट्रास मिळू न देण्याचे गुजराती भांडवलदारांचे कारस्थान सफल झाले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावरून चव्हाण आणि हिरे यांच्यांत दुरावा वाढू लागला होता. शंकरराव देवांना निष्प्रभ केल्यास हिरे यांचे प्रस्थ कमी होईल, असा बहुधा चव्हाणांचा होरा असावा. ९ डिसेंबर, १९५५ रोजी फलटण येथे झालेल्या बैठकीत देवांचे नेतृत्व झुगारण्याची आणि महाराष्ट्रापेक्षा नेहरूंना आपण मोठे मानतो, अशा आशयाची विधाने यशवंतरावांनी केली. महाराष्ट्रभर चव्हाणविरोधी लाट पसरली, मात्र आचार्य अत्र्यांच्या शब्दांत त्यांनी- "आपल्या द्वैभाषिक राज्याच्या भावी मुख्य प्रधानपदाचा पाया घातला!" ('कऱ्हेचे पाणी', १०९).

द्वैभाषिकाचे मुख्यमंत्री

प्रारंभी यशवंतराव द्वैभाषिक राज्याच्या पर्यायास प्रतिकूल होते. कोणालाही विश्वासात न घेता पक्षश्रेष्ठींनी दिलेला हा निर्णय आत्मघातक आहे, अशी टीकाही त्यांनी केली होती. गुजरात प्रदेश काँग्रेस कमिटीने मुंबई राज्याची महाराष्ट्र, गुजरात व मुंबई अशी तीन स्वतंत्र राज्ये करावीत, असा ठराव केला होता. काँग्रेस कार्यकारिणीने द्वैभाषिकाचा निर्णय घेतल्यानंतर ३० ऑगस्ट, १९५६ रोजी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीने त्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. हिरे यांनी तसा ठराव मांडून चव्हाणांनी त्यास पाठिंबा दिला. चव्हाणांनी आपल्या भाषणात विरोधीपक्षीय संयुक्त महाराष्ट्र समितीच्या उपराष्ट्रवादावर आणि गुजरात प्रदेश काँग्रेसच्या ठरावामागील देशी वसाहतवादावर टीकास्त्र सोडले. त्या त्यांच्या भाषणातून प्रथमच त्यांनी गुजराती भांडवलदारांविरुद्ध आवाज उठवला होता. पण तरीही मोरारजींची इतराजी ओढवू नये, अशा हेतूने काही दिवसांनी त्यांनी मोरारजींना पत्र पाठवून दिलगिरीही व्यक्त केली होती. त्या पत्रात ते लिहितात :

'... गेल्या काही वर्षांत मी माझे सार्वजनिक जीवन तुम्हांला आदर्श मानून घडवलेले आहे. हे काम सोपे नाही. पण मी प्रामाणिकपणे आस्थापूर्वक प्रयत्न केला आहे. मला नेहमीच यश आले नसेल, तर ते केवळ मी तुमच्याइतकी परिपक्वतेची पातळी गाठू शकलो नाही, यामुळेच. ... मी केले, ते बरोबर नव्हते, असेच तुमचे मत असेल, तर आजवर जे कमावले आहे, त्याचा त्याग करून सार्वजनिक मंचावरून अदृश्य होण्याचा मी निर्धार व्यक्त करतो ... या अंधारात पित्याने मुलाला दाखवावा, तसा प्रकाश तुम्ही मला दाखवा, अशी प्रार्थना करतो." म्हणजे मी इतक्या वर्षांच्या आपल्या विश्वासास पात्र ठरण्याचा प्रयत्न करीन (उद्धृत, नरेश कवडी : 'मोरारजी देसाई चरित्र व कार्य', ९१).

द्वैभाषिकाचा पर्याय

द्वैभाषिकाचा पर्याय गुजरातच्या गळी आपण उतरवू शकणार नाही, अशी खात्री असल्यामुळे प्रथम मोरारजी मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारू इच्छितच नव्हते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा मुकाबला अत्यंत चुकीच्या पद्धतीने केल्यामुळे मोरारजींपासून महाराष्ट्र दुरावलाच होता. पण पक्षश्रेष्ठींच्या सूचनेवरून मोरारजी राजी झाले, तरी अविरोध निवड होणार असेल, तरच आपण मुख्यमंत्री होऊ, अशी भूमिका मोरारजींनी घेतली. त्यांची ती मागणी पूर्ण होऊ न देण्यास हिरे कटिबद्ध झाले होते. देव-गाडगीळांचा त्यांना पाठिंबा होता. संयुक्त महाराष्ट्राला पाठिंबा दिल्यामुळे त्यांची लोकप्रियताही खूप वाढलेली होती. विरोध होताच मोरारजी माघार घेणार आणि हिरे मुख्यमंत्री होणार, हे स्पष्ट होते. यशवंतरावांनी परिस्थितीचा अंदाज घेतला. महाराष्ट्र काँग्रेसने यशवंतरावांची निवड नक्की केलीच होती; पण भाऊसाहेब हिरे यांच्या स्पर्धेत विदर्भ व मराठवाडा येथील मते चव्हाणांना कितपत पडतील, याची शंका होती. विदर्भात पंजाबराव देशमुख यांचा पाठिंबा स्पष्टपणे हिरेंना होता. यशवंतराव शहाण्णव कुळी मराठा नसल्यामुळे त्यांना विदर्भातील मराठा आमदारांची मते मिळतीलच, याची खात्री नव्हती. य. दि. फडके यांच्या मते, मालोजीराव नाईक निंबाळकरांनी खास विदर्भात जाऊन यशवंतराव आपले पाहुणे असल्याचा प्रचार केला होता. ('महाराष्ट्राचे राजकारण' विषयावर शिवाजी विद्यापीठातर्फे झालेल्या चर्चासत्रातील भाषण; दि. १५ ऑक्टोबर, १९८५), पण यशवंतरावांची मुख्य भिस्त मारोतराव कन्नमवार यांच्यामार्फत मिळणाऱ्या मधल्या जातींच्या मतांवर होती. कन्नमवार तेव्हा स्वतंत्र विदर्भवादी होते; पण बियाणींच्या राजकारणात आपल्याला वाव आणि मान्यता मिळण्याची सुतराम् शक्यता नाही, हे त्यांच्या तोपर्यंत लक्षात आले होते. फलटणच्या बैठकीनंतर यशवंतरावांचे नेतृत्व प्रभावी ठरल्याचे पाहून "मी व माझे साथी जरी त्या वेळी स्वतंत्र विदर्भाचे पुरस्कर्ते होतो, तरी यशवंतरावांच्या या पुरुषार्थाने व बहादुरीने आम्हीही प्रभावीत झालो व त्यांच्या नेतृत्वाकडे आकर्षित झालो," अशा शब्दांत कन्नमवारांनी आपली प्रतिक्रिया नोंदवली आहे. पुढे ते लिहितात, "ते आले. माझ्याकडेच त्यांचा मुक्काम होता. त्यांच्या भेटीकरिता कार्यकर्त्यांची रीघ लागली होती. त्यांच्या सौजन्यपूर्ण, प्रेमळ वागणुकीने व रोखठोक भाषणाने सर्वांना आपलेसे करून घेतले. सर्वांना आपल्या व्यक्तिमत्त्वाने त्यांनी आकर्षित केले. थोडक्यात, ते आले, त्यांनी पाहिले व त्यांनी जिंकले." ('यशवंतराव अभिनंदन ग्रंथ', ८२).

संयुक्त महाराष्ट्र झाल्यास मराठा-वर्चस्व वाढेल, या भयाने स्वतंत्र विदर्भाची

मागणी करणाऱ्यांचा विश्वास यशवंतरावांनी मिळवला. मराठवाड्यात सावनेरकर, देवीसिंग चौहान वगैरे मंडळींची साथ त्यांनी मिळवली. अर्थात तरीही महाराष्ट्रात एकंदरीत भाऊसाहेब हिरे यांचेच पारडे जड होते. चव्हाणांना खरी मदत गुजरात, कच्छ, सौराष्ट्र व मुंबईचे अ-मराठी आमदार यांच्याकडूनच मिळाली. मोरारजींनी नाव मागे घेतल्यानंतर त्यांची मते चव्हाणांनाच मिळाली. कारण हिरे त्यांच्या दृष्टीने स्पष्टपणे शत्रुपक्षात होते, निवडणुकीत हिरे यांना १११ तर चव्हाणांना ३३३ मते मिळाली.

१ नोव्हेंबर, १९५६ रोजी चव्हाणांनी विशाल द्वैभाषिक राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारली.

"महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर यशवंतराव जे स्थानापन्न झाले, त्याचे श्रेय भाऊसाहेबांकडेच जाते. यशवंतरावांच्या सिंहासनाखाली भाऊसाहेब हिऱ्यांच्या राजकीय जीवनाच्या अस्थी सापडतील." अशा शब्दांत आचार्य अत्रे यांनी या घडामोडींवर भाष्य केले आहे ('हुंदके', २०१-२).

द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्रिपद ही तशी सुळावरची पोळी होती. 'सूर्याजी पिसाळ' ही चव्हाणांची प्रतिमा मराठी जनमानसावर पक्की झाली होती. सर्वांत मोठ्या राज्याचे वयाने ते सर्वात लहान मुख्यमंत्री होते. द्वैभाषिक त्यांनाही मनापासून भावलेले नव्हते. कूपर, खेर, देसाई या आधीच्या शहरी- उच्चभ्रू आणि पूर्वप्रतिष्ठित मुख्यमंत्र्यांच्या तुलनेत ग्रामीण गरीब स्तरातून आलेले नवखे यशवंतराव अनेक दृष्टींनी वेगळे होते. त्यांची महामुंबई राज्याच्या मुख्यमंत्रिपदी झालेली निवड काहींना 'शेतकरी-कामगार राज्याची आणि लोकशाही समाजवादाची नांदी' ('बाबूराव काळे', पूर्वोक्त, १८०) वाटली असली, तरी बहुसंख्य संयुक्त महाराष्ट्रवादी मराठी माणसांना ते गुजराती भांडवलदारांच्या पाठिंब्याने सत्तेवर आलेले महाराष्ट्र-शत्रूच वाटत होते. पण त्यापेक्षाही महत्त्वाचे आव्हान निराळेच होते. नवे द्वैभाषिक राज्य आतून दुभंगलेले होते. राजकीय वातावरण कमालीचे तणावपूर्ण होते. सार्वत्रिक निवडणुका तोंडाशी आल्या होत्या. प्रतिपक्षाचे सामर्थ्य सतत वर्धावत होते.

अर्थात जमेच्याही काही बाबी निश्चितच होत्या. बहुजन-नेतृत्वाच्या ठिकाणी अभावानेच आढळणारे व्यासंग, बहुश्रुतता, व्यवहार-कौशल्य, संयम, शिष्टाचार, मितभाषित्व, धोरणी मुत्सद्दीपणा, दूरदृष्टी आणि माणसे जिंकण्याची कला असे असामान्य गुण चव्हाणांच्या अंगी भरपूर प्रमाणात होते. त्यांच्या बळावरच द्वैभाषिकाच्या जीवघेण्या जोखमीतून ते सहीसलामत सुटले.

१९५७ च्या निवडणुकांमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील काँग्रेसचे पानपत झाले.

अनेक प्रतिष्ठित काँग्रेस नेते पराभूत झाले. पार्लमेंटच्या २३ जागांपैकी फक्त दोनच मिळाल्या आणि असेम्ब्लीच्या १३३ जागांपैकी फक्त ३१ काँग्रेसच्या वाट्याला आल्या. "जिल्हेच्या जिल्हे बेचिराख! बेकाँग्रेस झाले!! धरणीकंपासारखे झाले. अनेक काँग्रेसजनांचे डिपॉझिट जप्त झाले." ('पथिक - २,' ६७७). यशवंतराव विजयी झाले होते. त्यांनाही सुमारे ६०० मतांनी निसटता विजय मिळाला होता. पण त्यांनी जेव्हा आपला जय म्हणजे 'द्वैभाषिकाचा जय,' असे विधान केले, तेव्हा 'त्यानेच पुढील अनर्थाचे बीजारोपण केले. कारण सर्व प्रांतभर सूडाची भावना उघड उच्चारली जाऊ लागली." (कित्ता, ६६५). यशवंतराव उर्वरित राज्यातल्या आमदारांच्या पाठिंब्यावर आपले मुख्यमंत्रिपद टिकविण्यात यशस्वी झाले असले, तरी सभागृहातल्या व बाहेरच्याही विरोधकांच्या मुकाबल्यात काम करणे हे महाकठीण कर्म होते. विरोधी पक्षांचे एकाहून एक वरचढ नेते विधानसभेत प्रविष्ट झाले होते.

पण यशवंतरावांच्या बाजूने या निवडणुकीकडे पाहिल्यास त्यांना हा काँग्रेसचा पराभव, त्यांचे चरित्रकार रामभाऊ जोशी म्हणतात, त्याप्रमाणे- "...वेगळ्या अर्थाने लाभदायकच ठरला. महाराष्ट्रातील काँग्रेस संघटना मजबूत करण्याच्या दृष्टीने यशवंतरावांना पुढच्या काळात जी उपाययोजना करायची होती, त्या दृष्टीनेही वातावरण बनवण्यास याचा मोठाच उपयोग झाला... महाराष्ट्रातील जुन्या काँग्रेस नेत्यांबद्दल त्या काळी सर्वसाधारणतः अप्रीती निर्माण झालेली होती ... काँग्रेसमध्ये नवे रक्त आणण्याचीच आवश्यकता होती. यशवंतरावांना नंतरच्या काळात तसा निर्णय करावा लागला. निवडणुकीतील पराभवामुळे तो निर्णय करणे त्यांना सुलभ गेले" ('यशवंतराव-इतिहासाचे एक पान', १७८).

विरोधी पक्षांचे यश हे तसे संघटितपणाचे व संयुक्त महाराष्ट्र भावनेचे यश होते. निवडणुकीत यश मिळताच समितीच्या एकजुटीला तडे गेले आणि पुढे यशवंतरावांनीच जेव्हा संयुक्त महाराष्ट्राचा मंगल-कलश आणला, तेव्हा समितीचा दुसरा आधारही कोसळला आणि यशवंतरावांवरील विरोधी पक्षांचे आव्हान दूर झाले.

निवडणुकीतील अपयशानंतर सावध होऊन यशवंतरावांनी प्रथम आपल्या पक्षावरची आपली मांड पक्की केली. मराठवाडा प्रदेश काँग्रेस अध्यक्षाच्या पदावर देवीसिंग चौहानांच्या जागी बाबासाहेब सावनेरकरांना बसवले, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची सूत्रे मामा देवगिरीकरांकडून काढून नाईक-निंबाळकरांच्या हाती सोपवली. पश्चिम महाराष्ट्रात पक्षसंघटना पुनरुज्जीवित करण्यासाठी पद्धतशीर आखणी काळजीपूर्वक सुरू करून निवडणूक-अपयशाने आलेली मरगळ झटकून टाकली.

त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या वाटा निर्वेध करण्याच्या उद्योगास ते

लागले. संयुक्त महाराष्ट्राचे एकेक विरोधक हेरून त्यांनी त्यांना आपलेसे केले व त्यांचा विरोध येनकेन प्रकारेन मोडून काढला. मुंबईचे भांडवलदार, मराठी राज्य झाल्यास आपले हितसंबंध दुखावतील, या भयगंडातून संयुक्त महाराष्ट्राला विरोध करीत होते, विदर्भ व मराठवाडा या अविकसित प्रदेशांना महाराष्ट्रात आपल्या विकासाची उपेक्षा होईल, अशी भीती वाटत होती; मोठे महाराष्ट्र राज्य झाल्यास मराठे वरचढ होतील आणि वरचे ब्राह्मण व खालचे हरिजन यांच्यावर अन्याय होईल, अशा भीतीपोटी आंबेडकरांनी संयुक्त महाराष्ट्राचे पाच लहान राज्यांत विभाजन करावे, अशी सूचना केली होती; "आम्हा ब्राह्मणांना मुंबई तरी राहू द्या, महाराष्ट्रात आम्हांला जिवंतसुद्धा राहणे कठीण होईल", या भाऊ भोपटकर यांच्या विधानातून (उद्धृत, 'पथिक - २', ५३८) मराठी उच्चवर्णीयांचे भयकल्पन व्यक्त होत होते. यशवंतरावांनी या सर्वांचे भयनिरसन करण्याचा कसून प्रयत्न केला.

आपल्या कर्तबगारीच्या बळावर यशवंतरावांनी द्वैभाषिकाचा कारभार कार्यक्षम बनवला. आपल्या समर्थकांप्रमाणेच विरोधकांच्याही मनांवर आपल्या प्रामाणिकपणाचा व सद्भावनेचा ठसा बसवला. आधीच्या राज्यकर्त्यांपेक्षा आपला दृष्टिकोन समूळ निराळा असून प्रश्नांचे स्वतःस नेमके भान आहे, याची साक्ष त्यांनी आपल्या वर्तन-व्याख्यानांमधून दिली. एकाहून एक बलदंड असलेल्या विरोधी पक्षनेत्यांना त्यांनी आपल्या संयत शैलीने जवळ ओढले. त्यांच्या रचनात्मक सूचनांचे स्वागत केले. प्रशासन स्वच्छ व गतिमान करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. बहुजनीन (कॉस्मोपॉलिटन) बहुरंगी मुंबईचे मनही त्यांनी जिंकून घेतले. शेतकरी संस्कृतीतून आलेला पुढारी औद्योगिक संस्कृतीच्या अडचणी आस्थेवाईकपणे समजून घेतो, 'शेतकऱ्याचा पोर' ही प्रतिमा घेऊन सत्तेवर आलेला हा नेता बड्या भांडवलदारांच्या भपकेबाज मेजवान्यांमध्येही न बुजता सहजपणे वावरतो, आणि मराठी बहुजनसमाजाच्या हाती सत्ता जाऊनही आपले हितसंबंध अबाधित राहू शकतात, असा त्रिविध प्रत्यय आपल्या वागणुकीतून व कारभारातून चव्हाणांनी भिन्नप्रदेशीय वरचढ वर्गांना आणून दिला. या वर्गाचा विश्वास त्यांना संपादिता आला नसता, तर कदाचित संयुक्त महाराष्ट्र होऊच शकला नसता; कारण मुख्य विरोध त्यांचाच होता.

अविकसित व दुर्लक्षित भागांच्या औद्योगिक व व्यापारी विकासासाठी खास प्रयत्न करून चव्हाणांनी विदर्भ-कोकण-मराठवाडा यांना आपलेसे करून घेतले आणि संयुक्त महाराष्ट्रात बिनदिक्कत प्रवेश करण्यासाठी अनुकूल अशी त्यांची मनोभूमिका तयार केली. या प्रादेशिक एकजिनसीपणाइतकेच महत्त्वाचे यश चव्हाणांनी सामाजिक सहिष्णुतेच्या जोपासनेचे केले. महार वतने रद्द करणे, बौद्ध धर्म स्वीकारणाऱ्या नवदीक्षित दलितांची संरक्षणे व सवलती अबाधित ठेवणे ही त्यांची पावले स्वागतार्ह ठरली. संवरण

(को-ऑप्शन), तहकरार (अलायन्सेस्) किंवा मलिदावाटप (डिस्ट्रिब्युशन ऑफ फेवर्स) अशा मार्गांनी त्यांनी असंतुष्टांची बंडखोरी काबूत आणली. शेतीवर आधारित उद्योगीकरण, आधुनिक शेती, भूसुधार, सिंचन, सहकारी पतपेढ्या वगैरे उपाय योजून आपल्या वेगळ्या संस्कृतीची छाप पाडली.

द्वैभाषिकाचा दुस्वास करणारे अनेक बुद्धिमंत, पत्रकार व भाष्यकार चव्हाणांबद्दल व्यक्तिगत आदर बाळगू लागले. हे यश फार मोठे होते. देशातल्या सर्वाधिक कार्यक्षम अशा दोन राज्यांपैकी द्वैभाषिक मुंबई राज्य हे एक असल्याचा निर्वाळा खुद्द नेहरूंनीच दिला होता. चव्हाण हे सर्वोत्तम मुख्यमंत्री असल्याचा दाखला जयप्रकाश नारायण यांनी दिला होता. तर आपल्या राज्याच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी इतक्या अल्पावधीत एवढी भक्कम कामगिरी करणारा एकमेवाद्वितीय मुख्यमंत्री चव्हाणच असल्याचा अभिप्राय के. एम. मुन्शी यांनी व्यक्त केला होता.

एवढी सगळी कर्तबगारी केल्यानंतर चव्हाणांनी श्रेष्ठींच्या हे निदर्शनास आणून दिले, की प्रामाणिक प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही द्वैभाषिक राबवणे अशक्य आहे. महाराष्ट्र व गुजरात या प्रांतांचे मनोमीलन घडून येऊच शकत नाही. एकभाषिक राज्यनिर्मितीबाबतची जनभावना तीव्र असून तदर्थ चाललेल्या चळवळी दीर्घकाळ विफल राहिल्यास त्यांच्या ठिकाणी हताश आक्रमकता येणे अपरिहार्य ठरणार आहे. तशी वेळ येण्यापूर्वी आपणच दोन स्वतंत्र राज्ये करून श्रेय पदरात पाडून घ्यावे. शिवाय, एकभाषिक राज्याचे प्रशासन जनजीवनाशी अधिक चांगल्या प्रकारे समरस होऊ शकेल, विकासाच्या अधिक संधी लोकांना उपलब्ध करून देऊ शकेल. आपण जर निर्णय घेण्यास हयगय केली, तर १९६२ च्या येऊ घातलेल्या निवडणुकांचे निकाल १९५७ पेक्षाही पक्षाच्या दृष्टीने भयंकर ठरतील.

नेहरूंनी चव्हाणांना एका भेटीत विचारले होते, की

"द्वैभाषिक तोडून दोन स्वतंत्र राज्ये केली, तर काँग्रेसला बहुमत मिळेल काय?"

काही दिवस विचार करून, "बहुमत मिळेल', असे उत्तर चव्हाणांनी दिले होते. त्यांचे स्पष्टीकरण असे होते :

"तांत्रिकदृष्ट्या आम्ही अल्पमतात आहोत; पण विरोधकांतले निदान पंधरा सदस्य केवळ महाराष्ट्राच्या प्रश्नावरच विरोधी पक्षात आहेत. पण द्वैभाषिक तोडले जात असून महाराष्ट्र स्थापन होत आहे, हे जर त्यांना कळले, तर ते पंधराजण तरी काँग्रेसला पाठिंबा देतील. ते काँग्रेसमध्ये येतील, की नाही, हे सांगता येणार नाही, पण तेही शक्य आहे." ('ऋणानुबंध', ९०).

विकासाची कामे सरकार करते आहे, करीलही; पण त्यासाठी द्वैभाषिकाची गरज नाही, अशी लोकभावना असल्यामुळे लोक संतुष्ट नाहीत, हेही त्यांनी नेहरूंच्या कानांवर घातले होते. शासकीय दृष्ट्या यशस्वी ठरलेले द्वैभाषिक राजकीय दृष्ट्या अपयशी ठरले आहे, हे नेहरूंना त्यांनी पटवून दिले होते. प्रतापगडावर शिवस्मारकाच्या अनावरण प्रसंगी जेव्हा नेहरू आले होते, तेव्हा समितीने केलेल्या उग्र निदर्शनांमधून लोकक्षोभ संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर किती तीव्र आहे, हे त्यांनी स्वतःच प्रत्यक्ष अनुभवले. प्रतापगड-प्रकरणातून चव्हाणांना दुहेरी लाभ झाला. एकतर नेहरूंना ते संयुक्त महाराष्ट्राच्या अनुकूल करून घेऊ शकले; आणि दुसरे म्हणजे त्यांची इच्छा असो वा नसो, त्यांच्या बाजूच्या वृत्तपत्रांनी जातीय प्रचार करून समिती ही ब्राह्मण्यग्रस्त असल्याचा प्रभावी प्रचार केल्यामुळे समितीची बहुजनमानसातली प्रतिमा डागाळली, याचा यशवंतरावांना राजकीय लाभ मिळाला.

संयुक्त महाराष्ट्राची स्थापना

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रतिष्ठापनेने यशवंतरावांच्या राजकीय कारकीर्दीचे सुवर्णयुग सुरू झाले. ग्रामीण व जनसामान्य संस्कृतीचे पाथेय आणि सामाजिक परिवर्तनाची सुस्पष्ट वैचारिक दिशा यांच्या आधारे महाराष्ट्राच्या राजकारणात काही तरी मौलिक कार्य त्यांच्या हातून घडून येईल, अशा अपेक्षा निर्माण झाल्या होत्या. खुद्द यशवंतरावांनी त्याप्रसंगी केलेल्या भाषणांनी या अपेक्षांना खतपाणी घातले होते.

यशवंतरावांनी संयुक्त महाराष्ट्रासमोरील साध्ये निर्धारित करताना प्रादेशिक असंतुलन दूर करण्याला अग्रक्रम दिला होता. विदर्भ, मराठवाडा व कोकण या अप्रगत भागांचा इतिहास, भूगोल व अर्थकारण लक्षात घेऊन त्यांच्या विकासाचे कार्यक्रम हाती घेणे, त्यांच्या मनातले पूर्वग्रह व संशय यांचे निराकरण करून त्यांचा विश्वास संपादणे हे त्यांच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाचे होते. कारण त्याखेरीज उर्वरित महाराष्ट्राशी हे प्रदेश एकरूप होणार नाहीत, याची त्यांना जाणीव होती. जातीयवादाने भंगलेले सामाजिक जीवन सांधणे हे त्यांच्या मते दुसरे आव्हान होते. 'हे राज्य मराठी, की मराठा?' या प्रश्नाचे निःसंदिग्ध 'मराठी' असे उत्तर त्यांनी दिले होते. औद्योगिक विकास आणि शेतीसुधारणा या दोहोंबद्दलचे काही आडाखे त्यांनी बांधले होते. औद्योगिक विकासात प्रादेशिक संतुलन राखले जावे, शहरे व खेडी यांच्यांतील अंतर कमी व्हावे, शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग ग्रामीण भागात सुरू व्हावेत, मराठी-अमराठी भ्रातृभाव वाढीस लागावा; कूळकायदा, कमाल जमीनधारणा, भू-संधारण, जमिनींचे फेरवाटप, वीज व पाणी यांचा पुरवठा, आधुनिक शेतीपद्धती वगैरेंबरोबरच शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास

व्हावा व त्यांच्या ठिकाणी औद्योगिक मानसिकता, नवी मूल्य-व्यवस्था व जीवनदृष्टी विकसित व्हावी, अशी काही उद्दिष्टे यशवंतरावांनी निर्धारित केली होती.

महाबळेश्वरच्या पक्षकार्यकर्त्यांच्या शिबिरात सामान्य नागरिकाच्या दृष्टीने नियोजनाचा विचार मांडताना, आहे त्या साधनांचा जास्तीत जास्त विकास करून जीवन समृद्ध करणे हा नियोजनाचा अर्थ यशवंतरावांनी सांगितला होता. विकासाचा मेळ सामाजिक न्यायाशी घालवण्यासाठी शासनयंत्रणेने कालसंगत बदलले पाहिजे, यावर त्यांनी विशेष भर दिला होता. सहकार आणि विकेंद्रीकरण ही नवसमाजरचनेची साधने ठरावीत, त्यांच्याद्वारे सामान्यांच्या गरजा भागवल्या जाव्यात, नवे सुसंस्कारित नेतृत्व पुढे यावे, अशा यशवंतरावांच्या अपेक्षा होत्या.

यशवंतरावांनी संयुक्त महाराष्ट्रासंबंधी केलेले हे स्वप्नरेखाटन सत्यसृष्टीत उतरेल, असे वाटण्याजोगी राजकीय परिस्थिती त्या काळात झाली होती. विरोधी पक्षांच्या संघटित विरोधाची धार महाराष्ट्र निर्मितीनंतर बोथट होऊ लागली होती. सत्तारूढ पक्षाशी सहकार्य किंवा मैत्रीपूर्ण संवाद करण्याच्या मनःस्थितीत अनेक विरोधी पक्ष होते. यशवंतरावांच्या पुरोगामी पवित्र्यांचा निमित्तमात्र आधार घेऊन विरोधी पक्षांमधील अनेक वजनदार नेत्यांनी यशवंतरावांच्या अपेक्षेनुसार काँग्रेसप्रवेश घ्यायला प्रारंभ केला होता. प्रसप आणि शेकापला विशेष गळती लागली होती. रिपब्लिकन पक्षातील अंतर्गत यादवी गतिमान करण्यात यशवंतराव यशस्वी ठरले होते.

संयुक्त महाराष्ट्र समितीने निर्माण केलेल्या मराठी अस्मितेचा आणि त्या अस्मितेच्या ऐतिहासिक प्रतीकांचा पुरेपूर फायदा चव्हाणांनी उचलला. शिवरायांच्या राज्याभिषेकाशी महाराष्ट्राच्या प्रतिष्ठापनेची तुलना अनेक बाजूंनी करण्यात आली. जणू त्या इतिहासाचे पुनरावर्तन घडत आहे, असे कुणालाही वाटावे!! सामान्य शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री झाला, मराठा ही एक जात नसून पुरोगामी असा जातिसमूह आहे, इत्यादी विधानांमुळे महाराष्ट्र काँग्रेसची डळमळती प्रतिष्ठा सावरण्यास हातभार लागला. महाराष्ट्रात सुमारे चाळीस टक्के सापेक्षतः एकसंध व सर्वत्र समप्रमाणात असलेल्या मराठा समाजाने काँग्रेस पक्षाला व नव्या राजवटीला आपले मानल्यामुळे त्यांचे बस्तान पक्के बसले. शिवाजीपासून लोकमान्य टिळकांपर्यंत अखिल भारतीय राजकारणाला महाराष्ट्राने समर्थ नेतृत्व दिले, महाराष्ट्र नेहमीच पुरोगामी व परिवर्तनाग्रही राहत आला आहे, विविध वैचारिक प्रवाहांचे बौद्धिक नेतृत्व महाराष्ट्रानेच देशाला बहाल केले आहे- अशी काही मिथके (मिथ्स) चव्हाणांनी प्रभावीपणे या काळात वापरली.

अर्थात हे करण्यामागे चव्हाणांचा दृष्टिकोन संकुचित प्रादेशिक म्हणता येणार

नाही. त्यांना मराठा राज्य खरोखरच नको होते. मराठी राज्यच अपेक्षित होते, प्रादेशिक परंपरेचा त्यांचा अभिमान राष्ट्रीय अभिमानाच्या कोंदणात चपखलपणे बसणारा होता, किंबहुना या त्यांच्या समंजस भूमिकेमुळेच यशवंतराव नेहरूंच्या विश्वासास पात्र ठरले होते. महाराष्ट्राच्या आधीच्या मुख्यमंत्र्यांपेक्षा यशवंतराव त्यांना अधिक निष्ठावंत, खंबीर व प्रगल्भ समजूतदार वाटले. बाष्कळ बडबडीपेक्षा अबोल कृतिशीलतेवर भर देणे, सामदामादी तंत्राचा तारतम्य ओळखून वापर करणे, चोख आणि स्वच्छ कारभारास अग्रक्रम देणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे राष्ट्रीय संदर्भ मनात जागृत ठेवून कोणत्याही स्थानिक प्रश्नाचा विचार करणे हे यशवंतरावांचे गुण नेहरूंनी अचूक हेरले होते.

शिवसेना हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतून उद्‌भवलेले विचित्र अपत्य होते. यशवंतरावांनी शिवसेनेच्या संकुचित प्रादेशिकतेचा नेहमीच धिक्कार केला होता. ही एक अपायकारक फॅसिस्ट चळवळ आहे, राष्ट्राची मूलभूत कल्पना आणि मानवी मूल्ये यांच्याशी ती विसंवादी आहे, हे आपले मत त्यांनी कधीच लपवून ठेवले नव्हते. परप्रांतीय हितसंबंधांना व अन्य भाषिक नागरिकांना असुरक्षित वाटू नये, याची त्यांनी खास दक्षताही घेतली होती.

यशवंतरावांची धोरणे, त्यांची मुत्सद्देगिरी आणि ग्रामीण भागात त्यांनी सुरू केलेल्या आर्थिक व राजकीय प्रक्रिया यांचा लाभ त्यांच्या पक्षाला १९६२ च्या विधानसभा निवडणुकीत मिळणे क्रमप्राप्तच होते. १९५७ च्या निवडणुकीत डागाळलेली आपल्या पक्षाची प्रतिमा यशवंतरावांच्या धोरणी नेतृत्वाखाली महाराष्ट्र काँग्रेसने पार पुसून टाकली.

मात्र यानंतर फार काळ महाराष्ट्राची धुरा प्रत्यक्षपणे सांभाळण्याची संधी यशवंतरावांना मिळाली नाही. चीनच्या आक्रमणानंतर नेहरूंनी त्यांना संरक्षणमंत्री म्हणून केंद्रीय मंत्रिमंडळात घेतले. तिथून व्यक्तिगतरीत्या चव्हाण एकापेक्षा एक महत्त्वाचे खाते सांभाळीत आपला राजकीय प्रभाव वाढवीत राहिले. मात्र, महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांचा वारसा पुढे चालू राहावा, असे नेतृत्व व परिस्थिती ते टिकवून ठेवू शकले नाही.

केंद्रातून महाराष्ट्राचे राजकारण

केंद्रात जाताना यशवंतरावांनी मारोतराव कन्नमवार यांना आपला वारसदार नेमले. हा बदल फारच मोठा होता. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा शैलीदारपणा, रुबाब आणि चौफेर बहुश्रुतपणा कन्नमवारांच्या ठायी नव्हता; पण ते उत्तम संघटक होते. सामान्य कार्यकर्त्यांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. यशवंतरावांनी त्यांना मुख्यमंत्री केले, याच्या अनेक भिन्नभिन्न प्रतिक्रिया उमटल्या. काहींना ही नेमणूक यशवंतरावांच्या एकूण जातिनिरपेक्ष

व्यापक दृष्टिकोनाशी सुसंगत अशीच वाटली, काहींच्या मते मात्र स्वतःच्या नेतृत्वाला पर्यायी असे सत्ताकेंद्र मराठा समाजातून उभे राहू नये, अशा हिशेबातून चव्हाणांनी कन्नमवारांच्या पारड्यात आपले वजन टाकले असावे.

दुर्दैवाने कन्नमवार त्यानंतर फार दिवस जगू शकले नाहीत. त्यांच्या निधनानंतर नेतृत्वाची पाळी मराठवाड्याची होती. पण यशवंतरावांनी पुन्हा विदर्भाच्याच वसंतराव नाईकांच्या बाजूने कौल दिला. दुसऱ्यांदा मराठेतर व्यक्तीच्या बाजूने चव्हाण उभे राहिलेले पाहून त्यांच्या अनेक चाहत्यांनाही त्यांच्या हेतूंविषयी शंका वाटू लागली. परंतु यशवंतरावांविरूद्ध बंड करण्याचा विचारही महाराष्ट्रातील काँग्रेस-पुढारी करू शकत नव्हते, इतकी त्यांची घट्ट पकड मराठी राजकारणावर होती.

वसंतराव नाईक कोणत्याच अर्थाने यशवंतरावांचा वारसा चालवणारे नव्हते. किंबहुना त्या दोघांची व्यक्तिमत्वे, पार्श्वभूमी व वैचारिक निष्ठा सपशेल अंतर्विरोधी होत्या. नाईक स्वातंत्र्यलढ्यापासून तर दूर होतेच; पण त्यांचा सामाजिक परिवर्तनासाठी वा न्यायासाठी चाललेल्या कोणत्याही चळवळीशी दूरान्वयानेही संबंध आलेला नव्हता. समाजवादाशी तर त्यांची तोंडओळखही नव्हती. तरीही १९६७ च्या निवडणुकीनंतर पुन्हा वसंतराव नाईकच यशवंतकृपेने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले; आणि १९७२ च्या निवडणुकीनंतरही नेतृत्वबदलाच्या प्रयत्नास खो घालण्याचा यशवंतरावांनी प्रयत्न केला. नाईकांसोबत मराठवाड्यात दौरा करून यशवंतरावांनी 'नाईकच पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहतील', असे जाहीर करून टाकले.

१९६९ च्या राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारीबाबत यशवंतरावांनी श्रीमती गांधींच्या विरोधात पवित्रा घेतला, तेव्हाही महाराष्ट्र काँग्रेस एकमुखाने चव्हाणांच्या मागे उभी होती. पण १९७२ पर्यंत ही परिस्थिती राहिलेली नव्हती. श्रीमती गांधींनी प्रादेशिक राजकारणात बळकट पाये असणाऱ्या नेत्यांचे ते पाये खिळखिळे करण्याचे जोरदार प्रयत्न मधल्या काळात नेटाने चालवले होते. याची झळ यशवंतरावांनाही लागणे ओघानेच आले होते.

नाईक हे यशवंतरावांचे उमेदवार असतील, तर आपला पाठिंबा शंकरराव चव्हाणांना, अशी भूमिका श्रीमती गांधींची होती. मोहन धारियांना त्यांनी तसे आश्वासनही दिले होते. यशवंतरावांनी आपली पकड टिकवण्यासाठी वापरलेल्या नीतीचाच वापर करून इंदिरा गांधी त्यांची मुळे छाटण्याचा खटाटोप करीत आहेत, हे स्पष्ट दिसत होते. नाईकांनी हे हेरले असावे. त्यांनी यशवंतरावांना सोडून द्वारकाप्रसाद मिश्र यांना हाताशी धरले. त्यांच्यामार्फत महाराष्ट्राच्या उमेदवारांच्या यादीत आपली माणसे त्यांनी मोठ्या संख्येने घुसवली. श्रीमती गांधींनी 'शंकरराव चव्हाणांना मुख्यमंत्रिपद पेलणार नाही',

असे लटके कारण सांगून नाईकांनाच हिरवा कंदील दाखवला. नाईक तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले, पण तिसऱ्या वेळेचे श्रेय यशवंतरावांना देता येणार नाही.

पण त्यानंतर लवकरच महाराष्ट्र काँग्रेस कामचलाऊ प्रमाणावरही एकसंध टिकून राहू शकली नाही. यशवंतरावांच्या एकमुखी नेतृत्वामुळे किमान तेवढे ऐक्य तोपर्यंतच्या काळात साध्य झाले होते. श्रीमती गांधींच्या राजकीय शैलीमुळे ते नष्ट झाले. मराठा-मराठेतर वादाला निरनिराळे संदर्भ चिकटवून नाईक मंत्रिमंडळाविरुद्ध असंतोषाचे उद्रेक त्यांच्याच पक्षातली मंडळी घडवून आणू लागली. या कामी त्यांच्यापैकी काहींनी शिवसेनेचेही साह्य घेतले. मराठवाडा विकास आंदोलन हेही नाईकांच्या नेतृत्वाला प्रच्छन्न आव्हानच होते. 'नाईक नकोत' यावर महाराष्ट्र काँग्रेस पुढाऱ्यांचे एकमत होते, पण 'कोण पाहिजे?' यावर मतांतरेच मतांतरे होती. वसंतदादा पाटील व पी. के. सावंत प्रभृतींनी यशवंतरावांना डावलून सरळ इंदिरा गांधींसमोरच साकडे घातले. त्या म्हणतील, तो मुख्यमंत्री स्वीकारण्याची तयारी दाखवली. तरी इंदिराजी काही निर्णय घेत नव्हत्या; पण बोर्डीच्या शिबिरात जेव्हा त्यांना जाणवले, की अजूनही महाराष्ट्रात यशवंतरावांना बराच पाठिंबा आहे, तेव्हा त्यांनी मुख्यमंत्री बदलण्याचा तात्काळ निर्णय घेतला. त्यांनी रजनी पटेल, सावंत व शंकरराव चव्हाण यांना पाचारण करून शंकररावांना मुख्यमंत्री करण्याचा निर्णय घेतला. यशवंतरावांना 'एक सिद्ध गोष्ट' (फेट अकम्पली) या स्वरूपात हा 'निर्णय' कळवून त्यांची त्यास 'संमती' फक्त श्रीमती गांधींनी मिळवली.

शंकरराव चव्हाणांची निवड म्हणजे एका परीने महाराष्ट्राच्या राजकारणातील 'यशवंत' - पर्वाची अधिकृत परिसमाप्तीच होती. स्वाभिमानशून्य मराठा लॉबीने मध्यमजातीकडून स्वतःकडे सत्ता खेचून आणण्याच्या एकमात्र स्वार्थी हेतूने 'डायरेक्ट' इंदिराजींकडून त्यांच्याच मर्जीनुरूप मिळवलेले मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार हीच शंकरराव चव्हाणांची प्रतिमा होती. आणीबाणीच्या काळात इंदिरा-संजय जोडीचे आज्ञाधारक सुभेदार म्हणून शंकररावांनी निष्ठेने कारभार केला. पण त्यांना अजिबात राजकीय पाया नसल्यामुळे १९७७ च्या निवडणुकीत काँग्रेसला महाराष्ट्रात प्रचंड हादरे बसले. दादा, मोहिते, नाईक या मुख्यमंत्र्यांविरुद्ध बंड करून उठले.

यशवंतरावांनी केंद्रात श्रीमती गांधींच्या एकाधिकाराविरुद्ध ठाम भूमिका घेतली, तेव्हा महाराष्ट्र काँग्रेसच्या मुखंडांनी पुन्हा त्यांची कास धरली. पक्षफूट झाली. इंदिरा काँग्रेस नामक नवा पक्ष निर्माण झाला. तरी मराठा लॉबी बव्हंशी यशवंतरावांसोबत मूळ पक्षात राहिली. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका झाल्या. कोणत्याच पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले नाही; पण जनता पक्षाला सार्वत्रिक जागा मिळाल्या. पण त्या पक्षाला संधी

न देता राज्यपाल सादिक यांनी काँग्रेस-इंदिरा काँग्रेस यांच्या युतीला मान्यता देऊन वसंतदादांना मुख्यमंत्री केले. एस. एम. जोशींनी म्हटल्याप्रमाणे- "खरे तर जनता पक्ष व स्वर्णसिंग काँग्रेस या दोघांत एकाधिकारशाही विरोधाचा समानधर्म होता. पण यशवंतराव जनता पक्षाचा श्यामकर्ण वारू अडवण्याच्या इरेस पडले व आय काँग्रेसचा लांडगा त्यांनी खुशाल घरात घेतला! हे त्यांचे अंदाज त्यांच्या अंगाशी आले." ('मी : एसेम', ३७४).

हा काळ यशवंतरावांच्या राजकीय हयातीत कमाल संदिग्धतेचा व राजकीय किंकर्तव्यतेचा काळ ठरला. श्रीमती गांधींच्या अटकेचे निमित्त साधून तिरपुडे-मोहिते प्रभृतींनी यशवंतरावांच्या 'चौकडी' प्रभुत्वाविरुद्ध एल्गार पुकारला. यशवंतरावांच्या कृपेने मुख्यमंत्रिपदावर असलेल्या वसंतदादांनाही यशवंतरावांचा भरोसा वाटत नव्हता. ते केव्हा शरद पवारांना पाठिंबा देतील, याचा त्यांना नेम वाटेना. यशवंतरावांविरुद्ध भूमिका घेणे हे इंदिरानिष्ठेचे गमक या काळी महाराष्ट्रात समजले जाऊ लागले.

दादांची भीती खरी ठरली. यशवंतरावांच्या प्रच्छन्न पाठिंब्याच्या बळावर पवारांनी बंडखोरी करून वसंतदादांच्या मंत्रिमंडळातून राजीनामा दिला व समांतर काँग्रेस स्थापन केली. या समांतर काँग्रेसने जनता पक्षाशी समझौता करून पुरोगामी लोक दलाचे संयुक्त सरकार महाराष्ट्रात उभे केले. पण तेही अल्पजीवी ठरले.

आयुष्याच्या अखेरीस वसंतदादांशी मैत्री करून पुन्हा महाराष्ट्राच्या राजकारणात उभे राहण्याचा एक क्षीण प्रयत्न यशवंतरावांनी केला. पण इतिहासजमा झालेला त्यांचा प्रभाव त्यांना पुन्हा कधीच प्रस्थापित करता आला नाही.

शोकांतिकेची कारण-मीमांसा

महाराष्ट्राच्या राजकारणात यशवंतरावांची सर्वांगीण शोकांतिका झाली आहे, त्यांना सपशेल पराभव पत्करावा लागला आहे आणि त्यांच्या स्वप्नांची परिपूर्ती तर सोडाच; उलट, त्यांना सपशेल अनपेक्षित असलेल्या स्वरूपात १९८५ साली महाराष्ट्राला आपला रौप्यमहोत्सव साजरा करावा लागला आहे, याबद्दल दुमत संभवणार नाही.

असे का व्हावे? या प्रश्नाचे पहिले उत्तर यशवंतरावांना उपलब्ध असलेल्या पक्षरचनेत शोधावे लागते. त्यांनी रचलेले स्वप्न- आरेखन प्रत्यक्षात उतरवण्याच्या दृष्टीने त्यांच्या पक्षाची रचना मुळीच पोषक नव्हती. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही तत्त्वे व परिवर्तन-प्रक्रिया यांच्या फलस्वरूप समाजाच्या नव्या थरांतून या पक्षात भरती झाली असली, तरी पक्षाचा पाया मूलतः गटांच्या आर्थिक व राजकीय आकांक्षा हाच राहिला. इथला बहुजन-समाज राष्ट्रसभेत आला, तोच मुळी सत्तांतराची शक्यता स्पष्ट दृष्टिक्षेपात आली,

त्यानंतरच. त्यामुळे प्राप्त परिस्थितीचा लाभ आपल्या संख्याबळाच्या जोरावर कसा पदरात पाडून घेता येईल, हेच त्याचे मुख्य व्यवधान राहिले. व्यापक आणि तत्त्वनिष्ठ राजकारणासाठी लागणाऱ्या ध्येयनिष्ठा, समर्पित वृत्ती आणि सहिष्णुता या नेतृत्व गुणांचा नीट विकास काँग्रेसच्या बांधणीत फारसा झालेलाच नव्हता. त्यामुळे निश्चित कार्यक्रमाशी स्वतःला बांधून घेऊन कालबद्ध योजना हाती घेण्यापेक्षा गटबाजीचे व संधिसाधूपणाचे सत्ताकांक्षी राजकारण करण्याला अनुकूल असाच काँग्रेस कार्यकर्त्यांचा पिंड घडत गेला होता.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजवादी, शेतकरी कामगार पक्ष, सर्वोदयी गांधीवादी वगैरे गट बाहेर पडल्यानंतर; आणि काँग्रेस हाच एकमेव प्रबळ व संघटित पक्ष असल्याने तोच सत्तेवर राहणार, हे ओळखून नवे व्यवहारचतुर व आपमतलबी गट काँग्रेसमध्ये शिरल्यानंतर कपट- कारस्थाने, गटस्वार्थ व वैयक्तिक हेव्यादाव्यांपलीकडे जाऊन राजकारण करण्याची त्या पक्षाची क्षमताच शिल्लक उरली नव्हती. पक्षाच्या या मर्यादा लक्षात न घेता चव्हाणांनी कार्यक्रमांची आखणी केली होती. कार्यक्रम जितके अवास्तव व अव्यवहार्य असतात, तेवढी कार्यकर्त्यांमध्ये ढोंगबाजी शिरण्याची शक्यता वाढते. यशवंतरावांच्या कार्यक्रमांचे हेच झाले. तत्त्वतः यशवंतरावांच्या कार्यक्रमांना नकार देणे कुणालाच शक्य नव्हते. पण ते अमलात आल्यास प्रबळ स्थानिक हितसंबंध अपरिहार्यतः दुखावणार आणि आपला राजकीय पायाच उखडणार, हे पक्षनेत्यांना ठाऊक होते.

संयुक्त महाराष्ट्रासाठीचे आंदोलन सुरू असताना यशवंतराव अमराठी शक्ती व राष्ट्रीय नेते यांच्या बळावर सत्तारूढ होते. नंतर त्यांनी ग्रामीण महाराष्ट्रात पक्षाला पाया मिळवून देऊन महाराष्ट्र काँग्रेस जागवली, हे मान्य करीत असतानाच त्यांनी केलेली ही पक्षउभारणी पुरोगामी कार्यक्रमांच्या राबवणुकीसाठी अगदीच कुचकामी होती, हेही लक्षात घ्यायलाच हवे, व्यक्तिगत संबंध, पारंपरिक निष्ठा व सहकारी प्रयत्नातून अर्थलाभ हेच या पक्षसंघटनाचे आधार होते. यशवंतरावांनी संयुक्त महाराष्ट्राच्या सत्तेवर संकलित काँग्रेस पक्ष दृढमूल केला. त्यासाठी आवश्यक ती सर्व तंत्रे वापरली. पण कार्यक्रमाधिष्ठित पक्षनेतृत्वाची फळी उभारणे मात्र त्यांना साध्य झाले नाही. पक्षाचे ध्येय निवडणुकांपुरतेच सीमित राहिल्यामुळे पुरोगामी प्रवृत्तींची व परिवर्तनाग्रही मूल्यांची रुजुवात तो पक्ष करू शकला नाही.

सहकारी चळवळ आणि सत्तेचे विकेंद्रीकरण यांतून अपेक्षित परिणाम साधलेच नाहीत. उलट, अनपेक्षित दुष्परिणाम मात्र मोठ्या प्रमाणावर पुढे आले. सहकारी साखर कारखान्यांभोवती बागायती सधन शेतकऱ्यांचा एक वर्ग ग्रामीण भागात आघाडीस आला आणि विकेंद्रीकरणातून उपलब्ध झालेली सत्तास्थाने त्यानेच बळकावली. सरकारी योजनांमधून

घडून आलेला विकास मूल्यमुक्त (व्हॅल्यू-फ्री) स्वरूपात झाल्यामुळे त्यातून ग्रामीण भागातील विषमतेला वा सर्वांगीण शोषणाला आळा बसला नाही. श्रमिक घटक विकास- प्रक्रियेपासून दूरच राहिले. समृद्धांची काही बेटे फक्त ग्रामीण समाजात निर्माण झाली आणि त्यांनी शहरातील भांडवलदार वर्गाशी साटेलोटे जुळवून घेतले. कमाल जमीनधारणा व शेतजमिनींचे फेरवाटप कागदोपत्रीच राहिले. शेतीचे आधुनिकीकरण झाले, तरी शेतीक्षेत्रातील धुरीणांची मानसिकता सरंजामीच राहिली आणि नेतृत्वाचे आधारही पारंपरिकच राहिले. कौटुंबिक मोठेपणा, सामाजिक प्रतिष्ठा व सांपत्तिक सुस्थिती हेच ते आधार होते. तरुण व पुरोगामी हे यशवंतरावांच्या मनातले नेतृत्व राजकारणात पुढे येऊच शकले नाही. बहुजन-समाजाच्या अभ्युदयापेक्षा व्यक्तिगत, आप्तस्वकीय व जातिगट यांच्या स्वार्थाचा पाठपुरावा हेच राजकारणाचे साध्य होऊन बसले.

काही अंशी यशवंतरावांच्या व्यक्तिकेंद्री नेतृत्व-बांधणीचाही या शोकांतिकेत वाटा आहेच. परिवर्तनाग्रही नेतृत्व सत्तेच्या अडणीवर बसून सहसा निर्माण होतच नसते. ते चळवळीतूनच आकार घेते. बिळाशी सत्याग्रहाच्या वेळी जनशक्तीच्या सामर्थ्याचा प्रत्यय घेतलेल्या, चळवळीत निराशेचे वातावरण येऊ नये, यासाठी आत्माराम बापूंच्या उमेदवारीचा आग्रह धरणाऱ्या आणि ४२ च्या आंदोलनात प्रतिसरकारच्या प्रयोगात चळवळीचे बळ अनुभवलेल्या यशवंतरावांनी नंतर चळवळींपेक्षा सत्ताकारणालाच समाजपरिवर्तनाचे साधन मानले. त्यामुळेच चळवळीतले त्यांचे साथीदार आणि सत्तापर्वातील सहकारी हे पूर्णतया वेगळे असल्याचे दिसून आले. 'हे राज्य मराठी आहे, मराठा नव्हे', हे सूत्र आपल्या सहकाऱ्यांपर्यंत संक्रमित करणे यशवंतरावांना कधीच साध्य झाले नाही. ग्रामीण मानसिकतेत बदल घडवण्यासाठी सुरू झालेली सत्यशोधक चळवळ पुढे रेटण्याचे प्रयत्न यशवंतरावांकडून झाले नाही. प्रतिसरकारचा अधिकृत इतिहास शासनातर्फे प्रकाशित करण्याचेही कधी त्यांच्या मनात आले नाही, इतके ते या चळवळींपासून दुरावले होते. विचारसरणीच्या दृष्टीने त्यांचे राजकीय सहकारी कायम दिवाळखोरच राहिले.

मोरारजींची भेट होण्यापूर्वी तळपातळीवर ध्येयवादी तरुण कार्यकर्त्यांसोबत काँग्रेसला नवी दिशा, नवे पर्यायी नेतृत्व व सामाजिक-आर्थिक उद्दिष्टे देण्यासाठी धडपडणारे यशवंतराव आणि १९४६ नंतर संसदीय मनोवृत्तीची शिकार झालेले, चळवळींचा भूतकाळ दडपू पाहणारे आणि शासकीय सत्तेतूनच समाजसेवा शक्य आहे, या निर्णयाप्रत आलेले यशवंतराव- हे परस्परव्यावर्तक दोन टप्पे यशवंतरावांच्या राजकीय प्रवासात स्पष्ट दिसतात.

द्वैभाषिकाचा स्वतःला न पटलेला पर्याय त्यांनी जिद्दीने राबवला, त्यात त्यांची पक्षनिष्ठा होती. त्या काळात संयुक्त महाराष्ट्राचे एकेक विरोधक त्यांनी जिंकून घेतले,

यातील त्यांचे कौशल्य व ऐतिहासिक श्रेयही नाकारता येणार नाही. द्वैभाषिकासाठी यशवंतरावांसारखा धुरंदर नेता जर काँग्रेसश्रेष्ठींना गवसला नसता, तर या उफराट्या राज्याचा कारभार चालवताच आला नसता आणि अशा वेळी नाइलाजास्तव जर तो प्रयोग सोडून देणे भाग पडले असते, तर तो संयुक्त महाराष्ट्र समितीचा प्रचंड मोठा विजय ठरला असता. मोर्चे-आंदोलनांच्या मार्गाने पदरात पडलेले यश सामान्यतः अल्पजीवी ठरते, संयुक्त महाराष्ट्राचेही तेच झाले असते. चळवळ म्हणून समितीची ताकद केवढीही मोठी असली, तरी सुसूत्र व संगतवार कारभार चालवण्यासाठी लागणारा किमान एकजिनसीपणा समितीत कधीच नव्हता. रा. पु. आयोगाने प्रारंभीच संयुक्त महाराष्ट्र दिला असता, तर यशवंतरावांची राजकीय भरभराट इतक्या झपाट्याने झाली नसती. त्या काळी संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे कर्तुमकर्तुम नेतृत्व हाती बाळगणाऱ्या देव-देवगिरीकर प्रभृतींचे उच्चवर्णीय नेतृत्व आणखी काही काळ महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी राहिले असते. चळवळीने नेतृत्वाचा खांदेपालट तातडीने घडवून आणला. त्यामुळे असे म्हणणे भाग ठरते, की संयुक्त महाराष्ट्राबद्दलचे शासकीय निर्णय आणि चव्हाणांचे राजकीय आरोहण या एकमेकींसाठी परस्परपूरक ठरलेल्या प्रक्रिया आहेत.

द्वैभाषिकाचे मुख्यमंत्रिपद चालवताना लोकनिंदेची काळजी न करता चव्हाणांनी कारभार केला, त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश त्यांच्या हातून येण्यात काहीच अनपेक्षित नव्हते. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर यशवंतरावांनी पारंपरिक जातिनिष्ठा, ऐतिहासिक वारसा आणि आधुनिक संघटन-पद्धती यांचे योग्य ते संमिश्रण करून महाराष्ट्र काँग्रेस बळकट करण्याचा प्रयत्न केला. व्यावहारिक संदर्भात त्यांचा तो प्रयत्न यशस्वीही झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर झालेल्या निवडणुकांनी या यशाची स्पष्ट पावती दिली होती. यशवंतरावांच्या कार्यपद्धतीमुळे व चाणाक्ष राजनीति-नैपुण्यामुळे विरोधी पक्ष निष्प्रभ झाले, विरोधी पक्षनेत्यांना काँग्रेसच्या छत्राखाली परत यावेसे वाटले. यामधून स्वतः यशवंतरावांचे व त्यांच्या पक्षाचे राजकीय बळ आणि प्रतिष्ठा निःसंशयपणे वाढली. मात्र ज्या संयुक्त महाराष्ट्राचे आदर्श चित्र त्यांनी त्या वेळी संकल्पनात्मक पातळीवर रेखाटले होते, त्याचे समूर्तीकरण करण्यासाठी आवश्यक असा परिबद्ध पक्ष अशा बेरजेच्या राजकारणातून उभा राहू शकला नाही, उलटपक्षी नव्या सत्ताग्रहणाने उन्मत्त झालेला बहुजन पुढारी-वर्ग ग्रामीण पातळीवर शिरजोर झाला आणि त्याने सरकारी योजनांमागील सामाजिक-आर्थिक न्याय आणि परिवर्तन या प्रेरणाच पार धुळीत मिळवल्या. योजनांचे लाभ समाजातल्या बलवत्तर घटकांना आणि प्रादेशिकदृष्ट्या प्रगत विभागांनाच मिळून विषमता व असंतुलन पूर्ववतच कायम राहिले, नव्हे वाढत गेले.

यशवंतरावांचे व्यक्तिगत यश आणि त्यांचे पक्षगत अपयश यांतील अंतर्विरोध मराठी राजकारणावर यशवंतरावांचा जास्तीत जास्त प्रभाव असण्याच्या काळातसुद्धा स्पष्ट जाणवत होता. मराठवाडा-कोकण या प्रदेशांतील लोकांचा चव्हाणांच्या सद्‌गुणांवर व शब्दांवर विश्वास होता, पण त्यांच्या राज्यप्रशासनाबद्दल मात्र ते सदैव साशंक होते. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी व्यक्तिशः चव्हाणांच्या गुणग्राहक- जिज्ञासू व्यवहार-चातुर्याबद्दल भारावून बोलत असत. पण यशवंतरावांच्या पक्षाबद्दल मात्र त्यांच्या मनात कधीच अनुकूल भाव नव्हता. विरोधी पक्षनेते यशवंतरावांच्या सौजन्यशील, आस्थेवाईक व सहिष्णू वृत्तीबद्दल कृतज्ञ असत, पण या गुणांचे संस्कार महाराष्ट्र काँग्रेसवर यशवंतराव करू शकतील, अशा भ्रमात ते कधीच नव्हते. यशवंतरावांच्या तोंडच्या समाजवादाच्या भाषेने भांडवलदार-जमीनदार वर्ग कधीच बुजत नसत, कारण एकंदर राजकीय चौकटीच्या भांडवली निष्ठा ते पूर्ण ओळखून होते. या परिस्थितीचा एकच अर्थ होता, तो असा, की यशवंतरावांचे जे जे म्हणून यश आपण नोंदवले, ते त्यांचे व्यक्तिगत यश होते, त्यांना मिळालेला सर्वस्तरीय पाठिंबा हा ते तिथे असेपर्यंतच टिकणार होता आणि वारसदारांना यांपैकी कशाचाच आयता लाभ व्हावा, अशी परिस्थिती नव्हती; तो करून घ्यावा, ही त्यांची कुवत नव्हती किंवा तसे त्यांचे प्रशिक्षणही झालेले नव्हते.

संयुक्त महाराष्ट्राच्या रौप्यमहोत्सवी वर्षात मराठा महासंघ किंवा पतितपावन संघटना यांच्यासारख्या उच्चकुलीन मराठ्यांच्या संस्था दलितांच्या आरक्षणाला विरोध करतात, याहून मोठी यशवंतरावांच्या पराभवाची दुसरी कोणतीच बाब असू शकत नाही. मराठा समाज चाळीस टक्के आहे, याचा व्यावहारिक राजकारणासाठी उपयोग करून घेणाऱ्या चव्हाणांनी तसे करण्याचा हा संभाव्य दुष्परिणाम कदाचित कधीच अपेक्षिला नसेल. पण आज तो घडून आला आहे, हे कुणालाच नाकारता येणार नाही. शिवसेनेला 'अपायकारी फॅसिझम्' म्हणणाऱ्या चव्हाणांच्या वारसदारांनी स्वार्थी राजकारणासाठी शिवसेनेला आतून पाठिंबा दिला, ही भयंकर वस्तुस्थितीही नाकारता येणार नाही. किंबहुना असेही म्हणता येईल, की महाराष्ट्र सोडताना यशवंतरावांना या नव्या संकुचित प्रादेशिक मराठा अहंकाराची पूर्वकल्पना कदाचित आली असावी, आणि त्यामुळेच आपला वारसदार त्यांनी मध्यम जातीतून निवडला असावा आणि नंतर तेच धोरण पुढे दहा-बारा वर्षे चालवले असावे.

महाराष्ट्राची राजकीय सत्ता शहराकडून खेड्याकडे नेण्याचे श्रेय यशवंतरावांना देत असतानाच त्यांच्या काही धोरणांमधून शहरी भांडवलदार वर्ग आणि ग्रामीण जमीनदार वर्ग यांच्यात एक अनिष्ट युती होऊन ती समाजवादी महाराष्ट्राच्या उभारणीआड संयुक्तपणे उभी राहिली, याचे अपश्रेयही यशवंतरावांच्याच पदरात टाकावे लागले.

●●●

३. यशवंतराव - राजधानी दिल्लीत

महाराष्ट्राच्या राजकारणात प्रत्येक संकटाला संधीत रूपांतरित करून यशवंतरावांचे नेतृत्व तावून सुलाखून निघत असतानाच केंद्रपातळीवर चीनच्या आक्रमणामुळे एक मोठाच पेचप्रसंग निर्माण झाला होता व त्याने खुद्द नेहरूंच्याही नेतृत्वाला हादरे दिले होते. संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांना काढून टाकण्याची मागणी सत्तारूढ व विरोधी-दोन्ही पक्षगटांनी केली होती. नेहरूंची इच्छा काहीही असली, तरी त्या मागणीचा जोर वाढल्यावर त्यांना पर्यायच उरला नव्हता. त्यांनी लालबहादूर शास्त्रींशी नव्या संरक्षण-मंत्र्याच्या निवडीबद्दल चर्चा केली. टी. टी. कृष्णम्माचारी, बिजू पटनाईक व यशवंतराव चव्हाण ही तीन नावे चर्चेत पुढे आली. या पदावरची व्यक्ती वादातीत असावी, प्रशासकीय कौशल्य तिने सिद्ध केलेले असावे आणि तिला बळकट राजकीय पाठिंबा असावा, या तिन्ही निकषांच्या कसोटीला नेहरू-शास्त्रींच्या मते फक्त चव्हाणच उतरत होते. (कुन्हीकृष्णन्: 'चव्हाण ॲण्ड दि ट्रबल्ड डीकेड',- ७७). चव्हाणांनी नेहरूंना नम्रपणे सांगितले, की आपल्याला लष्करी बाबींचा पूर्वपरिचय नाही आणि राष्ट्रभक्तीखेरीज त्या पदाला लागणारी गुणवत्ताही नाही. पण नेहरूंचा निर्णय कायम राहिला. १४ नोव्हेंबर, १९६२ रोजी चव्हाणांची संरक्षण-मंत्रिपदावरील नियुक्ती जाहीर झाली आणि त्यांच्या राजकीय जीवनातील नव्या पर्वाला प्रारंभ झाला.

संरक्षणमंत्री

संरक्षण-मंत्रिपदाचा प्रभार घेतल्यानंतर लवकरच यशवंतरावांनी त्या खात्याच्या कारभाराची माहिती बारकाईने करून घेतली, नेफा व लडाख सीमांना भेटी देऊन युद्धाचे

बारकावे समजावून घेतले. लष्करी अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केल्या. प्रत्येक आघाडी त्यांनी नजरेखालून घातली. लष्करी प्रशिक्षण केंद्रांत जाऊन चर्चा केल्या. सैनिकांच्या आधीच्या काही घडामोडींमुळे डळमळीत झालेला आत्मविश्वास त्यांनी पुन्हा बळकट केला. त्यांच्यांतील हताशपणाची भावना पुसून त्यांचे नीतिधैर्य वाढवले. चव्हाणांनी आधी ज्या पदांच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या होत्या, त्यांपेक्षा अगदीच वेगळ्या प्रकारच्या जबाबदाऱ्या या नव्या पदावरून त्यांना पत्करायच्या होत्या. इथल्या समस्यांचे स्वरूप मूलतः निराळे होते. त्यांची परिभाषा, सोडवण्याची रीत आणि आयाम- सारेच काही एकदम वेगळ्या प्रकारचे होते. पण अंगभूत चिकाटी, व्यासंगी वृत्ती व कार्यनिष्ठा या गुणांच्या बळावर चव्हाणांनी नव्या पदासाठी आवश्यक असलेली नवी पात्रता आत्मसात केली. संरक्षण ही केवळ लष्कराशी संबंधित बाब नसून तिला महत्त्वाचे राजकीय, आर्थिक व मानसशास्त्रीय पदर असतात, याचे भान ठेवून त्यांनी संरक्षण- खात्याचा कारभार चालविला.

संरक्षणाशी संबंधित विविध प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र समित्या चव्हाणांनी नेमल्या. विभिन्न क्षेत्रांचा व खात्यांचा परस्परांशी जो संपर्क व सुसंवाद संरक्षणदृष्ट्या आवश्यक असतो, तो प्रस्थापित करण्यासाठी पावले उचलली. जनसामान्यांमध्ये लष्कराच्या भूमिकेसंबंधीची जाण वाढवण्याचे प्रयत्न केले. लष्करी दलांची फेररचना व शस्त्रसज्जता याबाबतीत त्यांनी स्वतः तर हस्तक्षेप केलाच नाही; पण अन्य कुणालाही करू दिला नाही. लष्कराच्या आधुनिकीकरणाचे उपाय त्यांनी तातडीने योजिले. परदेशांकडून साहित्य व शस्त्रसामग्री मिळवली. आधीच्या संरक्षण-मंत्र्यांच्या तुलनेत त्यांनी संरक्षणविषयक प्रश्नांबाबत संसदेला व सर्वसामान्य जनतेला अधिक विश्वासात घेतले, असा अभिप्राय वृत्तपत्रांनी व्यक्त केला होता. (उद्धृत, कित्ता, १०१). त्यांना त्यांच्या प्रशासकीय पूर्वानुभवाचा व कार्यक्षमतेचा खूप उपयोग झाला. आव्हाने पाहून उफाळणाऱ्या त्यांच्या आत्मविश्वासाने व महत्त्वाकांक्षेने त्यांना उत्तम साथ दिली.

नव्या प्रधानमंत्र्यांची निवड

मे १९६४ मध्ये जवाहरलाल नेहरूंचे निधन झाले. वारसदारीचा प्रश्न निर्माण झाला. मोरारजी व लालबहादूर शास्त्री यांची नावे पुढे आली होती.

"यशवंतरावांच्या नावाची चर्चा झाली, ती पर्यायी उमेदवार म्हणून... मोरारजी आणि शास्त्रीजी यांच्यामध्ये जी चुरस निर्माण झाली, तीत एकाने जरी माघार घेतली असती, तरी पर्यायी उमेदवार म्हणून चव्हाण यांचेच नाव पुढे आले असते." असे निरीक्षण ज्येष्ठ पत्रकार द्वा. भ. कर्णिक यांनी नमूद केले आहे. ('चैतन्ययुग' ४७).

आपण केलेला अनुग्रह स्मरून यशवंतराव या निवडणूक-स्पर्धेत आपल्या बाजूने उभे राहतील, अशी मोरारजींची अपेक्षा होती. पण व्यक्तिगत ऋणापेक्षा राजकीय ध्येयनिष्ठेला प्राधान्य देऊन यशवंतरावांनी मोरारजींना निरोप पाठविला, की "आपली निवड झाली, तर मला आनंद वाटेल; पण सदसद्विवेकबुद्धीला स्मरून मात्र मी आपल्याला पाठिंबा देऊ शकत नाही." (उद्धृत, कित्ता, ४९).

त्याच वेळी यशवंतरावांनी असाही आग्रह धरला, की प्रधानमंत्रिपदी करावयाची निवड शक्यतो एकमताने व्हावी. मतदान घेण्याचा मार्ग शक्यतो अवलंबावा लागू नये. 'मतसाधारणतेचा' (कॉन्सेन्सस्) मार्ग म्हणून पुढे ज्याची भारताच्या राजकीय इतिहासात नोंद झाली, त्याचे प्रवर्तक याप्रसंगी यशवंतरावच ठरले. त्यांनी कॉंग्रेस कार्यकारिणीपुढे बोलताना सांगितले,

"भारताच्या भवितव्याकडे साऱ्या जगाचे लक्ष लागलेले आहे. आपण नेत्याची निवड समजुतीने कशी करतो, हे जगाला पाहावयाचे आहे. तेव्हा आपल्यांतील मतभेद या वेळी तरी प्रगट होऊ नयेत. बहुमताचा कौल घेऊन स्पर्धेशिवाय आपण नेता निवडला पाहिजे." (कित्ता)

बहुमताचा कौल घेण्याची जबाबदारी कामराज यांच्यावर टाकण्यात आली. मोरारजींना एकूण परिस्थिती प्रतिकूल असल्याचा अंदाज येऊन त्यांनी स्पर्धेतून माघार घेतली. शास्त्रीजींची निवड अविरोध झाली.

शास्त्रींची कारकीर्द अठरा महिन्यांचीच झाली; पण पाकिस्तानवर भारताने मिळवलेल्या विजयामुळे ती दैदीप्यमान ठरली. शास्त्रींबरोबरच संरक्षणमंत्री चव्हाण यांची कीर्ती या काळात जगभर पसरली. चव्हाणांचे नेतृत्व राष्ट्रव्यापी होण्यास आणि त्यांच्या गुणांचा लौकिक सर्वत्र पसरण्यास पाकिस्तानचे १९६५ चे आक्रमण मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरले. चव्हाणांच्या समर्थ राजकीय नेतृत्वाखाली भारतीय सेनादलांचे नीतिधैर्य या लढ्याच्या वेळी खूपच उंचावलेले होते. आक्रमणाला जो जोरदार प्रतिसाद या दलांनी दिला, त्यामुळे पाकिस्तानच्या लष्करी राजवटीचे धाबेच दणाणले. हवाई दलाने लष्कराला दिलेल्या उत्तम साथीमुळेच ते पाकिस्तानचा पराभव करू शकले. युद्धबंदी झाली, तेव्हा पाकिस्तानने व्यापलेल्या भारताच्या प्रदेशापेक्षा तिपटीहून जास्त पाकिस्तानचा प्रदेश भारताच्या ताब्यात होता.

४ जानेवारी, १९६६ रोजी शास्त्री-अयूबखान बोलणी ताश्कंदमध्ये सुरू झाली. चव्हाण शास्त्रींच्या सोबत होते. युद्धभूमीवरील यशातून जसे चव्हाणांचे संरक्षणमंत्री म्हणून गुण दिसून आले होते, तसे समेटाच्या वाटाघाटींच्या बैठकीत त्यांचे राजनयनैपुण्य सिद्ध

झाले. प्रधानमंत्र्यांच्या अतिविश्वासाचे सहकारी ते त्यामुळे ठरले. ताश्कंद करारावर सही केल्यानंतर दुसऱ्या दिवशी ११ जानेवारी, रोजी हृदयविकाराने शास्त्री निधन पावले.

पुन्हा प्रधानमंत्र्यांची निवड

या वेळी प्रधानमंत्रिपदासाठी इंदिरा गांधी, मोरारजी देसाई, जगजीवनराम यांच्या जोडीला यशवंतराव चव्हाणांचेही नाव ठळकपणे पुढे आले. महाराष्ट्राचे तेव्हाचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी चव्हाणांचे नाव सुचवले. यशवंतरावांनी सावधपणे नाईकांना सांगितले, की श्रीमती गांधी मंत्रिमंडळात आहेत. त्यांच्याभोवती नेहरू घराण्याचे वलय आहे. संपूर्ण भारतात त्यांची राष्ट्रीय नेत्या अशी प्रतिमा झाली आहे. त्या उभ्या राहणार नसल्या, तरच निवडणूक लढण्याचा ते स्वतः विचार करतील. चव्हाणांनी श्रीमती गांधींना स्वतःच विनंती केली आणि "आपण प्रधानमंत्रिपदासाठी निवडणूक लढवणार असला, तर माझा आपल्याला संपूर्ण पाठिंबा आहे," असे सांगितले; पण "आपण उभ्या राहणार नसाल, तर मग आपण मला पाठिंबा द्यावा," असेही सुचवले. (उद्धृत, द्वा. भ. कर्णिक, पूर्वोक्त, ७९).

चव्हाणांचा पाठिंबा मिळाल्यानंतर श्रीमती गांधी यांची उमेदवारी जवळपास पक्कीच झाली होती. चव्हाण स्पर्धेतून दूर झाले, तरी मोरारजी होतेच. 'मतसाधारण' सूत्राचा पूर्वानुभव लक्षात घेता या वेळी ते तो मार्ग मान्य करणे शक्यच नव्हते. खासदारांच्या मतस्वातंत्र्यावर तसे बंधन आणण्याऐवजी खुले मतदान होऊ द्यावे, असा आग्रह त्यांनी धरला. पण राज्यांचे मुख्यमंत्री मोरारजींच्या विरोधात होते. त्यांनी आपापल्या राज्यांतील खासदारांवर दडपण आणले. यशवंतरावांनी याही वेळी मोरारजींचा अपेक्षाभंग केला. त्यांनी मृदू पण ठाम शब्दांत मोरारजींना सांगितले की,

"तत्त्वतः मी इंदिरा गांधी यांच्याजवळ आहे. नेतृत्वाची निवड करताना मतप्रणालीला अधिक महत्त्व दिले पाहिजे, असे मला वाटते. तुमच्याबद्दल कृतज्ञताभाव ठेवूनही मी तुम्हांला मत देऊ शकणार नाही." (उद्धृत, कित्ता, ८२).

कामराज, चव्हाण, जगजीवनराम आणि अनेक राज्यांचे मुख्यमंत्री विरोधात असताना निवडणुकीत मोरारजी निवडून येणे शक्यच नव्हते. श्रीमती गांधी भारताच्या तिसऱ्या प्रधानमंत्री झाल्या. उपप्रधानमंत्रिपद व अर्थखाते मोरारजींना देण्यात आले.

गृहमंत्रिपद

गृहमंत्रिपद गुलझारीलाल नंदा यांच्या हाती होते. दोन वेळा हंगामी प्रधानमंत्रिपद देऊन या वेळी उपप्रधानमंत्रिपदीही न बसवल्यामुळे नंदाजी आधीच दुखावले होते. दुसऱ्या

वेळी तरी प्रधानमंत्रिपद वर्षभरासाठी दिले जाईल, कारण वर्षभरात निवडणुका व्हायच्या होत्या, अशी त्यांची अपेक्षा होती. पण ती खोटी ठरली होती. नोव्हेंबर १९६६ मध्ये गोहत्याबंदीच्या प्रश्नावर साधूंचे मोठे व हिंसक बंड राजधानीत झाले. या बंडाला गृहमंत्र्यांचीच आतून फूस असल्याचा प्रवाद सर्वत्र पसरला. काँग्रेस खासदारांनीच त्यांना काढून टाकण्याची मागणी केली. नंदांनी प्रधानमंत्र्यांचा तटस्थ पवित्रा पाहून राजीनामा दिला. तो त्वरित स्वीकृत झाला.

त्या खात्यावर अनेक मंत्र्यांचे डोळे होते. चव्हाण फारसे उत्सुक नव्हते. पण श्रीमती गांधींनी ते त्यांना द्यायचे ठरविले. स. का. पाटील यांनी "चव्हाण हे प्रादेशिक नेते आहेत, सबब त्यांना गृहमंत्रालयाची जबाबदारी देऊ नये. त्यांना ती दिल्यास आपण राजीनामा देऊ" (उद्धृत, कुन्हीकृष्णन्, पूर्वोक्त, १६७). पण त्यांचे काही चालले नाही. यशवंतराव गृहमंत्री झाले.

गृहखात्याचा व्याप प्रचंड मोठा होता. राष्ट्रजीवनाच्या सर्वच बाजूंशी त्याचा संबंध होता. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यापासून आंतरराज्य संबंधांपर्यंत प्रत्येक क्षेत्रात असंख्य गुंतागुंतीचे प्रश्न उद्भवलेले असताना यशवंतरावांच्या हाती त्या खात्याची सूत्रे आली.

ते वर्ष भारतीय राजकारणात एकूणच अत्यंत तीव्र संघर्षाचे होते. हिंदूंचा व शिखांचा जीर्णोद्धारवाद भरीस आला होता, भाषिक-प्रादेशिक अस्मिता धारदार झाल्या होत्या, राजकीय गदारोळ स्पष्ट झाला होता, सत्तारूढ पक्षातही जिथे कोणाचा पायपोस कोणाला नव्हता, तिथे विरोधी पक्षांबद्दल विचारायलाच नको, विद्यार्थ्यांची आंदोलने उग्र होत चालली होती. गोहत्याबंदीच्या मागणीसाठी साधूंनी केलेल्या बंडाला शंकराचार्यांचे आशीर्वाद लाभले होते, आत्मदहनाच्या धमक्या देऊन संत फतेसिंग व अन्य आठ शीख नेते गृहमंत्रालयाला आव्हान देत होते. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश व बिहारात विद्यार्थी-असंतोष दडपण्यासाठी पोलिस खाते अमानुष पातळी गाठीत होते. चव्हाणांनी प्रभार घेतल्यावर तीनच दिवसांनी विद्यार्थ्यांचा जुलूस लोकसभेवर चालून आला होता.

चव्हाणांनी खास आपल्या शैलीने या प्रश्नांना हात घातला. विद्यार्थ्यांचा असंतोष हा केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ठरवून त्यांच्याशी दंडेली करणे हा उपाय प्रभावी ठरू शकत नाही, हे ओळखून विद्यार्थ्यांच्या समस्यांचा खोलात जाऊन विचार करायचे चव्हाणांनी ठरवले (कित्ता, १७४). मंत्रालयाशी संलग्न असलेल्या परामर्शदायी समितीला त्यांनी या असंतोषाच्या मुळाशी असलेला संवादभंग (कम्युनिकेशन गॅप) आणि इतर सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा संदर्भ देऊन विचार करण्यास सुचवले.

प्रासंगिक उठावांचे दमन हा कोणत्याही प्रश्नाच्या निर्णायक सोडवणुकीचा मार्गच असू शकत नाही, अशी चव्हाणांची पक्की धारणा होती. विविध समित्या नेमून त्यांनी एकेका प्रश्नाची मूलग्राही चिकित्सा करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली, पोलिसांच्या उठावाचाही त्यांनी आस्थेवाईक पद्धतीने निपटारा केला.

पण गृहमंत्रालयासमोर १९६७ च्या निवडणूक- निकालांनी जे राजकीय आव्हान उभे केले होते, त्याला तोडच नव्हती. या निवडणुकीत काँग्रेसच्या तोपर्यंतच्या एकछत्री अमलाला प्रचंड हादरा बसला. बिहार, केरळ, मद्रास, ओरिसा, राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांत विरोधी पक्षांची संयुक्त सरकारे सत्तारूढ झाली. स्वातंत्र्योत्तर काळात एवढा आकस्मिक व अनपेक्षित बदल प्रथमच घडून आला होता. केंद्र व राज्ये संबंधांत अभूतपूर्व तणाव प्रथमच निर्माण झाला होता. आमदारांच्या सतत घडणाऱ्या पक्षांतरामुळे राज्य सरकारे अस्थिर व राजकीय जीवन विस्कळीत झाले होते, राज्यपालांच्या नेमणुका व त्यांचे स्वेच्छाधिकार परोपरींनी विवाद्य ठरले होते. या सर्वच प्रश्नांचा उपसर्ग गृहमंत्रालयाला पोचत होता. राज्याराज्यांत उभ्या राहिलेल्या राजकीय समरप्रसंगांसंबंधी प्रश्नांचा भडिमार संसदेत गृहमंत्र्यांवर होत होता. चव्हाण संयतपणे त्या प्रश्नांना उत्तरे देत होते.

केंद्रीय राखीव पोलिसांचा राज्यांतील अराजकसदृश परिस्थिती काबूत आणण्यासाठी वापर करण्याच्या प्रश्नांवर सभागृहातील विरोधी खासदार प्रक्षुब्ध होत होते. पक्षांतराच्या साथीमुळे राज्य सरकारे कोसळत असत. त्याचाही ठपका केंद्र सरकारवरच ठेवला जात असे. केंद्राची भूमिका संपूर्ण निष्पाप खचितच नव्हती. परंतु या सर्वच प्रश्नांचे खापर केंद्रात सत्तारूढ पक्षाच्या डोक्यावर फोडून भागणार नव्हते. पक्षांतरामुळे राजकीय स्थैर्य, प्रशासकीय कार्यक्षमता व प्रातिनिधिक संस्थांवरचा जनविश्वास या तिन्ही गोष्टी धोक्यात सापडल्या होत्या. मार्च १९६८ मध्ये गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पक्षांतरांचा विचार करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व काही संविधानतज्ज्ञ यांची एक उच्चाधिकार समिती संसदेने नेमली होती. त्याच वर्षी नोव्हेंबर महिन्यात या समितीने आपल्या शिफारशी सादर केल्या होत्या. एकंदरीत गृहमंत्रालयावर केंद्र सरकारच्या प्रत्येक कर्ते-नाकर्तेपणाचे स्पष्टीकरण संसदेसमोर देण्याची जबाबदारी येऊन पडली होती. आपले संपूर्ण संसदीय कौशल्य पणास लावून चव्हाणांनी ती पार पाडली होती.

पक्षांतर्गत तणाव

केंद्रात सत्तारूढ असलेल्या पक्षासाठी १९६७ च्या निवडणुकीने काही अंतर्गत समस्याही निर्माण केल्या होत्या. लोकसभेतील बहुमत प्रचंड प्रमाणावर घटले होते. पक्षाचे श्रेष्ठी श्रीमती गांधींच्या स्वतंत्र कार्यपद्धतीवर रुष्ट होऊ लागले होते. संजीव रेड्डी यांना पक्षश्रेष्ठींनी श्रीमती गांधींच्या इच्छेविरुद्ध लोकसभेच्या सभापतिपदावर निवडून आणले होते. यशवंतरावांचे स्थान श्रीमती गांधींच्या मंत्रिमंडळातील आतल्या गोटात होते. पक्षश्रेष्ठींचा सल्ला न घेता रुपयाच्या अवमूल्यनासारखा दूरगामी निर्णय श्रीमती गांधींनी घेतला, तेव्हापासूनच कामराज, निजलिंगप्पा, स. का. पाटील वगैरे पक्षश्रेष्ठी त्यांच्यावर रुष्ट झाले होते. त्यातून पक्षाची शासनगत शाखा श्रेष्ठ, की शासनबाह्य शाखा श्रेष्ठ, या जुन्याच वादाला पुन्हा चालना मिळाली होती. पक्षातल्या ज्येष्ठ नेत्यांच्या नाराजीचा विचार न करता झाकिर हुसेन यांना राष्ट्रपतिपदावर निवडून आणण्यात श्रीमती गांधी यशस्वी झाल्या होत्या.

श्रीमती गांधींचा प्रभाव असा वाढत असताना काही बाबतींत दिसत असला, तरी कामराज यांच्या नेतृत्वाखालील- पुढे 'सिंडिकेट' म्हणून विख्यात झालेल्या- मंडळींच्या हातीच पक्षाची सूत्रे १९६९ पर्यंत टिकून होती. आपण श्रीमती गांधींना आवर घालू शकू, आणि वेळ पडल्यास पदभ्रष्टही करू शकू, असा आत्मविश्वास या मंडळीला वाटत असे. झाकिर हुसेन निधन पावले आणि राष्ट्रपतिपदासाठी नव्या उमेदवाराचा शोध सुरू झाला. उपराष्ट्रपतीला राष्ट्रपती करण्याची परंपरा पुढे चालवून ते पद आपल्याला मिळावे, अशी गिरींची अपेक्षा होती. श्रीमती गांधी या प्रश्नावर मौन पाळून होत्या. जवळच्या सहकाऱ्यांशी त्यांनी या संदर्भात चर्चा केली नव्हती. पण सिंडिकेटने जेव्हा नीलम संजीव रेड्डी यांची उमेदवारी पक्की केली, तेव्हा श्रीमती गांधी क्रियाशील झाल्या. त्यांना या निर्णयाच्या मुळाशी आपल्याला पायबंद घालण्याचा वा पदभ्रष्ट करण्याचा डाव दिसला. रेड्डी व श्रीमती गांधी यांचे संबंध कधीच सलोख्याचे नव्हते. उलट, सिंडिकेटशी ते जवळून संबंधित होते. राष्ट्रपतीचे सांविधानिक अधिकार वापरून राष्ट्रपती प्रधानमंत्र्यांची अडवणूक सहज करू शकणार होता. स्वतंत्रपणे कारभार चालवू पाहणाऱ्या श्रीमती गांधींना, प्रतिकूल राष्ट्रपतीच्या अधिकारांकरवी वेसण घालण्याचा श्रेष्ठींचा इरादा लपून राहू शकला नव्हता. पण इंदिराजी गप्पच होत्या.

बंगलोर अधिवेशनात वरिष्ठ पुढाऱ्यांनी एकमुखाने संजीव रेड्डी यांचे नाव सुचवले. श्रीमती गांधींनी काहीच चर्चा केलेली नसल्यामुळे यशवंतराव चव्हाणांनीसुद्धा रेड्डीच्या नावाला पाठिंबा दिला. श्रीमती गांधींनी मात्र अचानक जगजीवनराम यांचे नाव पुढे केले. सर्वांनाच

आश्चर्य वाटले. भावी संकट हेरून 'आक्रमण हाच बचावाचा सर्वोत्तम मार्ग आहे', या त्यांच्या खास सूत्रानुसार श्रीमती गांधी वागल्या; पण त्यामुळे त्यांचे यशवंतरावांसारखे समर्थकही अचंब्यात पडले. श्रेष्ठींनी मतदान घेतले. रेड्डींची निवड बहुमताने झाली. श्रीमती गांधीनीच मग रेड्डींच्या नामांकन-पत्रावर प्रस्तावक म्हणून सही केली.

मग मनोमन त्यांनी दुसरेच काही ठरवले असावे. ताबडतोब त्यांनी आक्रमक पावले उचलायला प्रारंभ केला. पहिला तडाखा त्यांनी मोररजींना दिला. अर्थमंत्रिपद त्यांच्या हातून काढून घेतले आणि चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण घोषित केले. तोपर्यंत बरेच गुंतागुंतीचे प्रश्न हाताळण्यात चव्हाणांनी आपली वाकबगारी सिद्ध केली असली, तरी कामकाजाची ही शैली त्यांना अजिबात परिचयाची नव्हती. झटक्यात लोकप्रिय होणारी घोषणा नाट्यपूर्ण पद्धतीने करून विचारी लोकांना तर्क करीत ठेवण्याचे खास तंत्र श्रीमती गांधींनी अवगत केले होते. एकदा सवंग लोकप्रियता आपल्या बाजूला खेचून घेतली, की शंभर गुन्हे माफ ठरतात, हे त्यांनी गृहीतच धरले होते. रेड्डींचे नाव सुचवणाऱ्या श्रेष्ठींना मोरारजींच्या हकालपट्टीबद्दल ब्रही उच्चारता येऊ नये, असे वातावरण श्रीमती गांधींनी बँक राष्ट्रीयीकरणाच्या आकस्मिक निर्णयातून निर्माण केले होते. खुद्द यशवंतरावांनाही त्या निर्णयाचे स्वागत करणे भाग होते, आणि मोरारजींच्या पदच्युतीबद्दल काहीही भाष्य करणे अशक्य झाले होते. "समाजवाद हवाय् ना? मग घ्या!" अशी जणू श्रीमती गांधींची भूमिका होती. अर्थमंत्र्यांना काढल्याचा निषेध करायचा, तर यशवंतरावांचे स्वतःचेच स्थान काढून घेतले जाण्याची शक्यता स्पष्ट दिसत होती.

इंदिराजींचा रोष

त्या वेळी श्रीमती गांधींचा राग यशवंतरावांवर होता. कारण किमान ते तरी आपण राष्ट्रपतिपदासाठी सुचवलेल्या नावाला पाठिंबा देतील, ही त्यांची अपेक्षा, यशवंतरावांनी खोटी ठरवली होती. (द्वा. भ. कर्णिक, पूर्वोक्त, १०३). यशवंतरावांचे राजकारण बव्हंशी नैतिकतेचे राहत आल्यामुळे संजीव रेड्डींच्या नावाला पाठिंबा देण्याबद्दल आपण शब्द दिला आहे, शिवाय श्रीमती गांधींनी नाव सुचवण्यापूर्वी आपल्याला विश्वासात घेतलेले नाही, तेव्हा त्यांनी सुचवलेल्या नावाला पाठिंबा देण्याची नैतिक जबाबदारी आपल्यावर नाही, अशी नैतिकदृष्ट्या रास्त भूमिका यशवंतरावांची होती. पण ही नैतिकता श्रीमती गांधींना मुळी राजकारणात अभिप्रेतच नव्हती. त्या पूर्णपणे कौटिल्याच्या शिष्या होत्या. बंगलोर अधिवेशनाच्या आधी हैदराबादेत झालेल्या अधिवेशनापासूनच यशवंतरावांबद्दल इंदिराजी संशयग्रस्त झालेल्या होत्या. ते कार्यकारिणीत आपली माणसे भरण्याच्या प्रयत्नात श्रेष्ठींशी

संगनमत करीत आहेत, असा इंदिरा गांधींचा समज झाला होता. कारण वसंतराव नाईकांना कार्यकारिणीत घेण्यासाठी यशवंतरावांनी खटपट केली होती. बंगलोर अधिवेशनात त्यांनी रेड्डींच्या नावाला पाठिंबा दिल्यामुळे तो बळावला श्रीमती गांधींनी चव्हाणांना 'श्रेष्ठीं'च्या यादीत जमा करून टाकले. चव्हाणांच्या या कथित 'विश्वासघाता'मुळे त्या अधिकच दुखावल्या. प्रहार त्यांना चव्हाणांवरच करायचा होता; पण डावपेचाच्या दृष्टीने त्यांनी तो मोरारजींवर केला, कारण चव्हाण त्या मानाने प्रबळ प्रतिस्पर्धी होते. (कित्ता, १०४).

श्रीमती गांधींची पुरोगामी प्रतिमा दिवसेंदिवस तेजाळत होती. बँका यापुढे सामान्यांच्या हितासाठी राबणार, मोरारजी वगैरे झारीतले शुक्राचार्य होते, निजलिंगप्पा व स. का. पाटील हे जनसंघ व स्वतंत्र या उजव्या पक्षांच्या कच्छपी लागले आहेत, ही सर्व ज्येष्ठ मंडळी काँग्रेस पक्षाच्या तत्त्वाशी द्रोह करीत आहेत, वगैरे गोष्टींचा प्रभावी प्रचार सुरू झाला होता. काँग्रेसची मूल्ये व तत्त्वे तुडवणाऱ्या या लोकांमागे उभे राहण्याची सक्ती इंदिराजी काँग्रेसजनांना कशी करणार? त्यांचा उमेदवार निवडणे म्हणजे त्यांची तत्त्वच्युती पुरस्कारणेच ठरेल! म्हणून श्रीमती गांधींनी फतवा काढला, की या अपवादात्मक प्रसंगी आमदार-खासदारांना त्यांच्या 'स्वतःच्या' सदसद्विवेक बुद्धीच्या निर्णयाबरहुकूम राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत मतदान करण्याचे स्वातंत्र्य असेल! याचा अर्थ स्पष्ट होता, पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला मत न देता गिरींना मत द्यावे, ही श्रीमती गांधींची इच्छा स्पष्ट होती.

परिणाम असा झाला, की पक्षाचा अधिकृत उमेदवार पडला आणि गिरी राष्ट्रपती झाले. सिंडिकेटने जळफळाट केला. श्रीमती गांधींविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करायचे त्यांनी ठरवले. पण श्रीमती गांधींनीच डाव त्यांच्यावर उलटवला. संघटना काँग्रेस आणि सत्तारूढ काँग्रेस अशी पक्षाची दोन शकले झाली. लोकप्रियतेच्या व निवडणूक-यशाच्या बळावर आपलाच पक्ष म्हणजे खरी काँग्रेस आहे, हे श्रीमती गांधींनी सिद्ध केले.

या सबंध घटनाक्रमात यशवंतरावांची भूमिका, पूर्वी कधीच नव्हती, एवढी दोलायमान व धरसोडीची राहिली. संजीव रेड्डी यांना दिलेला शब्द त्यांनी निकराने पाळला. पण ज्या पद्धतीने पक्षात फूट पडली, ती पाहता यशवंतराव चक्रावून गेले. वैचारिक पातळीवर कोणत्याच दृष्टीने आपल्या जवळच्या नसलेल्या श्रेष्ठींच्या गटात आपण सापडलो आहोत, या भावनेने ते अस्वस्थ झाले. श्रीमती गांधींचा पुरोगामीपणा, बेगडी का असेना, पण त्याला यशवंतरावांनी मनोभावे साथ दिली होती. गृहमंत्री या नात्याने संस्थानिकांचे तनखे रद्द करण्याबाबत त्यांनीच पुढाकार घेतला होता. अशा वेळी, इंदिरा गांधींचा समाजवादी धर्मनिरपेक्ष पवित्रा हाच त्यांच्या वैचारिक भूमिकेच्या जवळचा होता. किंकर्तव्य

अवस्थेत चव्हाण पडले. काहींच्या मते सिंडिकेटने त्यांना प्रधानमंत्रिपदाचे आश्वासन दिले होते; पण त्यांनी ते आमिष झुगारून दिले. ज्या सावध काटेकोरपणासाठी चव्हाणांचे नेतृत्व प्रसिद्ध आहे, तो या आकस्मिक परिस्थितीत ढेपाळला होता, ही गोष्ट स्पष्ट आहे. ते श्रीमती गांधींच्या विश्वासातून उतरले होते. त्या दोहोंमध्ये स्पष्ट दुरावा निर्माण झाला होता.

दुसरे कदाचित असे असावे, की श्रीमती गांधींच्या सामर्थ्याचा अचूक अंदाज चव्हाणांना वेळीच आला नसावा. पण प्रत्यक्षात त्यांनी जेव्हा राष्ट्रपतीच्या निवडणुकीचे चित्र पाहिले, तेव्हा आपले फासे उलटे पडले, हे त्यांच्या लक्षात आले असावे. आपण यशस्वी प्रवाहापासून प्रथमच दूर केलो गेलो, हे लक्षात येताच त्यांनी या पेचातून सुटण्याची खटपट सुरू केली.

काँग्रेसमधील दोन्ही गटांनी थोडीफार तडजोड केल्यास व थोडा समजूतदारपणा दाखवल्यास पक्षफूट टळू शकेल, असा त्यांचा अंदाज होतो. सिंडिकेटने श्रीमती गांधींविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचा आग्रह सोडावा आणि श्रीमती गांधींनी सिंडिकेटवरचे प्रतिगामीपणाचे आरोप मागे घ्यावे, अशा अटींवर एकीचा एक ठराव २५ ऑगस्ट, १९६९ रोजी चव्हाणांच्या पुढाकाराने काँग्रेस कार्यकारिणीने केला. यातून चव्हाण दोन्ही गटांच्या मधले मध्यस्थ बनले, म्हणजेच कोणत्याही एका गटाशी ते आता संलग्न नाहीत, तर या गटबाजीच्या वर आहे, ही त्यांची भूमिका प्रस्थापित झाली. चव्हाणांचा हा पवित्रा त्यांच्या 'यशवंत' नीतीशी सुसंगत असाच ठरला. झाले गेले, ते विसरून आता नव्या राजकीय परिस्थितीत नवा मार्ग स्वीकारण्याची मोकळीक त्यांनी या ठरावाद्वारे स्वतःसाठी मिळवून घेतली, संधी मिळताच तिचा फायदा घेतला.

इंदिराजींना निष्ठा समर्पण

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या शिबिरात त्यांनी हे निःसंदिग्ध शब्दांत घोषित केले, की-

"माझी निष्ठा इंदिरा गांधी यांना वाहिलेली आहे, त्यांच्या समाजवादी धोरणाचा पाईक म्हणून मी मानसन्मानाची पर्वा न करता कार्य करीत राहीन."

आपल्याबद्दल इंदिरा गांधींच्या मनात कोणताही गैरसमज राहू नये, म्हणून ते पुढे असेही म्हणाले, की

"प्रधानमंत्रिपदाची मला मुळीच महत्त्वाकांक्षा नाही, इंदिरा गांधी यांना प्रधानमंत्रिपद देण्यात यावे, म्हणून मी दोन वेळा प्रयत्न केला आणि त्यांच्या नेतृत्वाखाली जी काही सेवा

करता येईल, ती करण्यातच मला कृतार्थता वाटेल." ('चैतन्ययुग', ११०).

ऐक्यप्रकरणी यशवंतरावांची शिष्टाई सफल होणार नव्हतीच. वरिष्ठ नेते प्रधानमंत्र्यांना पेचात पकडण्याच्या, तर प्रधानमंत्री वरिष्ठांना नामोहरम करण्याच्या खटपटीत सर्व सामर्थ्यानिशी पडल्या होत्या. सिंडिकेटने कार्यकारिणीतून इंदिरानिष्ठांना वगळण्याचा घाट घातला, तेव्हा श्रीमती गांधींनी आपल्या निवडक सहकाऱ्यांसह एक खरमरीत पत्र काँग्रेस-अध्यक्षांना पाठवले. या पत्रावर इतरांसोबत यशवंतरावांचीही सही होती. सिंडिकेटशी त्यांचा पूर्ण काडीमोड आणि श्रीमती गांधी जे करतील, त्याच्याशी बांधिलकी या दोन्ही गोष्टी एव्हाना स्पष्ट झाल्या होत्या. श्रीमती गांधींनी त्यांना पूर्ण विश्वासार्ह मात्र त्यानंतर कधीच मानले नाही.

सिंडिकेटने शिस्तभंगाची कारवाई पुढे रेटलीच; पण तोपर्यंत संसदीय पक्षात व बाहेर पक्षसंघटनेतही श्रीमती गांधींचे प्रचंड बहुमत झाले होते. त्यांनीच मुंबईला अधिवेशन घेऊन लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका पुकारल्या. निवडणूक आयुक्ताने त्यांच्या काँग्रेसलाच मूळ काँग्रेस म्हणून घोषित केले. त्यांना निवडणुकीत प्रचंड यश मिळाले आणि मुंबई अधिवेशनात प्रसृत केलेल्या स्मरणिकेत लेख लिहून चव्हाणांना जाहीर करावे लागले :

"जुनी व नवी काँग्रेस हे शब्दच चूक आहेत. हीच खरी काँग्रेस आहे. धर्मनिरपेक्षता, लोकशाही व समाजवाद हीच तिची तत्त्वे आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात हरवून गेलेल्या काही मूल्यांना पुन्हा प्रतिष्ठित करण्यासाठी तिने हा पुनर्जन्म घेतला आहे. नवे तारुण्य, नवा विचार, नवे चैतन्य व नवे समर्पण तिच्या रूपाने अवतीर्ण झाले आहे." ('विण्डस् ऑफ चेंज', चव्हाण-भाषण संग्रह, ११९).

वचनपूर्तीचे राजकारण, व्यवहार्य दृष्टिकोण, आत्मपरीक्षण, कार्यक्रमात्मक चिंतन आणि अंमलबजावणीवर विशेष कटाक्ष ही या काँग्रेसची खास वैशिष्ट्ये असल्याचेही त्यांनी सांगितले होते.

अर्थमंत्रिपदाची धुरा

इंदिरा गांधींच्या पुरोगामी, क्रांतिकारी वगैरे धोरणांची धुरा सांभाळणाऱ्या खंद्या पुढाऱ्यांपैकी एक यशवंतराव होते. त्यांना प्रामाणिकपणेच असे वाटत होते, की राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीवरून पक्षात पडलेली फूट ही आर्थिक व राजकीय धोरणांवरच्या वैचारिक भूमिकांमधील तफावतीतून पडलेली होती (कुन्हीकृष्णन्, २९२). संसदेचे १९७० चे अंदाजपत्रकी अधिवेशन संपल्यावरच श्रीमती गांधींनी आपल्या मंत्रिमंडळाची पुनर्रचना करून स्वतःकडे गृहमंत्रालय घेतले व अर्थखाते चव्हाणांच्या गळ्यात घातले होते. राजकीय निरीक्षकांच्या

मते एकतर ही त्यांची पदावनती होती आणि चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्याच्या पुरोगामी प्रचाराचा धुरोळा आता खाली बसून आक्षेपकांच्या घणाघाती टीकेला तोंड देण्याची प्रधानमंत्र्यांच्या दृष्टीने गैरसोयीची वेळ येऊन ठेपली असल्यामुळे इंदिराजींनी आपले घोंगडे चव्हाणांच्या अंगावर झटकून टाकले होते. काहींच्या मते चव्हाणांच्या रूपाने क्रमांक दोनवर असलेला आपला प्रबल प्रतिस्पर्धक वगळून टाकण्याचाच श्रीमती गांधींचा अंतःस्थ हेतू असावा. कोणालाही आपल्या पदावर डोईजड होऊ देण्याइतपत 'वाढू' न देणे हा इंदिराजींचा खास खाक्या होता. (कित्ता, ३४५). चव्हाणांनी आपले हे अवमूल्यन सहन न करता स्वाभिमानपूर्वक राजीनामा देऊन बाहेर पडावे, असाही सल्ला अनेकांनी दिला होता. पण 'नव्या' काँग्रेसच्या पुरोगामी ध्येयधोरणांवर व आर्थिक कार्यक्रमांवर भाबडी श्रद्धा असल्यामुळे म्हणा किंवा राजकीय विजनवास पत्करून स्वतःचे राजकीय भवितव्य निकालात काढण्याची तयारी नसल्यामुळे म्हणा, चव्हाणांनी तसे काहीही केले नव्हते.

वित्तमंत्री म्हणून त्यांनी प्रभार स्वीकारला, तेव्हा त्या खात्यातली परिस्थिती तशी चिंताजनकच होती. अर्थव्यवस्था विस्कळीत होती. अनेक आवश्यक गोष्टींचा तुटवडा होता, अर्थसाधने तुटपुंजी होती. शेतीची परिस्थिती हरितक्रांतीने काही अंशी आशादायक असली, तरी ऊस वगळता रोकड पिकांचे उत्पन्न असमाधानकारकच होते. जीवनावश्यक वस्तूंची टंचाई व भाववाढ हा प्रश्न फारच अडचणीचा ठरलेला होता. शिवाय सुशिक्षित बेरोजगारी, ग्रामीण बेकारी, जमीनसुधारणा असे असंख्य प्रश्न होते. सत्तारूढ पक्षाच्या घोषणा क्रांतिकारी राहत आल्या असल्या, तरी प्रत्यक्ष उपाययोजना मात्र अर्धवट व लेच्यापेच्या ठरल्या होत्या. अर्थमंत्री या नात्याने बँकवाल्यांना त्यांनी समाजाभिमुख होण्याचा सल्ला दिला, परकीय मदतीचा नव्या दृष्टीने विचार केला, अनार्जित उत्पन्नाला वाव राहू नये आणि बहुसंख्य जनसामान्यांपर्यंत शासकीय कार्यक्रमाचे लाभ पोचावेत, असे अंदाजपत्रक सादर केले, आर्थिक विकासाचा सांधा सामाजिक न्यायाशी जोडण्यावर विशेष भर दिला. मात्र, जनतेने दिलेला कौल हा समाजवादाला दिलेला कौल असल्याचे एकीकडे म्हणत असतानाच आपले अंदाजपत्रक मात्र पुरेसे समाजवादी नाही, हे त्यांना लोकसभेसमोर अप्रत्यक्षपणे मान्य करावेच लागले. (कित्ता, ३६१).

'वचनपूर्ती'कडून दडपशाहीकडे

श्रीमती गांधींच्या दृष्टीने समाजवाद ही केवळ एक निवडणूक घोषणा होती आणि 'गरिबी हटाव'च्या त्यांच्या प्रभावी प्रचारातून त्यांनी मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळवलाही होता. पण प्रत्यक्षात त्यांच्या धोरणांतून आधीचीच मळवाट तुडवली गेल्यामुळे

देशाच्या आर्थिक परिस्थितीत अपेक्षित बदल होण्याची सुतराम् शक्यता नव्हती. वचनपूर्तीच्या राजकारणाची हवा थोडे दिवसच टिकली, पुढे 'वाढलेल्या अपेक्षांच्या क्रांती'चे आव्हान पेलणे अशक्यच ठरले. भ्रमनिरस्त जनतेचा असंतोष वाढत राहिला. आंदोलने वेगवेगळी निमित्ते घेऊन प्रखर होत गेली.

दिव्यवलयी नेत्यांना लाभलेल्या लोकप्रियतेची नौका अशा आव्हानांच्या खडकावर आदळून फुटली, की दमनाखेरीज दुसरा मार्गच त्यांना दिसत नाही. श्रीमती गांधींनी तोच मार्ग पत्करला. अलाहाबाद हायकोर्टाने त्यांची निवडणूक रद्द ठरवल्यानंतर विरोधकांनी त्यांचा राजीनामा मागितला, तर एकजात सर्व विरोधकांना राष्ट्रद्रोही ठरवून दडपण्याचा हुकूमशाही पवित्रा त्यांनी आणीबाणीच्या स्वरूपात घेतला. ज्येष्ठ विपक्षी नेत्यांना तर त्यांनी तुरुंगात डांबलेच; पण स्वपक्षीय सहकाऱ्यांवरही त्यांनी नजर कैद ठेवल्याची वार्ता होती. सेन्सॉरशिपमुळे अधिकृत काहीच कळत नव्हते. पण या नजरबंद सहकाऱ्यांच्या यादीत यशवंतरावांचेही नाव असायचे.

यशवंतरावांनी आणीबाणीचा निषेध करावा, ही त्यांच्या चाहत्यांची अपेक्षा त्यांच्याकडून पूर्ण झाली नाही. या राक्षसी राजवटीचे अंतःस्थ हेतू पूर्णतया स्वार्थी होते, ज्यांच्या डोक्यांवर प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याचा वरवंटा फिरत होता, त्यांच्यापैकी अनेकांच्या त्यागी देशभक्तीबद्दल चव्हाणांना अंतर्यामी आदर होता, उद्घोषित कार्यक्रमांच्या बजावणीसाठी अशा उपायांची मुळीच गरज नाही, हे उघड दिसत होते, आणीबाणीत दंडसत्तेचे अतिरेक उघड्या डोळ्यांनी बघणे क्लेशकारक होते. संजय गांधींच्या रूपाने काँग्रेसमध्ये शिरलेल्या अपप्रवृत्ती काँग्रेसच्या संपूर्ण ध्येयनिष्ठेला व परंपरांना तिलांजली देणाऱ्या होत्या, वगैरे सगळे दिसत असूनही यशवंतराव मिठाची गुळणी तोंडात धरून बसले, याचा अनेकांना अचंबा वाटत होता. त्यांच्या मनाची या काळात प्रचंड घालमेल होत असावी; पण परतायचे दोर कापून टाकल्याप्रमाणे त्यांची अगतिक अवस्था झाली असावी; असे दिसते. एका परीने ते स्वतःच्याच कार्यपद्धतीचे बंदिवान झाले होते. परराष्ट्रमंत्री म्हणून ते रुमानियात गेलेले असताना तिथल्या कौन्सलने त्यांना जेव्हा सांगितले, की प्रधानमंत्री इंदिरा गांधींनी निवडणुका घोषित करण्याचे ठरवले असल्याची बातमी भारतातून आली आहे, तेव्हाची बोलकी प्रतिक्रिया चव्हाणांनी नोंदवली आहे. ते लिहितात,

"संदेश ऐकून मनावरचे ओझे एकदम हलके झाले."

आणखी दोन देशांचा दौरा योजलेला होता, पण तो रद्द करून तडक मायभूमीला जाण्याचा निर्णय त्यांनी घेतला. पुढे ते म्हणतात,

"सार्वत्रिक निवडणुकांना आम्ही कायमचे मुकलो मी काय, अशी धास्ती गेले

कित्येक महिने वाटत होती, ती नाहीशी झाली. मी माझ्या पत्नीला त्या दिवशी तेथूनच पत्र लिहिले. त्यात म्हटले आहे, की '... बहुतेक सर्व राजबंदी सुटतील व निवडणुकीचे वातावरण प्रस्थापित होईल. This is gain. हवा मोकळी होईल. आज मी आनंदात आहे." ('ऋणानुबंध', ३२)

त्यांच्या आणीबाणीकालीन मनःस्थितीचे प्रतिबिंब या पत्रातून उमटले आहे. निवडणुका होणार, एवढा संदेश नुसता कानांवर आला, आणि ते इतके संतुष्ट झाले, यावरून त्यांच्या मनावर परिस्थितीचे किती प्रचंड दडपण होते, याचा प्रत्यय येतो.

ते लिहितात,

".... तो संदेश ऐकल्यानंतर दिवसभर माझ्या मनात, सकाळच्या कोवळ्या उन्हाचा उल्हास होता- एका नव्या आशावादी दृष्टीने देशाच्या भवितव्याकडे पाहण्याची संधी पुन्हा प्राप्त झाली होती." (कित्ता).

पराभवानंतरचे आत्मपरीक्षण

१९७७ च्या निवडणुकीत इंदिरा गांधींच्या कॉंग्रेस पक्षाचा अभूतपूर्व पराभव झाला. पण त्या पराभवाचे तटस्थ विश्लेषण करून अपराध्यांना शासन करण्याच्या मनःस्थितीत हा पक्ष त्यानंतरही नव्हता. यशवंतरावांनी नवनिर्वाचित अध्यक्ष ब्रह्मानंद रेड्डी यांच्या सहकार्याने थोडेसे सत्यान्वेषण व आत्मपरीक्षण करण्याचा प्रयत्न आपल्या परीने केला; पण तो त्यांना तडीस नेता आला नाही. आपल्या पक्षाने पक्षांतर्गत लोकशाही गमावली आणि एकचालकानुवर्तित्व स्वीकारले, यातच आपल्या पक्षाच्या पराभवाचे मूळ आहे आणि म्हणून यापुढे जर पुन्हा पक्षाला पुन्हा ऊर्जितावस्था यायची असेल, तर पक्षांतर्गत लोकशाही प्रक्रिया पुन्हा सुरू करणे आणि सामुदायिक नेतृत्वाची प्रतिष्ठापना करणे ही पावले ताबडतोब उचलावी लागतील, असे चव्हाण-रेड्डी यांचे निदान होते.

श्रीमती गांधींना, हे सरळसरळ त्यांच्या एकतंत्री नेतृत्वाला दिलेले आव्हान आहे, असे वाटले. त्यांना त्या दोन्ही गोष्टी साफ नामंजूर होत्या. पक्ष ही आपली खाजगी इस्टेट समजून हव्या त्या सुभेदारांना हव्या त्या पदांवर हव्या तितक्या काळासाठी नेमायचे, बदलायचे वा काढून टाकायचे, हा अनिर्बंध अधिकार चालवण्याची उणीपुरी दशकभराची वहिवाट सोडायला त्या स्वाभाविकच तयार नव्हत्या. सामुदायिक नेतृत्व तर त्यांच्या राजकीय शैलीत मुळीच बसणारे नव्हते. एकीकडे त्या सामुदायिक नेतृत्वात चंचुप्रवेश करीत असतानाच दुसरीकडून त्यांनी स्वतःभोवती निष्ठावंतांचा गोतावळा गोळा करायला प्रारंभ केला.

मधल्या काळात जनतापक्षीय राज्यकर्त्यांनी श्रीमती गांधींना अटक केली आणि

दुसऱ्याच दिवशी सोडून दिले पण या दोन दिवसांत इंदिरानिष्ठांनी देशभर नुसता हैदोस घातला. ब्रह्मानंद रेड्डींना काढून इंदिराजींना पक्षाध्यक्ष करावे, अशी जोरदार मागणी त्यांनी केली. त्यासाठी महासमितीने खास अधिवेशन भरवावे, अशी त्यांनी सह्यांची मोहीम काढली. रेड्डी व चव्हाण यांनी खंबीर भूमिका घेऊन श्रीमती गांधींना एकमेवाद्वितीय नेतृत्व देण्यास कसून विरोध केला. त्यांच्यावर दडपण आणण्यासाठी इंदिराजींनी केलेला दक्षिण-दौरा त्यांना तिथल्या निदर्शनांमुळे आवरता घ्यावा लागला. चव्हाण-रेड्डी द्वयीचे पक्षात वजन वाढल्यासारखे दिसले. पक्षांतर्गत लोकशाहीला मारक ठरू शकतील, अशा सर्व सूचना त्यांनी फेटाळून लावल्या. आणीबाणीत स्वैराचारी वर्तनामुळे बदनाम झालेली संजयसेना (यूथ काँग्रेस) बरखास्त करण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

इंदिराजींची चाल

ही सगळी 'मानहानी' मूकपणे सोसणे हा मुळात इंदिराजींचा स्वभावच नव्हता, शिवाय स्वतःच्या पक्षात असे निराधार होणे त्यांना विरोधी पक्ष सत्तेवर असताना मुळीच परवडण्यासारखे नव्हते. पुन्हा अटक झाल्यास आपल्या पक्षाने प्रचंड प्रमाणावर रस्त्यावर येऊन अराजक माजवावे, आणीबाणीतल्या गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी नवे राज्यकर्ते विशेष न्यायालये नेमण्याचा प्रस्ताव आणतील, तेव्हा आपल्या पक्षाकडून त्यास कडाडून विरोध केला जावा, आणि आपल्यामागे व आपल्या पुत्रामागे पक्षाचे संघटित सामर्थ्य उभे राहून राज्यकर्त्यांना धडकी भरवावी, अशा इंदिराजींच्या अपेक्षा होत्या. त्यांनी आपल्या हस्तकांकरवी रेड्डी-चव्हाणांना शह देण्याचा घाट घातला. 'यूथ फोरम' नावाचे नवे व्यासपीठ त्यांनी संजय गांधींच्या नेतृत्वाखाली उभे केले. रेड्डी-चव्हाणांचे नेतृत्व कमजोर व कुचकामी असून जनता राज्यकर्त्यांशी ते वाटाघाटींचे स्वार्थी राजकारण करीत आहेत. वगैरे आरोप आपल्या पाठीराख्यांकरवी प्रसृत करायला त्यांनी सुरुवात केली.

काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत ही दुही स्पष्ट झाली. इंदिरानिष्ठांनी मध्ययुगीन परिभाषेत नेहरू घराण्याशी इमान व्यक्त केले, तर इंदिराजींनी रेड्डी-चव्हाण प्रभृती ज्येष्ठ नेत्यांवर अहंमन्य टीकास्त्र सोडले.

डिसेंबर १९७७ च्या अखेरीस श्रीमती गांधींनी काँग्रेस कार्यकारिणी सदस्यत्वाचा राजीनामा दिला. व्यक्तिगत राजकारणाच्या सोयीसाठी पक्ष फोडण्याचा हा प्रसंग श्रीमती गांधींनी आपल्या कारकीर्दीत दुसऱ्यांदा निर्माण केला होता. त्यांच्या पाठोपाठ त्यांच्या निष्ठावंतांनी कार्यकारिणी- सदस्यत्वाचे राजीनामे दिले. आपण कार्यकारिणी सोडली आहे, पक्ष नव्हे; असे एकीकडे म्हणत असतानाच त्यांनी जानेवारी १९७८ च्या प्रारंभी

आपल्या पाठीराख्यांची परिषद स्वतंत्रपणे बोलावली.

रेड्डी व चव्हाण यांनी एका संयुक्त पत्रकाद्वारे इंदिरावाद्यांच्या नियोजित अधिवेशनावर बहिष्कार टाकावा, असे आवाहन केले होते. अधिवेशन बोलावण्याचे कृत्य ही पक्षविरोधी कारवाई असून यातून पक्ष दुभंगण्याचा धोका आहे, असा इशाराही या पत्रकात देण्यात आला होता. श्रीमती गांधी पक्षात बेदिली व गोंधळ माजवीत आहेत, असे सांगून आणीबाणीत काही व्यक्तींनी केलेल्या गैरकृत्यांशी काँग्रेस ही महान संघटना एकरूप होऊ शकत नसल्याचेही नमूद केले गेले होते. पक्षांतर्गत संयुक्त लोकशाही पद्धतीने काम करण्याचे नाकारून व पक्षावर आपली पकड घट्ट करून पक्षाला गुलामीच्या दाव्यात बांधण्याचा श्रीमती गांधी प्रयत्न करीत आहेत, असा स्पष्ट आरोप; आणि विचारपूर्वक व योजनाबद्ध रीतीने त्यांनी चालवलेले अनुचित वर्तन, शिस्तभंग, आदेशभंग व राजकीय दडपण आणण्याचे प्रयत्न या प्रकारांचा निषेध प्रस्तुत पत्रकातून रेड्डी-चव्हाण यांनी केला होता. इंदिरावादी अधिवेशनाबाबत पुढाकार घेतल्याबद्दल देवराज अरस यांना त्यांनी निलंबित केले होते.

काही काळ पक्षात रेड्डी-चव्हाणांच्या पत्रकाला बऱ्यापैकी प्रतिसाद मिळताना दिसला. अरस वगळता कोणत्याच राज्याच्या मुख्यमंत्र्याने इंदिरा-मेळाव्यास पाठिंबा दिला नव्हता. उलट, अनेकांनी उपर्युक्त संयुक्त पत्रकाचे स्वागतच केले होते. तरीही इंदिरावादी अधिवेशन भरलेच. रेड्डी-चव्हाणांच्या कचखाऊ धोरणावर आणि जनता-सरकारच्या कारभारावर सारख्याच प्रमाणात ताशेरे त्यात ओढण्यात आले. पक्षाला जर समर्थ व संघटित करायचे असेल, तर रेड्डी-चव्हाणांच्या कचाट्यातून आधी त्याला मुक्त करणे आवश्यक आहे. श्रीमती गांधींच्या प्रभावी व धडाडीच्या नेतृत्वाखालीच त्याला त्याचे गत ऐश्वर्य पुन्हा लाभू शकेल, अशा आशयाची भाषणे अधिवेशनात करण्यात आली. हे अधिवेशनच खरी काँग्रेस आहे, असे घोषित करण्याची मागणी करण्यात आली. पक्षाने आक्रमक विरोधी पक्ष होण्याची गरज असताना जे नेते बचावात्मक पवित्रे घेतात, त्यांचा निषेध केला गेला. दुसऱ्या दिवशी 'इंदिरा काँग्रेस' इंदिराजींच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली.

पक्षात आणखी एक फूट

पुन्हा १९६९ प्रमाणेच खरी काँग्रेस कोणती, अशी काही काळ चर्चा चालली. इंदिरा-पक्षात गेलेल्यांना मूळ पक्षातून काढून टाकले गेले. जुन्या कार्यकारिणीने नव्या पक्षाला घटनाबाह्य ठरवले. त्याच्याशी संबंध ठेवणाऱ्यांविरुद्ध शिस्तभंग कारवाई करण्याची धमकी दिली. नव्या पक्षाने 'फॉरवर्ड टु सोशॅलिझम' या जुन्याच घोषणेवर पण नव्या

सदस्यांसह आपला प्रवास सुरू केला. १९६९ प्रमाणे पुन्हा एकदा ऐक्य घडवून आणण्यासाठी धावपळ करण्याची पाळी काही जणांवर आली. पण त्या लोकांमध्ये या वेळी यशवंतराव नव्हते. ते, करणसिंग, प्रियरंजनदास मुन्शी, चंद्रजित यादव हे या वेळी ऐक्य-प्रयत्नांच्या स्पष्ट विरोधात होते. कारण त्यांच्या व श्रीमती गांधींच्या भूमिकांमध्ये जमीन-अस्मानाचे अंतर होते. पण ते पक्षात अल्पसंख्याक होते. श्रीमती गांधींशी तडजोड करता येईल काय, याचा अंदाज घ्यावा, म्हणून कार्यकारिणीने केलेल्या ठरावाला त्यांनी विरोध केला; पण उपयोग झाला नाही. ऐक्यवादी गटात रेड्डी, सुब्रह्मण्यम्, नाईक प्रभृती नेते होते. त्यांना अशी खात्री होती, की आणीबाणीत जे काही घडले, त्याबद्दल श्रीमती गांधींना पश्चात्ताप झाला असून पक्षफुटीबद्दल त्यांना दुःख होत आहे. त्या नक्कीच युतीचे स्वागत करतील. चव्हाणांनी ऐक्य-बोलण्याच्या वेळी त्यात भाग घ्यावा, असा इंदिरा गांधींचा आग्रह होता. ऐक्यासंबंधी इंदिरा-स्वर्णसिंग यांच्या सहीने पत्रक काढले गेले, पण 'ते केवळ एक सदिच्छापत्र आहे' या पलीकडे त्याला चव्हाणांच्या मते महत्त्व नव्हते. पक्षाचे नेतृत्व इंदिराजींना द्यायला चव्हाणांची हरकत नव्हती, पण तत्पूर्वी काही अटी इंदिराजींनी पाळाव्या, एवढेच त्यांचे म्हणणे होते.

चव्हाणांच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या :

लोकसभेत पक्षाचे नेतेपद यशवंतरावांकडे आणि राज्यसभेत ते के. सी. पंत यांच्याकडे असावे, म्हणजेच अनुक्रमे स्टीफन व कमलापती त्रिपाठी यांच्याकडून ते काढून घेण्यास इंदिराजींनी संमती द्यावी, राज्यांमधील पक्षशाखांवर कोणाची निवड करायची, हे स्वर्णसिंग व इतर दोन सदस्य यांच्या समितीवर सोपवण्यात यावे, पक्षाची फेररचना व एकीकरण त्रिसदस्य मंडळाच्या नेतृत्वाखाली व्हावे आणि या त्रिसदस्य मंडळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे (म्हणजे स्वर्णसिंग काँग्रेसचे) दोन सदस्य असावेत.

इंदिरा गांधींना या अटी मान्य नव्हत्या. राज्यपातळीवर आपल्याला प्रतिकूल संघटना यातून बांधली जाईल, अशी त्यांना भीती होती.

इंदिरा गांधींनी पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतला. या वेळी त्यांनी संजय गांधींना पुढे केले. त्यांच्या नेतृत्वाखालच्या यूथ फोरमला, म्हणे, ऐक्य-बोलणीच अमान्य होती! स्वर्णसिंग काँग्रेसच्या अटी नामंजूर होत्या. इंदिराजींनी वसंतदादा व नाईक यांना सांगितले, की-

"ऐक्यवादी लोक माझ्या दिव्यवलयाचा वापर करू इच्छितात. जनसामान्यांमध्ये माझ्याबद्दल जे आकर्षण आहे, ते वापरून घेण्यासाठीच मला त्यांनी नेतृत्व देऊ केले आहे. पक्षांच्या एकत्र येण्याचा यापुढे प्रश्नच नाही. इंदिरा काँग्रेस कायम राहील. त्यांनी हवे तर

या पक्षात यावे."

इंदिरा गांधींची मुख्य व्यथा ही होती, की विशेष न्यायालयांची नियुक्ती आणि संजय गांधीला नव्या एकत्र पक्षात मानाचे स्थान या त्यांच्या मते 'राष्ट्रीय' महत्त्वाच्या असणाऱ्या मुद्द्यांना ऐक्य-बोलण्यांमध्ये कुठेच जागा मिळाली नाही; किंवा इंदिरा वा संजय यांना पुन्हा अटक झाल्यास चव्हाण-स्वर्णसिंग रस्त्यावर येण्याचे आश्वासन देण्यास तयार नव्हते. विशेष- न्यायालये- विधेयकासंबंधी स्वर्णसिंग काँग्रेसची भूमिका होती, की खासदारांना सद्‌सद्‌विवेक बुद्‌ध्यिनुसार त्यावर मत देण्याचे स्वातंत्र्य असावे. ब्रह्मानंद रेड्डी व सुब्रह्मण्यम यांनी या प्रसंगी अनुपस्थित राहावे, असे चव्हाणांचे मत होते, तर त्यांनी विधेयकाला प्रखर विरोध करावा, अशी इंदिराजींची अपेक्षा होती. शहा आयोगासंबंधी जी मुग्ध भूमिका स्वर्णसिंग काँग्रेसने घेतली, तीही इंदिराजींना नापसंत होती.

या काळात चव्हाण आपल्या भूमिकेवर बरेच ठाम राहिलेले दिसले. इंदिरा गांधींचे दिव्य वलय त्यांना सोडून गेले आहे, त्यांना एकत्रित काँग्रेसचा वापर त्यांच्यावर व त्यांच्या मुलावर खटले करणाऱ्या जनता सरकारशी मुकाबला करण्याच्या कामीच फक्त करून घ्यायचा आहे, आपण असे आपल्याला वापरू दिल्यास लोक आपली कुचेष्टा करतील, श्रीमती गांधींसाठी कुणीही रस्त्यावर येणार नाहीत, आणीबाणीतील अतिरेकांचे समर्थन केलेच जाऊ शकणार नाही- अशा दृष्टींनी यशवंतराव विचार करीत होते. श्रीमती गांधींच्या अपेक्षा पक्ष-एकीकरणातून पूर्ण होणार नसल्यामुळे मग त्यांना त्यात रस उरलाच नाही.

महाराष्ट्रात समांतर काँग्रेस

मधल्या काळात महाराष्ट्रात काँग्रेस-इंदिरा काँग्रेस युतीच्या सरकारातून शरद पवारांनी राजीनामा देऊन समांतर काँग्रेस स्थापन केली. तिला महाराष्ट्र विधानसभेतील चाळीस आमदारांची साथ होती. जानेवारी १९७९ मध्ये समांतर काँग्रेसचा मेळावा शरद पवारांनी घेतला. पवारांच्या या उपक्रमाला यशवंतरावांची मूक संमती आहे, हे उघड गुपित होते. यशवंतराव व अन्य इंदिराविरोधक यांच्यावर इंदिरा काँग्रेसमध्ये विसर्जित होण्यासाठी येत असलेले दडपण थोपवणे शक्य झाले. आणि महाराष्ट्रातला हा नवा प्रयोग कोसळू नये, म्हणूनच जुलै १९७९ च्या प्रारंभी देवराज अरस यांनी सर्व काँग्रेसजनाचा जो मेळावा घेतला, त्यास यशवंतराव हजर राहिले नाहीत. शरद पवारांनी जनता पक्षाशी मैत्री करून महाराष्ट्रात पुरोगामी लोकशाही आघाडीचे सरकार मधल्या काळात स्थापन केले होते. आणि 'आमची काँग्रेस हीच खरी काँग्रेस असून देवराज अरस यांचा प्रयत्न इंदिरा

काँग्रेसला जाऊन मिळण्याचा आहे. त्यांना हवे तर त्यांनीच आम्हांला येऊन मिळावे', असे विधान शरद पवारांनी केले होते. एवढ्या आत्मविश्वासपूर्वक बोलणारा आणि थोड्या-फार का होईना निवडणूक-यशाची खात्री बाळगणारा समांतर काँग्रेस हा एकमेव इंदिराविरोधी गट होता आणि इंदिरा गांधींच्या अधिकारशाहीविरुद्ध सातत्याने स्पष्ट भूमिका तो घेत होता. यशवंतरावांना हा एवढाच दिलासा होता. एरव्ही स्वर्णसिंग काँग्रेसचा सर्वत्र-दक्षिण भारतात असोत वा उत्तर भारतात- जिथे जिथे पोटनिवडणुका झाल्या, तिथे पराभवच झाला होता. राजकीय शक्ती म्हणून हा पक्ष टिकणे असंभव होते. उलट, इंदिरा काँग्रेसची सर्वत्र सरशी होत होती.

जनता-शासन डळमळीत

जनता पक्षाचे सरकारही आतून फुटलेलेच होते. समाजवादी गट आणि जनसंघ गट यांच्या कुरबुरी दुहेरी सदस्यत्वाच्या प्रश्नावरून सुरूच होत्या. चरणसिंग व मोरारजी यांचेही आपसांत फारसे सख्य नव्हते. इंदिरा गांधींना दूर ठेवून जनता पक्षातील फुटीचा लाभ कसा घेता येईल, याचा विचार यशवंतराव सावधपणे करीत होते. चरणसिंग अर्थमंत्री होते व त्यांच्या अंदाजपत्रकामुळे देशातील असंतोष वाढला होता. भाववाढ झाली, संघटित क्षेत्रांत आंदोलने उभी राहिली. सरकारी अकार्यक्षमता जनतेच्या नजरेस येऊ लागली. प्रत्येक घटकपक्ष आपापल्या भवितव्याची काळजी वाहू लागला. जनसंघ व इंदिरा गांधी यांना वगळून काँग्रेसवाल्यांनी एकत्र यावे, असा प्रयत्न काहींनी सुरू केला, तर जनता पक्षात राहिल्यामुळे आपल्या नेतृत्वाच्या पायांखालची वाळू सरकत आहे, हे लक्षात आल्याने चरणसिंग जनता पक्षाच्या चौकटीबाहेर नव्या युतीच्या शोधात निघाले होते. यशवंतरावांनी हे सर्व पाहिले.

- आणि १९७९ च्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी त्यांनी लोकसभेसमोर जनता सरकारविरुद्ध अविश्वास प्रस्ताव ठेवला, नंतरच्या दोन दिवसांतच अनेक खासदार जनता पक्षातून राजीनामा देऊन बाहेर पडले. राजनारायण, मधू लिमये, बहुगुणा, वगैरे १०० जणांनी जनता (एस) नावाचा पक्ष स्थापन केला. जनता पक्षात जे प्रादेशिक व ग्रामीण शेतकरी वर्गांचे प्रतिनिधी होते, ते चरणसिंग यांच्या नेतृत्वाखाली बाहेर पडले होते. स्वर्णसिंग काँग्रेसमध्येही याच वर्गाचे प्राबल्य असल्यामुळे या पक्षाची साथ चरणसिंगांना मिळणार, हे स्पष्ट झाले. मोरारजींना विरोधी पक्षांपेक्षा स्वपक्षातील बंडखोरांनीच जेरीस आणले. त्यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला, तरीही पक्षनेतेपद स्वतःकडेच ठेवले.

श्रीमती गांधींचा चतुर डाव

श्रीमती गांधींनी चतुर डाव टाकला. त्यांनी चरणसिंगांना सरकारबाहेर राहून पाठिंबा देण्याचे घोषित केले. प्रधानमंत्रिपदासाठी हुरळलेल्या चरणसिंगांनी तो पाठिंबा लगेच स्वीकारला. पण आश्चर्य असे, की इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीविरुद्ध आवाज बुलंद करणाऱ्या यशवंतराव चव्हाण, जॉर्ज फर्नांडिस, ब्रह्मानंद रेड्डी प्रभृती नेत्यांनीही त्या पाठिंब्याचे स्वागत केले. राष्ट्रपती संजीव रेड्डींनी सरकार निर्माण करण्याची पहिली संधी विरोधी पक्षनेते या नात्याने यशवंतरावांना दिली असता त्यांनी असमर्थता व्यक्त करून ती नाकारली होती. पण चरणसिंग पुढे येताच यशवंतरावांनी त्यांना साथ द्यायचे ठरवले. जुलैअखेरीस चरणसिंग भारताचे पाचवे प्रधानमंत्री आणि यशवंतराव त्यांच्या मंत्रिपरिषदेत उपप्रधानमंत्री झाले. इंदिरा गांधींच्या पाठिंब्यावर काँग्रेस (एस) आणि जनता (एस) या पक्षांचे संयुक्त सरकार केंद्रपातळीवर उभे राहिले. १८ ऑगस्ट, १९७९ पर्यंत त्याने लोकसभेतील आपले बहुमत सिद्ध करावे, असा आदेश राष्ट्रपतींनी दिला.

या घडामोडीतून श्रीमती गांधींचे राजकीय पुनर्वसन तर झालेच, शिवाय त्यांना भारतीय राजकारणात पुन्हा एकवार कळीचे स्थान प्राप्त झाले. इंदिरा काँग्रेसच्या पाठिंब्यावर विश्वास- ठरावाच्या कसोटीला चरणसिंग सरकार उतरले असते, तरीही ते अल्पजीवी ठरले असतेच, हे उघड आहे, आपल्या यशाची खात्री झाल्यावर एकाही दिवसासाठी इंदिरा गांधी त्या सरकारला सत्तेवर राहू देणार नव्हत्या. मोरारजींच्या सरकारने खास न्यायालये, शहा आयोग वगैरेंच्या द्वारे जे त्यांना हवालदिल केले होते, त्यातून सुटका करून घेण्यासाठी त्यांनी चरणसिंगांना पाठिंबा दिला होता. आणि ती निकड संपली आहे, असे दिसताच त्या तो काढून घेणार होत्या. काँग्रेस (एस) व जनता (एस) या दोन्ही पक्षांना बिनशर्त पाठिंबा देऊन त्यांनी एकाधिकारशाहीच्या विरोधकांना एकाकी पाडण्यात यश मिळवले होते. राज्यकर्त्यांना मिंधे करून स्वतःला शिक्षा मिळण्याची शक्यताच रद्दबातल ठरवली होती. पाठिंब्याची एक चाल चालून त्यांनी सर्व विरोधकांना अशाप्रकारे शह दिला होता.

ऐन वेळी श्रीमती गांधींनी पाठिंबा काढून घेतला आणि २० ऑगस्ट रोजी चरणसिंगांना राजीनामा देणे भाग पडले. तीन-चार दिवस नेतृत्वाचा अक्षरशः सावळा गोंधळ राजधानीत सुरू होता. राष्ट्रपतींनी जगजीवनराम यांचा दावा डावलून लोकसभाविसर्जनाचा निर्णय २५ ऑगस्ट रोजी घेतला आणि नव्या निवडणुकांचा आदेश काढला. निवडणुका होऊन नवे सरकार सत्तारूढ होईपर्यंत चरणसिंग यांच्या मंत्रिमंडळाला काळजीवाहू सरकार म्हणून कारभार करण्याची विनंती त्यांनी केली.

इंदिरा-पुनरागमन

१९८० च्या प्रारंभी श्रीमती गांधींचा इंदिरा काँग्रेस पक्ष प्रचंड बहुमत मिळवून विजयी झाला, आणि यशवंतरावांच्या राजकीय जीवनाला पूर्णविराम मिळाला. त्यानंतर काही काळ विरोधी पक्षात ते राहिले. पण त्यांचे सर्व सहकारी इंदिरा काँग्रेसला क्रमाक्रमाने जाऊन मिळाले होते. संघर्षाचा पवित्रा एकाकीपणे चालवण्यात हशील नव्हते. मानहानी पत्करून यशवंतरावांनी पुन्हा 'स्वगृही' येण्याचा निर्णय घेतला. श्रीमती गांधी यांनी त्यांना बराच काळ ताटकळत ठेवल्यानंतर पक्षात प्रवेश दिला. त्यांना आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्षपद दिले.

पण यशवंतरावांच्या नेतृत्वाला ती पूर्वीची झळाळी पुन्हा कधीच येऊ शकली नाही. पुनरागमन झालेल्या श्रीमती गांधींच्या नव्या राजकारणात यशवंतरावांसारख्या सात्त्विक व सच्चरित्र नेत्याला काहीही स्थान नव्हते. संजय गांधींच्या अनुयायांच्या स्वरूपात इंदिरा काँग्रेसला यशदायी ठरलेल्या ज्या नव्या शक्ती सत्तारूढ पक्षात प्रविष्ट झाल्या होत्या, त्यांना यशवंतराव ज्या स्वातंत्र्य-लढ्यातील मूल्यांचे व राष्ट्रसभेच्या परंपरांचे प्रतिनिधित्व करीत होते, त्यांच्याशी काहीही देणे-घेणे नव्हते. ज्येष्ठांबद्दल आदरभाव किंवा मार्गदर्शनाची अपेक्षा या गोष्टींना त्यांच्या राजकीय संस्कृतीत काडीचेही स्थान नव्हते.

यशवंतराव निःशब्द व एकाकी होते. आयुष्यभर प्रतिकूल परिस्थितीतही टिकवून ठेवलेला व त्यांच्या भाषणांमधून ओतप्रोत ओसंडत आलेला आशावाद पराभूत झाल्याचा विषण्ण अनुभव घेत ते दिवस कंठीत होते. तरीही 'होपिंग अगेन्स्ट होप' म्हणतात, तसे ते मनाची उभारी जुळवीत प्रसंगांना तोंड देतच होते.

श्रीमती गांधींची हत्या झाली. महिन्याभरात त्यांच्या वारसदारांनी निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला. कराड मतदारसंघातून नामांकन भरण्यासाठी यशवंतरावांनी कंबर कसली...

पण नियतीने त्यांना त्यांच्या मानसिक ओढाताणीतून कायमचे सोडवायचे ठरवले. अल्पशा आजारानंतर २५ नोव्हेंबर, १९८४ रोजी त्यांचे निधन झाले.

●●●

४. यशवंतराव आणि समाजवाद

सामाजिक पार्श्वभूमी आणि बौद्धिक तयारी

ज्या सातारा जिल्ह्यात यशवंतरावांचा जन्म झाला आणि जिथे त्यांनी नेतृत्वाची उभारणी केली, तो महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यांपेक्षा समाजवादी विचारसरणीच्या जोपासनेत अधिक अनुकूल होता. जमीनदार आणि त्यांची कुळे यांच्यांतील संघर्ष या जिल्ह्यात अधिक ठळक व झुंजार स्वरूपात व्यक्त झाला होता. एकेकाळच्या मराठा साम्राज्याची इथे राजधानी असल्यामुळे पराक्रम आणि राष्ट्रभक्ती यांची दीर्घ परंपरा तिथे आधीपासून होतीच. शिवाय टिळकप्रणित शिवाजी संप्रदायानेही या जिल्ह्याला बरेच प्रभावित केले होते. विद्यमान परिस्थितीविषयी असमाधान आणि ती बदलण्यासाठी संघटित प्रयत्न करण्याची शोषितांची तयारी यांमधून आपोआपच समाजवादी विचाराची पूर्वपीठिका जिल्ह्यात तयार झालेली होती. ब्राह्मणेतर चळवळीचा बालेकिल्ला या जिल्ह्यात होता. त्या चळवळीने तिथल्या जनसामान्यांच्या मनांवर सामाजिक समता व सामाजिक न्याय या तत्त्वांचे खोल संस्कार केले होते. शेटजी-भटजी या युतीविरुद्ध असंतोष मोठ्या प्रमाणात उसळला होता.

बहुजन-समाजातील श्रेष्ठींच्या ठिकाणी या चळवळीतून कायदेकौन्सिलातील राखीव जागा, सरकारी नोकऱ्या, व्यवसाय-उद्योगांतील वाढीव भागीदारी वगैरेंबद्दल आकांक्षा निर्माण झाल्या, तर खालच्या श्रेणीच्या सामान्य शेतकरी, शेतमजूर वर्गांच्या ठिकाणी तिने पिळवणुकीपासून सुटका करवून सामाजिक न्याय पदरात पाडून घेण्याच्या अपेक्षा पल्लवीत केल्या होत्या. त्यांच्यासाठी ही चळवळ केवळ ब्राह्मण जातीचे वर्चस्व झुगारून देण्यापुरती नव्हती, तर तिला वर्गवर्चस्वविरोधी स्वरूप आपसूकच प्राप्त झाले

होते.

गांधींचे असहकारिता आंदोलन सामान्य शेतकरी वर्गाला जवळचे वाटले, कारण त्याचे आवाहन वरिष्ठवर्गीय श्रेष्ठींना डावलून तळपातळीवरच्या सामान्य नागरिकांना केले गेले होते. नेतृत्वाचे पारंपरिक वलय छेदून नवे नेतृत्व उदित होण्याची शक्यता या आंदोलनातून पुढे आली होती. स्वाभाविकच पुरोगामी पिंडाच्या सातारा जिल्ह्यातील बहुजनसमाजात नवचैतन्य प्रसृत होऊ लागले होते. यशवंतराव हे या चैतन्याची पेरणी करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांपैकी एक म्हणून जिल्ह्यात वावरत होते. काँग्रेसच्या चळवळीबद्दल आदर बाळगूनही काँग्रेस सामान्य शेतकऱ्यांच्या प्रश्नांशी एकरूप होत नसल्यामुळे ती तळागाळापर्यंत जाऊ शकत नाही, हे सत्य प्रस्तुत कार्यकर्ते दुर्लक्षू शकत नव्हते. आर्थिक शोषणाचा खोलवर विचार केल्यामुळे जातिविग्रही भूमिका मांडणाऱ्या बहुजनश्रेष्ठींपेक्षा वर्गविग्रही मांडणी करणारांकडे ते अधिक आकर्षित झाले होते.

उपकारक सामाजिक पार्श्वभूमी आणि स्वकष्टार्जित बौद्धिक तयारी या गोष्टींमुळे यशवंतराव समाजवादाचा विचार सहज समजावून घेऊ शकले. सत्यशोधक चळवळीने अप्रत्यक्षतः एक नवा ध्येयवाद त्यांच्या मनात पेरलेलाच होता. क्रांतिकारक विचारसरणी स्वीकारण्याची पूर्वपीठिका त्यातून तयार झाली होती. सावकारी पाश, कुळांची कायम ससेहोलपट वगैरे जे शेतकरी समाजाचे जिव्हाळ्याचे आर्थिक प्रश्न होते, त्यांकडे जिल्हा व प्रांतिक काँग्रेसचे नेते दुर्लक्ष करतात, ते पाहून यशवंतराव अस्वस्थ होत असत. १९३१ साली मसूर (तालुका कराड) गावी भरलेल्या राजकीय परिषदेत एका ठरावाला उपसूचना मांडून माधवराव बागड यांनी जेव्हा राजकीय मागण्यांच्या जोडीला काही आर्थिक मागण्या ठरल्या, तेव्हा तांत्रिक अडचणी पुढे करून नेत्यांनी त्या डावलल्या, हे यशवंतरावांना खटकले होते. त्यांनी खुल्या अधिवेशनात बागलांना पाठिंबा दिला होता. शेतकरी समाजाच्या तातडीच्या प्रश्नांबद्दलही परिषद काहीच बोलणार वा करणार नसेल, तर शेतकरी समाजाने स्वातंत्र्य-आंदोलनात घेतलेला भाग फुकट जाईल, अशी त्यांची भावना झाली होती. आपल्या आत्मचरित्रात ते याबद्दल लिहितात :

"शहरातल्या पांढरपेशा वर्गातील कार्यकर्त्यांना व पुढाऱ्यांना राजकीय स्वातंत्र्य प्रिय होते, पण त्यातून उद्‌भवणारे सामाजिक व आर्थिक प्रश्न त्यांना नको होते, असा अर्थ मी मनाशी काढला आणि माझे मन अतिशय कष्टी झाले." ('कृष्णाकाठ', १०३)

समाजातील आर्थिक व सामाजिक संबंध आमूलाग्र बदलल्याशिवाय स्वातंत्र्य अर्थपूर्ण ठरणे शक्य नाही, अशी त्यांची खात्री झाली. ('विण्डस् ऑफ चेंज', १५७).

सामान्य स्तरातील जीवनानुभव यशवंतरावांना समाजवादाच्या दिशेने असा घेऊन

जात असतानाच वैचारिक अंगानेही समाजवादाचे संस्कार मिळण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. १९३२-३३ साली यशवंतराव विसापूर कारागृहात होते. तिथे त्यांची बारा नंबरची बराक म्हणजे यशवंतरावांच्या बौद्धिक जडणघडणीची संस्कारशाळाच ठरली. आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन, अतीतकर, मामा गोखले, वि. म. भुस्कुटे, एस. एम. जोशी, ह. रा. महाजनी प्रभृती अभ्यासू राजकीय नेत्यांच्या सहवासात अनेक विषयांचा अभ्यास करण्याची संधी त्यांना मिळाली. विविध विचारसरणींचा सविस्तर व तौलनिक अभ्यास त्यांनी केला. गांधीवाद, साम्यवाद, समाजवाद, मार्क्सवाद वगैरे 'राजकीय विचारांच्या वेगवेगळ्या छटा आणि त्यांचा परस्परांशी संबंध' त्यांना स्पष्ट झाला. वाचन-चिंतन-मनन आणि विचारविमर्श यांमधून विविध विचारसरणींच्या तात्त्विक आधारांचे इतके पिंजण तुरुंगात झाले, की बाहेर पडताना आपण केवळ काँग्रेसवाले राहिलो नसून समाजवादी निष्ठेची जोड घेऊन आलो आहोत, अशी खुद्द यशवंतरावांची धारणा झाली होती ('कृष्णाकाठ', १८२).

अर्थात या विचारमंथनातून समाजवादाची त्यांना सांगोपांग कल्पना आली होती किंवा समाजवाद कसा आणता येईल, याची दिशा स्पष्ट झाली होती, असे मात्र म्हणता येणार नाही. कारण त्यांनीच पुढे हे कबूल केले आहे, की अतिव्याप्त अर्थानेच त्या वेळी समाजवाद शब्दाचा प्रयोग ते करीत असत. समाजवाद शब्दामागे असलेले संदर्भांचे सगळे पदर उकलण्याऐवजी त्यांनी समाजवादाचा आपल्यापुरता एक सुटसुटीत अर्थ करून घेतला होता. स्वातंत्र्यसैनिक म्हणून आपण काँग्रेसचे व्यासपीठ मूलभूत मानतो आणि त्याच वेळी समाजवादही स्वीकारतो, याचा मर्यादित अर्थ-

"एवढाच, की राजकीय स्वातंत्र्य म्हणजे निव्वळ इंग्रजांचे राज्य जाऊन या देशातील जनतेची प्रगती होणार नाही, त्याचबरोबर आमच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनामध्ये मूलभूत फेरफार करावे लागतील."

स्वातंत्र्याचा अर्थ केवळ राजकीय न राहता सामाजिक-आर्थिक आशयही त्यास लाभावा, एवढ्या स्थूल व संदिग्ध स्वरूपातच समाजवादाचा विचार यशवंतरावांनी स्वीकारला होता. साम्यवादी मंडळींशी शास्त्रीय समाजवादासंबंधी वादविवाद करताना आपली गडबड उडत असे, मात्र तरीही खोलात जाण्याची आपली तयारी नव्हती. हे त्यांनी स्वच्छ शब्दांत कबूल केले आहे. पुस्तकी विचारविमर्शापेक्षा प्रत्यक्ष जनआंदोलनाच्या अनुभवांमधूनच आपल्या देशातील परिस्थितीला अनुरूप असे समाजवादाचे प्रारूप पुढे येईल, अशी आशा त्यांनी बाळगली होती. आपल्या समाजवादी दृष्टिकोनाने काँग्रेसनिष्ठेवर मात करू नये, अशी दक्षताही त्यांनी आरंभापासून घेतली होती.

१९३४-३५ पर्यंत काँग्रेसवर राष्ट्रवादी विचाराची एवढी गडद छाया होती, की ब्रिटिशांनी देश सोडून जाणे एवढाच नकारात्मक अर्थ काँग्रेसप्रणित स्वातंत्र्याला आला होता. सामान्य जनतेच्या जीवनात क्रांती व्हावी किंवा सामान्य नागरिक सामाजिक-आर्थिक दास्यातून मुक्त व्हावा, हे त्या राष्ट्रवादात तोपर्यंत अंतर्भूतच झालेले नव्हते.

ही जाणीव ज्यांना प्रकर्षाने झाली, त्यांनी काँग्रेसमध्ये काँग्रेस समाजवादी पक्ष संघटित केला होता. राघूअण्णा लिमये यांच्यामुळे यशवंतराव या गटाशी जोडले गेले होते. समाजवादाचा विचार खेड्यांतल्या शेतकऱ्यांनाही आवडतो, हे त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले होते. गरीब-श्रीमंत विषमता नष्ट व्हावी, आणि जे मागासलेले आहेत, त्यांना उन्नतीच्या सर्व संधी अधिकार म्हणून मिळाव्यात, (कित्ता, १५६) या समाजवादाच्या उद्दिष्टांबाबत काँग्रेसमध्येही कुणाचे दुमत होईल, असे यशवंतरावांना वाटले नव्हते. गरिबी आणि मागासलेपणा यांच्या ओझ्याखाली पिचलेले कार्यकर्ते मित्र समाजवादी विचाराने प्रेरित होतात, हे पाहिल्यावर काँग्रेस संघटनेत राहूनच सर्व जिल्हा काँग्रेस समाजवादी विचाराची करायची, असे मनसुबेही यशवंतरावांनी आखले होते.

पण लवकरच एक शृंगापत्ती त्यांच्यापुढे उभी राहिली. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नेतृत्वाखाली आणखी एक गट काँग्रेसमध्ये निर्माण झाला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, भय्याशास्त्री वाटवे, ह. रा. महाजनी, वामनराव कुलकर्णी प्रभृती त्या गटात होते. यशवंतरावांचे त्यांच्यापैकी काहींशी वैयक्तिक जिव्हाळ्याचे संबंध होते. यशवंतरावांनी काँग्रेस समाजवादी पक्षात जावे, हे या मंडळीला पसंत नव्हते.

"(समाजदवादी) मंडळी खरा समाजवाद देशात आणू शकणार नाहीत. हे गांधींचा अहिंसावादच समाजवादाच्या परिभाषेत मांडण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या वैचारिक भूमिकेत मूलभूत असे काहीही क्रांतिकारकत्व नाही. हिंदुस्थानचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सुटायचे असतील, तर स्वराज्याची चळवळ अशा कार्यक्रमांवर व अशा पद्धतीने बांधायला पाहिजे, की तिची जसजशी प्रगती होईल, तसतसे त्यातून समाजवादाचे स्वप्न साकार व्हायला मदत होईल," (कित्ता, १८७) अशी भूमिका रॉयवादी घेत असत.

यशवंतरावांना निवड करायची होती. त्यांनी विचार केला : समाजवादी बुद्धिमान व देशभक्त निःसंशयपणे आहेत. पण ते पुस्तकी आहेत, हस्तिदंती मनोऱ्यात बसून चिंतन करणारे आहेत, लोकांच्या प्रश्नांचे त्यांना यथार्थ आकलन नाही. त्यांच्या पुस्तकी विचारांना शहरी झालर आहे, जनतेमधील आंदोलनाचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव मुळीच नसल्यामुळे ते या देशात समाजवाद आणू शकणे असंभवनीय आहे. याउलट रॉय तुरुंगातून आपल्या अनुयायांना पत्रांद्वारे जे विचार कळवीत किंवा चळवळ-बांधणीविषयी मार्गदर्शन

करीत, ते पाहिल्यावर समाजवाद्यांच्या भोंगळ विचारांपेक्षा व्यक्तिमत्वानेच ते जास्त प्रभावित झाले होते, हे त्यांच्या लेखनावरून दिसते (कित्ता, १९०). रॉय यांची तीव्र बुद्धिमत्ता, मार्क्सवादाचा त्यांनी केलेला सखोल अभ्यास, रशियात लेनिनसोबत केलेले राजकीय व वैचारिक कार्य, चीन, द. आफ्रिका व मेक्सिकन क्रांतीतील प्रत्यक्ष सहभाग आणि पूर्व आशियाई देशांमध्ये ज्या भांडवलशाहीविरोधी चळवळी करायच्या, त्यांच्या आखणीतील जागतिक पातळीवरचा पुढाकार- या बाबींमुळे रॉय यांच्या व्यक्तिमत्वाभोवती एक तेजोवलय त्या काळात निर्माण झाले होते. समाजवाद्यांपेक्षा रॉयवाद्यांमध्ये समाजवादी क्रांती घडवून आणण्याची अधिक क्षमता आहे, असे त्या वेळी यशवंतरावांना वाटून त्यांनी समाजवादी पक्षाचा राजीनामा दिला आणि रॉयवाद्यांची सोबत धरली.

रॉयवादी प्रतिपादनातील पुढील दोन गोष्टी चव्हाणांना पटत होत्या. एक, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची लढाई ही समाजवादी क्रांतीच्या पूर्वीची लोकशाही क्रांतीची लढाई आहे आणि ती कामगार व शेतकरी यांनी संयुक्त बळावरच लढवायची आहे. त्या दृष्टीने कोट्यवधी गरीब शेतकऱ्यांना वर्गहिताच्या मागण्यांच्या आधारे संघटित करणे हे मुख्य कार्य असून हे ऐतिहासिक कार्य फक्त काँग्रेसच पार पाडू शकेल. आणि दुसरे असे, की राज्यक्रांती करायची असेल, तर आधी देशामध्ये विचारक्रांती घडवून आणली पाहिजे, त्याशिवाय समाजवादाची क्रांती होणार नाही. विचारक्रांतीसाठी डोळसपणाचे वातावरण निर्माण केले पाहिजे, परंपरावादी दृष्टीने आंधळेपणाने गोष्टी स्वीकारण्याची मनोवृत्ती काढून टाकली पाहिजे. (कित्ता, १९२). चव्हाणांनी त्या काळात रॉय यांच्याशी 'भारतीय सामाजिक क्रांतीतील किसानांचे स्थान आणि राज्यक्रांतीचे तंत्र' या विषयावर सविस्तर खल केला होता, असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री सांगतात. ('चव्हाण अभिनंदन ग्रंथ', ८.)

रॉय यांचा आपल्यावर प्रभाव झाला, तो केवळ बौद्धिक व तात्त्विक पातळीपुरताच परिमित होता. त्यापेक्षा अधिक खोलवर तो जाऊ शकला नव्हता, हे खुद्द चव्हाणांनीच सांगितले होते. (कुन्हीकृष्णन, ३३). स्वातंत्र्योत्तर देशाच्या सामाजिक-आर्थिक प्रश्नांचे गांभीर्य रॉय यांच्या शिकवणुकीतून पटले असले, तरी हे प्रश्न दुय्यम आहेत, स्वातंत्र्य हेच प्रथम महत्त्वाचे आहे, अशीच त्यांची एकंदरीत धारणा होती. काँग्रेसमध्ये पर्यायी नेतृत्व उभे करण्याची रॉय यांची भूमिका तर त्यांना कधीच पटली नव्हती. हे रॉयवादी काँग्रेसला अप्रत्यक्षतः कमजोर तर करणार नाहीत ना, ही भीतीही चव्हाणांच्या मनात सतत वावरत होती ('कृष्णाकाठ', १९२). रॉय तुरुंगातून सुटल्यावर काँग्रेसवाल्यांनी त्यांचे थंडे स्वागत केले, तेव्हा तर चव्हाणांची खात्रीच झाली. तासगावची रॉयवाद्यांची परिषद उधळली गेली. जिल्ह्यात रॉयवादी व रॉयविरोधी फळ्या पडल्या. तेव्हा 'जिथे गांधी-नेहरू, तिथे मी' ही

मूळ स्वभावाशी सुसंगत भूमिका चव्हाणांनी स्वीकारली.

दुसऱ्या महायुद्धात सहभागी होण्याच्या प्रश्नावरून अल्पावधीतच रॉयवादी व काँग्रेस यांच्या वाटा वेगवेगळ्या झाल्या आणि चव्हाणांच्या आयुष्यातील रॉयपर्व संपुष्टात आले.

चव्हाणांवर रॉय यांच्या विचारसरणीतून समाजवादाचे खूप ठळक संस्कार झाले होते, असे म्हणता येणार नाही. कारण नंतरच्या त्यांच्या राजकीय वाटचालीत त्यांनी त्या विचारसरणीचा कुठेही आग्रह धरलेला आढळत नाही. रॉयवादातल्या त्यांना पटलेल्या उपर्युक्त दोन बाबींचा- काँग्रेसतर्फे शेतकऱ्यांचे वर्गहिताधारे संघटन, आणि विचारक्रांतीचे प्रयत्न- त्यांच्या हातून पाठपुरावाही केलेला दिसत नाही. युद्धातल्या सहभागावरून मतभेद झाला, हे समजू शकले, तरी रॉय यांनी पुढे जो नवमानवतावादी विचार मांडला, तो मार्क्सवादाला भारतीय परिस्थितीशी जुळवण्याचाच एक खटाटोप होता. चव्हाणांची भूमिका तशीच असली, तरी त्यांनी रॉयवादाचा आधार मात्र पुढे कधीच घेतलेला दिसत नाही. यावरून हे स्पष्ट होते, की त्यांना वाटलेले आकर्षण रॉय यांच्या विचारांपेक्षा व्यक्तिमत्वाचेच होते. आणि त्याचे स्वरूप बौद्धिक असण्यापेक्षा भावनिकच होते. लवकरच ते यथाक्रम विरले.

गांधीवादी पर्यायही नाकारला

समाजवादाचा रॉयप्रणीत आराखडा जसा चव्हाणांनी नाकारला, तद्वतच गांधींनी समाजवादाच्या विचारसरणीला एतद्देशीय स्वरूपात मांडण्याचा केलेला प्रयत्नही चव्हाण स्वीकारू शकले नाहीत. पश्चिमी समाजवादाला पर्याय म्हणून रॉय यांचा नवमानवतावाद होता. तसाच गांधींचा सर्वोदय विचार होता. पण चव्हाण त्या विचारापासूनही अलिप्तच होते. गांधी-नेहरू असा संयुक्त उल्लेख ते करीत असले, तरी त्यांचा कल स्पष्टपणे नेहरूंच्या बाजूने होता. 'स्वतःला कधीच गांधीवादी न म्हणवून घेणारा मला भेटलेला पहिला नेता.' असे त्यांचे वर्णन वेलेस हॅजेन या लेखकाने केले आहे. ('हू आफ्टर नेहरू?' १३२). भूमिगत चळवळीच्या खडतर वाटचालीत त्यांचे राजकीय संगोपन झाले असल्यामुळे असेल किंवा जहाल व झुंजार सातारा जिल्ह्याच्या 'समाजवादी' संस्कारांमुळे असेल; पण गांधीप्रणीत अहिंसा-सत्य-अस्तेयादी व्रतस्थ जीवनादर्शाचे त्यांना कधीच फारसे आकर्षण वाटले नाही. वैयक्तिक जीवनातही विरक्तपूर्ण आचरणाचे त्यांनी स्तोम माजवले नाही. सुखवस्तू जीवनपद्धती त्यांना आवडायची. गांधींची आध्यात्मिकताही त्यांना मानवणारी नव्हती. गांधी-विचारांविरुद्ध बंडखोरी त्यांनी कधी केली नसली, तरी वर्तमानकाळात

गांधीवादाची बरीच तत्त्वे गैरलागू झाली आहेत, याबद्दल ते निःशंक होते. स्वतः खादी वापरीत असले, तरी खादीचे संपूर्ण तत्त्वज्ञान त्यांनी कधीच स्वीकारले नव्हते, आणि गांधीमार्गातील विधायक कार्यक्रम, क्रियाशील कार्यकर्ते, जनसंपर्क वगैरेंबद्दल त्यांना आस्था असली, तरी समाजाचे मूलभूत प्रश्न सोडवून देशाला नवे आधुनिक रूप द्यायचे सामर्थ्य त्या कार्यक्रमांत आहे काय? या प्रश्नाचे त्यांचे उत्तर स्पष्ट नकारार्थी होते. ('कृष्णाकाठ' : १५६). त्यामुळे गांधीप्रणीत समाजवादाचा पर्याय त्यांनी गंभीरपणे विचारात घेतलाच नव्हता.

नेहरूंचा समाजवाद

यशवंतरावांनी स्वतःला 'नेहरूवादी' हेही बिरुद कधी लावले नसले, तरी त्यांनी आपल्या निष्ठा नेहरूंना समर्पित केल्या होत्या, हे स्पष्ट आहे. रॉयच्या मार्क्सवादात उगम पावलेली त्यांची विचारसरणी नेहरूंच्या समाजवादात परिणत झाली होती, असे रास्त विधान तर्कतीर्थांनी केले आहे. नेहरूंच्या मार्गाने काँग्रेस गेली, तर देशात समाजवाद येईल, याची त्यांना एवढी खात्री होती, की नेहरू जे म्हणतील व करतील, तोच समाजवाद, हे त्यांनी जणू गृहीतच धरले होते. त्यांच्या प्रारंभिक काँग्रेस-निष्ठेचे रूपांतर असे नेहरूनिष्ठेत झाल्यामुळे आपल्या मूळ समाजवादी धारणांना मुरड घालण्याचे अनेक प्रसंग पुढे त्यांच्यावर ओढवले.

नेहरूंची वैचारिक परिबद्धता समाजवादाशी निश्चितपणे होती. रशियातील समाजवादाच्या यशाचे त्यांना कौतुक होते. भारतातले प्रश्नही रशियातील प्रश्नांप्रमाणेच असून समाजवादाच्या मार्गाने त्यांची सोडवणूक होऊ शकेल, अशी त्यांना खात्री वाटे. १९३६ साली लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात :

"समाजवाद म्हणजे अशी एक व्यवस्था, की जीमध्ये भूमी आणि भूमीची फळे यांचा समाजाच्या हितासाठी अशा तऱ्हेने उपयोग व्हावा, की मिळणारा लाभ खाजगी मालमत्तेच्या अपघाताने न ठरता लोकांनी केलेल्या सेवेच्या प्रमाणात ठरावा." ('नेहरू स्पीचेस्' खं. ३, १५६-७).

उत्पादन व वितरणाच्या साधनांचे राष्ट्रीयीकरण करून त्याद्वारे आमूलाग्र बदल घडवून आणणे हा त्यांच्या मते समाजवादाचा गाभा होता.

१९३७ नंतर क्रमशः काँग्रेसची मंत्रिमंडळे सत्तेवर आल्यानंतर आधी काँग्रेस चळवळीबद्दल तटस्थ असलेला स्थानिक भांडवलदारवर्ग काँग्रेसला पैसा व पाठिंबा पुरवू लागला, आणि मग नेहरू प्रभृतींना आपल्या समाजवादी विचारांना मुरड घालणे अनिवार्य

होऊ लागले. जोपर्यंत काँग्रेस सुशिक्षित मध्यमवर्गीयांच्या ध्येयवादाच्या बळावर उभी होती आणि जनजागृती व जनसंघटनांतूनच आपले आधार भरभक्कम करू पाहत होती, तोपर्यंतच नेत्यांची समाजवादी ध्येयनिष्ठा टिकून राहू शकली. पुढे मात्र ती शिथिल होणे भाग ठरले. नेहरूंनी आणि नेहरूंनंतर काँग्रेसच्या अन्य नेत्यांनी पुनःपुन्हा समाजवादी कार्यक्रमांचा जोरदार जाहीर पुरस्कार केला असला, तरी खऱ्या अर्थाने काँग्रेस कधीच समाजवादी होऊ शकली नाही. नेहरूंच्या समाजवादाची ही अपरिहार्य शोकांतिका होती आणि स्वाभाविकच नेहरूंमध्ये समाजवादाचे आदर्श शोधणाऱ्या चव्हाणांसारख्यांच्या पदरीही निराशा येणे त्यामुळे अटळ ठरले होते.

'संसदीय' समाजवाद

जनआंदोलनांच्या प्रत्यक्ष अनुभवांमधून भारतीय समाजवादाची उभारणी होईल, असे चव्हाणांनी वारंवार म्हटले असले, तरी त्यांनी स्वतः मात्र पुरोगामी कायद्यांद्वारे निश्चितपणे समाजवाद आणता येईल, अशी खूणगाठ बांधूनच राजकारण केले. तत्त्वाखातर राजकारणातून बाहेर पडण्याची पाळी त्यांच्यावर जेव्हा जेव्हा आली, त्या प्रत्येक वेळी तत्त्वाला मुरड घालूनही सत्तास्थानांवर राहणेच त्यांनी पसंत केले. यावरून समाजवादासाठी जनआंदोलनांपेक्षा सत्ताकारणाचे माध्यमच श्रेयस्कर मानण्याची त्यांची वृत्ती स्पष्ट होते.

१९४६ च्या निवडणुकांनंतर ते मुंबई राज्याच्या गृहखात्याचे संसदीय सचिव झाले. हँजेनच्या म्हणण्याप्रमाणे लवकरच त्यांच्या लक्षात आले, की तरुणपणीच्या आपल्या समाजवादाच्या रोमँटिक कल्पना युद्धोत्तर टंचाईग्रस्त मुंबई राज्याच्या अर्थव्यवस्थेत सपशेल गैरलागू आहेत. अन्न- वस्त्र- निवारा- संपर्क साधने- ऊर्जा वगैरे सगळ्याच गोष्टींचा तुटवडा आणि भडकती महागाई अशी सर्वत्र दुर्दशा होती. समाजवादाच्या सैद्धातिकांनी वाचाळपणे पुरस्कारलेली नियंत्रणे सहजासहजी धाब्यावर बसवली जात होती. भ्रष्टाचार भारतीय समाजजीवनाच्या हाडी मुरला होता (हँजेन, १३९). या अनुभवानंतर यशवंतरावांनी काँग्रेसच्या, प्रचारात समाजवादी; पण आचारात भांडवलदारी असलेल्या धोरणांना मूक संमती देण्याचा वसा स्वीकारला. काँग्रेसचे नामांतर 'काँग्रेस समाजवादी पक्ष' असे करावे, असा जो ठराव शंकरराव मोरे यांनी आणला होता, तो मान्य करणे या परिस्थितीत काँग्रेस पक्षाला शक्यच नव्हते.

काँग्रेसच्या शहरी भांडवलधार्जिण्या धोरणाविरुद्ध केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव प्रभृतींच्या पुढाकाराखाली एक गट काँग्रेसमध्ये संघटित होत होता. त्याची एक बैठक खुद्द यशवंतरावांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. पुरोगामी विचार आणि

कार्यक्रमाच्या आधारे ग्रामीण शेतकरी वर्गाचे व एकूणच बहुजन-समाजाचे हित साधावे, हा या पक्षाचा हेतू होता. यशवंतरावांच्या मूळ समाजवादी भूमिकेशी तो सुसंगत होता. पण जेव्हा हा गट काँग्रेसबाहेर पडला, तेव्हा यशवंतराव मात्र त्यांच्यासोबत गेले नाहीत. राष्ट्रीय राजकारणाचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रादेशिक पक्षांपेक्षा काँग्रेसच प्रभावी ठरेल, अशा विचारान्ती चव्हाणांनी तसे केल्याचे त्यांचे सर्व चरित्रकार (उदा. बापूराव काळे ५४) सांगत असले, तरी यात वैचारिक आत्मप्रतारणा व तत्त्वच्युती होती, हे लपवून लपवता येत नाही.

पुरवठामंत्री असताना अन्यधान्यांवरची नियंत्रणे यशवंतरावांनी काढून टाकली होती, किंवा शेतकऱ्यांनी अधिक धान्य पिकवावे, म्हणून त्यांना आर्थिक प्रलोभने दिली होती. शेतकऱ्यांची उत्पादनप्रेरणा जमिनीच्या स्वामित्त्वाशी निबद्ध आहे, असे मत मांडून त्यांनी सहकारी शेतीची कल्पना उडवून लावली होती. यशवंतरावांचा दृष्टिकोन व्यवहारी व फलितदर्शी असल्याचे सांगून काही भाष्यकारांनी या त्यांच्या समाजवादाशी विसंगत भूमिकांचा गौरवही केला होता. परिस्थितीतील वास्तवाशी चव्हाण कसे चपखलपणे जुळवून घेत, हे सांगताना हँजेन म्हणतो, की शेती-उत्पादनात वाढ करण्यासाठी आर्थिक प्रलोभने प्रभावी ठरतात, हे चिनी नेत्यांनी उपेक्षिलेले सत्य चव्हाणांनी अचूक हेरले होते. (हँजेन, १४०). तर शेतीची उत्पादन-प्रेरणा यशवंतरावांनी स्वामित्वाशी जोडल्यावर, त्यांचा समाजवाद पाठ्यपुस्तकी नसून 'लोकांचा' समाजवाद असल्याचे शिफारसपत्र 'ब्लिट्झ'चे संपादक आर. के. करंजिया यांनी दिले होते ('चव्हाण अभिनंदन ग्रंथ', २१). चव्हाणांच्या समाजवादास मार्क्सची नीतिवचने नसली, तरी मार्क्सवाद भारतीय परिस्थितीला लागू करण्याचे मनोधैर्य असल्यामुळे पुस्तकी समाजवाद्यांनाच नव्हे, तर समाजवादाचा उच्चार, पण समाजवादविरोधी आचार करणाऱ्या काँग्रेसवाल्यांनाही आपल्या मागे खेचून नेण्याचे सामर्थ्यही त्या संपादकांना यशवंतरावांच्या ठिकाणी जाणवले होते.

संयुक्त महाराष्ट्र होण्यापूर्वी अस्तित्वात आलेल्या द्वैभाषिक मुंबई राज्याचे चव्हाण मुख्यमंत्री होते. त्या काळात अत्यंत प्रतिकूल राजकीय पर्यावरण असूनदेखील ते ग्रामीण बहुजन-समाजप्रमाणेच मुंबईतील अ-मराठी भांडवलदारांची मने आपलीशी करू शकले. वास्तविक आधीच आवडी अधिवेशनाच्या समाजवादी समाजरचनेच्या घोषणेने किंचित चिंताक्रांत झालेला हा भांडवलदारवर्ग तळागाळातून आलेल्या एका मराठी माणसाच्या हाती सत्तेची सूत्रे गेल्यामुळे अधिकच हवालदिल झाला होता. गुजराती व्यापाऱ्यांच्या देशी वसाहतवादावर चव्हाणांनी डागलेल्या तोफेचे पडसाद अजूनही पुरते विरलेले नव्हते. तरी पण अल्पावधीत मुख्यमंत्री चव्हाणांनी या व्यापारीवर्गाचा विश्वास आपल्या प्रत्यक्ष कारभारातून

संपादित केला. समाजवादविषयक संदिग्धतेतच त्यांच्या या यशाचे रहस्य शोधावे लागेल. विचाराने डावी, पण व्यवहारात लवचीक माणसे नेहरूंना आवडायची. यशवंतराव नेहरूंना त्यामुळे लवकरच प्रिय झाले. (हॅजेन, १५७). ए. डी. श्रॉफ या मुंबईच्या एका बड्या सावकाराने चव्हाणांसंबंधी केलेले विधान या संदर्भात लक्षणीय आहे. तो म्हणतो,

"यशवंतराव नेहरूंना खूश करण्यासाठी इतर अनेकांप्रमाणे समाजवादी असल्याचा देखावा करीत असले, तरी खाजगी उद्योगक्षेत्राकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन सहानुभूतीचा आहे." (कित्ता, १४७).

संयुक्त महाराष्ट्र झाला, त्या वेळी तर वातावरणात समाजवादाची हवा प्रखर होती. संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये डाव्या पक्षांचे वर्चस्व असल्यामुळे महाराष्ट्रात समाजवादी सरकार यावे, हे समितीचे साध्य होतेच; पण काँग्रेसलाही आता तीच भाषा करण्यावाचून चळवळीच्या वातावरणामुळे गत्यंतर उरले नव्हते. 'संयुक्त महाराष्ट्रात समाजवादाचा पहिला पाळणा हलेल', अशी भविष्यवाणी मुख्यमंत्री चव्हाणांनी मावळत्या सूर्याच्या साक्षीने मुंबईत उच्चारली. महाराष्ट्रात कृषी- औद्योगिक-अर्थव्यवस्थेची पायाभरणी करण्यातून इथे खऱ्या अर्थाने न्याय्य व स्वतंत्र समाज उभा राहू शकेल. शेती आणि ग्रामीण उद्योगधंदे या दोन्ही क्षेत्रांत सहकारी संस्थांचे जाळे विणण्यातून समाजवाद अवतरू शकेल आणि ग्रामीण- शहरी विकासांतील दरी बुजविता येईल, अशीही चव्हाणांची अटकळ होती. पण प्रत्यक्षात मात्र मुंबईचे कारखानदार- भांडवलदार आणि खेड्यांतील सधन शेतकरी यांच्या युतीचे पौरोहित्य या मुख्यमंत्र्यांना करणे भाग पडले.

विकास योजनांच्या द्वारे सामाजिक- आर्थिक विषमता दूर करता येईल, उत्पन्नाची विभागणी योग्य प्रमाणात होतेय किंवा नाही, हे पाहण्यासाठी योजनेच्या कार्यांतर्गत एक कायमची यंत्रणा उभारली जाईल, ('सह्याद्रीचे वारे', १०५-६), योजनेमधून निर्माण होणारा फायदा समाजाच्या खालच्या थरापर्यंत नेऊन पोचवणाऱ्या आज क्षीण असलेल्या शक्ती योजनेच्या क्रमातच बलवत्तर केल्या जातील, (कित्ता, १०७), इत्यादी ज्या अपेक्षा यशवंतरावांनी व्यक्त केल्या होत्या, त्या त्यांच्या कारकीर्दीत आणि नंतरसुद्धा कधीच पूर्ण होऊ शकल्या नाहीत. समाजवादी यशवंतरावांना धनिकसत्तेची बटीक असलेल्या मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे अस्तित्व तर पुसता आलेच नाही; पण वर्चस्वही कमी करता आले नाही. तडजोड हेच त्यांच्या कारभाराचे मुख्य सूत्र राहिले. कोणत्याही वादात विरोधकांचा विरोध बोथट व्हावा व क्रमशः लयास जावा, अशा पद्धतीने त्यांच्याशी वागण हे कौशल्य त्यांना विशेष अवगत होते. एकीकडे कमाल जमीनधारणा कायदा करून पक्षांतर्गत पुरोगामी गटांना संतुष्ट ठेवायचे; पण त्याचबरोबर सहकारी सोसायट्यांमार्फत साखर कारखानदारांना

कमाल धारणेची मर्यादा मोडण्याचीही मुभा ठेवायची, असे हे खास तंत्र चव्हाणांनी सर्वच बाबतींत राबवले. परिणामी चव्हाणांची लोकप्रियता, महाराष्ट्राचे साखर-उत्पादन आणि जमीन सुधारणेचा समाजवादी कैवार- तिन्ही गोष्टी बिनबोभाट वृद्धिंगत होत राहिल्या. (हॅंजेन, १३४).

१९८५ साली महाराष्ट्र राज्याने आपला रौप्यमहोत्सव साजरा केला; पण आजही या राज्याच्या मुहूर्ताच्या वेळी घोषित केलेली समाजवादी उद्दिष्टे मात्र कागदोपत्रीच राहिलेली दिसतात. याचे कारण राज्यकर्त्यांच्या संदिग्ध विचारसरणीत व दुटप्पी वर्तनात सापडू शकते. आज महाराष्ट्रात भांडवलदारांच्या सोयीनुसार मुंबई, ठाणे व पुणे या तीन जिल्ह्यांतच संघटित उद्योगांचे केंद्रीकरण झाले असून उर्वरित जिल्ह्यांची औद्योगिक वाढ नगण्य व निःसंदर्भ झाली आहे. १९६० सालानंतरच्या महाराष्ट्राची शेतीविषयक वाटचाल अन्य कोणत्याही सरासरी किंवा सरासरीखालच्या राज्यापेक्षा गुणात्मकदृष्ट्या वेगळी झालेली नाही. उलट ऊस वगळता दुसऱ्या कोणत्याही शेतमालाच्या दर हेक्टरी वाढीबाबत महाराष्ट्र इतर राज्यांच्या मागेच आहे. दिवसेंदिवस नगदी पिकांकडे रोख वाढतो आहे. ग्रामीण समाजाच्या प्राथमिक गरजाही भागवल्या जात नाहीत. आर्थिक- सामाजिक विषमता व शोषण कमी होण्याऐवजी वाढले आहे.

यशवंतरावांनी सुरू केलेल्या सहकारी चळवळ व विकेंद्रीकरण या दोहोंचा ग्रामीण जीवनात पुरोगामी परिवर्तन घडवणे हा मूळ हेतू आजही विफलच राहिला आहे. मक्तेदारीला आळा घालून कृषी- औद्योगिक समाजाची पायाभरणी करण्यासाठी अस्तित्वात आलेले साखर कारखाने केवळ त्या त्या भागात 'समृद्धीची बेटे' निर्माण करूनच कृतकृत्य ठरले आहेत. ग्रामीण भागात औद्योगिक जाणीव-जागृती घडून अन्य उद्योगांना चालना मिळण्याचे प्रयोजन सफल झालेले नाही. सहकाराची चळवळ कोरडवाहू शेतकऱ्यांसह सर्व ग्रामीण घटकांना सामावून घेण्याइतपत व्यापक झालेली नाही. ऊसकामगारांची स्थितीही फारशी सुधारू शकलेली नाही. सहकारातून मध्यम व लहान शेतकऱ्यांचे कल्याण झाले आहे, असे यशवंतरावांनी आवर्जून सांगितले असले, तरी महाराष्ट्र कॉंग्रेसने सतत जमीनदार वर्गाचे व मोठ्या शेतकऱ्यांचेच हित सांभाळले, ही वस्तुस्थिती आहे. शेतीवरील आयकराच्या कायद्याची १९६२ पासून झालेली अंमलबजावणी हेच दाखवते. प्रचंड गुंतवणुकीचा लाभ उपटणारे हे सधन शेतकरी आपल्यावरचा करभार मात्र चुकता करीत नाहीत. शेती आयकराची इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातली वसुली लोकलेखा समितीच्या अहवालात (जुलै १९७६) पुढीलप्रमाणे नोंदविलेली आढळते. ती पुरेशी बोलकी आहे.

वर्ष	१९७२-३	१९७१-२	१९७०-१
बिहार	२१	२७	३२
केरळ	३२४	३७४	३५२
तामिळनाडू	२२९	२१५	१८७
महाराष्ट्र	२	३१	५

(आकडे लाखांत)

शहरी मध्यमवर्गीय अभ्यासक व पत्रकार सहकारी संस्थानिकांवर करीत असलेली बव्हंश टीका 'शहरी असूयेतून' होते, असे यशवंतराव म्हणतात. पण सत्तेची मक्तेदारी निर्माण करण्याकडे या सहकारी संस्थांचा कल आहे, हेही ते कबूल करतात. पुढे ते अशा अपेक्षा व्यक्त करतात, की या चळवळीचा उपयोग दारिद्र्याशी लढण्यासाठी व्हावा, रोजगार वाढवण्यासाठी व्हावा. या संस्थांनी श्रीमंत शेतकऱ्यांच्या हातांतली खेळणी बनू नये. त्यांनी श्रीमंतांना अधिक श्रीमंत करू नये. संस्थांच्या विकासाची शास्त्रीय चिकित्सा व्हावी, राजकीय सत्तेचे नवे मक्तेदार जर या चळवळीतून निर्माण व्हायचे नसतील, तर एकापेक्षा अधिक सहकारी संस्थांचे अध्यक्षपद एकाच व्यक्तीकडे राहू नये. कोणाही व्यक्तीला दोनपेक्षा अधिक कार्यकालांसाठी आपल्या पदावर राहता येऊ नये (कुन्हीकृष्णन्, ५७). प्रत्यक्षात हे संकेत पाळले जाणे तर दूरच राहिले; उलट, कायदेशीरपणे ते उडवून लावण्याचेच कार्य त्यांच्या वारसदारांनी केले. नगद पीक-अर्थव्यवस्थेतून काँग्रेस पक्षाला भक्कम पाया जरूर मिळाला, मात्र समाजवादाच्या शक्यतेला त्यातून तिलांजली मिळाली.

केंद्रपातळीवरचा समाजवाद

१९६२ साली यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद सोडून केंद्रीय संरक्षणमंत्री म्हणून गेले. नेहरू या वेळी आपल्या आर्थिक व राजकीय धोरणांचा पुनर्विचार करण्याच्या मनःस्थितीत होते. जिथे उत्पादनाची मुख्य साधने सामाजिक मालकीची असतील, उत्पादनाला क्रमशः चालना मिळेल आणि राष्ट्रीय संपत्तीची न्याय्य विभागणी होईल, अशा समाजवादी समाजरचनेचा आवडी अधिवेशनात १९५५ साली सोडलेला संकल्प केवळ घोषणामात्र ठरला होता. आर्थिक धोरणे, पक्षबांधणी, सदस्यांच्या समाजवादी निष्ठा वगैरे बाबतींत

स्थिती जैथे थे राहिली होती. त्यामुळे पक्षाची लोकप्रियता घटून पक्षात एक बेचैनी व नैराश्य पसरले होते.

१९६४ साली भुवनेश्वर अधिवेशनात पुन्हा नेहरूंनी समाजवादी धोरणांचा पुरस्कार केला. चव्हाणांचा त्यांना पांठिबा होताच. १९७५ पर्यंत लोकांच्या अन्न-वस्त्र-निवारा-औषधपाणी व शिक्षण या पाच मूलभूत गरजा काँग्रेसने पूर्ण कराव्यात, असा ठराव या अधिवेशनात झाली. पण अल्पावधीतच नेहरूंचे निधन झाले. नव्या प्रश्नांमध्ये राज्यकर्ते व्यस्त झाले. समाजवादी कार्यक्रम गुलदस्तातच राहिला.

१९६७ साली सार्वत्रिक निवडणूक अपयशानंतर पुन्हा काँग्रेसला समाजवादाची आठवण झाली. दिल्ली अधिवेशनात एक १० कलमी कार्यक्रम पक्षाने स्वीकारला. बँकांवर सामाजिक नियंत्रण, विम्याचे राष्ट्रीयीकरण, आयात-निर्यात व्यापाराचे क्रमशः सरकारीकरण, मक्तेदारीला व अर्थसत्तेच्या केंद्रीकरणाला आळा, सर्वांच्या प्राथमिक गरजांची परिपूर्ती, शहरी मालमत्ता कमाल धारणा, त्वरित भूसुधारणा, संस्थानिकांचे तनखे व भत्ते रद्द करणे वगैरे कलमे त्यात होती. अखेरच्या कलमाचे कर्तृत्व चव्हाणांकडे असल्याचे सांगितले जाते. यांपैकी प्रचारमूल्ये असलेली काही कलमे औपचारिक पातळीवर राबविली गेली, तरी बाकीची (समाजवादाच्या दृष्टीने मौलिक असलेली) मात्र तशीच राहिली. या कार्यक्रमाने काँग्रेसमधील अंतर्विरोध मात्र तीव्र झाले. १९६९ च्या फरिदाबाद काँग्रेसमध्ये निजलिंगप्पांनी सर्व मौलिक पुरोगामी धोरणे आव्हानित केली. श्रीमती गांधींची पुरोगामी प्रतिमा त्यामुळे उजळ झाली.

चव्हाणांचे संबंध नेहमीप्रमाणे दोन्ही अंतर्विग्रही गटांशी सलोख्याचे होते. स्वतः ते पुरोगामी पक्षाचे होते. तरीही प्रतिगामी पक्षांशी ते संवाद करू शकत असत. बंगलोर अधिवेशनात पंतप्रधानांच्या टिपणात तरुण तुर्कांनी 'राष्ट्रीय आर्थिक कार्यक्रमाची रूपरेषा' मांडली, त्यात पुन्हा समाजवादी कार्यक्रमाचे अधोरेखन केले गेले होते. इंदिरा गांधी त्या वेळी हजर नसल्यामुळे या कार्यक्रमाचे समर्थन- स्पष्टीकरण चव्हाणांनीच केले होते. तरुण तुर्कांशी त्यांची वैचारिक जवळीक या काळात होती. दोन्ही गटांना संमत व्हावा, असा तडजोड-मसुदा चव्हाणांनी तयार करून मांडला, तरी पण मोरारजींनी मोडता घातलाच, चव्हाण या प्रसंगी म्हणाले होते, की-

"निरनिराळ्या वर्गांच्या आपापसांतील संबंधात रचनात्मक बदल होणे समाजवादात गृहीत असते. आणि ज्याअर्थी असे बदल भारतात आजपर्यंत झालेले नाहीत, त्याअर्थी नव्या प्रयत्नांची अजून गरज आहे. पंतप्रधानांच्या टिपणात देशातील आर्थिक परिस्थितीचे प्रामाणिक मूल्यांकन असून राष्ट्राच्या अस्वस्थ मनःस्थितीचे यथार्थ प्रतिबिंब उमटले आहे."

इतिहासाने स्वीकारलेली ही दिशा असून काँग्रेस पक्षाला आता मागे पाय घेता येणार नाही. (कुन्हीकृष्णन्, ३०७).

पक्षांतर्गत फुटीत चव्हाणांनी श्रीमती गांधींची बाजू अशी पुरोगामी असण्याच्या कारणावरून उचलून धरली असली, तरी हे कथित पुरोगामित्व हा श्रीमती गांधींच्या राजकारणाचा भाग आहे. व्यक्तिगत नेतृत्व- स्पर्धेत प्रतिपक्षाला शह देण्यासाठी टाकलेला तो डाव आहे, याची बहुधा यशवंतरावांना जाणीव नसावी. कायद्यांच्या द्वारे समाजवादाची रुजवात करता येईल, हा त्यांचा भाबडा आशावादच बहुधा प्रबळ ठरला असावा, असे दिसते. पुरोगामी कायदे करूनही प्रत्यक्षात काहीही मूलभूत परिवर्तन घडत नाही, हा अनुभव स्वीकारायलाच त्यांचे मन तयार नसावे.

राष्ट्रपतींच्या निवडणुकीचे निमित्त घडून पक्षात फूट पडली. 'सरकारच्या पुरोगामी कार्यक्रमांना वृद्ध नेते खीळ घालतात,' अशी हाकाटी करून श्रीमती गांधी बंडाचे निशाण घेऊन उभ्या राहिल्या. राष्ट्रपतिपदाच्या काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध मतदान करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. पक्षशिस्तीला प्रमाण मानणाऱ्या चव्हाणांना हे पटले नाही. त्यांनी महाराष्ट्रातल्या आपल्या अनुयायांसह पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला मत दिले. पण पक्षाचा उमेदवार पराभूत होऊन श्रीमती गांधीपुरस्कृत उमेदवार स्पर्धेत यशस्वी झाला. पुरोगामी प्रतिमेमुळे एरव्ही चव्हाणांना श्रीमती गांधी जवळच्या होत्याच आणि सिंडिकेटशी त्यांची कोणत्याच अर्थाने जवळीक नव्हती. मात्र पक्ष फुटू नये, यासाठी त्यांनी केलेली धडपड आणि पक्षशिस्तीखातर अधिकृत उमेदवाराचा घेतलेला कैवार या दोन गोष्टींमुळे चव्हाणांची 'कुंपणावरचे' ही प्रतिमा लोकांच्या नजरेत भरली. नंतर श्रीमती गांधींनी त्यांना वेळोवेळी आपल्या राजकारणासाठी वापरले असले, तरी पूर्ण विश्वसनीय कधीच मानले नाही.

तरुण तुर्कांप्रमाणेच काँग्रेस फोरम फॉर सोशालिस्ट ॲक्शनशीही चव्हाण जवळून संबंधित होते. ऑक्टोबर १९७० मध्ये फोरमच्या चवथ्या अधिवेशनाचे उद्घाटन करताना ते म्हणाले होते,

"हे सत्य आपल्याला स्वीकारले पाहिजे, की आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण वाढले आहे. पैशाची उधळमाधळ मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. मूठभर लोक डामडौलाने जगत असून पंचवार्षिक योजनांमधून मागासवर्गीयांच्या व परंपरेने दारिद्र्यात असणाऱ्यांच्या परिस्थितीत कवडीमात्रही सुधारणा झालेली नाही. १९७० नंतरच्या दशकाची आर्थिक व्यूहरचना अशी हवी, की त्यातील उत्पन्न व मालमत्ताविषयक समुचित धोरणाचा संदर्भ समग्र परिवर्तनाच्या प्रक्रियेतून जात असलेल्या समाजाच्या सामाजिक-आर्थिक रेट्यांशी जोडलेला असावा."

चव्हाणांची ही अपेक्षा कधीच पूर्ण होणे शक्य नव्हते. सत्तारूढ पक्षाचे ते ईप्सितच नव्हते. 'गरिबी हटाव'च्या घोषणेवर प्रचंड बहुमताने निवडणूक जिंकून आलेल्या श्रीमती गांधींच्या सरकारात वित्तमंत्री वगैरे पदांवर चव्हाण राहिले; पण समाजवादाच्या दिशेने काहीही घडवू शकले नाहीत. आणीबाणीनंतर श्रीमती गांधींनी पुन्हा पक्ष फोडला, त्या वेळी रेड्डी काँग्रेसमध्ये ते राहिले, कालांतराने पुन्हा लाचारी पत्करून स्वगृही आले. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष झाले. काही वर्षांनी निधन पावले. त्यांच्या या प्रदीर्घ संसदीय कार्यकालाचे समाजवादाच्या निकषावर मूल्यमापन केल्यास काहीही हाती लागत नाही.

आपला पक्ष प्रशिक्षित काडरवर आधारित असावा, परिवर्तनाचे साधन अशा स्वरूपात त्याची संघटनात्मक रचना व्हावी, कागदोपत्री आखलेल्या कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यांपैकी काहीही करणे यशवंतरावांच्या ताकदीबाहेरचे होते. समाजवादाला मारक असलेल्या शक्तींपुढे खुद्द नेहरूही जिथे हतबल ठरले, तिथे चव्हाण काय करणार? त्यांची चूक फक्त एवढीच, की कायदे, प्रशासकीय उपाययोजना यांतून समाजवाद अवतरू शकेल, असा विश्वास त्यांनी बाळगला. ध्येयवादाच्या पूर्तीसाठी धोके पत्करण्याची तयारी त्यांनी दाखविली नाही. ती दाखविली असती, तर मोहन धारियांनी म्हटल्याप्रमाणे ते अखिल भारतीय कीर्तीचे महान नेते, कदाचित पंतप्रधानही झाले असते. "मुखबद्ध राजबंद्याप्रमाणे अवमानित अवस्थेत मंत्री राहण्याचा दुर्धर प्रसंग त्यांच्यावर ओढवला नसता" ('सफर', ११३). पण आपले आसन सुरक्षित ठेवण्याच्या नादात ते मावळत्या सूर्याची शपथ विसरले, आणि कापलेल्या दोराचा जनतेला व काँग्रेस कार्यकर्त्यांना त्यांनी दिलेला इशारा सत्तेच्या सूर्याने वितळवून टाकला. (कित्ता, ११२).

वैचारिक भूमिका

यशवंतरावांच्या या अपयशाचे कारण त्यांच्या वैचारिक संदिग्धतेतच शोधावे लागते. त्यांनी शास्त्रीय सिद्धांताच्या स्वरूपात समाजवाद कधीच स्वीकारला नव्हता. ते राजकारणात 'मध्यबिंदूच्या डाव्या बाजूकडे' झुकलेले होते. समाजवादाच्या संभाव्य परिणामांचे त्यांना आकर्षण होते; पण समाजवादाची काटेकोर मांडणी करून त्या विचासरणीच्या आधारावर आपली प्रत्येक कृती व निर्णय तपासून पाहण्याची मात्र त्यांची तयारी नव्हती. आपला समाजवाद पाश्चात्यांच्या समाजवादापेक्षा निराळा आहे, मार्क्सवादाला तो अचूक व त्रिकाला-बाधित मानीत नाही. हिंदुस्थानातला समाजवाद इथल्या अनुभवावरच अधिष्ठित असावा लागेल, मार्क्सप्रणीत तराजूवर तो मोजून भागणार नाही, माझा समाजवाद व्यावहारिक व फलितदर्शी आहे, तो महावाक्यांपेक्षा प्रत्यक्ष वैधानिक व प्रशासकीय उपायांच्या रूपाने

व्यक्त होत असतो. शब्दांपेक्षा कृतीवर त्याची भिस्त असते, वगैरे शब्दांत त्यांनी समाजवादाचे सिद्धांत उडवून लावले होते.

पण त्याचबरोबर जो वेगळा समाजवाद असेल, त्याचे नेमके स्वरूप कसे असेल आणि कोणत्या मार्गाने तो आणता येईल, याची मांडणी मात्र त्यांनी कुठेही केलेली नव्हती. आपण सांगितलेली समाजवादाची गमके मोघम असल्याचे त्यांना मान्य होते. पण त्या संदर्भात "ही गोष्टच अशी आहे, की ती शब्दांत उभी करण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी ती अस्पष्टच राहते" ('सह्याद्रीचे वारे', २४१), असे म्हणून ते मोकळे होतात. आणि त्याच वेळी 'निश्चित अशा समाजवादाकडे जाण्याची आमची इच्छा आहे', असेही म्हणतात. 'खाजगी नफ्याच्या जागी सामाजिक नफ्याचा पाया अधिक घट्ट करणे', त्यासाठी एकतर आर्थिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न करणे आणि दुसरे म्हणजे सर्वांना समान संधी मिळेल, अशी परिस्थिती निर्माण करणे व व्यक्तित्वविकासाला वाव देणे एवढाच स्थूल अर्थ ते समाजवादाचा सांगतात (कित्ता, २३९). सर्वांना समान संधी असावी, उत्पादनामागची प्रेरणा वैयक्तिक नफेबाजीपेक्षा समाजाच्या सुखाची व हिताची असावी, लोकांच्या गरजा व विकासाच्या शक्याशक्यता विचारात घेऊन मालमत्तेची विभागणी व्हावी अशा समाजवादाच्या तीन कसोट्यांही त्यांनी दुसऱ्या एका भाषणात नोंदवल्या होत्या ('युगांतर', २२८).

समाजवाद हे एक सामाजिक-आर्थिक तत्त्वज्ञान असून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे दोष दूर सारण्यासाठी ते अस्तित्वात आले आहे, असं सांगून 'व्यक्तीचे हितसंबंध सामाजिक कल्याणापेक्षा दुय्यम ठरवणे, आर्थिक विकासापेक्षा मानवी मूल्ये, मानवी प्रतिष्ठा व कल्याण यांना प्राधान्य देणे, विकासाचे अर्थकारण व सामाजिक न्यायाचे अर्थकारण यांचा समन्वय केला जाणे, आणि मुख्य म्हणजे आधुनिक, विवेकपूर्ण, समताधिष्ठित आणि मानवी स्वरूपाची समाजव्यवस्था उभी करणे' हा समाजवादाचा स्थूल अर्थ त्यांनी एका लेखात नमूद केला आहे. ('विण्डस् ऑफ चेंज', १५६). ही समाजव्यवस्था पुरोगामी व भविष्यलक्ष्यी असणे; धर्म-जात-पंथ वगैरे आधारांनी उभ्या असलेल्या तटबंद्यांना तीत स्थान नसणे, इत्यादी गोष्टीही त्यांना अभिप्रेत होत्या. मात्र हे अमूकच मार्गाने होईल, असे सांगता येणार नाही. कारण इतिहास हा काही आंधळा पीर नाही. प्रत्येक देशाला समाजवादाची स्वतःची व्याख्या करावी लागते. इथेही ती प्रत्यक्ष अनुभवातून केली जाईल, असे त्यांचे प्रतिपादन होते. आपण समाजवादाची फक्त भाषा करतो; पण त्या दिशेने ठोस वाटचाल मात्र करीत नाही, ही खंत त्यांनी आयुष्याच्या अखेरीपावेतो अनेकदा व्यक्त केली होती.

समाजवादाचे समीकरण साम्यवादी देशांमधील लोकशाहीच्या संकोचाशी घालून आमचा समाजवाद लोकशाही मूल्यांची बूज राखील, असेही एक ठोक विधान चव्हाणांच्या भाषणांत वारंवार आले आहे. १९६० च्या महाबळेश्वर शिबिरापासून नंतरच्या अनेक प्रासंगिक भाषणांमधून समाजवादासंबंधी विवेचन त्यांनी केले असले, तरी उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टांत व अन्य भाषिक अलंकरणे यामुळे त्यांच्या मांडणीचे स्वरूप कमालीचे शब्दाळ, भोंगळ व पसरट होत असे. उदाहरणार्थ, समाजवाद ही नुसती चर्चा करण्याची कल्पना उरली नसून, ती आता प्रत्यक्षात आणता यावी, लोकांना उपलब्ध करून देता यावी, ती तरुणांनी जगावी व संपादावी, अशी बाब झाली आहे.... थोडक्यात, समाजवाद हा जीवनमार्ग आहे. (उद्धृत 'चव्हाण अभिनंदन ग्रंथ', ६७), तत्त्वज्ञानावर जास्त विसंबून न राहता व्यावहारिकदृष्ट्या जी गोष्ट योग्य दिसते, तीच करायची. आकाशात भराऱ्या नकोत, जमिनीवर चालायचे आहे. ('सह्याद्रीचे वारे', १०९), समाजवादी मूल्यांवर माझा विश्वास आहे, म्हणून मला आश्वासन द्यावयास हरकत वाटत नाही, की या योजनेच्या विकासाची जी गती आहे, ती पर्यायाने आपल्याला समाजवादाकडे घेऊन जाणारी आहे (कित्ता, १०७), आम्ही ग्रंथनिष्ठ नाही, मार्क्स आम्ही संपूर्ण सत्य समजत नाही (कित्ता, २३८). समाजवादाचे आपले तरुणपणीचे रोमँटिक विचार परिस्थितीवशात व मंत्रिपदांच्या प्रत्यक्ष अनुभवांमुळे अधिक वस्तुनिष्ठ झाल्याचेही त्यांनी वारंवार सांगितले आहे. समाजवाद न म्हणता समाजवादी समाजरचना असा शब्दप्रयोग करण्याचे स्पष्टीकरणही त्यांनी देशकालपरिस्थिती-विशिष्टत्वाशी जोडून दिले आहे.

समारोप

"आपण समाजवादी आहात काय?" या पत्रकारांच्या प्रश्नाला यशवंतरावांनी ठाम होकारार्थी उत्तर देऊन "पण माझा समाजवाद निराळा आहे", हेही आवर्जून सांगितले आहे. त्यांचा समाजवाद रॉय, मार्क्स, गांधी, लेनिन, समाजवादी पक्ष, शेतकरी कामगार पक्ष वगैरेंपेक्षा निराळा होता हे समजू शकते; पण त्याचे त्यांनी सांगितलेले कारण मात्र पटू शकत नाही आणि त्यांच्या समाजवादाचा आशयही नीट हाती लागत नाही. नव-समाजरचना अस्तित्वात आणण्याची आकांक्षा आपल्याला पाठ्यपुस्तकांतून मिळालेली नाही. समाजवादावरचा आपला विश्वास आपण ज्यांच्यात जन्मलो, वाढलो, त्या कोट्यवधी देशबांधवांच्या दैन्य-दारिद्र्यातून प्रादुर्भूत झाला आहे. कारण समाजवादाच त्यांना त्यातून मुक्त करणार आहे (कुन्हीकृष्णन् ९) असे त्यांनी एका संदर्भात म्हटले आहे. समाजवादाकडे त्यांचा असलेला स्वाभाविक कल त्यांच्या संस्कारक्षम वयात भोवताली

असलेल्या परिस्थितीमुळे झाला होता. हे यावरून समजू शकते. पण समाजवादी विचारसरणी आत्मसात करून आचरणात आणण्याच्या दृष्टीने हा 'स्वाभाविक कल' पुरेसा ठरू शकत नाही हेही लक्षात घेणे आवश्यक आहे. यशवंतरावांनी त्या स्वाभाविक कलाला वैचारिक परिबद्धतेची जोड दिली नाही, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील वैगुण्य म्हणावे लागेल.

रॉय यांचे संस्कार त्यांनी वरवर व प्रसंगापुरतेच स्वीकारले. अधिक खोलवर त्यांनी त्यांचा अंगीकार केला नाही, हे त्यांच्याच निवेदनांवरून स्पष्ट होते. रॉय यांच्याकडून आपल्याला आर्थिक न्यायाची निकड पटली असली, तरी केवळ खाजगी मालमत्तेच्या निराकरणातून सामाजिक न्याय साध्य होऊ शकेल, असे कधीच वाटले नाही, हे चव्हाणांचे म्हणणे समजू शकते. खाजगी मालमत्ता नष्ट झालेल्या देशात छळ व दमन झाले, हेही मान्य करायला हरकत नाही. प्रश्न एवढाच पडतो, की नेहरूंनी ज्या लोकशाही समाजवादाचे प्रतिपादन केले होते, त्याच्याशी तरी बांधिलकी सत्तारूढ पक्षाने ठेवली होती काय? आणि ती ठेवलेली नाही, हे चव्हाणांनीच दिलेल्या कबुलायतींवरून जर स्पष्ट होते, तर अशा पक्षाला चिकटून राहण्यातून आपल्या दुःखदैन्यग्रस्त ग्रामीण देशबांधवांसाठी चव्हाणांनी काय मिळवले?

समाजवादाची व्याख्या करण्याचा ज्या ज्या वेळी यशवंतरावांनी प्रयत्न केला, त्या वेळी लोककल्याणकारी राज्याच्याच कल्पनेपर्यंत त्यांची मजल गेलेली दिसून येते. राज्य शासनाने केलेल्या कायद्यांमधून दिलेल्या सोयी-सवलती-संरक्षणे वगैरे लाभांमधून शोषितांना दिलासा मिळणे एवढेच कल्याणकारी उपायांचे प्रयोजन असते. क्रांतिकारक समाजवादी परिवर्तनाच्या शक्यता अशा उपायांनी स्थगित होत असतात, हे चव्हाणांनी लक्षातच घेतले नव्हते, सत्तास्थानांपासून दूर राहूनही समाजवादी शक्ती बळकट केल्या जाऊ शकतात, हा पर्याय त्यांच्या राजकारणी मनाने कधी स्वीकारलाच नाही. डाव्या-उजव्यांच्या तत्त्वशून्य तडजोडीचेच राजकारण ते जन्मभर करीत राहिले. महाराष्ट्रात त्यांच्या पुरोगामी कायद्यांमधून व विकास-योजनांमधून सधन शेतकरी व शहरी भांडवलदारांची युती होऊन समाजवादाच्या शक्यता संपल्या, तर राष्ट्रीय पातळीवर नेहरूंच्या हयातीतील फक्त संकल्पनात्मक, तर इंदिरा गांधींच्या हयातीतील फक्त प्रचारमूल्यात्मक पातळीवर समाजवाद गाजत राहिला आणि यशवंतराव हे त्याचे मूक साक्षीदार व निमूट हस्तक ठरले.

नेहरूंची समाजवादाबद्दलची आस्था प्रामाणिक आणि आयुष्यभराची होती. परिस्थितीवशात त्यांना त्यांचा समाजवाद पातळ करावा लागला असला, तरी त्याबद्दल आंतरिक हळहळ त्यांना वाटत असे. श्रीमती गांधींबद्दल असे म्हणता येणार नाही. क्रांतिकारक घोषणांचा व उपायांचा प्रचारार्थ जाणिवपूर्वक उपयोग करून घेणेच फक्त

त्यांना अभिप्रेत होते. बंगलोर अधिवेशनात श्रीमती गांधींच्या नावे जो आर्थिक कार्यक्रम मांडला गेला व ज्याचे ठरावरूपातील पौरोहित्य यशवंतरावांनाच पार पाडावे लागले, हे इंदिराजींनीच पुढे म्हटल्याप्रमाणे आदल्या दिवशी 'सहज स्फुरलेले विचार (रॅण्डम थॉटस्)' फक्त होते. पुढे आणीबाणीत त्यांनी दिलेल्या वीस कलमी कार्यक्रमाचेही स्वरूप असेच होते. पण दरवेळी यशवंतराव आपल्या परीने या नवनव्या समाजवादी धोरणांचे प्रवक्तेपण करीत राहिले. प्रचारात्मक पातळीवर समाजवादी असणाऱ्या घोषवाक्यांचा उद्‌घोष करीत राहिले.

"समाजवादी समाजव्यवस्थेच्या उभारणीसाठी जो लढा द्यावयाचा, त्याची ऐतिहासिक संधी सत्तरनंतरच्या दशकात चालून आली आहे, हे दशक आपल्याकडून आपल्या ध्येयांवर अविचल निष्ठा ठेवण्याची, धारिष्ट्याची व सर्व अडथळे पार करण्यासाठी लागणाऱ्या निग्रहाची मागणी करीत आहे. पण लढ्यातून काय निष्पन्न होणार, हे या महान व पुरातन देशाच्या भवितव्यासाठी निर्णायक महत्त्वाचे आहे" ('विण्डस् ऑफ चेंज', १६१) अशी आवाहने करीत राहिले.

यशवंतरावांच्या इंदिरा गांधींना मिळालेल्या या पाठिंब्यामध्ये प्रामाणिक गफलतींचा भाग किती आणि निरुपायास्तव केलेल्या आत्मवंचनेचा किती, हे आता सांगणे अवघड आहे. परंतु समाजवादाच्या त्यांनी सांगितलेल्या स्थूल कल्पनेशीही श्रीमती गांधींचे व्यक्तिगत व सार्वजनिक आचरण व धोरण जुळत नाही, हे यशवंतरावांना इतक्या जवळूनही दिसत नसावे, यावर विश्वास ठेवणेही तितकेच अवघड आहे.

●●●

५. साहित्यिक यशवंतराव

"…. पण त्यांचे मूल्यमापन मात्र त्यांच्या राजकीय जीवनाच्या अनुषंगाने झाले आहे, त्यामुळेच त्यांच्यावर काहीसा अन्याय झाला आहे. राजकारणातील आवेश, अभिनिवेश, पूर्वग्रह, त्या त्या काळचे वातावरण या सर्वांमुळे राजकीय व्यक्तींचे मूल्यमापन वस्तुनिष्ठ व साक्षेपी नसते. पूर्वग्रहांच्या दाट छायेने राजकीय महापुरुषांचे अनेक सद्‌गुण झाकले जातात, किंवा त्यांचे धूसर दर्शन होते. अनेकदा राजकीय पुरुष त्यांच्या कमी महत्त्वाच्या गुणांनी प्रसिद्धी पावतात. म्हणून राजकीय मापाने अशा अष्टपैलू व्यक्तींचे मूल्यमापन करणे तर्कदुष्ट व अशास्त्रीय आहे." (ऋणानुबंध २३५-६).

वरील विधान यशवंतराव चव्हाणांनी तात्यासाहेब केळकरांच्या संदर्भात केळकर-जन्मशताब्दी समारंभातील भाषणात केले होते. केळकरांच्या ठिकाणी 'अष्टपैलू व्यक्तिमत्व, व्यापक बुद्धी व अनेकांगी कर्तुकी' असल्याचे सांगून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विचार राजकीय पूर्वग्रह, मतभेद वा वैचारिक कलह बाजूस सारून केला जायला पाहिजे, असे प्रतिपादन यशवंतरावांनी केले होते.

प्रस्तुत लेखारंभी हे अवतरण उद्‌धृत करण्याचे कारण असे, की खुद्द यशवंतरावांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे मूल्यांकन करतानाही अभ्यासकांनी त्या अवतरणातील पथ्य पाळणे अगत्याचे ठरते. वाङ्‌मयीन संस्कारांचे पाथेय जन्मभर कृतज्ञतापूर्वक मिरवणारे, उत्कटतेने अनुभव घेऊन तितक्याच प्रत्ययकारी शैलीत ते शब्दबद्ध करणारे, भाषेवर मनापासून प्रेम करणारे आणि साहित्याविषयी चोखंदळ जाणकारी बाळगणारे यशवंतराव राजकीय पूर्वग्रहांमुळे वा मतभेदांमुळे दुर्लक्षिले जाता कामा नयेत. एक राजकारणी मुत्सद्दी, संसदपटू, कार्यक्षम

मंत्री व पक्षनेता हा त्यांचा 'राजकीय' लौकिक जगभर झालेला आहे. मराठी माणसाला त्याचा अभिमानही आहे. पण अन्य राजकारण- धुरंधरांपेक्षा यशवंतरावांचे वेगळेपण हे, की त्यांचा आपल्या मायबोलीवर खूप जीव होता. ते स्वतः एक सर्जनशील कलावंत व उत्तम समीक्षक होते.

'साहित्याच्या क्षेत्रात माझी भूमिका नम्र रसिक वाचकाची आहे', हे त्यांनी आवर्जून वारंवार सांगितले असले, तरी तेवढ्यापुरती ती मुळीच सीमित नव्हती. त्यांचा मूळ पिंडच प्रतिभावंताचा होता. राजकारणाच्या धकाधकीत यशवंतराव शिरले नसते, तर कदाचित साहित्याच्या इतिहासात अजरामर ठराव्यात, अशा साहित्यकृती ते निर्माण करू शकले असते, असे त्यांच्या प्रकाशित लेखनावरून व भाषणांवरून वाटते.

ग्रामीण भागातल्या शेतकरी कुटुंबाचे घर तसे वाङ्मयीन संस्कारांच्या दृष्टीने एकूण प्रतिकूलच असते. पण यशवंतरावांनी आपल्या सूक्ष्म संवेदनशीलतेच्या बळावर या प्रतिकूलतेवर मात केली. प्रतिभेचे देणे त्यांना आईकडून उपजतच मिळाले होते. दळताना आईने म्हटलेल्या स्वरचित ओव्यांनी पहिला वाङ्मयीन संस्कार त्यांच्यावर केला होता. रामायण-महाभारताचे कथासार असणाऱ्या शेपाचशे ओव्या त्यांच्या आईने रचल्या होत्या. आईबरोबर ऐकलेली कथाकीर्तने, प्रवचने, पौराणिक आख्याने, इत्यादींतून त्यांचे भाषाभान सतर्क झाले होते. कृष्णाकोयनेच्या प्रीतिसंगमाकाठचा सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असलेला परिसर त्यांच्यातल्या सर्जनशील ऊर्मींना खतपाणी घालणारा ठरला. त्या परिसराने त्यांच्या मनात निसर्ग-सौंदर्याची ओढ रुजवली.

आपले 'ऋणानुबंध' हे पुस्तक यशवंतरावांनी कृष्णा-कोयनेच्या काठावर नांदणाऱ्या 'कऱ्हाड'ला समर्पित केले आहे, ते या परिसराविषयीच्या कृतज्ञता-भावनेतूनच. कृष्णा-कोयनेच्या 'या पाण्याने काही छंद लावले व काही श्रद्धा दिल्या', हे त्यांनी अर्पणपत्रिकेत नमूद केले आहे. देवराष्ट्र हे यशवंतरावांचे आजोळ, त्याच्या शेजारील सागरोबाचे शिवार. या संपूर्ण परिसराने यशवंतरावांना इतका लळा लावला होता, की एखाद्या सुखस्वप्नासारखे त्यांनी आपले तिथले बालपण मर्मबंधातल्या ठेवीप्रमाणे जन्मभर जपले होते. सोनहिरा ओढ्याच्या काठावर घनगर्द आंबराईत कोकिळेच्या कुहूकुहू स्वरात स्वर मिसळून यशवंतरावांनी अर्धेअधिक मेघदूत मुखोद्गत केले होते. डोंगरांवर एकट्याने चढावे-उतरावे, संगमात डुंबावे, कृष्णा-कोयनेचे एकात्म होऊन वाहणारे पाणी पाहत काठावर तासन्तास चिंतन करावे, हा त्यांचा बालवयातला मुक्त जीवनक्रमच त्यांच्यांतल्या साहित्यिकाच्या निकोप जडणघडणीस कारणीभूत झाला होता.

फडके-खांडेकरांच्या युगात यशवंतरावांची पिढी वाढली होती. विशेषतः, खांडेकरांच्या

लेखनाचा आपल्या विचारांवर व भावनांवर खोल ठसा उमटला होता, हे यशवंतरावांनी नमूद केले आहे. तुरुंगात पुढे आचार्य भागवतांनी सावरकरांच्या 'कमला'चे जाहीर वाचन केले, तेव्हा आपणही दीर्घकाव्य लिहावे, असे वाटून यशवंतरावांनी राष्ट्रीय चळवळीत स्वतःला झोकून देण्याची तीव्र इच्छा असलेल्या ग्रामीण युवकाचे मनोविश्व चितारणारे दीर्घकाव्य लिहायला प्रारंभ केला होता. त्यांच्या काही कथा 'लोकक्रांती' नामक नियतकालिकात प्रकाशित झाल्या होत्या. एक कादंबरीही त्यांनी मनाशी आखून ठेवली होती...

चौफेर अखंड वाचन

ललित लेखक होण्याचे आपले स्वप्न यशवंतरावांना आपल्या सामाजिक-राजकीय जीवनाच्या धावपळीत बाजूला ठेवून द्यावे लागले असले, तरी मनात खोलवर रुजलेला वाङ्मयीन संस्कार मात्र कधीच मिटला नाही. उभ्या हयातीत ते जे जे बोलले वा त्यांनी जे काही पांढऱ्यावर काळे केले, त्यातून हा संस्कार प्रगट होत राहिला, मुख्य म्हणजे कोणताही अनुभव तादात्म्य पावून घेण्याची जी क्षमता या संस्कारातून त्यांच्या अंगी आली, ती तर त्यांच्या शब्दाशब्दांतून आविष्कृत झाली आहे. राजकारणात हयात घालवली, तरी त्यांचे व्यक्तिमत्त्व कधीच एकारले नाही, याचे श्रेयही या संस्कारालाच द्यावे लागते. राजकारण हे आपले संपूर्ण जीवन आहे, असे त्यांनी कधीच मानले नाही. कला, साहित्य, संगीत, खेळ, नाट्य या सर्व क्षेत्रांत त्यांनी रस घेतला. जीवनाच्या सर्व दालनांच्या सतत संपर्क-साहचर्यातून आपल्या व्यक्तिमत्त्वाची चैतन्यभूक ते भागवीत राहिले.

वाचक ही आपली साहित्यक्षेत्रातली प्राथमिक भूमिका तर यशवंतरावांनी अत्यंत निष्ठेने व चोखपणे पार पाडलेली आढळते. त्यांच्या वाचनासंबंधीचे त्यांच्या लेखन-भाषणांतून आलेले संदर्भ नुसते जरी एकत्र केले; तरी त्यांच्या जिज्ञासेच्या कथा किती विशाल होत्या, याचा प्रत्यय मिळतो. उल्लेख न झालेल्या पुस्तकांची संख्या तर कित्येक पटींनी मोठी असावी. मनाची केव्हाही विश्रब्ध अवस्था झाली, की पुस्तक काढून वाचीत बसणे, प्रवासात नवनवीन पुस्तके नजरेखालून घालणे हा यशवंतरावांचा- आपल्याकडच्या राजकारण्यांमध्ये अतिदुर्लभ असलेला- छंद होता. वैचारिक लेखनाबरोबरच कथा, कविता, कादंबरी वगैरे साहित्य-प्रकारही ते साक्षेपाने वाचीत असत. 'आपल्याला आवडलेले पहिले पुस्तक पहिल्यांदा कसे आणि केव्हा वाचले, याची आठवण मनात ताजी असते. हे पुस्तक आपल्या हातात घेऊन कसे कुरवाळले... नव्या कोऱ्या पुस्तकाला येणारा सुरेखसा वास कसा येत होता-' ही खास ग्रंथप्रेमी माणसालाच पटणारी खूणगाठ सांगून आपण खांडेकरांची 'दोन ध्रुव' कोल्हापुरातल्या भुसारी वाड्यातील खोलीत एका पावसाळी दुपारी वाचली, ही

आठवण यशवंतराव कित्येक वर्षांनंतर आळवून सांगतात (कित्ता, २४८). खांडेकरांच्या लेखन-वैशिष्ट्यांचा परिचय देताना त्यांच्या कादंबऱ्यांमधील पात्रे, प्रसंग व संवादांचा हवाला आपल्या उत्स्फूर्त भाषणातून ते देतात, तेव्हा त्यांच्या सूक्ष्म आस्वादक वाचकत्वाचीच साक्ष मिळते. त्यांच्या भाषणांत महानुभाव, मराठी संत, अव्वल दर्जाचे आंग्ल नाटककार-कवी, आधुनिक मराठी नाटककार-कवी, अन्य क्षेत्रांतील कलावंत- एवढेच नव्हे, लोकजीवनाशी एकरूप झालेले गोंधळी-वासुदेव प्रभृती लोककलावंत, इत्यादिकांचे नाना प्रकारचे संदर्भ आलेले आढळतात. त्यावरून त्यांच्या चौफेर व चतुरस्र ग्रहणशक्तीची साक्ष पटते. स्वतः ते साहित्याच्या सामाजिक बांधिलकीचे पुरस्कर्ते असल्यामुळे तसे साहित्य त्यांना विशेष आवडत असले, तरी रोमँटिक साहित्याचेही त्यांना वावडे नव्हते. नारायण सुर्वे आणि ना. धों. महानोर या दोघांचीही कविता ते सारख्याच चवीने वाचीत.

आस्वादक समीक्षा-लेखन

आयुष्यभर अखंड केलेल्या या चौफेर वाचनामुळेच वाचलेल्या ग्रंथांची आस्वादक समीक्षा करण्याची कुवत यशवंतरावांना लाभली होती. सहज म्हणून त्यांनी जी विधाने विविध साहित्यकृतींबद्दल केली आहेत, ती त्यांच्या विलक्षण बुद्धीचा प्रत्यय देतात. सहज एक रसिक या नात्याने ते विधान करीत असले, तरी प्रत्येक 'साहित्यप्रेमी हा आजच्या लोकशाही युगात एक नम्र समीक्षक असतोच', याची चव्हाणांना ठाम जाणीव दिसते (कित्ता, २०६). त्यामुळेच यशवंतरावांचा साहित्यिक म्हणून विचार करताना त्यांनी केलेल्या समीक्षेचा आवर्जून उल्लेख करणे अगत्याचे ठरते.

आत्मचरित्रांविषयी लिहिताना अलीकडच्या आत्मचरित्रांची वैशिष्ट्ये लेखकांच्या क्षेत्रानुसार आत्मचरित्रात पडणारा फरक जसा यशवंतराव नोंदवतात, तद्वतच 'आत्मचरित्रे वाचताना वाचकांनी नैतिक न्यायाधीशाची भूमिका न घेणे बरे', किंवा लेखकाच्या खाजगी जीवनाविषयी अकारण जिज्ञासाही बाळगू नये, असा वाचकांनाही ते सल्ला देतात (कित्ता, २१९). अलीकडच्या आत्मचरित्रांचे लेख त्यांच्या मते स्वतःचे बाल्य व तारुण्य या भूतकाळाबद्दल बरेच पारदर्शक लेखक करतात, मात्र त्यांचे हे लेखन अलीकडच्या चालू काळाबाबत मात्र अतिशय सावध असते. दलित आत्मचरित्रांचे उत्तरार्ध जर कुणी अभ्यासकाने स्वतंत्रपणे अभ्यासले, तर यशवंतरावांच्या विधानातले मर्म त्यांच्या लक्षात येऊ शकेल. यशवंतरावांच्या मते, आयुष्यात घडलेल्या घटनांचे सूक्ष्म विश्लेषण करता येणे ज्यांना स्वयंविश्लेषणाची व आविष्काराची सवय आहे, अशा कलावंतालाच शक्य होते, 'म्हणूनच कलाकारांची आत्मचरित्रे अधिक अंतर्मुख, तर सामाजिक-राजकीय क्षेत्रांतील कार्यकर्त्यांची

आत्मचरित्रे सामान्यतः अधिक बहिर्मुख असतात', असा अनुभव यशवंतराव नमूद करतात. कार्यकर्त्यांच्या आत्मचरित्रात विपुल माहिती मिळते, तर कलावंतांची आत्मचरित्रे चटका लावून जातात (उदा., 'सांगत्ये ऐका'). आत्मचरित्रातून सत्य लपवले जाते, आत्मगौरव आणि आत्मसमर्पण घडते, याचा ठपका केवळ लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर न ठेवता समाजजीवनातील त्रुटींमध्ये यशवंतराव त्यांचे मूळ शोधतात, ते म्हणतात, "आपले सामाजिक जीवनातील दुहेरीपण (दुटप्पीपणा) बऱ्याच प्रमाणात (यासाठी) जबाबदार असावे" (कित्ता, २२०), आदर्श व तत्त्वे एक आणि व्यवहार निराळाच, शिवाय सामाजिक दांभिकता यांचा हा अपरिहार्य परिणाम आहे, असे त्यांना वाटते, म्हणून ते आत्मचरित्रांचे मोठेपण ती संपूर्ण सत्य सांगतात, की नाही, या कसोटीवर ठरवीत नाहीत, कारण संपूर्ण सत्य त्यांच्या मते आकाशपुष्पासारखेच असते. राजकीय-सामाजिक कार्यक्षेत्रांतील-किंबहुना सार्वजनिक जीवनात भाग घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने तटस्थपणे व अभिनिवेशरहित आत्मचरित्र लिहायलाच पाहिजे, असे यशवंतरावांचे म्हणणे होते. त्यांच्या मते, एका परीने अशा व्यक्तीने आत्मचरित्र लिहिणे हे तिचे कर्तव्यच ठरते, कारण अशा आत्मचरित्रावाचून ऐतिहासिक महत्त्वाच्या घटनांचे धागेदोरे उलगडणे अशक्यप्राय ठरते. आपल्याकडे वस्तुनिष्ठ विश्लेषणात्मक इतिहासलेखन न होण्याचे एक कारण अशा सामग्रीचा अभाव हे आहे.

नाटकांचेही आकर्षण लहानपणापासून यशवंतरावांना असल्याचे दिसते. कराडला नाटकांचे उत्साही वातावरण होते. गणेशोत्सवातली पौराणिक-ऐतिहासिक नाटके सतत तीन-चार वर्षे पाहिल्यामुळे 'नाटकातले बरे-वाईट मला हळूहळू समजायला लागले', अशी नोंद यशवंतरावांनी केली आहे ('कृष्णाकाठ', ५३). एखाद-दुसऱ्या प्रयोगात त्यांनी चेहऱ्याला रंग फासून कामही केले होते. लांब- कोल्हापूरला जाऊन 'प्रेमसंन्यास' पाहण्याइतपत नाटकांची गोडी त्यांना बालपणीच लागली होती. यामुळेच पुढे नाट्याचार्य खाडिलकरांच्या नाटकांच्या निमित्ताने लिहिताना त्यांच्या नाट्यकृतींचे मार्मिक रसग्रहण करून जुन्या व नव्या नाटकांतील तफावत ते अचूक दाखवू शकले. खाडिलकरांनी 'स्वयंवर', 'भाऊबंदकी' किंवा 'सवाई माधवरावांचा मृत्यू' या नाटकांचे विषय निवडण्याची कारणमीमांसा यशवंतराव करतात. त्यांच्या मते, महाभारताप्रमाणेच मराठ्यांच्या इतिहासातही सर्व व्यक्तिरेखांना युद्धाची पार्श्वभूमी आहे, त्यातील शृंगार हा वीरांचा शृंगार आहे, त्यातील कारुण्यही युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घटनांचे आहे. युद्धामुळेच मानवी जीवनात निर्माण झालेल्या तणावांचे चित्रण करण्याचे युयुत्सु व प्रतिभाशाली नाटककाराला वाटलेले आकर्षणच अशा नाट्यविषयांची निवड करण्यामागे असू शकते, हे यशवंतरावांचे स्पष्टीकरण मर्मग्राही नाही, असे कोण म्हणेल? आनंदीबाई-राघोबा, धैर्यधर-भामिनी, कृष्ण-रुक्मिणी यांच्यांतील

शूरांचा शृंगार, कौटुंबिक जीवनातील नाट्य व खलपुरुषांशी संबंध आणि तज्जन्य तणाव, इत्यादींची सोदाहरण चर्चा यशवंतरावांनी केली आहे.

पूर्वीच्या नाटकांतील समाजजीवनाचे चित्रण अत्यंत स्थूल आणि दोनच गडद रंगांनी रंगवलेले असायचे, पण सामाजिक जीवनाच्या वाढत्या क्लिष्टतेबरोबरच नाट्यवस्तूंचीही गुंतागुंत वाढत जाऊन आजची नाटके समाज-वास्तवाचा सूक्ष्म वेध घेऊ पाहत आहेत, हे यशवंतरावांचे भाष्य आणि नाट्यगीतांची भावगीते होऊन त्यांतला 'गायनरस' नष्ट होऊ द्यायचा नसल्यास रंगभूमीच्या सूत्रधारांनी करावयाच्या तपश्चर्येचा त्यांनी दिलेला इशारा किंवा नटांना नाट्याचे यथार्थ आकलन होण्याच्या आणि नाटककारांना अधिक प्रभावी लेखन करता येण्याच्याही दृष्टीने नाटककार व नट यांच्यातील अकृत्रिम साहचर्याच्या जुन्या परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याची त्यांनी प्रतिपादिलेली निकड त्यांचा या क्षेत्रातील अधिकारच स्पष्ट करते.

शब्दचमत्कृती व कल्पना-चमत्कृतीतून खांडेकरांच्या कादंबऱ्यांकडे संस्कारक्षम वयातच आकर्षित झालेले यशवंतराव पुढे त्यांच्या कादंबऱ्यांमधील सामाजिक आशयामुळे लुब्ध होतात. १९३० ते १९४० या काळातील खांडेकरांच्या लेखनात मराठी जीवनाचे आणि विशेषतः निम्न मध्यमवर्गीय जीवनातील संघर्षाचे जे चित्रण आहे, ते यशवंतरावांना मराठी मनाचे समर्पक चित्रण वाटते. वरिष्ठ मध्यमवर्गाची नजर ऊर्ध्वगामी, तर कनिष्ठ मध्यमवर्गाची अधोगामी असते, जो आपल्यापेक्षा गरीब व दुबळा आहे, त्याच्या दुःखांना वाचा फोडण्याचा प्रयत्न कनिष्ठ मध्यमवर्ग करतो. खांडेकर या वर्गाला आपला मुख्य लेखनविषय करतात आणि त्याचे हुबेहूब आविष्करण करतात, हीच त्यांची खरी थोरवी यशवंतरावांना वाटते. खांडेकरांची 'जीवनासाठी कला' ही भूमिका यशवंतरावांना पटते. खांडेकरांचे साहित्य मराठी जीवनाचे असले, तरी भाषांतरित स्वरूपात त्याचा आस्वाद सबंध देशभरातले वाचक घेऊ शकतात, यामागच्या रहस्याची उकलही यशवंतरावांनी केली आहे. त्यांच्या मते 'दोन ध्रुव'सारख्या कादंबरीतील पात्रे मराठी असली, तरी सामाजिक विषमतेचा तिचा आशय आणि तिने स्पर्श केलेल्या मूलभूत मानवी भावना सार्वत्रिक असतात आणि म्हणून ती कोणत्याही प्रदेशातल्या वाचकांना भिडते.

माडखोलकरांच्या निमित्ताने लिहीत असताना यशवंतरावांनी मराठीतील राजकीय कादंबरीविषयी फार मौलिक विचार मांडले आहेत. माडखोलकरांनीच प्रथम मराठीत राजकीय कादंबरी लिहिली. त्यांच्यानंतर आणखी काहींनी तो प्रयत्न केला; "परंतु त्यांच्या राजकीय कादंबरीला मागे टाकील, अशी राजकीय कादंबरी अद्याप पहायला मिळायची आहे" ('ऋणानुबंध' : २५२) माडखोलकरांच्या राजकीय कादंबऱ्या मौलिक ठरण्याचे कारण

सांगताना यशवंतराव पुढे म्हणतात, "त्यांना स्वतःला राजकारणात फार रस होता. राजकारणातील लोकांशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. कलाविषक लेखनाला लागणारी अनुभूतीची जोड त्यांना सहजप्राप्त होती. शिवाय तपशिलाचा अभ्यास करून मगच विषयाला हात घालण्याचा शिरस्ता त्यांनी पाळला होता" (कित्ता, २५४). अन्यत्र याच विषयासंबंधी बोलताना राजकारणाचे मराठी कादंबऱ्यांतील चित्रण अतिशय अपुरे व फसवे असल्याचे सांगून 'सिंहासन' व 'जनांचा प्रवाहो चालिला' या कादंबऱ्यांचा निर्देश केला होता. ते म्हणतात, "अरुण साधूंच्या 'सिंहासन' या कादंबरीत मला प्रचाराचा वास येतो. राजकीय कादंबऱ्या लिहिण्याचा साधूंचा प्रयत्न आहे. पण त्यांचा थाट प्रचारकी आहे. 'सिंहासन' कादंबरीपेक्षा 'रिपोर्टिंग' वाटते. 'जनांचा प्रवाहो चालिला'... हे पुस्तक निकृष्ट (थर्ड ग्रेड) आहे" ('पुस्तक पंढरी', दिवाळी अंक १९८३, ३५). यशवंतरावांच्या मते देशाच्या राजकारणातील महत्त्वाच्या प्रेरणांशी सहानुभूती नसलेले, जागतिक राजकारणातील वेगवेगळे प्रवाह ठाऊक नसलेले, केवळ आपले गाव किंवा आपली गल्ली यातच रममाण होणारे लेखक जेव्हा राजकीय कादंबऱ्या लिहिण्याचा आटापिटा करतात, तेव्हा त्यांच्या त्या कादंबऱ्या पूर्वग्रह व गैरसमज यांना बळी पडल्यावाचून राहत नाही (कित्ता).

संवेदनक्षम ललित लेखक

साहित्यास्वादकाची भूमिका हीच आपली प्राथमिक भूमिका आहे, असे यशवंतराव म्हणत असले, तरी, आणि ललित लेखन त्यांनी आयुष्यात फार पूर्वीच सोडून दिले असले, तरीही त्यांचे मन मात्र अखेरपर्यंत कलावंताचेच होते. निसर्गात रमणे, मनःपूर्वक एखादा अनुभव घेणे, भूतकाळातल्या कडूगोड आठवणींची प्रसंगोपात्त उजळणी करणे, लोकजीवनाच्या संजीवक संपर्काला प्रयत्नपूर्वक जोपासणे, बुद्धीइतकेच भावनेलाही तीक्ष्ण राखणे ही सारी त्यांच्यांतल्या जिवंत कलावंताचीच लक्षणे होती.

बालपणाचे कृष्णाकाठाशी एक अतूट समीकरण त्यांच्या मनात आयुष्यभर ठाण देऊन बसले होते. "श्रावण कोसळू लागला, की "कृष्णामाईची याद मनात हटकून येते", "कृष्णाकाठावर उभे राहिल्यानंतर स्वच्छ जीवनाचा तो प्रशांत प्रवाह आणि तीरांवरील हिरवागार सुंदर निसर्ग पाहत राहणे याचा आनंद काही वेगळाच असतो. अंतःकरणात तो बसून राहतो आणि स्मरणमात्रे अंतःचक्षूंसमोर उभा राहतो." (ऋणानुबंध, ९९-१००). ही त्यांची विधाने कृष्णा-कोयनेचे त्यांच्या भावसृष्टीतील अनन्य नाते सांगून जातात, या नद्यांच्या उगमापासून मुखापर्यंत परिक्रमा करावी, बदलत्या पात्रांची भव्यता, भोवतालची निसर्गशोभा पहावी, गावोगावच्या लोकांना भेटावे व त्यांच्या चालीरीती अभ्यासाव्यात,

पिकांनी भरलेली शेते बघावीत. हे स्वप्न त्यांनी जन्मभर उरात बाळगले होते.

परिसर-प्रेम

या परिसराचे अत्यंत हृदयंगम वर्णन यशवंतरावांनी अनेक प्रसंगी केले आहे. देवराष्ट्र हे गाव तर त्यांना विशेष भावलेले दिसते. सातारा जिल्ह्याच्या टोकावरील डोंगराच्या कुशीत वसलेले ते एक लहानसे गाव. गावाचा आसमंत ऐतिहासिक अवशेषांनी व लेणी, देवळे यांनी भरलेला. सर्वांत जुने देऊळ समुद्रेश्वराचे- गाव त्याला 'सागरोबा' म्हणते. गावचे हे दैवत. डोंगरही सागरोबाचा. ('कृष्णाकाठ' : ९).

"सागरोबाचे शिवार हे देवदेवेंद्राला पडलेले एक स्वप्न आहे.... स्वतःला एखादे घरकुल असावे; म्हणून जणू शोधाशोध करीत आलेली देवमंडळी या शिवारात पोचताच कायमची स्थिरावली असावीत आणि या शिवाराचेच त्यांनी 'देवराष्ट्र' बनवून टाकले." ('ऋणानुबंध', ३३) अशी एक उपपत्तीही यशवंतरावांनी दिली आहे. त्यांच्या मनात देवराष्ट्र व भारत एकरूपच आहेत, कारण शेवटी भारत हेसुद्धा तेहतीस कोटी देवांनी घडवलेले देवराष्ट्रच आहे.

भारताबद्दल ते लिहितात :

"खरोखरच हा एक अलौकिक देश! निसर्ग चमत्काराच्या अनेक गुहा आणि लक्ष्मीच्या अनेक खाणी असलेली ही भूमी, सिद्धांचा आणि सिद्धांतांचा परिमल येथील दऱ्याखोऱ्यांत अखंड दरवळत राहिलेला आहे. सज्जनांचा जिव्हाळा आणि सरस्वतीचे सौंदर्य या भूमीला जसे लाभले आहे, तसे तिच्या सद्‌गुणाला चांगुलपणाचे तेज आहे. भव्यत्व आणि दिव्यत्व यांनी इथे परिसीमा गाठली आहे." (कित्ता).

प्रीतिसंगमातून त्यांना एक तर एकजिनसी मनुष्यजीवनाच्या आदर्शाचा साक्षात्कार होत असे आणि दुसरे म्हणजे आपल्या जिवाभावाच्या व्यक्तींचा सहवास आठवे. कामाच्या रगाड्यात मनाला क्षणाचीही उसंत मिळाली, की यशवंतराव या परिसराची स्मरणसाखळी मनातल्या मनात ओढीत असावेत, असे दिसते. सर्व कामांतून सवड काढून कऱ्हाडच्या प्रीतिसंगमावर काही काळ निवांतपणे घालवावा, अशी इच्छा त्यांच्या मनात वारंवार उसळून येत असे. तिथे जाऊन आले आणि घरच्या मंडळींच्या प्रेमळ सहवासाच्या आठवणींच्या सहवासात, मनाने का होईना, राहून आले, की त्यांना जणू कामाचा नवा हुरूप येत असे.

जगात जिथे जिथे ते कामानिमित्त गेले, तिथल्या नद्यांच्या ते प्रेमात पडले होते.

"सागराचा प्रचंड जलाशय पाहून मन प्रसन्न होते, हे तर खरेच; पण नद्यांचे काठ मला त्यापेक्षाही सुंदर दिसतात. नदीची मला फार भुरळ पडते. मी नदीकाठचा आहे,

त्याचा हा परिणाम असेल कदाचित." (कित्ता, ११०) अशा शब्दांत ते आपली भावना व्यक्त करतात. हिंदूंना नद्या पवित्र वाटतात, पण त्या केवळ धार्मिक अर्थाने, यशवंतराव मात्र त्यांना भौतिक अर्थानेच पवित्र समजतात, म्हणून धर्माच्या नावाने पूजा करून एरव्ही नदीकाठांना गलिच्छ ठेवणाऱ्या हिंदूंपेक्षा नदीकाठांची नीट निगा घेणारे परकीय लोक त्यांना विशेष आवडतात.

नदी ही त्यांना माताच वाटते. आणि माती व माता यांच्याशी एकरूप होणे हा तर त्यांचा जन्मजात स्वभावच होता; जीवनविषयक समर्पणाचे सारे तत्त्वज्ञान आपल्याला माती आणि माता यांच्या सहवासात लाभलेल्या साक्षात्कारातून झाले आहे, अशी त्यांची धारणा होती. कृष्णामाई किंवा गंगायमुनाच नाही, तर थेट वोल्गाच्या काठी गेल्यावरही आपली भावसमाधी लागल्याची आठवण त्यांनी नमूद केली आहे.

प्रवासचिंतने

नद्यांप्रमाणेच डोंगरदऱ्या, अरण्ये, प्रेक्षणीय स्थाने यांचे असे मनस्वी आकर्षण असल्यामुळेच प्रवासाचे निमित्त कोणतेही असो, नव्या प्रदेशातल्या निसर्गाशी व तिथल्या इतिहासवास्तूंशी संवाद साधल्यावाचून यशवंतरावांना चैन पडत नसे. प्रवासाच्या निमित्ताने केलेल्या भ्रमंतीत मनावर कायमची मुद्रा उमटवून गेलेल्या कित्येक प्रसंगांची नोंद यशवंतरावांनी करून ठेवली आहे. त्या सर्व नोंदी ओळीने वाचल्यास यशवंतरावांची प्रतिभा त्यातून दिसून येते. समोर डोळ्यांना दिसत असलेला प्रसंग छायामुद्रकाच्या तटस्थतेने न टिपता तो आपल्या भावविश्वाच्या मुशीत घालून यशवंतराव त्याला लेखणीतून आविष्कृत करतात, असे वाटते. त्यामुळे ते जे लिहितात, ते केवळ प्रवासवर्णन न राहता प्रवासचिंतन होऊन जाते. उंच डोंगरावरून पायथ्याशी असलेल्या शेतांकडे पाहताना डोळ्यांना दिसणाऱ्या दृश्याच्या पल्याड त्यांच्या मनाची झेप जाते आणि ते लिहून जातातः

"सृष्टीच्या रूपाने अशा वेळी मला वारकऱ्यांचेच दर्शन घडायचे... ... पताका, गळ्यातला वीणा, खांद्यावरची पडशी, हातांतले टाळ, गळ्यातली माळ; डोक्यावर मुंडासे... पाहताक्षणी निरागसता लक्षात यावी; पवित्र वाटावे, अशी सगळी ठेवण. डोंगरावरून शेताचे, सृष्टीचे दर्शन असेच व्हायचे. जीवनातले ते सुगीचे दिवस वाटत असत." (कित्ता, १०२).

ऐतिहासिक वास्तू पाहताना तिच्या ललाटावरचे लेख वाचण्याचा यशवंतराव प्रयत्न करतात.

"मानवमात्राच्या ललाटाप्रमाणे अशा वास्तूंच्या ललाटावरही सटवाई काही लिहून

जात असली पाहिजे." अशी त्यांना खात्री असते.

या वास्तूंच्या ललाटानुसार माणसांचा इतिहास घडतो, की माणसांच्या ललाटानुसार वास्तूंचा, हे नक्की सांगता येत नसले, तरी "त्या दोन्हींचा काही तरी आंतरिक संबंध असला पाहिजे खास!" अशी ग्वाही त्यांचे मन त्यांना देते. ते म्हणतात,

"ऐतिहासिक वास्तूच्या छायेत जेव्हा मी जातो, तेव्हा तो वास्तुपुरुष हसू लागतो. आनंदाने, भेसूरपणाने! काळाचा पडदा बाजूला सारून सोन्याच्या टाकाने लिहिलेला वैभवशाली इतिहास वाचताना त्याला आनंदाचे भरते येते आणि मळलेली भाग्यरेखा दाखवताना तो भेसूर हसतो. तो सांगतो, रत्नजडित सिंहासनावर आरूढ झालेला मी- आज हा असा आहे पडलेला, पिचलेला, जळमटलेला! ते पाहताना अंतःकरण विदीर्ण होते." (कित्ता १२४).

वाचनातून झालेले वाङ्मयीन संस्कार, उपजत लाभलेले संवेदनक्षम मन व सूक्ष्म दृष्टी आणि आपपरनिरपेक्ष तादात्म्यबुद्धी या गुणांमुळे यशवंतरावांची प्रवासवर्णनात्मक टिपणे अत्यंत वेधक उतरली आहेत.

संरक्षणमंत्री म्हणून १९६४ मध्ये यशवंतरावांनी रशियाला पहिली भेट दिली. त्या वेळी आपली मनःस्थिती कशी विशेष होती, याचे त्यांनी वर्णन केले आहे. त्यात तिथल्या समाजवादी समाजरचनेविषयीची जिज्ञासा व आकर्षण तर होतेच; पण लेनिन आणि टॉलस्टॉय या दोन सुपुत्रांची मायभूमी पाहण्याची ओढ त्यांना तीव्रतेने जाणवत होती. आपल्या देशासाठी युद्धसाधनांची जोडणी करण्याच्या हेतूने तिथे गेलेल्या या संरक्षणमंत्र्याच्या मनाला शांततेच्या संदेशाने भारले होते. या त्यांच्या विरोधाभासात्मक विकल मनःस्थितीचेच वर्णन त्यांनी 'शांतिचितेचे भस्म' या आपल्या लेखात केले आहे. या लेखाबद्दल प्रस्तावनेत ते म्हणतात,

"दुसऱ्या महायुद्धात प्रत्यक्ष रणभूमी झालेल्या रशियाने लक्षावधी माणसांचे बलिदान केले होते. शत्रूशी लढताना आवश्यक असलेल्या पराकोटीच्या शौर्याचे जसे तेथे दर्शन होत होते, त्याचप्रमाणे युद्धाग्नीमुळे होणाऱ्या संहाराची प्रतिक्रिया म्हणून उचंबळून येणारा माणुसकीचा गहिवरही क्षणाक्षणाला जाणवत होता. त्या भारावलेल्या मनःस्थितीत तो लेख तयार झाला." (कित्ता, ६).

लेखकाच्या मनाच्या या भारावलेपणाची साक्ष या लेखातील शब्दाशब्दांतून वाचकाला मिळते. वोल्गा नदीच्या काठावर त्यांनी अनुभवलेले क्षण अत्यंत भावस्पर्शी शब्दांत त्यांनी नेमके पकडले आहेत. वोल्गाच्या प्रवाहात त्यांना जगन्मातेचे दर्शन घडले होते. ते लिहितात,

"वोल्गाच्या तीरावरील वोल्गागार्ड हे जगातील एक जागृत तीर्थ आहे. रशियातील यच्चयावत मानवता येथे साकार झाली आहे."

दुसऱ्या महायुद्धात वोल्गाच्या तीरावर जी अभूतपूर्व रणधुमाळी झाली तिचे वर्णन करून ते म्हणतात :

" 'लाल' क्रांतीतही हिमशुभ्र राहिलेली वोल्गा या धुमाळीत लालीलाल झाली. शूरमर्दिनी भू-माता आरक्त बनली आणि नंतर रक्तलांछित होऊन काळीठिक्कर पडली. तिच्या आश्रयाला कोणी जीवजिवाणू उरले नाही."

जगात अनेक युद्धे झाली. तरी वोल्गाकाठावरचे युद्ध अद्वितीय होते, हे सांगताना यशवंतराव वर्णन करतात,

"रक्ताचे सडे सांडले, हाडांची माती झाली. तेथे कोण कोणासाठी संपला, हा हिशेब निरर्थक आहे. जे घडले, त्यामुळे रक्तमांसाचा चिखल झाला. ह्या चिखलात माणुसकी कुजून गेली. सजीवता उगवेनाशी झाली. पिढीच्या पिढी निराधार झाली. सारे सारे उदास, भकास, भयाण आणि भयंकर झाले."

आजही अखंड वाहत असलेली वोल्गा त्या भीषण इतिहासाचे स्मरण देते. यशवंतरावांना वोल्गाकाठी तिचे शब्द स्पष्टपणे ऐकू आले होते. (कित्ता, १२४)

मंतरलेल्या भावभारलेपणातूनच हे संपूर्ण शब्दांकन झालेले असल्यामुळे ते मग केवळ एक यथातथ्य प्रवासचित्रण उरत नाही किंवा रूक्ष तपशीलाच्या शुष्क बारकाव्यांचे तटस्थ संकलनही ठरत नाही, तर लेखकाकडून वाचकाकडे एक जिवंत भावावस्थाच जणू संक्रमित होत राहते. लढाईत ज्यांनी प्राण वेचले, त्यांचे वोल्गाच्या काठावर जे स्मारक आहे, त्याचेही असेच हृद्य वर्णन यशवंतरावांनी केले आहे. सैनिकांच्या नावाने सामान्यतः दगडी खांब उभारण्याची सार्वत्रिक प्रथा पाहून अस्वस्थ झालेल्या यशवंतरावांना वोल्गा-तीरावरचे योद्ध्यांचे स्मारक फारच लोभस वाटले होते.

स्मारकाच्या रूपाने जणू एक निरंतर लढाईच ई. बुचेत्ख या कलावंताने 'ममई हिल्स'वर निर्माण केलेली आहे. रणधुमाळी त्या वेळी झाली, तशीच्या तशी त्यानी उभी केली आहे. टेकड्या चढू लागताच प्रेक्षक रणधुमाळीच्या धुमश्चक्रीत शिरकाव करतो. पुढचे वर्णन करताना यशवंतराव लिहितात,

"चिलखत घातलेले, संगिनी रोखलेले, रणगाडे पळवणारे, तोफा डागणारे, बॉम्ब फेकणारे, सरपटत जाऊन गोळ्या चालवणारे, एक ना दोन हजारो हात तिथे सज्ज दिसतात. हजारो कलेवरे तिथे जमीनदोस्त होऊन पडली आहेत. मूर्तिमंत भीती आणि भयानकता यांचेच हे चित्रण आहे. पण एका महान कलावंताच्या कलावैभवाचे ते एक

कोरीव लेणे बनले आहे." (कित्ता, १२५).

कलावंताला अशी उत्कट दाद हाडाचा कलावंतच देऊ शकतो. यशवंतराव तिथे या कलावंताला भेटले. तो केवळ कुंचला चालवणारा कलावंत नाही, तर स्वतः तो एक कुशल सैनिक आहे. ज्या पोलादी हातांनी त्यांनी शत्रुसैनिक यमसदनी पाठवले, त्याच हातांनी 'करणी' करून तोच आज समरप्रसंगाचा इतिहास चितारीत आहे, हे यशवंतरावांना विशेष लक्षणीय वाटते. सैनिकी वेषातल्या आपल्या तरण्याबांड लेकराचे कलेवर मांडीवर घेऊन बसलेल्या एका अघोवदना स्त्रीचे एक चित्र या अपंग चित्रकाराने काढले आहे. यशवंतरावांनी त्या चित्राचे अत्यंत मार्मिक विश्लेषण केले आहे.

यशवंतराव परत जायला निघाले, तेव्हा त्या शूर कलावंताने त्यांच्या हातात वोल्गागार्डची आठवण म्हणून रक्तमांसात भिजलेली मूठभर माती ठेवली होती. यशवंतरावांनी लिहिले आहे,

"शांततेच्या चितेतील ते भस्म, त्या कलावंताची ती देणगी मी स्वीकारली आहे. हिमालयात भडकलेल्या चितेतील भस्म माझ्या संग्रही आहे, त्याच्याशी ही देणगी मिळतीजुळती आहे. गिरिजा-शंकराला रोज ताज्या चिताभस्माची पूजा आवडते... वोल्गाची ती माती ते शांतिभस्म मी जपून ठेवले आहे." (कित्ता, १२७).

समुचित संदर्भ

कधीकाळी वाचून मनात साठवून ठेवलेल्या वाङ्मयीन कलाकृतीचे समुचित संदर्भ वाचन- मनन- चिंतनाचा निदिध्यास जडलेल्या यशवंतरावांना प्रवासात अचूक आठवत असत. ते सायप्रसला गेले असताना फामागुस्ता बंदराच्या तटबंदीवर त्यांना ऑथेल्लो टॉवर दाखवण्यात आला. त्यांना झटकन शेक्स्पीयरचा नायक कृष्णवर्णी सरदार आठवला. संशयापोटी त्याने केलेला डेस्डिमोनाचा खून आठवला. त्यानंतर तो टॉवर त्यांना प्रीती आणि असूया या मानवी चिरंतन भावनांचे प्रतीकच वाटला. इकडे समुद्र आणि तिकडे हा टॉवर दोन्हीही धर्माच्या व प्रेमाच्या असूयेतून घडलेल्या शोकनाट्याचे साक्षीदार त्यांना वाटले. ते म्हणतात,

"हा टॉवर आणि समोर खळाळणारा सागर यांच्याकडे आळीपाळीने पाहिले, तेव्हा ते दोघेही एकमेकांकडे पाहून असूयेने विकट हास्य करीत आहेत, असे मला भासले." (कित्ता, ११६).

यस्ना-पलाना येथील टॉलस्टॉय यांच्या निवासस्थानीही त्यांना टॉलस्टॉयच्या साहित्यातील स्मरणशलाकांनी असेच अस्वस्थ केले होते. त्यांना तिथे ॲना कॅरेनिना दिसू

लागली. 'रिसरेक्शन'मधील कटुशाला त्यांनी तिथे बघितले. 'मानवताप्रेमाने ओल्याचिंब झालेल्या लेखणीतून अंतःकरणातील शब्दांना सहानुभूतीचे रूप देऊन त्यांच्याद्वारे मानवतेला अमर संदेश' देणाऱ्या या प्रतिभावंत साहित्यिकाच्या अनेक कलाकृतींचे त्यांना स्मरण झाले. सोन्याच्या पिंपळाखाली ज्ञानदेवांनी ज्ञानसाधनेस बसावे, असेच हे ठिकाण असल्याचे त्यांना जाणवले. घनगर्द वृक्षराजीने वेढलेल्या त्या 'उदात्त, पवित्र व ईश्वरीय' तपोवनाचे यथातथ्य चित्र यशवंतरावांनी शब्दबद्ध केले आहे (कित्ता १२८-९).

व्यक्तिचित्रे

या आगळ्यावेगळ्या प्रवासवर्णनाप्रमाणेच साहित्यिक यशवंतरावांच्या प्रतिभेचा मनोज्ञ आविष्कार त्यांनी रंगविलेल्या विविध व्यक्तिचित्रांमधून झालेला आढळतो. कुलसुम दादी ही त्यांच्या स्मरणात रुतून बसलेली एक व्यक्तिरेखा. त्यांच्या आजीच्या वयाची ही प्रेमळ मुसलमान स्त्री. यशवंतरावांनी तिचे व्यक्तिचित्रण एका लेखातून केले आहे. तिचा परिवार, तिची मराठी-उर्दू संमिश्र भाषा, रोकठोकपणा, तिने बालवयात लावलेला लळा या सर्वांच्या वर्णनातून ती वाचकांसमोर मूर्तिमंत उभी राहते. या व्यक्तिचित्रातून '५० वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रातल्या एका खेड्यात सामान्य जीवन जगणाऱ्या माणसांच्या दैनंदिन जीवनात (जातिधर्म वगैरेंची) तटबंदी कुठेही दिसत नव्हती, भासत नव्हती. माणुसकीची नाती रक्ताच्या नात्याइतकीच मजबूत आणि खरीखुरी जिवंत नाती होती, हा मी जगलेला अनुभव' आपल्याला सांगायचा होता, असे यशवंतरावांनी नमूद केले आहे. (कित्ता, ६).

आयुष्यात अविस्मरणीय ठरलेल्या अशा अनेक व्यक्तींची स्मृतिचित्रे यशवंतरावांना रेखाटायची होती. पण पुढे या ना त्या निमित्ताने काही मान्यवर व्यक्तींसंबंधी त्यांनी लिहिले असले, तरी जनसामान्यांमधल्या या असामान्य व्यक्तींविषयी लिहिण्याचा त्यांचा इरादा मात्र पूर्ण होऊ शकला नाही.

गांधी, नेहरू, राधाकृष्णन्, काकासाहेब गाडगीळ, धनंजयराव गाडगीळ प्रभृती समकालीनांविषयी, किंवा खाडिलकर, केळकर, खांडेकर, माडखोलकर वगैरे लेखकांविषयी, तसेच शिवाजी, शाहू, विठ्ठल रामजी शिंदे या वंद्य विभूतीमत्त्वांविषयी यशवंतरावांनी प्रसंगोपात्त लिहिले आहे. बऱ्याचदा त्यांनी सांगितलेले अनेक तपशील जुनेच असले, तरी त्यांच्या लेखना-भाषणात संबंधित व्यक्तींविषयी एखादेच असे अन्वर्थक विधान यशवंतराव टाकतात, की त्यातून त्या व्यक्तिमत्त्वाचे खास वैशिष्ट्य चपखलपणे श्रोत्यांपुढे वा वाचकांपुढे उभे राहाते किंवा काही ठिकाणी अशा एखाद्या समर्थक व्यक्तिगत आठवणीचा ओझरता उल्लेख यशवंतराव करतात आणि तेवढ्यामुळे त्या व्यक्तिमत्त्वाचे आगळेपण अधोरेखित

होऊन जाते.

राधाकृष्णन् यांच्याबद्दल लिहिताना वॉशिंग्टनमध्ये भेटलेल्या एका साठपासष्टवर्षीय वृद्धाची आठवण यशवंतरावांनी सांगितली आहे. 'राधाकृष्णन् यांच्या कधीतरी ऐकलेल्या भाषणावरून कधीही न पाहिलेल्या गंगेचा ओघ कसा असेल, याची कल्पना आली होती', असे एक वाक्य उच्चारून तो म्हातारा निघून गेला होता. (कित्ता, १४२).

लालबहादूर शास्त्री एखादे काम एखाद्यावर सोपवल्यानंतर त्याच्यावर पूर्ण विश्वास टाकीत, त्याला हवे ते अधिकार देत. या त्यांच्या उमदेपणामुळे व मोकळेपणामुळे कामाला हुरूप येत असल्याचे सांगून यशवंतराव लिहितात,

"(त्यामुळे) माझ्यासारख्या दरबारी वृत्ती नसलेल्या माणसालाही काम करणे सोयीचे होई." (कित्ता, १५९).

शाहू महाराजांविषयीच्या लेखात, गोविंदराव टेंब्यांना 'शिवसंभव' नाटकाच्या वेळी आपल्या जवाहरखान्यातले खास शाही दागिने वापरण्यासाठी शाहूंनी दिले होते, आणि ते नाटक बघताना त्यात जेव्हा शिवजन्माचा प्रसंग येतो. तेव्हा "शाहू महाराज भर नाट्यगृहात आपल्या आसनावरून उभे राहिले आणि त्यांनी नाटकातल्या शिवाजी महाराजांना लवून मुजरा केला." (कित्ता १७३) अशा शेलक्या आठवणी यशवंतरावांनी सांगितल्या आहेत.

विठ्ठल रामजी शिंद्यांना आपल्या गावी आणल्याची लहानपणची आठवण तर त्यांनी अनेक संदर्भात पुनःपुन्हा सांगितली आहे. हजार शब्दांमधूनही व्यक्त होणार नाही, असे या व्यक्तिमत्त्वांचे महात्म्य या छोट्या-छोट्या आठवणींतून मांडण्याचे कसब साहित्यिक यशवंतरावांना उत्तम साधले होते.

एकेका मिताक्षरी वाक्यात संबंधित व्यक्तीचे संपूर्ण व्यक्तिमत्व उजळून काढण्याची त्यांची हातोटीही अशीच लक्षणीय होती.

"पुण्याच्या बुद्धिवैभवाचे प्रतीक आणि महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाचे आधारस्तंभ" असे तात्यासाहेब केळकरांचे वर्णन त्यांनी केले आहे (कित्ता, २३५).

"भाऊसाहेबांच्या वाङ्मयात निदान मी कधी अमावास्या पाहिली नाही... हा चांदण्यांचा लेखक आहे. प्रकाशाचा लेखक आहे." या शब्दांत ते खांडेकरांचा गौरव करतात. (कित्ता २४३).

त्यांच्या मते ह. ना. आपटे "हे राष्ट्रीय उषःकालाचे कादंबरीकार होते." (कित्ता, २१२), तर डॉ. धनंजयराव गाडगीळ हे 'बहुजन हिताय बहुजनसुखाय या थोर तत्त्वाचे प्रतीक' आणि तत्त्वचिंतक रचनाकार होते (कित्ता, १९४).

गांधीजींचे युगप्रवर्तकत्व सांगताना यशवंतराव युगप्रवर्तकाची पुढीलप्रमाणे व्याख्या देतात :

"व्याकरणाचे जुने नियम तो जणू फेकून देतो. जुनी फुटपट्टी तो मोडून टाकतो, स्वतःच्या गायकीला साजतील, असे नवीन स्वर आणि ताल बसवितो आणि नवे सूर आळवू लागतो." (कित्ता, १३२).

यशवंतरावांनी रंगवलेल्या व्यक्तिचित्रांमध्ये सर्वाधिक प्रभावी ठरली आहेत, ती त्यांच्या मातोश्री विठाई आणि पत्नी वेणूताई यांची व्यक्तिचित्रे. कारण एक तर या दोन्ही व्यक्ती त्यांच्या 'जीवनाला आकार आणि आशय देणाऱ्या' होत्या. आणि दुसरे असे की, त्यांची व्यक्तिचित्रे लिहायची, म्हणून स्वतंत्रपणे ठरवून न लिहिता प्रसंगवशात आपापतः लिहिण्याच्या सहज ओघात ती आलेली असल्यामुळेही ती अधिक हृदयस्पर्शी उतरली आहेत.

आई हा विषय तर भल्याभल्या प्रतिभावंतांना झपाटून टाकणारा आहे. माती आणि माता यांच्याशी एकरूप होणे हा आपला जन्मजात स्वभाव असल्याचे यशवंतरावांनी अनेकदा मान्य केले आहे. ते म्हणतात,

"तीर्थतूल्य मातेच्या दर्शनाने माझे अष्टसात्त्विक भाव जागे होतात. अंतर्मन निथळू लागते. पौर्णिमेच्या चंद्रातून अमृतबिंदू ठिबकावेत, अशी तिची प्रेमळ दृष्टी माझ्यावर वर्षाव करते आणि नकळत पायगत झालेल्या पापण्या, हृदयाच्या चौफाळ्यावरील पावले धुंडाळू लागतात" (कित्ता १२२).

शास्त्रज्ञ आणि अध्यात्मी जीवनाचे जे रहस्य सांगतात, त्याचा साक्षात्कार आपल्याला मातीच्या आणि मातेच्या सान्निध्यात होत असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. त्यांच्या शब्दांत,

"तिच्या अंतःकरणाच्या अवकाशात मी स्थिरावतो, प्रशांत मनोभूमीवर पहुडतो, आत्मतेजाने तेजाळून निघतो, प्रेमामृताने ओलाचिंब होतो आणि श्वासात श्वास मिसळून जातो." (कित्ता, १२३).

"कवी यशवंतांना आईची आठवण झाली आणि घराघरातली आई जागी झाली." ('युगांतर', २४६) या शब्दांत कवी यशवंतांचा गौरव करणाऱ्या यशवंतरावांनी ज्या शब्दांत आपल्या निरक्षर भोळ्या मातेचे ऋण व्यक्त केले आहे, ते यशवंतांच्या कवितेलाही मागे टाकणारे आहे. सत्काराला उत्तर देताना एका ठिकाणी ते म्हणतात,

"मला आपल्या या सगळ्या प्रेमाला पोचविण्याचे श्रेय माझ्या अशिक्षित आईला आहे. आज दुनियेमध्ये काय चालले आहे, ह्याचे तिला फारसे ज्ञान नाही. मी तिचा

धाकटा मुलगा मुख्यमंत्री आहे, पण मुख्यमंत्री म्हणजे काय, हे आजही तिला माहीत नाही... तिची पुण्याई, तिचा साधेपणा, तिचे प्रेम, तिने शिकविलेले लहानपणचे चारदोन छोटे छोटे गुण हेच मला माझ्या जीवनामध्ये उपयोगी पडले आहेत." (सह्याद्रीचे वारे, १९७).

आजूबाजूच्या ग्रामीण गरीब शेतकरी कुटुंबासारखेच यशवंतरावांचेही कुटुंब होते. घरची शेती असली, तरी अर्धपोटी राहण्याइतपतच होती. वेगळेपण जर काही असेलच, तर ते संस्कारांमध्ये होते आणि ते संस्कार करण्यात आईचा वाटा सर्वाधिक मोठा होता.

"संपत्तीने नसली, तरी संस्काराने आई श्रीमंत होती आणि ती श्रीमंती आम्हां मुलांपर्यंत पोचवण्याचा तिचा सतत प्रयत्न होता." (ऋणानुबंध, ३८) हे यशवंतराव आवर्जून सांगतात.

तिच्या जात्यावरच्या ओव्यांमधून त्यांना पृथ्वीमोलाचा संदेश मिळाला होता. तुरुंगात यशवंतरावांना भेटायला आलेल्या त्या माउलीने सोबतच्या गुरुजींनी केलेली माफी मागण्याची सूचना साफ उडवून लावून यशवंतरावांवर स्वाभिमानाचा व ध्येयनिष्ठेचा खोल संस्कार केला होता. १९६५ च्या युद्धाच्या धुमश्चक्रीत आईचे निधन झाले. तिच्या अस्थी गंगेत टाकताना 'भूतकाळाचा एकमेव धागा झटकन् तुटला', असे यशवंतरावांना वाटले.

माता आणि माती यांच्याविषयी अपार ओढ असलेल्या या राजकारणी कलावंताला जनतेच्या ठायीही जणू मातेचेच दर्शन होत असे. संयुक्त महाराष्ट्र होण्यापूर्वी मराठी जनतेचा त्यांच्यावर कमालीचा रोष ओढवला होता, पण संयुक्त महाराष्ट्र झाला आणि त्याच जनतेने त्यांच्यावर प्रेमाचा वर्षावही तितक्याच उत्कटतेने केला. या रागालोभाचा पोत मातृवत्सल यशवंतरावांना थेट आईच्या रागालोभाशी मिळताजुळता वाटला. ते म्हणतात,

"मुलाला मारण्याचा अधिकार सख्ख्या आईलाच असला पाहिजे. ...कारण कधी मारलाच पाठीवर एखादा धपाटा, तर दुसऱ्याच क्षणी ज्याला लागले, त्याच्यापेक्षा जिने मारले, तिच्याच डोळ्यातून पाणी येते आणि ती आपल्या मुलाला पोटाशी धरते. हा आईचा धर्म आहे. तीच गोष्ट जनतेची आहे." ('सह्याद्रीचे वारे', ३२).

मराठवाड्यात प्रवास करताना कुणी जख्ख म्हातारा एकेक रुपयांच्या दहापाच नोटांचा हार आपल्या थरथरत्या हातात घेऊन चव्हाणांच्या मोटारीला सामोरा आला. म्हणाला,

"तुझ्यासारखा पुत्र व्हावा अशी इच्छा होती, तुला खाऊला हे पैसे आणले आहेत."

समरसून हा प्रसंग सांगून चव्हाण लिहितात,

"मी पितृवंचित आहे. लहानपणीच वडील वारले, पण या वयातही आपल्याला खाऊ द्यायला कुणीतरी आहे, या भावनेने माझे मन भरून आले. माझे अश्रू मी थांबवू शकलो नाही." (कित्ता).

पत्नीच्या संदर्भात यशवंतरावांनी फारच त्रोटक लिहिले असले तरी त्यांच्या मनातले खूप काही त्यांचे ते शब्द व्यक्त करून जातात. यशवंतरावांच्या व्यस्त सार्वजनिक जीवनात काहीसे दुर्लक्षित जीवन वाट्याला आलेल्या वेणूताईंचे व्यक्तिमत्त्व किती परिपक्व आणि उदात्त होते, हे यशवंतरावांनी अक्षरशः चार-दोन वाक्यांत सांगितले आहे. लग्न झाल्यावर अल्पावधीतच भूमिगत जीवनाची ससेहोलपट यशवंतरावांच्या मागे लागली आणि सुखवस्तू घरातून आलेल्या वेणूताईंना कारावासाचे खडतर जीवन काही काळ कंठावे लागले आणि नंतरही त्या खडतरपणाने केलेला आरोग्याचा चोळामोळा त्यांना जन्मभर पुरला. त्यामुळे वेणूताईंविषयी बोलताना यशवंतरावांचा सूर हळवा व अपराधी होतो. ते लिहितात,

"नव्या संसाराची स्वप्ने रंगवण्याच्या वयात तिला तुरुंगाची हवा चाखावी लागली. तीही तिने माझ्याशी लग्न केले, या एकाच अपराधाबद्दल! मला जास्त वाईट वाटले, ते तिच्या लग्नानंतरच्या पहिल्याच कौतुकाच्या संक्रांतीवर तुरुंगाची संक्रांत आली, म्हणून. पण तिने ह्या निराशेचा कडवटपणा कधीही जिभेवर येऊ दिला नाही." (ऋणानुबंध ६७).

१९९३ साली वेणूताई गंभीर आजारी होत्या. भूमिगत यशवंतरावांना ते कळले आणि त्यांच्या मनाची जी घालमेल झाली, ती ते पुढील शब्दांत व्यक्त करतात :

"लग्न झाल्यापासून तिला सुखाचे दिवस असे दिसलेच नव्हते. सतत मनस्ताप आणि काळजी. तिच्या संसाराची सुरुवातच अशी दुःखमय झालेली, त्यात तुरुंगवासाचा त्रास, माझ्या मोठ्या बंधूंचा मृत्यू, माझे मलाच अपराध्यासारखे वाटू लागले." (कित्ता, ७१).

पण अशा काही उदास मूडस्‌बरोबरच पत्नीच्या संदर्भात त्यांनी लिहिलेला एखादा प्रसंग पुढीलप्रमाणे दिलखुलासपणे थुईथुई कारंजेही उडवून जातो.

१९४६ च्या निवडणुकीच्या यशानंतर मी माझ्या आईच्या पायाला स्पर्श करून नमस्कार केला. त्यानंतर अनेक महिलांनी येऊन मला ओवाळले. माझी पत्नी सौ. वेणूबाई हिनेही येऊन मला ओवाळले. तेव्हा माझे डोळे पाणावले. मी तिलाच ऐकू जाईल असे सांगितले,

'वेणूबाई या यशात तुझाही वाटा आहे.'

"ती किंचित हसली आणि म्हणाली, 'अशी वाटणी करायची नसते.'" ('कृष्णाकाठ'

३०९).

सूक्ष्म अनुभवग्रहण व प्रभावी आविष्करण

अनुभवग्रहणाची व आविष्करणाची यशवंतरावांची शैलीही सव्यसाची व संवेदनक्षम साहित्यिकाला साजेशीच होती. जतींद्राने तुरुंगात उपोषण करून आत्मार्पण केल्याची बातमी वाचून तरुण यशवंतरावांची जी मनःस्थिती झाली होती, तिचे पुढील वर्णन अत्यंत प्रत्ययकारी उतरले आहे.

"देहाचे व्यापार सुरू होते, परंतु मनाचे व्यवहार उधळले होते. परमदुःखाच्या खोल गर्तेत मी कुठे तरी पडलो आहे, असे स्पंदन मनात कुठे तरी चालू होते.... बधिर झालेल्या मनाने मी तसाच चालायला लागलो आणि चालता चालता रडायलाही लागलो... गावातील घरे ओलांडून मी पुढे चाललो होतो, ती निर्मनुष्य घरे मला भयाण वाटली. सायंकाळी नदी ओलांडून जाताना नेहमी घरट्याकडे परतताना भेटणारे पक्ष्यांचे थवे मला त्या दिवशी आढळले नाहीत. रानात भिरभिरणारा वारा सुस्तावला होता. झाडेझुडपे स्तब्ध झाली होती. सारे वातावरण कुंद बनले होते. माझ्या मनाचे प्रतिबिंब मला जणू चराचरात दिसत होते." (ऋणानुबंध, १५).

त्या अंधाऱ्या रात्रभर उपाशी पोटाने यशवंतराव अनिमिष नेत्रांनी तारकापुंजात जतींद्राचा शोध घेत जागे राहिले होते.

सावरकरांच्या कवितेवर लुब्ध असण्याच्या काळात सावरकरांना प्रत्यक्ष भेटता आले याचा किती उत्कट आनंद आपल्याला झाला होता, याचे जवळपास पन्नास वर्षांनंतर तितकेच सविस्तर तपशीलांसह वर्णन यशवंतरावांनी केले आहे. समुद्र आणि सावरकर या दोहोंबद्दल कमालीचे आकर्षण असणाऱ्या यशवंतरावांना एकाच यात्रेत या दोहोंना भेटता आले, याचा त्यांना झालेला आनंद अनिर्वचनीय होता. ते लिहितात, समुद्र नजरेच्या टप्प्यात येत्राच-

"मन हरखून गेले, प्रसन्न झाले. त्याचा केवढा अवाढव्य विस्तार होता! सकाळच्या प्रहरी शांत वातावरणात समुद्र पाहिला. त्यामुळे त्याचे विशाल रूप कार्तिक- मार्गशीर्ष महिन्यात दिसणाऱ्या निळ्याभोर आकाशासारखे वाटले. किती तरी वेळ मी आणि राघूअण्णा तेथे सागरतीरी बसून होतो. तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता. लाटांची धीरगंभीर गाज वातावरणात भरून राहिली होती. समुद्रावरून नजर काढावीशी वाटत नव्हती." ('कृष्णाकाठ', ८७).

सावरकरांशी झालेला संवाद शब्दशः लिहून काढल्यानंतर ते म्हणतात,

"सागर आणि सावरकर हे रत्नागिरीत एकाच वेळी पाहण्याचे भाग्य लाभल्यामुळे रत्नागिरीची माझी आठवण ह्या भेटीशी कायमची संलग्न झाली आहे." (कित्ता, ८९).

वेरूळचे कैलास लेणे पाहिल्यानंतरचा अनुभवही त्यांनी असाच लोभस व रेखीव शब्दांत पकडला आहे. कैलास पाहताक्षणी त्यांना भोवतालच्या चराचराचे विस्मरण झाले होते. मन भारावले होते. परमानंदाचा तो अत्युत्कट क्षण त्यांना भासला. श्रेष्ठ कलाकृतींमध्ये जीवन फुलवण्याची केवढी अमर्याद शक्ती असते, याचा जणू साक्षात्कार त्यांना कैलासदर्शनाने झाला होता.

जीवनातील बरेवाईट प्रसंग ऊनसावल्यांच्या खेळाकडे पाहावे, तसे नियतीचा खेळ म्हणून पाहताना यशवंतराव आढळतात. १९४६ साली साताऱ्याहून मुंबईला नवा पदभार सांभाळण्यासाठी डेक्कन क्वीनने ते निघाले असता एकेक बोगदे पार करीत गाडी जात होती. "कधी अंधार, तर कधी प्रकाश असा खेळ खेळत आमचा प्रवास चालला होता," असे नोंदवून यशवंतराव प्रश्न उभा करतात, "पुढच्या जीवनाचे हे प्रतीक तर नव्हते?" या प्रश्नावरच त्यांच्या आत्मचरित्राचा पहिला खंड संपतो. आणि आयुष्यातल्या ज्या छायाप्रकाशाचे नाट्य ते पुढच्या खंडात रंगवणार होते, त्याला आपण मुकलो, या जाणिवेने वाचक हळहळतो. ('कृष्णाकाठ', ३१४).

विषय कोणताही असो, त्याला लालित्याची डूब देऊनच यशवंतराव श्रोत्यांच्या वा वाचकांच्या समोर ठेवीत असत. त्यांची भाषणे ही तर प्रत्ययकारी प्रतिमांच्या व काव्यमय ओळींच्या उधळणीने परिप्लुत असायची. महाराष्ट्रातील शेती मुख्यत्वे कोरडवाहू आहे, हे रूक्ष विधान सगळेच पुढारी आपल्या कानीकपाळी ठोकीत असतात. पण तेच जेव्हा यशवंतरावांच्या तोंडून प्रगटते तेव्हा त्याचे रूप असे होते :

"मथुरेची गवळण पाणी भरून डोक्यावर हंडा घेऊन निघाली आणि घरी येऊन पाहते, तो आपल्या डोक्यावरच्या हंड्यामध्ये पाणी नाही, तसे आपल्या शेतीचे झाले आहे. दरवर्षी मृग नक्षत्रापासून हस्त नक्षत्रापर्यंत भरलेल्या नक्षत्रांच्या बाजारामध्ये आपल्या डोक्यावर भांडे घेऊन जाते. बिचारी आमची शेती; पण त्यात शेवटी काहीच शिल्लक राहत नाही." ('सह्याद्रीचे वारे', १२८). आमच्या महाराष्ट्राच्या शेतीचा हा मथुरेचा बाजार झाला आहे.

कृषी विद्यापीठांमधले ज्ञान सर्वच शेतकऱ्यांपर्यंत पोचायला हवे, असे सांगताना ते सहज बोलून जातात,

"नद्यांचे पाणी फक्त काठावरच्यांना मिळते, तसे कृषी विद्यापीठांचे होऊ नये."

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावरून त्यांना देशाच्या संरक्षणमंत्रिपदावर जावे लागले,

तेव्हाची आपली मनोवस्था 'सासरी जावेसे वाटते; पण माहेर तर सुटत नाही', अशा शब्दांत त्यांनी व्यक्त केली आहे. ('युगांतर', १०).

लालित्याचा स्पर्श होऊन उमटलेले त्यांचे हे शब्द ऐकणाऱ्याला सांगायचे ते तर अचूक सांगतातच, पण सांगणाऱ्याचे अंतर्मनही त्याच्या पुढ्यात उकलून ठेवतात. प्रतिपाद्य विषयाबद्दलचा त्यांचा जिव्हाळा या लालित्यपूर्ण मांडणीतून अधोरेखित केला जातो.

जीवनभाष्य

समर्पित जीवन हा यशवंतरावांचा आदर्श होता. कारण-

"जीवन पराकोटीचे समर्पित असेल, तर ते जीर्ण होत नाही. चंद्र कधी जुना होत नाही, सूर्याला म्हातारपण येत नाही, दर्या कधी संकोचत नाही. यांतील प्रत्येकाच्या जीवनात पराकोटीचे समर्पण आहे. पण अनंतयुगे लोटली, तरी विनाश त्यांच्याजवळ पोहोचलेला नाही. काळाने त्यांना घेरलेले नाही. त्यांचा कधी कायापालट नाही. स्थित्यंतर नाही. ते निष्वसन अखंड आहे." ('ऋणानुबंध', १२२).

"हे जग कलात्मक आनंदाकरताच निर्माण करण्यात आलेली शक्ती आहे. या कलेत स्फूर्ती आहे, माणुसकी आहे. केवळ वैज्ञानिक हिशोब म्हणजे जग नव्हे. कला आणि पावित्र्य यांचा हा सुरेख संगम आहे." (कित्ता, १२३). अशी कलासक्त धारणा मनात बाळगून जगणारे यशवंतराव सतत मीपण विसरून स्वर्गीय आनंद देणाऱ्या प्रसंगांच्या अखंड शोधात असायचे. असा क्षण मिळणे हाच त्यांना विरंगुळा वाटायचा. असे क्षण जेवढे जास्त मिळतील, तेवढे जीवन सुखी अशी त्यांची धारणा होती. सुखाच्या या क्षणांचे वर्णन ते करतात :

"जीवनात सुखाचे क्षण येतात, ते सूर्याच्या कोवळ्या किरणांसारखे सोनेरी व सतेज असतात. ते क्षणभर राहतात आणि नंतर कडक होतात. परंतु ज्या वेळी हे किरण कोवळे दिसतात, त्या वेळी त्यांचे ते तेज, ते रम्य स्वरूप पाहून मनाला आल्हाद वाटतो, गंमत वाटते. नदीच्या खोल डोहात दगड टाकला, की पाण्यावर तरंग उठतात, एकातून एक अशी वर्तुळे उठतात आणि पाहणाऱ्याला मोठी मजा वाटते. जंगलातल्या वाटेने जात असताना उन्हाच्या वेळी एखादा झरा दिसला, की त्याचे पाणी पिताना केवढा आनंद होतो... ओढ्याच्या काठी भरगच्च जांभळांनी भरलेल्या झाडाची चार जांभळे तोंडात टाकली की, ती किती गोड लागतात... जीवनामधील आनंदाचे क्षण हे असे असतात." ('सह्याद्रीचे वारे', ३१४).

यशवंतरावांचे हे जीवनभाष्य म्हणजे नितांत रमणीय काव्य आहे. आपल्या

स्मरणसारणीत अशा सुखाच्या क्षणांची इतकी भरगच्च बांधणी यशवंतरावांनी करून ठेवली होती, की राजकीय धकाधक असो, की राजकीय विजनवास, कपटकारस्थानांनी वेढले असो, की आव्हानांनी त्रस्त केलेले असो, यशवंतरावांचे मानसिक संतुलन कधीच डळमळले नाही, कारण त्यांचा हा आंतरिक आनंदाचा झरा कधीच आटणारा नव्हता, कुणाला तो हिरावून घेणेही सर्वथैव अशक्य होते.

शब्दसामर्थ्यावर व सौंदर्यावर विश्वास आणि भाषेचे प्रेम

ललितलेखनासाठी आवश्यक असणाऱ्या पर्यावरणापेक्षा सपशेल वेगळ्या पर्यावरणात हयातभर वावरत असूनही यशवंतराव आपल्यातला ललितलेखक विनासायास जिवंत ठेवू शकले, याचे मुख्य कारण त्यांना शब्दांचे सामर्थ्य व महत्त्व पटलेले होते, भाषेवर त्यांचे अतोनात प्रेम होते आणि भाषेचे त्यांना जागते भान होते. शब्दाच्या सामर्थ्यावर व सौंदर्यावर असलेला आपला विश्वास यशवंतरावांनी अनेकदा व्यक्त केला आहे. 'दोन ध्रुव' या खांडेकरांच्या शब्दांचे उदाहरण देऊन त्यांचा सामाजिक आशय आणि त्यातून सूचित होणारी नवी जाणीव ते उकलून दाखवतात. आणि म्हणतात,

"मी शब्दांना फार मानतो. त्यांच्यात अस्त्रांचे सामर्थ्य आहे, तसेच प्रकाशाचे तेज आहे. एखादा शब्द कोणी अशा वेळी उच्चारतो, की त्यामध्ये एक विलक्षण सामर्थ्य येते" ('ऋणानुबंध', २४८).

'गांधींच्या छोडो भारत' शब्दांचे उदाहरणही त्यांनी या संदर्भात दिले आहे. त्यांच्या मते,

"नवनिर्मितीचे सर्जनशील कार्य जसे शब्द करतात, तसेच साम्राज्यशक्ती धुळीला मिळविण्याचे संहारक सामर्थ्यही शब्दांत आहे. कल्पना, विचार आणि शब्द यांचा त्रिवेणी संगम ही मानवी इतिहासातील एक जबरदस्त शक्ती आहे" (कित्ता, ७).

शब्द हेच ज्यांचे प्रमुख माध्यम व शस्त्र आहे, असे साहित्यिक आणि राजकारणी हे त्यांना शब्दबंधू वाटतात.

"मराठी भाषेला इतिहासाने वस्त्र दिले, तर भूगोलाने ते शिवून मराठी भाषेच्या अंगावर घातले व तिच्या रूपात भर घातली ('ऋणानुबंध', १९८). मराठी भाषेची वाटचाल अशी सूचित करणाऱ्या यशवंतरावांना उत्तर व दक्षिणेकडील विचारप्रवाहांनी आणि पश्चिम किनाऱ्यावरच्या सागरी वाहतुकीच्या वर्दळीने मराठी भाषेवर केलेल्या विविध संस्कारांचे महत्त्व जाणवले आहे. परिणामी मराठीला जे सर्वांगीण सर्वसंग्राहक स्वरूप प्राप्त झाले, त्याचा यशवंतरावांना रास्त अभिमान वाटत होता, साधुसंतांच्या हातून उपदेशाचे आर्जव,

युद्धातील सैनिकांच्या तोंडून शत्रूला ललकारणारे आव्हान, एकीकडे कल्पनातीत कोमलता आणि दुसऱ्या बाजूने वज्राची कठोरता, यादव कुळात व मराठा युगात वीररसप्रधान, पेशवाईत लावणीचा शृंगार, तर आता अवघे लोकजीवन व्यापणारी सर्वंकष अशी परिस्थितीसापेक्षता ही मराठी भाषेची वैशिष्ट्ये त्यांनी अचूक टिपली आहेत.

यशवंतराव महाराष्ट्र राज्याचे स्वप्न जेव्हा मनाशी रेखाटीत, तेव्हा मराठी जनता नव्हे, तर मराठी भाषाच त्यांना सिंहासनारूढ झालेली दिसायची. मराठी ही राजभाषा व्हावी. लोकजीवन समृद्ध करण्याचे एक महत्त्वाचे साधन ठरावी. तिच्या माध्यमातून सर्व अभ्यासक्षेत्रांतील विचारसंपदा अभिव्यक्त व्हावी आणि त्यायोगे तिची विचारवहनाची क्षमता वृद्धिंगत व्हावी, असा ध्यास त्यांना लागून होता. ज्ञानविज्ञानाचे मूलभूत संशोधन मराठीतून व्हावे आणि एकूणच सर्व संशोधन समाजाभिमुख व्हावे, असा त्यांचा आग्रह होता. साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना करण्यामागे मराठी भाषेतून अभिजात ग्रंथांची उपलब्धी व्हावी, हाच त्यांचा मूळ हेतू होता, भाषाभिवृद्धीला ते सांस्कृतिक विकासाचे एक गमक मानीत. रवींद्रनाथांनी शिवचरित्र बंगाली भाषेत नेल्याबद्दल भारावून बोलणारे यशवंतराव रवींद्रांचे जीवनकाव्य मराठीत यथोचित प्रमाणात न आल्याबद्दल व्यथित उद्‌गार काढीत असत.

जीवनवादी दृष्टिकोन

साहित्यासंबंधी यशवंतरावांचा दृष्टिकोण हा पूर्णपणे जीवनवादी होता. साहित्य हे लोकजीवनातूनच निर्माण होत असते आणि लोकजीवनाचे प्रतिबिंब प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे साहित्यावर आणि साहित्याचा परिणाम लोकजीवनावर पडतच असतो, याबद्दल त्यांच्या मनात शंका नव्हती. साहित्याची व्याख्याच ते अशी करतात, की वैयक्तिक वा सामाजिक मानवी जीवनाच्या कोणत्याही पैलूची भाषेच्या मदतीने केलेली अभिव्यक्ती म्हणजेच साहित्य. त्यात स्वाभाविकच मानव आणि मानवोपयोगी प्रवृत्ती यांचे चित्रण घडते. ते म्हणतात,

"साहित्याचा समाजजीवनासाठी आरशासारखा उपयोग होतो. कारण या साहित्यात सर्वसाधारण लोकांच्या, सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक प्रवृत्तीचे प्रतिबिंब सापडते. त्यातच साहित्याच्या उत्पत्तीचे व जनतेच्या अभिव्यक्तीचे रहस्य दडलेले आहे, हे सत्य असे आहे, की ज्याला समस्त मानवी इतिहासाचा पुरावा देता येईल." ('ऋणानुबंध' २०२). साहित्य हे त्यांच्या मते 'थर्मामीटरमधील पाऱ्याप्रमाणे संवेदनशील' असले पाहिजे. साहित्यिक मूल्ये आणि सामाजिक- राजकीय मूल्ये त्यांना अविभाज्यच वाटतात. त्यांच्या मते साहित्याची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करून देणारीच असली

पाहिजे. जे मानवी मूल्ये प्रतीत करते, तेच अक्षरवाङ्मय ठरते. (सह्याद्रीचे वारे, २९४).

कलेसाठी कला हा मुक्त 'स्वतंत्रतावादी' विचार यशवंतरावांना मुळीच मान्य नव्हता. एका संदर्भात ते म्हणतात,

"कुठलाही महाकवी किंवा कवी निव्वळ शब्दांचा जुळारी होऊन कवी होऊ शकत नाही. नादमाधुर्य म्हणजेच काव्य, असे आपणास म्हणता येणार नाही... निव्वळ नादमाधुर्यातूनच निर्माण होणाऱ्या काव्यात जनतेचे मन काबीज करण्याचे सामर्थ्य निर्माण होऊ शकत नाही, त्या जुळणाऱ्या सुंदर, नादमधुर शब्दांच्या पाठीमागे एक नवा सामर्थ्यवान संदेश देणारे मन आणि विचार असल्याशिवाय कवी किंवा महाकवी निर्माण होऊ शकत नाही" (कित्ता, २७४).

शब्दांत लालित्य असावे, पण तो काही साहित्याचा आत्मा नसतो.

विचारांच्या पार्श्वभूमीवर भावविश्वात न्हाऊन निघालेली जिवंत अनुभूती व्यक्त होताना ललित रूपच घेते. मग ती अनुभूती कोणत्याही क्षेत्रातली का असेना!" असे त्यांचे मत होते. ('ऋणानुबंध', ४).

साहित्याला समाजजीवनात एक निश्चित प्रयोजन असते. समाजाच्या रचनापर्वात नव्या विचारांची, ज्ञानाची व मूल्यांची भर टाकत राहणे हे साहित्यिकाचे महत्त्वाचे कार्य असते. कारण त्या विचारांनी भारलेले कार्यकर्तेच समाजाला पुढे नेत असतात. कलाबाह्य निकष लावून हेतुवादी साहित्य ते श्रेष्ठ ठरवीत नसले, तरीही 'समाजाच्या प्रबोधनासाठी, त्याचा भावपिंड घडवण्यासाठी ललित साहित्याचा निश्चित उपयोग होतो.' ('ऋणानुबंध' २०७) अशी त्यांची खात्री होती. त्यांच्या मते समाजक्रांतीविषयी अनुकूल मनोभूमी तयार करावयाची असेल, तर प्रस्थापित समाजातील विसंगती, अंतर्विरोध आणि त्यामुळे निर्माण होणारी कोंडी यांचा कलात्मक आविष्कार साहित्यिकांनी करायलाच पाहिजे. साहित्यातील सामाजिकता व सामाजिक जाणीव ही सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देत असते. सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांचा व वैशिष्ट्यांचा सूक्ष्म विचार करणे, विज्ञानयुगाने व नवजीवनाने निर्माण केलेल्या नवजाणिवांचा स्वीकार-प्रसार करणे आणि समाजाचे प्रबोधन करणे ही साहित्याची प्रयोजने असल्याचे यशवंतरावांनी सांगितले आहे.

'जैथे थे'वादी परिस्थितीचे शाब्दिक फुलोऱ्याचे वर्णन करीत राहणे हे त्यांच्या दृष्टीने काही चांगले साहित्यसर्जन नव्हे. विचार बदलतात, स्थिती बदलते, जी वाहते, तिलाच नदी; तसेच नित्य बदलत जातो, त्यालाच ते विचार मानतात. त्यामुळे बदलत्या समाजस्थितीचा, बदलत्या समाज वास्तवाचा वेध त्यांच्या मते लेखकाने घ्यायलाच हवा. साहित्याचे तेच खरे प्रयोजन असते. लेखकाने संपाला पाठिंबा द्यावा, की विरोध करावा,

हा त्याचा प्रश्न आहे; पण संपामुळे कामगारांची जी परवड होते, त्यांच्या कुटुंबियांचे जे हाल होतात, त्या वाताहतीचे चित्र जो लेखक रेखाटील, तोच जगण्याच्या शाश्वत प्रेरणेशी इमान राखू शकेल, असे यशवंतरावांना वाटते. ज्या साहित्यातून अमंगलाचा नाश आणि मंगलाची स्थापना होते, तेच साहित्य उदात्त गुणांची प्रेरणा देऊन समाजाला प्रगतीच्या दिशेने गतिमान करू शकते.

लेखकाची बांधिलकी

लेखकाच्या बांधिलकीसंबंधी यशवंतरावांची भूमिका या संदर्भात नमूद करता येईल. ते बांधिलकीचे समर्थक होते. लिहिताना लेखकाला माणसांच्या प्रश्नांचे भान आणि जाण असणे, शोषित-दलित-उपेक्षित वर्गाच्या भवितव्याची ओढ आणि त्यांच्यावरील अन्यायाची चीड असणे- ही त्यांच्या मते उत्तम लेखकाची कसोटी असते. त्यांच्या शब्दात,

- "आपल्या देशात विषमतेचे, दारिद्र्याचे जे प्रश्न आहेत, शतकानुशतके उच्चवर्णीयांचे वर्चस्व आहे- या परिस्थितीच्या निर्मूलनाचा. प्रतिज्ञा लिखाणामागे आहे, की नाही, ही मी मूलभूत कसोटी मानतो. ज्याला समाजाचे, सामान्य माणसाचे प्रेम आहे, अशा लेखकाच्या साहित्यातून समाज येणारच. खरा साहित्यिक समाजापासून दूर असू शकत नाही." ('पुस्तक पुंढरी.' दिवाळी अंक १९८३, ३२).

सुंदर शब्द व प्रतिमा साहित्यात अवश्य असाव्यात. पण 'हे शब्द व प्रतिमा यांच्या पाठीशी असलेल्या प्रेरणा या जीवनाच्या अनुभवावर अधिष्ठित आहेत, की नाहीत?' हा प्रश्न त्यांना अधिक महत्त्वाचा वाटतो (कित्ता, ३३). शंकरराव खरात, भालचंद्र नेमाडे, चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या कादंबऱ्या, जयवंत दळवी, विजय तेंडुलकर यांची नाटके यांचा उदाहरणार्थ उल्लेख त्यांनी केला आहे. कानेटकर यशस्वी नाटककार असले, तरी ही बांधिलकी त्यांच्यात आढळत नाही. केशवसुतांचे वर्णन ते 'उत्स्फूर्त बांधिलकी असलेला मराठीतील पहिला आधुनिक कवी' अशी करतात (कित्ता, ३५).

त्यांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक बांधिलकीच्या कल्पनेचे रूढ कल्पनेहून असलेले वेगळेपणही यशवंतरावांनी स्पष्ट केले आहे. कोणताही गट, किंवा पक्ष किंवा व्यक्ती यांच्याशी बांधून घेणे हा बांधिलकीचा अर्थ त्यांना मान्य नाही. कारण अशा बांधिलकीतून त्यांच्या मते फक्त प्रचार-वाङ्मयच निर्माण होऊ शकते. त्याला ते साहित्यच मानीत नसत. स्वतःशी प्रामाणिक असलेल्या लेखकाची वैचारिक बांधिलकी त्याच्या उत्तम ललित कृतींमधून अवश्य उमटतेच. ती बाहेरून आयात करता येत नाही वा कलम करण्याचा किंवा लादून

घेण्याचाही प्रश्न नाही. ती आतून यावी लागते. उत्स्फूर्त वाङ्मयाच्या निर्मितीला जी प्रेरणा कारणीभूत होते, त्यात बांधिलकीची बीजे, त्यांच्या मते, अपरिहार्यतः असतातच, तेव्हा अमूक एकाच पक्षाचा वा विचारसरणीचा स्वीकार, म्हणजे बांधिलकी, हे समीकरणच चुकीचे आहे.

बांधिलकीचा संबंध संपूर्ण समाजजीवनाशी प्रामाणिक असण्याशी आहे. विशिष्ट गटाशी वा पंथाशी केवळ नव्हे. अशा प्रकारे यशवंतराव बांधिलकीला कोणताही विशिष्ट रंग देऊ इच्छीत नाहीत. त्यांच्या मनातला बांधिलकीचा अर्थ अधिक व्यापक, विशिष्टतेपलीकडे जाणारा व मूलभूत आहे. नारायण सुर्वेंच्या साहित्याला ते मानतात, याचे कारण ते मार्क्सवादी आहेत, एवढ्यापुरते सीमित नसून 'सुर्वे हे मानवी दुःखाने व्यथित होतात, त्यांच्या मनात त्वेष आहे' या कारणाने ते त्यांना लक्षणीय वाटते. मार्क्सवादी असूनही प्रचारकी नसलेल्या साहित्याची उदाहरणे म्हणून त्यांनी मॅक्झिम गॉर्कीच्या 'मदर' या कादंबरीचे तसेच टॉलस्टॉयच्या 'वॉर ॲण्ड पीस' या कादंबरीचे उदाहरण दिले आहे ('पुस्तक पंढरी', ३७). अन्यत्र ते म्हणतात,

"साहित्य कोणत्याही रंगाचे असले, तरी चालेल, पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून समाजात सर्व स्थरांत निर्माण झालेल्या अस्वस्थतेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे." ('ऋणानुबंध', २०७).

त्यांच्या मते जे वाङ्मय मानवाच्या मूलभूत सद्भावनांना आवाहन करते आणि मानवाला जीवनसंघर्षासाठी समर्थ बनविते, ज्यामुळे समाज नित्य प्रगतीला अभिमुख राहतो, तेच अक्षर वाङ्मय या संज्ञेस पात्र ठरते. (कित्ता, २००).

यशवंतराव दलित साहित्याचे स्वागत करतात, समर्थन करतात. दलितांच्या राजकीय हक्कांना सामाजिक बळ न लाभल्यामुळे आपल्या समाज-जीवनात जो विसंवाद व संकुचितपणा निर्माण झाला आहे, त्याची दलित साहित्य ही अपरिहार्य फलश्रुती आहे, असे त्यांना वाटते. दलित साहित्यिकांनी मराठी साहित्यक्षेत्रात मोलाची भर घातली, हेही ते खुल्या मनाने मान्य करतात.

"उच्चभ्रू साहित्याचे किंवा त्यांच्या संकल्पनांचे मानदंड लावून (दलित साहित्याला) जोखणे चुकीचे आहे. उच्चभ्रू साहित्यात पाश्चात्य वळणाची अश्लीलता आपणाला चालते, दलित समाजातून येणाऱ्या साहित्यिकांच्या भाषेस मात्र आपण नाके मुरडतो. हा नैतिक भेदभाव आहे, दुहेरी मानदंडाची भावना त्यामागे आहे." (कित्ता, २१०) अशा शब्दांत दलित साहित्याची तरफदारी यशवंतरावांनी केली आहे.

दलित साहित्यिकांच्या भाषेला अशिष्ट व ओंगळ ठरवणाऱ्या समीक्षकांना कानपिचक्या

देऊन यशवंतराव त्या भाषेचे कार्यकारण तर देतातच, शिवाय या नव्या प्रवाहातून मराठी भाषेला व समाजाला होणार असलेल्या संभाव्य फायद्यांचे संसूचनही करतात. त्यांच्या मते भाषेचे माध्यम जर अभिव्यक्तीसाठी असेल, तर तिचा सामाजिक अभिव्यक्ती हाही एक अविभाज्य भाग मानणे क्रमप्राप्तच ठरते. हजारो वर्षे दडपल्या गेलेल्या समाजाचा पहिला उद्‌गार रूढ कल्पनेप्रमाणे असूच शकत नाही, तशी अपेक्षाच अनाठायी आहे. उलट तो उद्‌गार निघाला, हेच सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे असल्यामुळे आपण त्याचे स्वागत करायला पाहिजे, असे यशवंतरावांना वाटते. हजारो वर्षांचे संस्कार अशा अभिव्यक्तीतून बाहेर पडले, तर ते सामाजिकदृष्ट्या आरोग्यदायक ठरेल, उपेक्षित सामाजिक स्थरांच्या भावनांची कोंडी फुटून त्याचा सामाजिक सुधारणेसाठी व सामाजिक प्रक्रियेसाठी उपयोग होऊ शकेल, अशी खात्री ते बाळगतात. त्यांच्या मते त्या समाजगटांचे एकूण समाज-व्यवस्थेसंबंधीचे मत, त्यांचा अनुभव इत्यादींचे जे आविष्करण दलित साहित्यातून घडते, त्याचा उपयोग समाजव्याधींवर इलाज करू पाहणाऱ्या सुधारकांना निश्चित होऊ शकेल. अशा प्रकारे साहित्यबाह्य निकषांसाठीही दलित साहित्य त्यांना मौल्यवान वाटते.

-आणि खुद्द साहित्यिक संदर्भात जरी विचार केला, तरी या साहित्याचे योगदान त्यांच्या मते मोलाचेच आहे.

"आदिवासी व उपेक्षित जाती यांची भाषा आता नव्या मराठी भाषेत येणार आहे. हे सामुदायिक चयन किंवा देवाणघेवाण भाषेच्या दृष्टीने उपयुक्त आहे. त्याने मराठी भाषा समृद्ध होईल. म्हणून दलित साहित्याची भाषा कदाचित वेगळी वाटली, तरी तिचा कस, तिच्यातील रग, जर नव्या मराठीत उतरली, तर ती हवीच आहे." (कित्ता, २११) अशा भूमिकेतून जाणकारांनी व सामान्य वाचकांनी दलित साहित्याविषयी स्वागतशील वृत्ती ठेवावी, असा सल्ला यशवंतराव देतात.

दलित साहित्याचे अंतरंग असे आस्थापूर्वक उलगडून दाखविणारे यशवंतराव साहित्याचा विचार संकुचित दृष्टीने करीत होते, असा ठपका मात्र कुणीच ठेवू शकत नाही, किंवा त्यांना मराठी भाषेचा अभिमान असला, तरी त्यांची भूमिका संकुचित प्रदेशाभिमानाची ठरवणेही कुणालाच शक्य नाही. भारतीय भाषा-भगिनींमधील आदान-प्रदानातून मराठी साहित्यात अखिल भारतीयत्व यावे, ऐतिहासिक अपघाताने जे आपल्या मनाचे पश्चिमीकरण झाले आहे, त्यातून संभवणारे एकारलेपण घालवण्यासाठी आशियाई व आफ्रिकी साहित्याचा तसेच संपूर्ण विश्वसाहित्याचा योजनापूर्वक, व्यापक व सखोल अभ्यास साहित्यिकांनी करावा, अशी आवाहने त्यांनी केली आहेत, हे या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे.

"भारतीयता, विश्वात्मकता व मराठीपणा हे तिन्ही गुण एकाच वेळी नांदले,

तरच आपले साहित्य समृद्ध होईल, त्यात भिन्न रुचित्व येईल, इंद्रधनुष्याची प्रभा त्यावर पसरेल, असा त्यांना विश्वास वाटतो." (कित्ता, २१३).

अशाप्रकारे कलावंताची तरल संवेदनक्षमता, सर्जनशील नवनवोन्मेषशाली प्रतिभा, शब्दशक्तीच्या समर्थ किमयेच्या क्षमतेचे परिपूर्ण भान, व्युत्पन्न मती आणि उदंड व्यासंग, साहित्याबद्दलची चोखंदळ जाण आणि साहित्य व समाज यांच्यांतील अन्योन्याश्रयी नात्याचे यथार्थ भान, चतुरस्र अनुभवसंपन्नता आणि आस्वादक समीक्षाबुद्धी इत्यादी दुर्मिळ गुणांचा समुच्चय यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वात होता. अव्वल दर्जाच्या कलाकृतीसाठी लागणारा कच्चा मालमसाला असा त्यांच्या ठिकाणी भरगच्च असल्यामुळे साहित्यक्षेत्रात ते प्रचंड मोठी कामगिरी करू शकले असते. पण राजकारणाच्या गदारोळात उभी हयात गेल्यामुळे हे ते करू शकले नाहीत. त्यांच्यातल्या कलावंत-लेखकाने योजलेले अनेक आराखडे मनातल्या मनातच राहून गेले. हे सर्व पाहिल्यावर ना. सी. फडक्यांनी त्यांच्या लेखणीबद्दल म्हटले आहे, तेच पटते.

"भावनेनं ओथंबलेलं, प्रभावी भाषेनं नटलेलं लेखन जी लेखणी करू शकते, ती साधीसुधी लेखणी नाही. श्रेष्ठ दर्जाच्या अस्सल साहित्यिकाच्या हातांत शोभावी, अशीच ती आहे. यशवंतरावांच्या लिखाणाचा आस्वाद जेव्हा जेव्हा मी घेतो, तेव्हा तेव्हा माझ्या मनात येतं, यशवंतरावांच्या रूपानं महाराष्ट्राला पडलेल्या नेतेपणाच्या ओझ्यामुळे यशवंतरावांच्या ठिकाणी जो श्रेष्ठ साहित्यिक आहे, त्याचे पूर्ण कर्तृत्व प्रगट होत नाही, ही खेदाची गोष्ट मानावी लागेल."

भावी काळात यशवंतरावांच्या हातून विपुल साहित्यलेखन होईल, असा आशावाद त्या वेळी फडक्यांनी व्यक्त केला होता. किमान संपूर्ण आत्मचरित्राचे लेखन त्यांच्या हातून घडून ही आशा सफल व्हायला हवी होती.

●●●

६. यशवंतरावांनंतरचा महाराष्ट्र

१९५६ पासून द्वैभाषिक राज्याचे आणि मे १९६० पासून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रीपद भोगून यशवंतराव केंद्रसरकारात संरक्षणमंत्री म्हणून गेले. सहा वर्षे त्यांनी या राज्याची धुरा समर्थपणे सांभाळली. ते येथून गेल्यानंतरच्या या राज्याच्या वाटचालीचा ऊहापोह करणे हे प्रस्तुत प्रकरणाचे प्रयोजन आहे. विशेषतः संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश आणला तेव्हा त्यांनी जे आदर्शचिंतन नव्या राज्याच्या संदर्भात केले होते, आणि मुख्यमंत्रीपदाच्या आपल्या अल्पस्वल्प कारकीर्दीत ते आदर्शचिंतन प्रत्यक्षात उतरवण्याच्या दृष्टीने जी ठोस पावले पक्ष, प्रशासन, अर्थकारण, समाजकारण, शिक्षण-साहित्य- संस्कृती इत्यादी आघाड्यांवर उचलली होती त्यांचे त्यांच्या पश्चात काय झाले हे पाहणे, त्याचप्रमाणे शक्य झाल्यास तसे होण्याची कारणमीमांसा करणे असाही प्रयत्न येथे केला आहे.

भारतीय लोकशाही क्रांतीचा महिमा ज्यांच्या जीवनातून नजरेत भरतो, ज्यांच्या जीवनात भारताच्या वर्तमान युगाचा गर्भितार्थ अधिक सखोलपणे सूचित होतो आणि तमाम युगप्रेरणा, ध्येयवाद, स्थित्यंतरे व घडामोडी यांचा ध्वन्यर्थ ज्यांच्या जीवनात प्रत्ययास येतो अशा अत्यंत मोजक्या व्यक्तींपैकी यशवंतराव होते अशा आशयाचे विधान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले होते. समस्यांचे आव्हान स्वीकारणे आणि त्या सोडविणे असा अव्याहत क्रम यशवंतरावांच्या आयुष्यात दिसून येतो. यशवंतरावांचे हे मोठेपण वादातीत असले तरी त्यांच्यावर सर्व सद्‌गुणांचे आरोपण करून त्यांची विभूतिपूजा करणे येथे अभिप्रेत नाही. किंबहुना त्यांच्या गुणांइतकेच त्यांचे दोषही मोठे होते. त्यांच्या हातून अनेक गंभीर चुका घडल्या हे लपवण्याचे काहीच कारण नाही. दुसरे असे की, यशवंतरावांनंतरच्या महाराष्ट्राचे सिंहावलोकन करताना एका व्यक्तीच्या कर्तुमकर्तुम शक्तीनुसार इतिहास निर्णायक

वळणे घेतो असे येथे गृहीत धरलेले नाही. यशवंतराव १९६२ नंतरही महाराष्ट्राचे प्रत्यक्ष सूत्रधार राहिले असते तर फार काही निराळे येथे घडले असते असेही नाही. तरीपण काही माणसे अशी असतात, की ऐतिहासिक वाटचालीत त्यांचे स्थान मैलाच्या दगडाचे असते. त्यांच्या आधीचा कालखंड त्यांनी विस्मरणात टाकलेला असतो, वर्तमानाला निर्णायक वेगळे रूप देऊन भविष्यकाळाचा इसार दिलेला असतो. महाराष्ट्राच्या संदर्भात अशा एकाच माणसाचे नाव सांगायचे झाल्यास ते यशवंतराव चव्हाण याखेरीज दुसरे असणार नाही. म्हणूनच त्यांच्यानंतरच्या महाराष्ट्राच्या वाटचालीची त्यांच्या निकषांवर तपासणी केल्यास ते अनाठायी होणार नाही.

यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय नेतृत्वशैलीची काही वैशिष्ट्ये प्रस्तुत पुस्तकात अन्यत्र नोंदवलेलीच आहेत. सभ्य व सुसंस्कृत संसदपटू म्हणून साध्या आमदारापासून मुख्यमंत्री, संरक्षणमंत्री, गृहमंत्री, वित्तमंत्री,परराष्ट्रमंत्री, उपप्रधानमंत्री आणि संसदीय विरोधी पक्षनेते अशा विविध भूमिका यशवंतरावांनी पार पाडल्या. ज्या जिल्ह्यात कुऱ्हाडीचे राजकारण प्रचलित होते आणि खुद्द यशवंतरावांपर्यंत ते साक्षात पोचले होते, तेथे राजकीय नेतृत्वाचे प्राथमिक धडे गिरवले असूनही यशवंतरावांनी स्वतः बेरजेचेच राजकारण केले. त्यासाठी मैत्री, सद्भावना याबरोबरच व्यवहारचातुर्य आणि मुत्सद्देगिरी यांचाही कुशल वापर केला. संकुचित सांप्रदायिक विचारापासून आणि क्षुद्र जातिवादापासून स्वतःला कटाक्षाने दूर ठेवले. स्वतःच्या पक्षाची महाराष्ट्रात पुनःप्रतिष्ठापना जशी त्यांनी केली, तसेच विरोधी पक्षांना त्यांनी एकेक करून नेस्तनाबूत केले. अर्थरचना, प्रशासनपद्धती व शिक्षण हे तिन्ही मूलभूत विषय मूलगामी पद्धतीने व विशिष्ट हेतू मनात बाळगून यशवंतरावांनी हाताळले. नव्या महाराष्ट्राचा आराखडा मनात बाळगून कारभार केला.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या काळात सूर्याजी पिसाळ, कुंपणावरचे नेते, केंद्रीय पक्षश्रेष्ठींच्या ओंजळीने पाणी पिणारे, महाराष्ट्रद्रोही, गुजराती भांडवलदारांचे पित्तू अशा अनेक दूषणांनी ज्यांचा टीकाकारांनी सतत पाणउतारा केला होता; त्या यशवंतरावांनी आपल्या सहा वर्षांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कालावधीत ती कलुषित प्रतिमा जनमानसातून पुसण्यात यश मिळवले. ते श्रेष्ठींचे कळसूत्री बाहुले नाहीत किंवा महाराष्ट्राचे मारेकरीही नाहीत हे त्यांनी आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केले.

यशवंतरावांचा वारसा

ब्राह्मण - ब्राह्मणेतरवादाची प्रदीर्घ परंपरा असलेल्या आणि गांधीहत्येनंतरच्या जाळपोळींनी त्या वादाला नवी उग्रता आलेल्या महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाची घडी

सुरळीत बसवण्याचे श्रेय यशवंतरावांना द्यावे लागते. जेधे-गाडगीळांनी सुरू केलेली, पण मध्ये काही काळ खंडित झालेली महाराष्ट्र काँग्रेसच्या बहुजनीकरणाची प्रक्रिया यशवंतरावांनी पुन्हा गतिमान केली आणि पूर्णत्वास नेली. संख्येने चाळीस टक्के असलेला आणि संपूर्ण राज्यभर विखुरलेला मराठा-कुणबी समाज हा आपल्या राजकारणाचा मुख्य आधार त्यांनी केला असला तरी विविध भागांत लक्षणीय राजकीय ताकद असणाऱ्या अन्य जातींचाही रोष ओढवू नये अशी दक्षता यशवंतरावांनी घेतली होती. खानदानी मराठाश्रेष्ठींना बाजूला ठेवून मराठा व कुणबी यांच्यातील ऐतिहासिक अंतर मिटवण्याचा त्यांनी जोरदार प्रयत्न केला होता. त्या जातिसमूहातील पोटजातींची उतरंड त्यांनी राजकीयदृष्ट्या अप्रस्तुत ठरवली. दलितांच्या उदयोन्मुख नेतृत्वाला आपल्या पंखांखाली घेऊन त्यांच्या पृथक् राजकीय शक्तीला आवर घातला. ब्राह्मणवर्गाला सुरक्षित वाटून त्याचे सहकार्य मिळावे, असे वातावरण त्यांनी जाणीवपूर्वक निर्माण केले. रा. सुहास पळशीकर म्हणतात त्याप्रमाणे "एकजातीय वर्चस्व आणि बहुजातीय सहमती यांच्या आधारावर काँग्रेस उभी राहिली. काँग्रेसच्या वर्चस्वात सामाजिक संघर्षाला मध्यवर्ती स्थान नव्हते, तसेच कोणताही समाजघटक सत्तेतून हद्दपार करण्याऐवजी त्याच्या समावेशनावर भर होता" ("महाराष्ट्राचे बदलते राजकारण", भोळे-बेडकिहाळ संपादित, बदलता महाराष्ट्र, २५).

मराठा-कुणबी श्रेष्ठींनी आपले वर्चस्व महाराष्ट्राच्या राजकारणावर बसवत असतानाच इतर जातींच्या समावेशनाकडे लक्ष दिले. जिथे मराठेतर जातींचे लक्षणीय वर्चस्व असेल तिथे त्यांनी त्यांना सत्तेत वाटेकरी करून घेतले. त्यामुळे एकजातीय वर्चस्व प्रस्थापित करूनही बहुजातीय स्वरूपाचा राजकीय अभिजनवर्ग अस्तित्वात असल्याचा आभास त्यांना निर्माण करता आला. भिन्नजातीय अभिजनांची संयुक्त आघाडी उभी राहिल्यास मराठी राज्याला व्यापक व सर्वसमावेशक पाया लाभेल असा यशवंतरावांचा होरा होता. काँग्रेस पक्षातील तसेच विकेंद्रित लोकशाहीतील आणि सहकारी संस्थांतील सत्तापदे मिळवण्यासाठी विविध जातीय अभिजनांना स्पर्धा करण्याची संधी उपलब्ध असणे हे यशवंतरावांच्या राजकारणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. व्यापक पायावरचे मराठी राज्य एकदा दृढमूल झाल्यानंतर सर्व अंतर्विरोधी व स्पर्धात्मक हितसंबंधांच्या पलीकडे जाणे शक्य होईल असा त्यांचा त्यामागे आराखडा असावा (जयंत लेले, "चव्हाण अँड दि पोलिटिकल इंटिग्रेशन ऑफ महाराष्ट्र", एन.आर. इनामदार व इतर संपादित, कान्टेम्परारी इंडियाः सोशियो-इकॉनॉमिक अँड पोलिटिकल प्रोसेसेस, ३०). चव्हाणांनी आपल्या अनेक भाषणांमधून सर्व जातींच्या श्रेष्ठींना उदारमनस्कतेचे आणि सहिष्णुतेचे आवाहन केलेले आढळते. त्यामागची त्यांची धारणा अशी दिसते की सरकारला साधन करून एक नवी जूट आणि सामाजिक सुसंवाद निर्माण करणे शक्य

होईल. सर्व वैध आणि व्यक्त हितसंबंधांना जिच्यात सामावून घेता येईल अशी राजकीय चौकट उभारता येईल. फक्त त्यांच्यात राजकीय वर्तनाच्या पायाभूत आदर्शांबाबत एकावाक्यता हवी, त्यांच्या मागण्या सहमतीची चौकट मोडणाऱ्या नसाव्यात आणि त्यांना विद्यमान सत्तासंरचनेची अधिमान्यता मंजूर असावी, एवढीच एक अट त्यांना त्यासाठी घालावीशी वाटली होती. ब्राह्मणांनी मराठ्यांबाबत, मराठ्यांनी दलितांबाबत, ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणांबाबत टोकाची अनुदार भूमिका बाळगू नये अशी आवाहने यशवंतरावांनी वारंवार केली होती. मराठ्यांनी आपल्या स्वजातीय व इतर विरोधकांशी जुळवून घेण्याचे, त्यांना सामावून घेण्याचे किंवा सहयोगी करण्याचे आपले ऐतिहासिक कसब पणाला लावून महाराष्ट्राचा सामाजिक एकसंधपणा साध्य करावा अशी त्यांची अपेक्षा होती. मराठा-कुणबी जातिसमूहाने आपल्या धुरीणत्वाला धक्का लागणार नाही इतपत अन्य हितसंबंधांची अपेक्षापूर्ती सरकारला साधन म्हणून वापरून करावी असे त्यांना अभिप्रेत होते. विविध हितसंबंधांमध्ये अशाप्रकारे होणाऱ्या वाटाघाटींमधून जी बहुकेंद्रितता निर्माण होते ती स्वरूपतः खुली असली तरी अंतिमतः वरचढ वर्गांच्याच हिताची असते असा पाश्चात्त्य राष्ट्रांचा अनुभव आहे. कमी विशेषाधिकारधारक असे जे इतर वर्ग असतात त्यांना सामावून घेत घेत वरचढ वर्ग व्यापक होत जातात. 'बहुकेंद्रिततेचा झिरपा सिद्धान्त' असे त्याचे वर्णन लेले करतात (कित्ता, ३३). त्यांच्या आधारे त्यांनी जे महाराष्ट्रात घडले त्याचे विश्लेषण केले आहे; ते आपण पुढे पाहू.

सामाजिक एकजिनसीकरणाप्रमाणेच आर्थिक व राजकीय क्षेत्रातही नव्या संधीसंरचनेची निर्मिती करण्यावर भर देणे हाही चव्हाणशैलीचा एक महत्त्वाचा पैलू होता. मूलतः अंतर्विरोधी असलेल्या हितसंबधांचा मेळ घालण्याचे सूत्र काँग्रेसने पूर्वापार अमलात आणलेलेच होते. बहुकेंद्री लोकशाहीच्या माध्यमातून तेच सूत्र चव्हाणांनी पुढे नेले. बिगरविशेषाधिकारी वर्गांतील अभिजनांपैकी जे अधिक मुखर आणि चिकित्सक असतील त्यांना सामावून घेणे, त्यांना विशेष संधी पुरवून त्यांची मर्जी व पाठिंबा संपादन करणे, विविध हितसंबंधांच्या व्यक्तींसाठी राजकीय विकासाच्या वाटा खुल्या करणे, त्यात काही विक्षेप आल्यास नव्या संधीसंरचना उभ्या करून नव्या पिढीच्या उगवत्या अभिजनांपर्यंत त्या पोचवणे, स्थानिक पातळीवर जे राजकीय महत्त्वाकांक्षा बाळगून असतील त्यांच्यासाठी त्या पातळीवर संधीसंरचना निर्माण करणे अशा अनेक प्रकारांनी यशवंतरावांनी महाराष्ट्राचे राजकारण केले. शेती, सहकार, शिक्षण आणि लोकशाही विकेंद्रीकरण या क्षेत्रांकडे विशेष लक्ष पुरवून त्यांनी मराठा-कुणबी श्रेष्ठींना आपलेसे केले होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्याबरोबर त्यांनी तशी घोषणा केली होती.

महाराष्ट्राला समाजवादाचे स्वरूप यायचे तर येथील राज्यसंस्थेला सकारात्मक

भूमिका पार पाडावीच लागेल अशी खूणगाठ जशी यशवंतरावांनी मनाशी बांधली होती त्याचप्रमाणे जनसामान्यांची विशेषतः ग्रामीण अभिजनांची शासनापर्यंतची पोच कशी वाढेल आणि ते सरकारकडून धोरणात्मक लाभ मिळवण्याच्या स्पर्धेत कशी आघाडी घेऊ शकतील याकडेही त्यांनी आवर्जून लक्ष दिले होते.

कृषि - औद्योगिक क्षेत्राची पायाभरणी

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात मुंबई कोणाची ? महाराष्ट्राची, गुजरातची की स्वतंत्र असावी हा एक कळीचा प्रश्न ठरला होता. त्याच्या मुळाशी देशाच्या अर्थव्यवस्थेतील मुंबई शहराचे अनन्यसाधारण स्थान हे तर एक कारण होतेच, पण त्याचबरोबर मुंबई ज्या राज्यात समाविष्ट होईल तेथील राजकीय अर्थकारणात अत्यंत मूलगामी असंतुलन निर्माण होणे अपरिहार्य होते. मुंबई महानगरातील व्यापारी व औद्योगिक हितसंबंध आपल्याला डोईजड होतील अशी भीती शेतकी हितसंबंध असणाऱ्या ग्रामीण वरचढ वर्गाना वाटत होती. या दोन हितसंबंधांची सांगड घालण्यासाठी काँग्रेस पक्षाने व महाराष्ट्र सरकारने दुहेरी धोरण अवलंबले. एका बाजूने मुंबईखेरीज ठाणे, रायगड, पुणे, नाशिक अशा पट्ट्यात औद्योगिक विकासाला प्रोत्साहन दिले, त्यातून औद्योगिक-व्यापारी हितसंबंधांना सुरक्षिततेची हमी मिळाली. याचवेळी दुसऱ्या बाजूने ग्रामीण विकासावर भर देऊन राज्याचा विकास केवळ शहरकेंद्रित व बिगर शेतीप्रधान असणार नाही तर कृषि-औद्योगिक विकासाच्या दिशेने जाऊन शेतकी हितसंबंधही संरक्षिले जातील असा दिलासा यशवंतरावांनी खेड्यापाड्यातील सधन शेतकऱ्यांना दिला. कृषि-आधारित प्रक्रिया उद्योगांचा विस्तार सरकारी पाठबळावर करण्याचे काही परिणाम या राज्याच्या राजकारणावर तात्काळ दिसून आले. एकतर सधन शेतकरी व सामान्य शेतकरी यांच्यातील हितविरोधाकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष झाले, त्यांचा समन्वित पाठिंबा काँग्रेस पक्षाला मिळवणे शक्य झाले, संभाव्य सुप्त विरोधकांची आव्हाने मुळातच गारद झाली आणि औपचारिक राजकीय सत्तेत प्रबळ शेतकरी जातींना भरपूर वाव मिळाला.

कृषि-औद्योगिक अर्थव्यवस्थेला मुख्य आधारचौकट सहकारी चळवळीतून उपलब्ध झाली. शेतकऱ्यांच्या मानेभोवती आवळले जाणारे सावकारी पाश दूर व्हावेत आणि त्यांना गरजेच्या वेळी अर्थसाह्य मिळावे या हेतूंनी महाराष्ट्रात सहकारी चळवळ आधीपासूनच अस्तित्वात होती. १९५० पर्यंत काही सहकारी साखर कारखानेही खाजगी क्षेत्रात चालवले जात होते. पण एकंदरीत सहकाराच्या अधोसंरचना पन्नासनंतरच्या दशकात मोडकळीस आल्या होत्या. यशवंतरावांनी सहकार चळवळीला नवी ऊर्जितावस्था आणली. राजकीय

महत्त्वाकांक्षा असणाऱ्या अभिजनांना त्यातून त्यांनी एक तगडे क्षेत्र उपलब्ध करून दिले. केंद्राकडून होणारा कर्जपुरवठा आणि उत्पादनांना मिळणारी बाजारभावाची हमी या कारणांमुळे सहकारी साखर कारखाने झपाट्याने वाढले. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात इतरही अनेक सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यात शेतकरी सहकारी पतसंस्था, खते-बी-बियाणे वाटप संस्था, विपणन संस्था इत्यादींचा अंतर्भाव होता. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपूर्वी बहुतेक समृद्ध सहकारी संस्था ग्रामीण श्रेष्ठींच्या हाती होत्या आणि शहरी विश्वाशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. अशा संस्थांची स्वाभाविकच भरभराट झाली होती. जिल्हा आणि त्यापेक्षाही खालच्या पातळयांवरच्या सहकारी पतसंस्थांना किंवा बाजार संस्थांना मात्र आर्थिक चणचण भासत होती. त्यांच्यापैकी बहुतेक संस्था कशाबशा तग धरून राहिल्या होत्या. त्यांच्या क्रमवार संरचना नव्हत्या किंवा सुस्पष्ट अशी स्पर्धाक्षेत्रेही नव्हती त्यामुळे मराठी श्रेष्ठींच्या लोकशाही स्पर्धेला त्या फारशा पोषक नव्हत्या, किंबहुना अडसरच ठरत होत्या. मुळात सहकारी चळवळीला अर्थसाह्य अत्यंत तुटपुंजे असायचे, त्यातही त्यांची त्या संसाधनांपर्यंतची पोच फारच मर्यादित होती. अनेक संस्था नोकरशाही-विलंबांच्या गर्तेत अडकलेल्या होत्या. अतिविशेषाधिकारधारक गटांची संसाधनापर्यंतची पोच आणि त्यांना सहज मिळणारा प्रचंड लाभ, तर ग्रामीण व तालुका श्रेष्ठींची खडतर पोच आणि अत्यल्प लाभ हे चित्र राज्याच्या राजकीय ऐक्याला मारक ठरले असते हे स्पष्टच होते (लेले, पूर्वोक्त, ४४-५) यशवंतरावांनी हा धोका टाळण्याचा प्रयत्न कसोशीने केला. त्यांच्या काळात महाराष्ट्राच्या बहुतेक भागांत सहकारी साखर कारखान्यांचे जाळे पसरले. १९८० पर्यंत त्यांची संख्या शंभरावर पोचली होती. आणि देशात साखरनिर्मितीच्या बाबतीत १९८८ साली उत्तर प्रदेशाला मागे टाकून महाराष्ट्राने पहिला क्रमांक पटकावला होता. ऊसाचे वाढलेले दरएकरी सरासरी उत्पादन, साखरेच्या उताऱ्याबाबत देशात महाराष्ट्राला सतत लाभलेला उच्चांक, कारखान्यांची अव्वल उत्पादनक्षमता व कार्यक्षमता आणि साखर कारखान्यांच्या यशामुळे राज्याच्या ग्रामीण भागात वाढलेले चैतन्य व आत्मविश्वास या सर्वच फार महत्वाच्या जमेच्या बाजू होत्या. साखर कारखान्यांच्या परिसरात सहकारी सूतगिरण्या, सहकारी कुक्कुटपालन संस्था, सहकारी दूध उत्पादन संस्था, शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या इतर सहकारी संस्था, सहकारी खरेदी-विक्री संघ असे अनेक उद्योग उभे राहिले. त्यातून सहकारी पतपेढ्यांचे व सहकारी बँकांचे प्रस्थ वाढले. सहकाराने ग्रामीण भागाचा कायापालट झाला. त्यातून सर्वांगीण विकासाला चालना मिळाली. शैक्षणिक संस्था, आरोग्यसुविधा, अन्य सेवा, वाहतूक-दळणवळण, अशा अनेक बाबतीत नजरेत भरणारी प्रगती घडून आली. (बी.एस. बावीसकर "महाराष्ट्रातील साठोत्तर सहकारी चळवळ", भोळे-बेडकिहाळ,

पूर्वोक्त ७८).

या श्रेयाचा सर्वात मोठा वाटा यशवंतराव चव्हाणांच्या कल्पक नेतृत्वालाच द्यावा लागतो. ते केंद्र सरकारात गेल्यानंतरही दीर्घ काळपर्यंत त्यांचेच नेतृत्व महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला मिळाले होते, आणि या चळवळीच्या राजकीय बळावरच केंद्र सरकारात यशवंतरावांचा दबदबा बराच काळ टिकून राहिला होता. या काळात महाराष्ट्राने जी नेत्रदीपक प्रगती सहकार क्षेत्रात केली ती पाहता त्यास सहकाराचे सुवर्णयुग म्हटल्यास मुळीच अतिशयोक्तीचे होणार नाही (कित्ता, ७९).

पद्मश्री विखेपाटील व धनंजयराव गाडगीळ यांनी लावलेला सहकारी चळवळीचा वेलू तात्यासाहेब कोरे, रत्नाप्पा कुंभार, यशवंतराव मोहिते प्रभृतींनी अक्षरशः गगनावेरी नेला. आपापल्या भागातील सहकारी संस्था त्यांनी स्वावलंबी व सुदृढ तर केल्याच; पण अनेक धाडसी प्रयोग करून सहकाराची क्षितिजे अमाप विस्तारली. शेती, शिक्षण, उद्योग आरोग्य, संगीत, कला इत्यादी क्षेत्रेही उजळली.

सहकार चळवळीला यशवंतरावांनी केलेले योगदान निरनिराळ्या स्वरूपाचे होते. राज्याकडून सहकारी संस्थांना भागभांडवलाच्या किंवा अनुदानांच्या स्वरूपात वाढीव अर्थसहाय्य त्यांनी केले. सरकारी निगराणीखाली त्या संस्थांचे आर्थिक व्यवहार आणले. शेतकऱ्यांना पतपुरवठा करणाऱ्या संस्था सर्व स्तरांवर निर्माण केल्या, तालुका पातळीवरच्या खरेदी-विक्री संघांतून शेतमालाच्या विपणनाबरोबरच शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक आगते (इन्पुटस्) पोचतील अशी दक्षता घेतली, शेतकऱ्यांना प्रसंगोपात्त कर्जाची सुलभ परतफेड करता यावी किंवा आंशिक वा संपूर्ण कर्जमाफी मिळावी असे राजकीय निर्णय घेतले. पत व सेवासंस्थांचे अक्षरशः जाळे ग्रामीण भागात विणले. पण या सर्व गोष्टींपेक्षाही महत्त्वाचे कार्य यशवंतरावांनी केले ते असे की त्यांनी या सर्व सहकारी संस्थांना एका सुबक-सुटसुटीत आणि एकात्मक अशा उतरंडीत गुंफून टाकले. श्रेष्ठींमधील स्पर्धा आटोक्यात ठेवण्याच्या दृष्टीने या फेररचनेचे महत्त्व फारच मोठे होते. मराठ्यांच्या अंतर्गत जे देशमुख-पाटील वगैरे प्रबळ घटक होते त्यांच्यात वरचा दर्जा, अधिक प्रतिष्ठा व मालमत्ता मिळवण्याची स्वाभाविकच स्पर्धा होती. त्या स्पर्धेला पाट काढून देण्याचे कार्य सहकारी संस्थांच्या उतरंडवजा पुनर्रचनेमधून साध्य झाले होते. (लेले, पूर्वोक्त ४४).

या स्पर्धेचे रणमैदान काँग्रेस पक्षांतर्गतच राहील आणि त्यात कोणत्याही गटाची सरशी झाली तरी त्याचा फारसा बरा-वाईट परिणाम पक्षाला भोगावा लागणार नाही, याचीही काळजी यशवंतरावांनी घेतली होती. पंचायत राज्याच्या तिन्ही पायऱ्या, सहकारी संस्थांचे विविध स्तर आणि काँग्रेस पक्षाची तळपातळीपासून बांधलेली संघटना या तिन्ही

संस्थांची सूत्रे त्या त्या पातळीवरील काँग्रेसजनांकडेच असल्यामुळे आमदार- खासदारकीसाठी करावयाची त्यांची स्पर्धा प्रथम या केंद्रांमधून चालत असे. ती केंद्रे तशी एकमेकांशी निगडीत व एकमेकांत गुंतलेली अशीच होती. एखाद्या नेत्याचे सहकारी संस्थांमधून पराभूत होणे त्याचे जिल्हा परिषदेतील स्थानही धोक्यात आणत असे आणि पतसंस्थेचे वा बँकेचे नियंत्रण एखाद्याच्या हातून निसटले तर त्याची आमदारकीही धोक्यात येत असे. काँग्रेस पक्षाची ताकद संकलित करण्यासाठी अशी अनुकूल परिस्थिती यशवंतरावांनी या तिन्ही संस्थांच्या जोडणीतून निर्माण केली होती. निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवारांना धरून ठेवण्यासाठी त्यांची नामनिर्देशने या तीनपैकी एखाद्या संस्थेतील सत्तापदावर करणे हा यशवंतनीतीचा एक भागच झाला होता.

लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग त्याकाळी यशवंतरावांनी जेवढा तत्परतेने राबवला तेवढा क्वचितच अन्य कोणत्याही घटकराज्याने राबवला असावा. राजकारणाचा प्रवाह शहरी मध्यमवर्गीय वरिष्ठ जातीवर्णांत कुंठित न राहता तो खेड्यापाड्यापर्यंत खळाळत जावा आणि खऱ्या अर्थाने बहुजनसमाजाच्या हाती समाजाची सत्ता पोचवण्याचे फुले-शाहू वगैरेंचे स्वप्न साकार व्हावे असा जाहीर हेतू अर्थातच विकेंद्रीकरणाच्या मुळाशी होता. पण त्यापेक्षाही ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात विशेषाधिकारांचे केंद्रीकरण होऊ नये आणि लोकशाही राजकारणाची स्पर्धात्मकता केवळ दिखाऊ व वरवरची न राहता ती तळपातळीपर्यंत खरोखरच क्रियाशील असावी असे तात्कालिक प्रयोजन अधिक प्रबळ ठरलेले आढळते. महाराष्ट्र राज्याची स्थापना होताच जून १९६० मध्ये यशवंतरावांनी वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून तिच्यावर महाराष्ट्राची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन तिला अनुरूप अशी पंचायत राज्याची रचना सुचवण्याची जबाबदारी तातडीने सोपवली होती. नाईक समितीने महाराष्ट्रासाठी शिफारस केलेला पंचायत राज्याचा आराखडा नजरेखालून घातल्यास एक गोष्ट स्पष्ट जाणवते की संपूर्ण महाराष्ट्रभरातून जो ग्रामीण अभिजनांचा वर्ग वाढत्या संख्येने राजकीय सत्तास्पर्धेत उतरू लागला होता, त्याच्या क्रमशः उंचावणाऱ्या आकांक्षांशी जुळणारी अशी ही पंचायत राज्याची संरचना होती. स्थानिक सहकारी व सरकारी अभिकरणांचीही फेररचना करून एकापरीने यशवंतरावांनी राज्याच्या राजकीय एकात्मतेचे दिलेले आश्वासन पूर्ण केले होते. अधिकाधिक लोकशाहीकरण साध्य करून ठळक ग्रामीण अभिमुखता जोपासणे हा त्यांच्या त्या आश्वासनाचा भागच होता (लेले, पूर्वोक्त ४६).

शिक्षणाच्या क्षेत्रात यशवंतरावांनी केलेली नवी सुरुवातही अशीच बहुपदरी होती. मराठी भाषेला ज्ञानभाषेचा दर्जा लाभावा म्हणून त्यांनी केलेल्या खटाटोपाचा जसा यात अंतर्भाव करता येईल तसाच गरिबाला शिक्षणाच्या कोणत्याही पातळीपर्यंत पोचण्यात

प्रत्यवाय येऊ नये याचा त्यांनी घेतलेला ध्यासही नमूद करता येईल. खेड्यापाड्यातील, शिक्षणाची पूर्वपरंपरा नसलेल्या घरांतून पुढे आलेली बहुजन समाजातील बुद्धिवंताची पिढी यासाठी यशवंतरावांप्रती नक्कीच कृतज्ञ राहील. भाषा, साहित्य, संस्कृती, रंगभूमी, क्रीडा वगैरे असंख्य क्षेत्रांतील उपक्रमशीलतेला चालना देण्याची समग्रलक्षी दृष्टी यशवंतरावांना होती. 'ज्ञानाच्या उपासनेतून सामाजिक क्रांतीला जाणीवपूर्वक चालना देऊन समाजपरिवर्तनाचे ध्येय गाठण्यासाठी राबणारा आणि बहुजन समाजापर्यंत सुखाचा प्रकाश पोचवून समाजाला सुखाच्या मार्गाने वाटचाल करायला उद्युक्त करणारा, प्रेरणा देणारा, अभ्यासू, दूरदर्शी, मुत्सद्दी, समाजवादी अग्रगण्य नेता, हे त्यांच्या चरित्रकारांनी (रामभाऊ जोशी) यशवंतरावांचे केलेले वर्णन शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या कार्यामुळे सर्वथैव सार्थ ठरते. मराठी भाषकांचे वेगळे राज्य स्थापन होणे याचे सारे भाषिक, शैक्षणिक साहित्यिक व सांस्कृतिक संदर्भ यशवंतरावांनी अचूक ओळखले होते. ग्रामीण शिक्षणावर भर देऊन विविध योजनांची आखणी व अंमलबजावणी त्यांच्या काळात झाली हाती. ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षणाचा विस्तार वेगाने झाला. मागास जातीजनजातींना तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शैक्षणिक सवलती दिल्या गेल्या. अभियांत्रिकी, वैद्यकी, कृषि, पशुवैद्यकीय, कायदा इत्यादी विशेष विषयांची महाविद्यालये ठिकठिकाणी निघाली. कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांच्याही संख्येत भर पडली. मातृभाषेतून शिक्षण पदव्युत्तर पातळीपर्यंत मिळण्याची सोय झाली. पंचायत राज्याची स्थापना झाल्यापासून प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदांकडे वर्ग झाले. शहरी भागात नगरपालिका, नगर परिषद किंवा महानगरपालिका प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी पार पाडतात. शैक्षणिक धोरण, अनुदान, अभ्यासक्रम, क्रमिक पुस्तके इत्यादीचे अधिकार सरकारकडे आहेत. माध्यमिक शिक्षण खाजगी शिक्षण संस्थांकडेच बहुधा असले तरी त्याबाबतही धोरणे, पुस्तके व परीक्षा या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी सरकारी यंत्रणा आहेत. उच्च शिक्षणाचे दायित्व स्वायत्त विद्यापीठांवर असते. पण राज्यपाल हा सर्व विद्यापीठांचा कुलपती असतो आणि तोच ठराविक पद्धतीने कुलगुरूंची नेमणूक करतो. त्यामुळे उच्च शिक्षणावरही सरकारी नियंत्रण आहेच. शिक्षणाच्या क्षेत्रात राजकीय अभिजनांची कृतिशीलता महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर विशेष वाढली. शिक्षणसंस्थांचे जाळे हाताशी असणे हा राज्यस्तरावरच्या अनेक नेत्यांच्या राजकीय वजनाचा आणि आर्थिक बळाचा आधार ठरला आहे.

साठोत्तर दशकाच्या मध्यावर शिक्षणाच्या क्षेत्रात जाणवणारा सर्वात ठळक बदल असा सांगता येईल, की शिक्षणाची शहरी अभिमुखता बदलून त्यास ग्रामीण अभिमुखता प्राप्त झाली. शिवाजी विद्यापीठाची स्थापना या दृष्टीने प्रतीकात्मक महत्त्वाची म्हणता येईल.

यशवंतराव चव्हाण आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई यांचा याकामी पुढाकार होता. मराठा कुणबी अभिजनांच्या उपक्रमशीलतेला खुले करून दिलेले, कधीकाळी विरोधी पक्षांच्या कह्यात असलेले क्षेत्र असे महत्त्व उच्च शिक्षणाला प्राप्त झाले. ग्रामीण भागातून कार्यकर्त्यांचा ओघ काँग्रेस पक्षाकडे खेचून आणण्याच्या दृष्टीने याचा बराच उपयोग झाला. सार्वजनिक संसाधनांपर्यंत पोचण्याचा एक राजरोस व प्रतिष्ठादायी मार्ग त्यांना या शिक्षणविस्तारात दिसला असावा. त्यामागे शिक्षणाबाबतची आस्था असण्यापेक्षा शिक्षणसंस्थांचा आश्रयदाता असण्यातून लाभणारे राजकीय महत्त्व मिळवण्याची आकांक्षाच मोठी होती हे उघडच असले तरी माध्यमिक शाळा, महाविद्यालये यांच्या संख्येत या उपक्रमशीलतेमुळे अभूतपूर्व प्रमाणात वाढ झाली.

मराठी भाषकांचे राज्य झाल्यावर मराठी भाषेचा सर्वांगीण विकास व्हावा, मराठी राजभाषा होऊन राज्याचा संपूर्ण कारभार मराठीतून चालावा, विद्यापीठ पातळीपर्यंत सर्व विषयांची दर्जेदार पुस्तके मराठीतून तयार करून रास्त किमतीत संबंधितांना उपलब्ध करून द्यावीत, शासन-प्रशासनाचे व्यवहारकोश, तसेच सर्व अभ्यासविषयांचे परिभाषाकोश सरकारी पुढाकाराने तयार केले जावेत, दर्जेदार मराठी ग्रंथ व नियतकालिकांना भरघोस अर्थसहाय्य व पुरस्कार दिले जावेत, अभिजात ग्रंथांची आवर्जून मराठीत भाषांतरे तयार करून प्रकाशित करावीत, अशा अनेक योजना यशवंतरावांच्या कारकीर्दीत सुरू झाल्या होत्या. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना करून वरीलपैकी अनेक जबाबदाऱ्यांसोबतच मराठीतून अनेक खंडात्मक विश्वकोश साकार करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्पही त्या मंडळाकरवी अमलात आणला होता. महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाची स्थापना करून ज्ञानविज्ञानाच्या सर्व विषयांवरची दर्जेदार क्रमिक पुस्तके तज्ज्ञांकडून लिहून प्रकाशित केली होती. पदवी व पदव्युत्तर पातळीवरील अनेक महत्त्वाचे ग्रंथ मंडळाने तयार केले होते. शेकडो उत्तम ग्रंथांची भाषांतरे मराठीत त्या काळात आली. महात्मा फुले समग्र वाङ्मयाची स्वस्त आवृत्ती तसेच फुले आणि आंबेडकरांच्या साहित्याचे संपादन-प्रकाशन अशा महत्त्वाच्या कामगिऱ्याही सरकारी यंत्रणांकरवी समाधानकारकपणे केल्या गेल्या आहेत. थोडक्यात असे म्हणता येईल की भाषिक घटकराज्याने आपल्या भाषेच्या संवर्धन-समृद्धीसाठी, तिच्या अंगी नव्या विज्ञान-तंत्रज्ञानादी विषयांतील सकारात्मक आव्हाने पेलण्याची ताकद यावी अशा दृष्टीने आणि प्रशासन न्यायालयांपासून तमाम ज्ञानक्षेत्रांपर्यंत तिचा प्रभावी वापर शक्य करण्यासाठी जे जे करणे आवश्यक होते त्या सर्व बाबींची सुरुवात यशवंतरावांच्या महाराष्ट्राने केली होती.

प्रादेशिक एकात्मता

ठराविक अंतरावर भाषेचा 'किंचित किंचित पालट' असलेली विदर्भ, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्राची मराठी भाषाभाषी 'खंडमंडळे' संयुक्त महाराष्ट्राच्या स्वरूपात, इतिहासात प्रथमच एकत्र आली होती. ती सगळी मराठी भाषकांचीच वसतिस्थाने असली तरी त्यांच्या परंपरा आणि इतिहास परस्परांहून भिन्न होते. ब्रिटिश भारतात असलेला पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भाचा काही भाग यांना विकासाचा लाभ मिळाला होता. निझामी राजवटीखाली असलेल्या मराठवाड्याला मात्र विकासाचे वारेही लागलेले नव्हते. सर्व भागांचे आपापले कायदेकानू होते. सगळ्यांना एकच एक कायदेपद्धती एकदम लागू करणे अवघड आणि अव्यवहार्य ठरले असते. तिन्ही विभागांच्या अस्मिता सांभाळून पुरोगामी स्वरूपाचे कायदे सर्वत्र हळूहळू अमलात आणणे क्रमप्राप्त होते. जनतेच्या आशाआकांक्षा मराठी भाषकांचे राज्य झाल्यामुळे उंचावल्या तर होत्याच; पण त्याचबरोबर या नव्या राज्यात आपली गळचेपी तर होणार नाही ना, किंवा आपले राजकीय महत्त्व नष्ट तर होणार नाही ना अशी भीतीही, विशेषतः विदर्भवासीयांच्या मनात होती. यशवंतरावांच्या शब्दावर विदर्भ श्रेष्ठींचा विश्वास असला तरी प्रगत पश्चिम महाराष्ट्राच्या वर्चस्वाचे भय त्यांच्या मनातून कधीच पुरते नाहीसे झाले नव्हते. विदर्भाचे राजकीय महत्त्व सांभाळले जाईल, विकासातील प्रादेशिक असंतुलन दूर केले जाईल, त्यासाठी मागास भागांच्या विकासाकडे आवर्जून लक्ष पुरवले जाईल- अशी अभिवचने यशवंतरावांनी दिली होती. पश्चिम महाराष्ट्राची आर्थिक-राजकीय प्रगती,मुंबई महानगरातील औद्योगिक-व्यापारी हितसंबंधांचे वर्चस्व आणि पुण्याचा सांस्कृतिक श्रेष्ठत्वगंड यांची विदर्भ-कोकण-मराठवाड्यातील जनतेने दहशत मनात बाळगू नये, निश्चिंत मनाने संयुक्त महाराष्ट्रात विलीन व्हावे; असे आवाहन त्यांनी केले होते. नागपूर करारानुसार नागपूर शहराला उपराजधानीचा दर्जा मिळाला आणि वर्षातून विधिमंडळाचे एक अधिवेशन नागपुरात घेण्याचा निर्णय झाला होता. यशवंतरावांनी प्रादेशिक एकात्मतेच्या प्रश्नाला एक राजकीय प्रश्नाना मानला आणि त्यानुसार त्याच्या राजकीय सोडवणुकीचे धोरणात्मक व व्यवहारात्मक उपायही त्यांनी अमलात आणले होते. 'हे राज्य मराठ्यांचे नव्हे, मराठीचे असेल' या त्यांच्या आश्वासनामागे नव्या राज्याच्या केवळ सामाजिक जोडणीचेच नव्हे तर प्रादेशिक जोडणीचेही उद्दिष्ट होते.

स्वप्नभंगांचा प्रवास

यशवंतराव चव्हाण केंद्रात संरक्षणमंत्री म्हणून गेले, त्यानंतरही जवळपास दशकभर

त्यांच्या शब्दाला महाराष्ट्राच्या राजकारणात वजन राहिले असले तरी त्यांनी नव्या महाराष्ट्राबद्दल रचलेले आदर्शचिंतन (युटोपिया) मात्र क्रमशः भंगत गेले असे म्हणावे लागते. त्या चिंतनाच्या अतिआदर्शात्मक स्वरूपाचा, महाराष्ट्राच्या राजकीय अर्थशास्त्राच्या अयथार्थ आकलनाचा, किंवा नेतृत्वपदी चुकीची माणसे निवडण्याचा अशा अनेक गोष्टींचा वाटा या स्वप्नभंगाला कारणीभूत झाला असे आपणास म्हणता येईल. कदाचित कारणांबद्दल आणखीही वेगळ्या बाजूने शोध घेता येईल. पण स्वप्नभंग झाला या वस्तुस्थितीबद्दल मात्र फारसा मतभेद संभवत नाही.

यशवंतरावांचा सामाजिक समावेशनाचा प्रयोग धड सुरू होण्यापूर्वीच संपला. 'बेरजेचे' त्यांचे राजकारण त्याला कृषि-औद्योगिक विकास, सहकाराचा क्षेत्रविस्तार आणि लोकशाही विकेंद्रीकरण यांची जोड मिळूनही फार काळ सुरू राहू शकले नाही. सामान्य शेतकरी व श्रीमंत शेतकरी हा भेद लक्षात न घेता अमलात आलेली कृषिक्रांती, तसेच मराठा अभिजन व सर्वसामान्य मराठा जातिसमूह यांच्यातील हितविरोधाकडे कानाडोळा करून केलेला सहकाराचा व लोकशाही विकेंद्रीकरणातील स्पर्धात्मक राजकारणाचा अवलंब याचे अपरिहार्य पर्यवसान गटबाजी बोकाळण्यात झाले. प्रत्यक्ष कार्यातून एकेक पायरी वर चढत जाऊन कार्यकर्त्यांचे रूपांतर परिपक्व नेत्यांत करण्याचे माध्यम असे स्वरूप काँग्रेस पक्षाला कधीच न लाभल्यामुळे लोकशाही स्पर्धा आटोक्यात ठेवण्याच्या दृष्टीने पक्षयंत्रणा कुचकामी ठरली. १९६४ साली विद्यार्थीनेता म्हणून पुढे आलेले शरद पवार यशवंतरावांच्या पाठिंब्यावर १९६७ साली आमदार झाले, पुढे अल्पावधीतच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे आणि काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे सचिवपद त्यांच्याकडे आले. १९७२ साली वयाच्या बत्तीसाव्या वर्षी ते राज्याच्या गृहखात्याचे मंत्री झाले. आणि १९७८ साली मुख्यमंत्री झाले. हे उदाहरण या संदर्भात बोलके आहे. नंतरच्या काळात तर पक्षकार्यात उमेदवारी न करता आकस्मिक 'उदय' पावलेले असे अनेक नेते महाराष्ट्राने पाहिले. घराण्याचे सवतेसुभे आणि त्यांच्यातील कौटुंबिक हेवेदावेच तत्त्ववैचारिक मतभेदांपेक्षा गटबाजीला अधिक प्रमाणात कारणीभूत ठरले. विरोधी पक्षांना निष्प्रभ करण्यासाठी वापरलेल्या रणनीती पक्षांतर्गत शह-काटशहाचे राजकारण करतांना मोठ्या प्रमाणात वापरल्या गेल्या.

मराठा हा एकसंघ जातिसमूह आहे असे गृहीत धरून यशवंतराव आणि त्यांचे विरोधक यांनी जे राजकारण केले त्यातून अनेक विपर्यस्त परिणाम दृष्टोत्पत्तीस आले. मराठा व कुणबी यांना आपसातील अंतर कमी करायला आणि पूर्वास्पृश्यांशी समावेशनाचे धोरण ठेवायला सांगण्यामागे या जातीगटांमध्ये फक्त सामाजिक विषमतेच्याच तेवढ्या भिंती आहेत असे यशवंतरावांच्या मनातील गृहीत आढळते. त्यांच्यातील विभक्ततेचे आर्थिक

व राजकीय पदर ते लक्षात घेताना दिसत नाहीत. किंबहुना तमाम राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा जो एक सामाईक मूलस्रोत राजकीय अर्थव्यवस्था हा होता त्याकडे पाहायला यशवंतरावांनी नकार दिला होता (लेले : पूर्वोक्त, ३०). पाश्चिमात्य भांडवलशाही लोकशाही राष्ट्रांतल्याप्रमाणे विविध हितसंबंधांच्या सरकारी यंत्रणांतील वाटाघाटीमधून खुल्या स्वरूपाची बहुकेंद्रितता येथेही आणता येईल हा यशवंतरावांचा आडाखा तसेच वरचढ वर्ग दुय्यम वर्गांना सामावून घेत घेत व्यापक होत जातील हा झिरप्याचा सिद्धांतही येथे खोटा ठरला. तो तसा ठरणे अटळच होते. पुरेशी भौतिक संसाधने आणि संख्याबळ पाठीशी असणाऱ्या हितसंबंधांची या वाटाघाटीमध्ये सरशी होणार हे उघडच असते. म्हणजेच या तथाकथित लोकशाही संस्था जे समाजात आधीच विशेषाधिकाराच्या जागा बळकावून असतात त्यांचेच हितसंबंध जोपासतात. तत्त्वतः खुल्या असलेल्या स्पर्धेत यशाची हमी वरचढ हितसंबंधांनाच असते. तेव्हा स्पर्धेचा खुलेपणा कल्पित असतो आणि दुय्यम वर्गांचा पाठिंबा विविध प्रतीकांच्या कुशल हाताळणीतूनच बहुधा मिळवला जात असतो. वरचढ वर्गांचा पाया रुंदावलाच तर तो त्यांच्या अटीवर आणि अगदी अपवादात्मक परिस्थितीतच रुंदावतो. एरवी विशेषाधिकाराच्या झिरपणीपेक्षा त्यांचे एकवटीकरण हीच प्रभावी प्रवृत्ती आढळते. दिखाऊ खुलेपणाही प्रसंगोपात्त मोडीत काढून वंचितांची बंडखोरी निकालात काढली जाते. राज्यसत्तेकडून दुय्यम वर्गांच्या बाजूने अपेक्षित असणाऱ्या हस्तक्षेपावर या परिस्थितीने आपोआपच गंभीर मर्यादा पडतात (कित्ता, ३४). यशवंतरावांच्या अपेक्षा काहीही असोत, महाराष्ट्रात प्रत्यक्षात हेच घडले. वरकरणी स्पर्धात्मक भासणाऱ्या क्षेत्रांतही विशेषाधिकारांचे केंद्रीकरण घडून आले. परिणामी मराठा-कुणबी अभिजनांतील अंतर्गत अंतरे घटण्याऐवजी वाढतच गेली.

मराठा-कुणबी जातिसमूहाच्या वर्चस्वाखाली स्थानिक पातळीवर बलिष्ठ असलेल्या इतर जातीच्या अभिजनांना सत्तापदे देऊन सामावण्याचे तसेच पक्षातील, सहकारातील व पंचायत राज्यातील पदांसाठी खुली स्पर्धात्मकता अस्तित्वात असल्याचे भासवून महाराष्ट्रात काँग्रेसचे वर्चस्व टिकवण्यात यशवंतराव १९७२ पर्यंत यशस्वी झाले. १९६७ सालच्या निवडणुकीत आठ राज्यांत विरोधी पक्षांची सरकारे सत्तेवर आली, तेव्हा तर काँग्रेसचा अभेद्य वाटणारा बालेकिल्ला महाराष्ट्रात अबाधित ठेवणाऱ्या यशवंतरावांना दिल्लीच्या राजकारणात वेगळेच महत्त्व प्राप्त झाले होते. केंद्राशी वाटाघाटी करताना महाराष्ट्राचे पारडे स्वाभाविकच त्याकाळी जड होते.

पण ही परिस्थिती फार काळ टिकली नाही. राज्यपातळीवरचे नेतृत्व बलशाली असणे हे श्रीमती गांधींच्या राजकारणाला नामंजूर होते. प्रधानमंत्री होताना त्यांनी राज्यस्तरीय नेत्यांना हाताशी धरले असले तरी नंतरच्या काळात लोकांशी साक्षात संवाद स्थापन करून

लोकानुरंजनी राजकारण करण्यावरच श्रीमती गांधींचा भर होता. राज्य पातळीवर बळकट पाळेमुळे असलेले यशवंतरावांसारखे पुढारी हे त्यांच्या या राजकारणाच्या आड येत असल्यामुळे त्यांची पाळेमुळे जाणीवपूर्वक छाटण्याचे काम श्रीमती गांधींनी केले. मराठा जातीचे, पण जनाधार नसलेले नेते त्यांनी त्यासाठी हाताशी धरले. मराठा नेतृत्वाकडून यास मिळालेला प्रतिसाद त्यांच्यातील अंतर्गत फाटाफुटीवर प्रकाश टाकणारा होता. इंदिरानिष्ठ मराठा नेते विरुद्ध महाराष्ट्रात राजकीय-आर्थिक प्रतिष्ठा असलेले वसंतदादा पाटील असे द्वंद्व सुरू असतानाच यशवंतरावांच्या प्रच्छन्न पाठिंब्यावर शरद पवारांनी मराठ्यांची तिसरी फळी उभी केली. बंडखोरी करून काही विरोधी पक्षांच्या सहकार्याने त्यांनी पुरोगामी लोकदलाचे सरकार १९७८ साली महाराष्ट्रात स्थापन केले.

यशवंतरावांचे एकजातीय वर्चस्वाखालील बहुजातीय राजकीय अभिजनवादाचे सूत्र १९७० नंतरच्या काळात अनेक दृष्टींनी संकटात सापडले. वसंतराव नाईकांनी औद्योगिक हितसंबंधांना मोकळा वाव दिल्यामुळे नवश्रीमंत मराठा वर्गाचे हितसंबंध आणि औद्योगिक हितसंबंध यांच्यातील अंतर वाढत गेले. यातून कधी शिवसेनेला फूस दिली गेली, कधी प्रादेशिक अस्मितेची ढाल पुढे करून दलितांना लक्ष्य केले गेले, (मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रकरण), तर कधी शेतकरी संघटनेच्या झेंड्याखाली तरुण मराठा गोळा झाले. अशा प्रकारे इंदिरा गांधींच्या नेतृत्वाचे आव्हान आणि अंतर्गत विसंगती यातून मराठा नेतृत्वात विस्कळीतपणा येत गेला (पळशीकर, पूर्वोक्त २९). राज्य पातळीवर श्रीमती गांधीकडून लादण्यात आलेले मुख्यमंत्री आणि दुसऱ्या बाजूने शिक्षणविस्तारातून पुढे आलेल्या नव्या पिढीची दडपणे अशा कात्रीत काँग्रेस पक्ष सापडला. शरद पवारांच्या बंडखोरीने मराठा समाजातील तरुण रक्ताला हायसे वाटले. पण तो त्यांचा आनंद फार काळ टिकला नाही. पवारांनी आपली समांतर काँग्रेस मूळ पक्षात विसर्जित करून टाकली.

तरुण मराठा वर्ग तत्त्ववैचारिकदृष्ट्या असंस्कारित होता, कृषिऔद्योगिकीकरणातून त्याची आर्थिक स्थिती सुधारली होती, झपाट्याने झालेल्या शैक्षणिक विकासातून तो पदवीधर झाला असला तरी बौद्धिक क्षेत्रात फारशी रुची त्याच्या ठिकाणी निर्माण झालेली नव्हती. काँग्रेस ज्या स्पर्धात्मक एकसंधतेवर उभी होती तिच्या आधारे लाभणाऱ्या सत्तापदांवर त्याचे समाधान होणारे नव्हते. स्वातंत्र्योत्तरकाळात जन्म घेऊन लहानाचा मोठा झाल्यामुळे फुले-शाहू - भाऊराव पाटील प्रभृत्तींच्या ध्येयवादाशी या वर्गाला देणे-घेणे नव्हते. राजकारणातील चलनी प्रतीके एवढेच त्याच्या लेखी त्यांचे महत्त्व होते. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात लोकप्रिय झालेली शिवाजी महाराजांची प्रतिमाही त्याच्या दृष्टीने तेवढ्यापुरतीच होती. ब्राह्मणविरोधी धारणा मनात तीव्र असल्या तरी 'ब्राह्मणां'चा कोणताच दोष त्याने

स्वतःपासून दूर ठेवलेला नव्हता. जुने मराठे व हे नवे मराठे यांच्यातील हे अंतर पश्चिम महाराष्ट्रापेक्षा विदर्भ व मराठवाडा या भागांत अधिक प्रत्ययकारीपणे पुढे आले. नव्यांना सामावून घेणाऱ्या पायाभूत संधीची कमतरता आणि धाक वाटावा अशा नेतृत्वाचा अभाव ही त्याची दोन कारणे संभवतात. पण एवढे खरे की प्रस्थापित राजकारणाला पर्याय शोधत निघालेल्या त्या तरुण रक्ताने जे पर्याय जवळ केले त्यात विचारपूर्वकतेपेक्षा भावनिकतेचा व उतावीळपणाचाच भाग अधिक दिसून आला. शरद पवारांकडून अवसानघात होत असल्याचे जाणवताच मोठ्या प्रमाणावर मराठा तरुण शिवसेनेकडे किंवा शरद जोशींच्या शेतकरी संघटनेकडे वळले. अल्पावधीत या दोन्ही संघटनांची ताकद त्यामुळे अपेक्षेबाहेर वाढली.

शिवसेनेला वसंतसेना म्हणून ओळखले जाण्याइतपत काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांचा वरदहस्त तिला लाभला होता; पण तोपर्यंत ती मुंबईपुरती आणि केवळ दाक्षिणात्त्यांच्या विरुद्ध होती. पुढे मात्र तिचा भौगोलिक विस्तार आणि राजकीय प्रभावक्षेत्र विस्तारत गेले. काँग्रेसमधील गटांचे शह-काटशहाचे राजकारण जसे याला कारणीभूत आहे; तसेच पक्षावरची शहरी श्रीमंतांची पकड सैल करण्यासाठी ग्रामीण काँग्रेसश्रेष्ठींनी खेळलेल्या चालीही वेळोवेळी शिवसेनेच्या पथ्यावर पडल्या आहेत. काँग्रेसने धर्मनिरपक्षतेचे धोरण निष्ठापूर्वक न सांभाळल्यामुळे कथित धर्मनिरपेक्ष काँग्रेसमधून सांप्रदायिक शिवसेनेत किंवा भारतीय जनता पक्षात जाताना कार्यकर्त्यांना फारशी अडचण कधीच वाटली नाही. दलितांशी सहकार्याचे राजकारण करीत असताना बौद्धेतर दलितांकडे काँग्रेसने दुर्लक्ष करणेही शिवसेनेला फायद्याचे झाले. मातंग, चांभार वगैरे जाती हिंदुत्वाच्या चौकटीतच राहिल्यामुळे सांप्रदायिक पक्षाच्या गळाला त्या सहज लागल्या. अर्थात काँग्रेसएवढेच हे अपयश रिपब्लिकन पक्ष आणि दलित पँथर यांचेही आहे. मुंबई-पुणे-नाशिक पट्ट्याचे वेगाने औद्योगीकरण झाले. त्यामुळे मोठी कामगारशक्ती तिथे अस्तित्वात आली. ती शक्ती प्रारंभी साम्यवादी-समाजवादी पक्षांशी संलग्न होती. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तेव्हापासूनच काँग्रेसने डाव्या राजकीय शक्तीच्या खच्चीकरणाचा विडा उचलला होता. 'लोकांनी काँग्रेसला पाठिंबा द्यावा, अन्यथा राज्यात साम्यवादी वर्चस्वाचा धोका संभवतो, कारण संयुक्त महाराष्ट्र समिती जरी अनेक विरोधी पक्षांची आघाडी असली तरी तिचे प्रमुख सूत्रधार कम्युनिस्ट पुढारीच आहेत', अशी जोरदार भूमिका यशवंतरावांनी घेतलीच होती, तीच पुढे नेत त्यांच्या राजकीय वारसदारांनी कामगार क्षेत्रातून साम्यवादी-समाजवाद्यांना हद्दपार करण्यासाठी चक्क शिवसेनेला हाताशी धरले. खुद्द समितीतही साम्यवादविरोधी लाट उफळल्यामुळे काही प्रजा समाजवाद्यांनीही शिवसेना जवळ केली. वेळोवेळी शिवसेनेने आपले लक्ष्यगट बदलेले. प्रारंभी दाक्षिणात्य भारतीय, पुढे दलित आणि त्यानंतर मुस्लिम यांना त्यांनी टीकेचे विषय बनवून क्रमशः मराठी माणसे, सवर्ण

समाज व हिंदू जनता यांना आपल्या पाठीशी खेचून आणण्यात यश मिळवले. आज जरी शिवसेना शिवशक्ती-भीमशक्ती एकत्र आणण्याची भूमिका जाहीरपणे मांडत असली, तरी जातीच्या प्रश्नाबाबत किंवा जातिनिर्मूलनाच्या कार्यक्रमाबद्दल तिला फार प्रामाणिक कळकळ किंवा आस्था वाटते असे मुळीच नाही. केवळ व्यावहारिक व तात्कालिक स्वार्थाच्या पलीकडे जाऊन सुसंगत तत्त्ववैचारिक भूमिका घेणे शिवसेनेला कधीच जमले नाही. शिवसेनेचे सावट महाराष्ट्रावर ओढवले याचे सर्वात मोठे अपश्रेय अर्थातच यशवंतरावांनी वाढवलेल्या महाराष्ट्र काँग्रेसला द्यावे लागते.

काँग्रेसने तत्त्वनिष्ठ व धर्मनिरपेक्ष राजकारण करण्याऐवजी मराठी-कुणबी वर्चस्वाखाली बहुजातीय राजकीय अभिजनांच्या नियंत्रित स्पर्धेचे फलितप्रामाण्यवादी राजकारण करण्याचाच शिरस्ता यशवंतरावांच्या काळापासून सुरू ठेवण्याचे काही दूरगामी परिणाम या राज्याच्या राजकारणावर झालेले दिसतात. महाराष्ट्राचा काँग्रेस पक्ष कोणत्याही विशिष्ट जातीशी जोडलेला नाही अशी त्याची प्रतिमा तयार झाली याचा त्या पक्षाला अनेक वर्षे फायदा झाला. देशात काँग्रेसची राज्याराज्यात पीछेहाट सुरू झाल्यानंतरही महाराष्ट्र काँग्रेस स्थिरपद त्यामुळेच राहू शकली. पण इंदिरा गांधींच्या स्व-केंद्री व लोकानुरंजनी राजकारणाने जेव्हा महाराष्ट्रातील जातीय संतुलनाचा धुव्वा उडवला आणि मराठा एकजुटीची भ्रामकता उघड्यावर आणली तेव्हापासून काँग्रेसच्या पायाखालची वाळू सरकायला सुरुवात झाली.

तरीही १९७५ पर्यंत मराठे व अन्य मागास जाती काँग्रेसच्याच बाजूने होत्या. मंडल आंदोलनानंतर मध्यम जातींच्या राजकीय महत्त्वाकांक्षा अधिक धारदार झाल्या. कोकण भागात मुस्लिम या काँग्रेसच्या पारंपरिक समर्थक गटाला तुल्यबळ असलेल्या कोळी, आगरी, कुणबी अशा इतर मागास जातीत राजकीय जागृती झाली. पश्चिम महाराष्ट्रात माळी, धनगर, वंजारी या 'माधव' घटकाच्या जोडीला कोष्टी व लिंगायत जातींचेही राजकीय महत्त्व वाढले. मराठवाड्यात बंजारा, वंजारी, लिंगायत, धनगर, मातंग व चांभार यांचे जिल्हाविशिष्ट वर्चस्व डोळ्यात भरण्याजोगे वाढले. विदर्भात तेली, माळी, कोष्टी, कोमटी, नवबौद्ध, गोवारी, कुणबी या जातींचे राजकीय वजन निवडणुकांच्या राजकारणात निर्णायक ठरू लागले. काँग्रेसप्रणीत संतुलनाचे राजकारण या नवजागृत जातींना अपुरे व असमाधानकारक वाटू लागले. याचा सर्वाधिक लाभ शिवसेना व भारतीय जनता पक्ष यांनी उचलला, सत्तेत वाटा मिळवायचा तर कोणताही पक्ष आपला म्हणण्याची या लहान मागास जातींची तयारी होती. विचारसरणीशी त्यांना धर्म काहीच घेणे-देणे नव्हते. काँग्रेसबद्दल विशेष जवळीक बाळगण्याचेही कारण नव्हते. सेना-भाजपाच्या सांप्रदायिक राजकारणाच्या लाटेवर स्वार होण्यात तत्त्वच्युती होत असल्याची खंत त्यांना जाणवत नव्हती. काँग्रेसमधील नव्या पिढीतही

त्यांना धर्म निरपेक्ष वर्तनाची आणि तत्त्वनिष्ठेची वानवाच दिसत होती. पतित पावन संघटना, बजरंगदल, छावा किंवा संभाजी ब्रिगेड यासारख्या बहुजनसमाजातील दिशाहीन आणि रिकामटेकड्या लोकांच्या संघटना आणि संघपरिवारातील जमातवादाने पिसाट झालेल्या झुंडी यांची राजकीय संस्कृती एकाच गोत्राची होती. त्यामुळे बहुजनसमाजातूनच नव्हे; तर दलित आणि मुस्लिम या वर्गांतूनही सेना-भाजपाच्या उन्मादी राजकारणात तरुणांची भरती सहज साध्य झाली. १९७८ साली शरद पवारांच्या पहिल्या बिगर काँग्रेसी सरकारच्या अयशस्वी प्रयोगानंतर १९९० च्या सुमारास राज्यातील शिवसेनेचे बळ अपूर्व प्रमाणात वाढून तो राज्यातील सर्वात मोठा विरोधी पक्ष ठरला. स्पर्धात्मक व बहुपक्षीय राजकारणाला त्यातून फार मोठी चालना मिळाली. त्यातूनच पुढे १९८५ साली शिवसेना-भाजपा युतीची मजल सरकार स्थापन करण्यापर्यंत पोचली. नव्वदीच्या दशकाअखेर काँग्रेस पक्ष सोनिया गांधींच्या परकीय मुळाच्या प्रश्नावर दुभंगला त्याची सर्वाधिक झळ महाराष्ट्राच्या राजकारणाला लागली. शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मराठ्यांचा अधिकृत पक्ष म्हणून पुढे आला असला तरी त्या पक्षाला मिळालेल्या मराठा आमदारसंख्येच्या तुल्यबळ मराठा आमदार शिवसेनेच्या तिकिटांवर निवडून आले होते. हा मराठा नेतृत्वाच्या फाटाफुटीचाच पुरावा आहे. १९९९ च्या निवडणुकीत या फाटाफुटीमुळे मतविभागणी प्रचंड प्रमाणावर झाली. दोन्ही मिळून काँग्रेस पक्षांचे बहुमत न झाल्यामुळे अनेक लहान पक्षांना सत्तेत प्रमाणाबाहेर वाटा देऊन त्यांचा पाठिंबा काँग्रेस पक्षांना सत्तेसाठी मिळवावा लागला. लौकिकार्थाने सत्ता काँग्रेसची असली तरी महाराष्ट्र हा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे असे म्हणण्याजोगती परिस्थिती मात्र शिल्लक उरलेली नाही. निवडणुकांचे सत्ताकारण भावनिक प्रश्नांभोवती आणि व्यक्तिपूजेच्या बळावर चालवण्याचा पायंडा सर्वच पक्षांनी पक्का केल्यामुळे महाराष्ट्राच्या तमाम वैचारिक पुरोगामी परंपरांचा सपशेल पराभव झाला असल्याचे चित्र तूर्तास तरी पुढे आले आहे.

कृषि-औद्योगिकीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था

यशवंतरावांनी महाराष्ट्रात कृषि औद्योगिक अर्थव्यवस्थेची पायाभरणी केली आणि शेती, उद्योगधंदे या क्षेत्रात समतोल साधण्याचा प्रयत्न केला होता. भांडवलदार व सधन शेतकरी यांच्या हितसंबंधातील तणावपूर्ण संतुलन साधण्यात यशवंतरावांनी यश मिळवले होते; पण त्यांच्या राजकीय वारसदारांना ते साधले नाही. शेतकी हितसंबंधांची त्यांनी हेळसांड केली आणि मराठा-कुणबी जातिसमूहांच्या केवळ संख्याबळावर भिस्त ठेवून औद्योगिक हितसंबंधांचीच पाठराखण केली. आज तर जागतिकीकरण-उदारीकरण-खाजगीकरणाच्या

रेट्याखाली नवभांडवलशाहीची तळी उचलणे भाग पडते, पण तसे केल्यास ग्रामीण महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे हितसंबंध धोक्यात येतात अशा शृंगापत्तीत काँग्रेस पक्ष अडकला असल्याचे स्पष्ट दिसते. शिवसेना-भाजप युतीचे काम त्यामानाने सोपे आहे. ते पक्ष औद्योगिक भांडवलदारीचे उजळ माथ्याने समर्थन करतात आणि संख्याबळ जोडण्यासाठी उन्मादी झुंडशाहीचे राजकारण करतात.

ज्या राज्यातील राज्यकर्ते १९९५ ते १९९९ चा अपवाद वगळता सतत ग्रामीण शेतकी हितसंबंधांशीच संलग्न राहिले आहेत तेथील शेतीची परिस्थिती दोलायमान असावी यातील अंतर्विरोध स्पष्ट करताना सुहास पळशीकरांनी नोंदवलेली पुढील निरीक्षणे खूप बोलकी आहेतः मध्यप्रदेश, राजस्थान, ओरिसा यांच्याहून महाराष्ट्रातील शेतीचे दर हेक्टरी उत्पादन कमी आहे (१००० किलोग्रॅमहून कमी). मात्र उसाविषयीचा राज्याचा अतिउत्साह कायम आहे. एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी जेमतेम तीन टक्के क्षेत्रात पिकणारा ऊस राज्यातील एकूण सिंचनापैकी निम्मे पाणी फस्त करतो. शेतीच्या एकंदर दुरवस्थेमुळे राज्याच्या एकूण उत्पादनातील प्राथमिक क्षेत्राचा वाटा १९९९-२००० साली १७ टक्के एवढाच होता. राज्यात ३२ लाख सीमांत शेतकरी आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्यांपैकी ४५ टक्के भूमिहीन शेतमजूर असून शेतजमिनीची मालकी विषम प्रमाणात विभागलेली आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात बिगर-कृषिक्षेत्रावरच अवलंबून राहिल्यामुळे शेतकऱ्याची अवस्था चिंताजनक आहे. अन्नधान्याच्या बाबतीत महाराष्ट्र स्वावलंबी नाही. येथील शेतजमिनीचा दर्जा खालावलेला आहे. १.७७ कोटी हेक्टर कसण्यायोग्य जमिनीपैकी केवळ १४.५ टक्के जमिनीवर सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत. त्यापैकी ५५ टक्के सिंचन विहिरींमुळे शक्य आहे. पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतीला दुष्काळाचा अनेकदा फटका बसतो. परिणामी भूहीन शेतमजुरांना व छोट्या शेतकऱ्यांना स्थलांतर करणे अटळ होऊन बसते. नगदी पिकांना प्राधान्य दिल्यामुळे सिंचन सुविधांच्या वापरात असमतोल निर्माण होतो. परिणामी अनेक लोकांना कायम टंचाईच्या छायेत राहावे लागते. राज्याच्या विकासावर याचा गंभीर दुष्परिणाम होतो. राज्याचा विकास शहरकेंद्री व बिगरशेतीप्रधान झाला आहे. (मानवविकास अहवाल - महाराष्ट्र २००२,१२५).

महाराष्ट्राच्या कृषिक्षेत्रातील वाढीवर आणि उत्पादक रोजगारनिर्मितीवर जाचक बंधने पडली आहेत. राज्यात बेकारीचे प्रमाण मोठे असून दोनतृतीयांशांना उदरनिर्वाहासाठी शेतीवरच विसंबून राहावे लागते. राज्याचे दरडोई उत्पन्न ग्रामीण भागात कमालीचे खालच्या पातळीवर आहे. त्यामुळेच महाराष्ट्राला बिगर-कृषिक्षेत्राकडे रोजगार निर्मितीसाठी वळावे

लागते (कित्ता, ३०). महाराष्ट्राचा मोठा भाग अल्पउत्पन्नामुळे गरीब राहिला आहे. अन्नधान्याचा खप आणि दरडोई मिळणारे उष्मांक ही मोजपट्टी लावली तर निराशाच पदरी पडते. ग्रामीण व शहरी या दोन्ही भागांतील बहुतांश लोक आज कुपोषित असल्याचे आढळते. जमीन हाच राज्याच्या मालमत्तेतील महत्वाचा घटक असूनही मशागतीखालील जमिनीचा दर्जा खराब असल्यामुळे महाराष्ट्रात मोठ्या संख्येने भूमिहीन शेतमजुरांनी ग्रामीण भागातील बेरोजगारांत प्रचंड भर घातली आहे. (कित्ता, ३६).

सहकाराचे सुवर्णयुग संपले

विविध जातींमधून तसेच मराठा-कुणबी जातिसमूहांतर्गत गटांमधून वर येणाऱ्या महत्त्वाकांक्षी अभिजनांना सामावून घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या संधीसंरचनांपैकी सुरुवातीच्या काळात अत्यंत उपयुक्त ठरलेल्या सहकारी चळवळीचे सुवर्णयुग पाहता पाहता संपले. त्या चळवळीने सर्वसामान्य शेतकऱ्याचे फार हित साध्य न होता मूठभर श्रेष्ठींच्या हाती आत्यंतिक सत्तेचे केंद्रीकरण घडून आले. १९६८ साली तेव्हाच्या सहकार मंत्र्यांच्या पुढाकाराने चळवळीत काही सुधारणा करण्याचा प्रयत्न झाला. कोणत्याही सहकारी संस्थेत कोणाही व्यक्तीने एक पद सहा वर्षांपेक्षा अधिक काळासाठी धारण करू नये, एका वेळी एकापेक्षा अधिक पदे विभिन्न स्तरावरची असली तरी धारण करू नयेत, सहकारी संस्थांच्या निवडणुकांसह सर्वच व्यवहारांवर सरकारची निगराणी असावी इत्यादी काही प्रस्ताव त्यावेळी पुढे आले होते. तथाकथित सहकार महर्षींची मक्तेदारी मोडावी, आपली संघटित व सरंजामी सत्ता वापरून त्यांनी त्यांची पुराणमतवादी मते पक्षावर लादू नयेत, पक्षाला त्याचे काम आपल्या पद्धतीने करू द्यावे अशी काही उद्दिष्टे या सुधारणांच्या मुळाशी होती. यशवंतरावांचा त्यांना पाठिंबा असला तरी वसंतदादा पाटील प्रभृतींचा विरोध होता. सहकार मंत्र्यांच्या आकस्मिक निधनामुळे हे सगळे प्रस्ताव मागे पडले. काही किरकोळ संरचनात्मक बदल केले गेले; पण तेवढ्यावरून सहकारातील श्रेष्ठींना धोक्याची सूचना मिळाली आणि त्यांनी जोरदार बचावात्मक उपाय योजणे सुरू केले. काँग्रेस पक्षाची सहकारी चळवळीवरची एकमुखी पकड शिथिल झाली. सहकार चळवळीचे अभ्यासक बी.एस. बावीसकर म्हणतात त्याप्रमाणे "काँग्रेस पक्ष कमजोर झाल्यामुळे त्याची सहकारावरची पकड कमी झाली की सहकारावरची पकड कमी झाल्याने काँग्रेस पक्ष कमजोर झाला हे ठरवणे तसे सोपे नाही" (बावीसकर : पूर्वोक्त, ८०) अर्थात त्या दोन्ही गोष्टी घडून आल्या हे शंभर टक्के सत्य आहे.

श्रीमती गांधींनी यशवंतरावांच्या नेतृत्वाची पाळेमुळे छाटण्यासाठी टाकलेले डाव तर सहकारी चळवळीला घातक ठरलेच; पण त्यापेक्षाही मोरारजी देसाईंच्या सरकारने

केलेले साखरेचे संपूर्ण निर्नियंत्रण सहकाराच्या चळवळीला अधिकच भोवले. उसाची लागवड कमी झाली, साखरेचे उत्पादन घटले, बाजारात साखरेची तीव्र टंचाई निर्माण झाली; पण केंद्रसरकारने भाववाढ रोखण्यासाठी साखरेच्या किंमतीवर निर्बंध घातले. 'पुरवठा कमी मागणी मोठी' अशा परिस्थितीत व्यापारी साखर कारखानदारांना 'ऑन मनी' देऊ लागले, या जास्तीच्या पैशातून चळवळीत भ्रष्टाचाराच्या हजार वाटा निर्माण झाल्या, सहकारी नेत्यांना भ्रष्टाचाराचा राजरोस आणि बेहिशेबी स्रोतच सापडला. त्यातही मद्यनिर्मिती करणाऱ्या कारखान्यांना आणखी एक ऑन मनीचा मार्ग सापडला. बॅ. अंतुल्यांनी स्थापन केलेल्या इंदिरा गांधी प्रतिभा प्रतिष्ठानाने सहकार महर्षींना जणू भ्रष्टाचाराचा वस्तुपाठच दिला. सहकार नेत्यांनी साखर कारखान्यांपासून स्वतंत्र असे अनेक ट्रस्ट स्थापन करून त्यावर आपल्या आप्तस्वकीयांचीच वर्णी लावून कोट्यवधी रुपयांवर कायमचे नियंत्रण मिळवले. प्रचंड कॅपिटेशन फी उकळणारी महाविद्यालये उघडून सहकारमहर्षी स्वतःला शिक्षणमहर्षींही म्हणवून घेऊ लागले. हा सगळाच व्यवहार चोरटा असल्यामुळे त्यांना त्यातून चरायला मोकळे कुरण मिळाले (कित्ता, ८१).

भ्रष्टाचाराबरोबरच अजागळ कारभार, कर्जवसुलीत प्रचंड थकबाकी, जुनाट कामकाजपद्धती, अनावश्यक कर्मचारी वर्ग, घराणेशाही अशाही दोषांची लागण सहकारी संस्थांना झाली. लोकशाही व्यवस्थापनला सोडचिठ्ठी देऊन बहुतेक सहकारी नेत्यांनी घराणेशाहीची कास धरून पुत्रपौत्रादिकांना सहकारातील सत्तापदे सुपूर्द केली. जागतिकीकरण खाजगीकरणाने निर्माण केलेल्या आव्हानांबाबत गाफील राहून जुन्याच पठडीचे नियोजन-शून्य व्यवस्थापन, भरमसाठ नोकरभरती आणि खर्चिक उत्पादनपद्धती सहकारी क्षेत्रात प्रचलित असल्याचे दिसते. बावीसकरांनी सहकारी चळवळीच्या ऱ्हासावर प्रकाश टाकण्यासाठी दिलेली पुढील आकडेवारी बरेच काही सांगून जाते: राज्यातील तीस जिल्हा मध्यवर्ती बँकांपैकी फक्त १५ बँका नफ्यात आहेत. नफा फक्त ८८ कोटी १९ लाख, तर तोटा मात्र ३८६ कोटी ७९ लाख आहे. नागपूर, वर्धा, उस्मानाबाद या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील ६४ संचालकांनी व ४ नागरी सहकारी बँकांमधील ६५ संचालकांनी एकूण २५० कोटी रुपयांच्या सहकारी रोख्यांची अफरातफर केली. गेल्या हंगामात सुरू असलेल्या ११० साखर कारखान्यांपैकी ५२ कारखाने आजारी असल्याचे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ३१ मार्च २००० अखेर यापैकी १७ कारखान्यांकडील सव्याज थकबाकी १५७ कोटी ९५ लाख होती. एवढी दैनावस्था दिसत असतानाही माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी जाताजाता या कारखान्यांना १५०० कोटी रुपयांचे अर्थसहाय्य घोषित केले. प्रचंड थकबाकीच्या ओझ्यामुळे आजारी पडलेल्या अनेक शेतकी

प्रक्रिया संस्था व सहकारी सूतगिरण्या राज्यात आहेत. एकट्या नगर जिल्ह्यात २००० सहकारी पतसंस्थांपैकी २०० दिवाळखोर आहेत. आर्थिक व्यवहारात तोटा, पैशांची अफरातफर व घोटाळे यासाठी गाजणाऱ्या सहकारी संस्थांची मोठीच संख्या राज्यभर आहे (कित्ता, ८२-३).

अर्थात महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे काही आशादायक पैलूही बावीसकरांनी नमूद केले आहेत. भागभांडवलाच्या बाबतीत आजही देशात महाराष्ट्र अग्रेसर आहे. साखर उत्पादनाबाबत जगात भारताचा आणि भारतात महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आहे. साखरेप्रमाणेच दूध उत्पादनातही भारताने पहिला क्रमांक घेतला आहे. त्याबाबत गुजरातचा पहिला तर महाराष्ट्रातील सहकारी दूध संस्थांचा दुसरा क्रमांक आहे. देशातील सहकारी बँकांपैकी ४० टक्के बँका एकट्या महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्राच्या समाजजीवनातील कुंभार, चांभार, धोबी, रिक्षाचालक इत्यादिकांच्या व्यवसायात, तसेच दवाखाने व हॉस्पिटले, विद्यार्थी वसतिगृहे व भोजनालये, शिक्षणसंस्था अशा अनेक क्षेत्रांत सहकाराने प्रवेश केला असून देशात अन्यत्र कोठेच असे दिसत नाही. (कित्ता, ८४).

अर्थात सहकारी चळवळीचा असा ताळेबंद मांडता येणार असला तरी तिला चालना देताना लोकशाहीकरणाचा पाया बळकट करून सामान्य शेतकऱ्यांचे सशक्तीकरण साधावे हा यशवंतरावांचा जो हेतू होता तो कितपत पूर्ण झाला किंवा होत आहे, हा प्रश्न उरतोच.

शिक्षणाचा विस्तार आणि ज्ञानसमाजाची निर्मिती

शिक्षणाद्वारे सामाजिक परिवर्तनाचा आणि नवसमाजरचनेचा उद्देश साध्य व्हावा असे सांगणाऱ्या विचारवंतांचीच नव्हे, तर तसा प्रत्यक्ष प्रयत्न करणाऱ्या कर्मवीरांची प्रदीर्घ परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. त्या परंपरेशी इमान राखून यशवंतराव चव्हाणांनी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राज्यात हाती घेतला होता. नामवंतांनी स्थापन केलेल्या अनेक शिक्षणसंस्थांच्या माध्यमातून सर्व स्तरांवरील ज्ञानशाखांचे अध्यापन सुरू असून तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र, कृषिशास्त्र, व्यवस्थापन, संज्ञापन वगैरे विशेष क्षेत्रातील शिक्षणसंशोधन करण्यासाठी अनेक प्रतिष्ठित संस्था आणि विद्यापीठेही स्थापन झाली आहेत. बहुजन, स्त्रिया, दलित, अपंग, मूक-बधिर मनोविकल, ऊसतोडणी कामगारांची मुले, भटक्या जनजाती, आदिवासी इत्यादी घटकांच्या विशिष्ट गरजा ध्यानात घेऊन केल्या गेलेल्या त्यांच्या शिक्षणाच्या सुविधा नजरेत भरणाऱ्या आहेत. संख्यात्मक दृष्टीने पाहिल्यास शिक्षण घेणारी मुले-मुली, शिक्षणसंस्था, विद्यापीठे व विशेष संस्था यांच्यात गेल्या चाळीस-

पंचेचाळीस वर्षांत प्रचंड भर पडली आहे असे दिसते. मानवी विकास अहवालात म्हटल्याप्रमाणे केवळ संख्यात्मक पातळीवर विचार करायचा झाल्यास मूलभूत शिक्षणाबाबत महाराष्ट्राने भरीव कामगिरी बजावली आहे. ढोबळ मानाने पाहता शिक्षणाचा प्रसार आणि सार्वत्रिकीकरण याबाबत राज्याने मोठीच मजल मारली आहे. देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात मुलगे व मुली यांच्यातील तफावत वरच्या स्तरावरील शिक्षणाचा अपवाद वगळता अत्यल्प आहे. अनुसूचित जाती-जनजातींमध्ये मुलांना शाळेत पाठवण्याचे प्रमाण वाढत आहे (पृ. ९१).

पण तरीही शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या उद्दिष्टापासून महाराष्ट्र अजूनही खूप दूर आहे. राज्यात असलेल्या एकूण ६५ हजार प्राथमिक शाळांपैकी १२ हजार शाळा एकशिक्षकी आहेत, वर्गखोल्यांची समस्या गंभीर आहे. शैक्षणिक गळतीचे प्रचंड मोठे प्रमाण आणि प्राथमिक शिक्षणावरील खर्चासाठी असणारी तुटपुंजी आर्थिक तरतूद ही शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या आड येणारी तथ्ये आहेत. शिक्षणविषयक विषमता कमी होण्याऐवजी वाढते आहे. सर्वांना समान संधी निव्वळ संविधानातच राहिली आहे. १९६० पासून प्राथमिक शाळांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली. माध्यमिक शाळा पाचपटीने तर महाविद्यालये व अन्य उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था दहापटीने वाढल्या आहेत ही वस्तुस्थिती आपले शिक्षणविषयक अग्रक्रम स्पष्ट करण्यास पुरेशी आहे. मुळातच प्राथमिक शिक्षणासाठी अपुरी आर्थिक तरतूद असते, त्यातही बरीच रक्कम शिक्षकांच्या वाढत्या पगारावर खर्च होते; शिक्षण जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी किंवा शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी होत नाही (कित्ता, ७२). शिक्षणाचा सर्वत्र प्रसार व्हावा या हेतूने सरकारने राबवलेल्या काही खास कार्यक्रमांत विद्यार्थ्यांना प्रवास सवलत देणे, ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी खास शाळा काढणे, वस्तीशाळा योजना, उपस्थिती शुल्क उपक्रम, अनुसूचित जाती-जनजातींच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षणसाहित्य इत्यादींचा अंतर्भाव आहे; पण त्यातून अपेक्षित परिणाम साध्य झाला असे म्हणण्याजोगती परिस्थिती नाही. १९९४ साली जागतिकीकरणाची गरज म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा एक कृतिआराखडा जाहीर करून सहा वर्षांवरील प्रत्येक बालकाने शाळेत जावे, चौदाव्या वर्षापर्यंत प्रत्येक बालकाने नियमित शाळेत उपस्थित राहावे आणि प्रत्येक इयत्तेच्या अभ्यासक्रमानुसार ज्ञान आणि माहितीच्या प्रत्येक बालकास प्राप्त व्हावी असे ठरले. प्रत्यक्षात मात्र याची कार्यवाही झाल्याचे कोणतेही दृश्य परिणाम दशकभरानंतरही समाजजीवनात आढळत नाहीत.

सहा ते चौदा वयोगटातील बहुसंख्य मुले शाळेबाहेर का राहतात? शाळेत दाखल झालेली मुले-मुली शाळेतून बाहेर का फेकली जातात? त्यांनी शाळेत टिकून राहावे यासाठी काय करता येईल? चौथीनंतर शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांना स्वतःचे नावही लिहिता, वाचता

येत नसेल तर चार वर्षे ते काय शिकले? विनाअनुदानित क्षेत्रात वाढलेल्या माध्यमिक शाळांमुळे त्या स्तरावरचे शिक्षण गरीब घरातल्या मुलांना दुर्लभ होत आहे त्यावरचा उपाय काय? असे असंख्य ज्वलंत प्रश्न समोर असताना त्यांच्यापेक्षा इंग्रजी विषय कोणत्या इयत्तेपासून शिकवावा आणि तो सक्तीचा असावा की वैकल्पिक, अशाच प्रश्नांची मातब्बरी महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांना कायम वाटत आली आहे. बहुजनांच्या नावाने राज्यकारभार करणारे हे लोक बहुजनहिताचे शिक्षण देण्याबाबत किती आस्थेवाईक आहेत याबद्दल शंकाच आहे.

यशवंतरावांच्या शिक्षणविषयक धोरणात फुले-शाहू-भाऊराव यांच्या बहुजनकल्याणकेंद्री विचाराइतकाच मराठा-कुणबी जातिसमूहांतर्गत प्रवाहांच्या श्रेष्ठींना सामावण्याचा आणि त्यांना लाभदायी अधिकारपदे प्रदान करण्याचा हिशेबीपणाही होता. यातूनच खाजगी महाविद्यालयांच्या आणि साम्राज्यसदृश शिक्षणसंस्थांच्या साखळ्यांच्या संख्येत अफाट वाढ महाराष्ट्रात झाली. या नव्या शिक्षणमहर्षींना अभ्यासक्रम, अध्यापनपद्धती व शैक्षणिक गुणवत्ता, यापेक्षा इमारती, अनुदाने, सबसिड्या, अध्यापकांच्या नेमणुका, शैक्षणिक साधनांचे अद्ययावतीकरण, कॅपिटेशन फी व देणग्या आणि विविध प्रकारची कंत्राटे यातच जास्त रस होता. मोठाल्या सरकारी इमारती कवडीमोलाने ताब्यात घेण्यावर त्यांचा कटाक्ष होता. शिक्षणप्रसारातून गोळा केलेल्या बेहिशेबी पैशाच्या बळावर राज्यातील विविध पातळ्यांवरचे राजकारण प्रभावित करणे त्यांच्या दृष्टीने शैक्षणिक गुणवत्ता किंवा शिक्षणाची सामाजिक फलश्रुती यापेक्षा अधिक महत्त्वाचे होते.

शिक्षणाच्या क्षेत्रात वेळोवेळी उद्‌भवलेल्या कोणत्याही समस्येच्या मुळापर्यंत जाऊन तिचा तर्क व विवेकाच्या आधारे विचार करण्यापेक्षा तिला जातीय मुरड घालून लोकानुरंजनी राजकारणासाठी तिचा वापर करून घेणेच राज्यकर्त्यांना वेळोवेळी सोयीचे वाटलेले दिसते. मधुकरराव चौधरी शिक्षणमंत्री असताना त्यांनी शिक्षणविषयक श्वेतपत्रिका काढली होती, तेव्हा प्रचंड वादळ उठले होते. श्वेतपत्रिकेचे कृष्ण अंतरंग अशा शीर्षकाची पुस्तिकाही एन.डी. पाटील यांनी प्रसिद्ध केली होती. अर्थात एन.डीं.च्या तार्किक युक्तिवादांपेक्षा कमी प्रतीच्या शैक्षणिक संस्थांचे चालक आणि ब्राह्मणविरोधी सर्वपक्षीय बहुजन लॉबी यांच्या राजकीय दबावामुळेच तेव्हाच्या मंत्रिमंडळाला श्वेतपत्रिका मागे घेणे भाग पडले होते. आज मागे वळून पाहता त्या श्वेतपत्रिकेत सारेच काही टाकाऊ नव्हते हे सहज लक्षात येऊ शकेल. शिक्षणविस्तारात प्रमाणाइतकेच महत्व गुणवत्तेलाही दिले गेले नाही तर दुय्यम गुणवत्तेचे कला वाणिज्य विषयांचे पदवीधर हजारोंच्या संख्येने बाहेर पडून मोठाच सामाजिक-आर्थिक प्रश्न अपरिहार्य ठरेल ही श्वेतपत्रिकेमागची भूमिका अचूक होती हे शिक्षण क्षेत्रातील आजवरच्या वाटचालीने सिद्ध केले आहे. मॅट्रिकपर्यंतच्या शिक्षणात इंग्रजी शिक्षणावर दिला

जाणारा अनाठायी भर कमी करावा कारण धड शिक्षणसोयींच्या अभावी शिक्षणाचा कस कमी होत आहे. त्यापेक्षा देशी भाषेतून शिक्षण देणे ज्ञाननिर्मितीला अधिक पोषक ठरेल या सूचनेत आक्षेपार्ह असे काही नव्हते. पण कडव्या ब्राह्मणविरोधी टीकाकारांना यात शिक्षणक्षेत्राचा आपला अखरेचा किल्ला टिकवून ठेवण्याचे ब्राह्मणी कारस्थान दिसले. अलीकडेही पहिलीपासून इंग्रजीचे अध्यापन सक्तीचे करण्याचा अशैक्षणिक निर्णय सरकारने घेतल्यावर त्याला रास्त कारणांनी विरोध करणाऱ्या टीकाकारांना ब्राह्मणी ठरवून त्यांच्या आक्षेपांची वासलात लावण्यात आली होती. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाकडे सतत कानाडोळा करून त्याच्या आड येणाऱ्या अडचणी दूर करण्याऐवजी साप सोडून भुई थोपटण्याचे हे राजकारण ते करत राहतात कारण ते त्यांच्या फायद्याचे असते. त्यांना बेहिशेबी पैसा पुरवणाऱ्या शिक्षणसम्राटांच्या महत्वाकांक्षा आणि हरित क्रांतीतून हाती पैसा खुळखुळू लागलेल्या मध्यम शेतकरी वर्गाच्या मनात उद्‌भवलेली शिक्षणातून प्रगतीच्या पायऱ्या भराभर चढण्याची पोकळ स्वप्ने जोपासूनच सत्तेचे राजकारण ते यशस्वीपणे करू शकतात. या त्यांच्या चुकीच्या निर्णयांचे अटळपणे संभवणारे दूरगामी, दुष्परिणाम त्यांना सपशेल विचारात घ्यावेसे वाटत नाही.

महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अलीकडच्या काळात फोफावलेली विनाअनुदान संस्कृती ही या साऱ्या विपर्यस्त धोरणांचीच फलश्रुती असून तिने तर यशवंतरावांच्या शिक्षणविषयक आदर्शचिंतनाचा पायाच उखडून टाकला आहे. सर्व शिक्षणवंचितांसाठी शिक्षणाचे दरवाजे कायमचे बंद होऊन बौद्धिक नव्हे तर आर्थिक कुवतीनुसार शिक्षण देण्याची विषमताधिष्ठित शिक्षणप्रणाली त्या संस्कृतीतून उभी राहिली आहे. शाळा, कॉलेजांना मिळणाऱ्या मान्यता व अनुदाने शैक्षणिक निकषांपेक्षा राजकीय निकषांवर दिली जात आहेत. विनाअनुदानित संस्थांना मनमानी नफेखोरी करण्याचे स्वातंत्र्य लाभले आहे. दुर्बल घटकांच्या शिक्षणाची सर्वांगीण दैना झाली आहे. मूल्यशिक्षणाच्या नावाखाली गतानुगतिकता आणि 'स्वाभिमानी' इतिहासलेखनाच्या नावाने सांप्रदायिकता अशा अपप्रवृत्ती जोपासण्याचे राखीव क्षेत्र म्हणून राज्यकर्ते शिक्षणाकडे पाहू लागले आहेत. विद्यापीठांची स्वायत्तता मोडीत काढून देशव्यापी एकसाचीपणा आणण्याचा घाट विद्यापीठ अनुदान मंडळाने घातला आहे. अशा कितीतरी चिंताजनक घटना शिक्षण क्षेत्रात घडल्या आहेत, घडत आहेत; पण कोणालाच त्याची चिंता नाही.

मराठी भाषा आणि संस्कृती: कोणत्या वाटेवर?

मराठी भाषकांचे राज्य झाले. समान भाषेच्या दुव्याने जोडलेले प्रदेश एकत्र आले. त्यांच्यातील संवाद वाढला. निवडणूकस्पर्धा करणाऱ्या राजकारण्यांची एकभाषिक मतदारवर्ग

मिळाल्यामुळे सोय झाली. मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला. तिची प्रतिष्ठा वाढवून तिला ज्ञानभाषा म्हणून विकसित करण्याचे प्रयत्न आणि तिचा प्रशासनाच्या सर्व क्षेत्रांत प्रसार करण्याचे प्रयत्न जोमाने सुरू झाले. पण हा जोम लवकरच ओसरला. सरकारने त्यासाठी निर्माण केलेल्या यंत्रणा कायम राहिल्या. पण त्याचे कार्य मात्र थंडावले किंवा भरकटले. भाषा सल्लागार मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पुढे त्यातून वेगळे काढलेले मराठी विश्वकोश मंडळ, मराठी भाषा विकास संस्था, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ अशा सगळ्या संस्था सरकारी पैशावर कार्यरत असूनही मराठी भाषेची अवस्था काही समाधानकारक म्हणता येणार नाही. गर्भश्रीमंत व नवश्रीमंत, व्यावसायिक आणि चाकरमाने, पांढरपेशे आणि विनपांढरपेशी, सत्ताधारक आणि विरोधक, उच्च-मध्यम व कनिष्ठ वर्गीय, व्यापारी आणि उद्योजक या सगळ्यांनीच मराठीकडे पाठ फिरवली असून इंग्रजी माध्यमाच्या शाळांना आमच्या पुढच्या पिढ्यांच्या प्रगतीच्या हमीसंस्था मानले आहे असे दिसते. ज्यांना परवडत नाही किंवा जे तत्त्वनिष्ठ आहेत अशाच पालकांची मुले मराठी माध्यमाच्या शाळांमधून शिकतात. बहुतांश मराठी माध्यमाच्या शाळा गुणवत्तेबाबत अतिसामान्य असतात. पण तिकडे कोणाचे लक्ष नाही. राज्य सरकार मराठी भाषेतून प्राथमिक शिक्षण सर्वांपर्यंत पोचवू तर शकले नाहीच उलट पहिलीपासून इंग्रजी शिकवण्याची सक्ती करणे हाच जणू शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा पर्याय आहे, असा भ्रम पसरवण्यात मात्र त्याचा पुढाकार असतो. वस्तुतः जगभराच्या शिक्षणतज्ज्ञांचे यावर एकमत आहे की कोणत्याही विषयाचे विद्यार्थ्याला जास्तीत जास्त आकलन त्याच्या मातृभाषेद्वारेच होत असते. परक्या भाषेत ज्ञानग्रहण करण्याची सक्ती केल्यास फक्त पोपटपंची वाढते, आकलन उथळ राहते, प्रज्ञा व सर्जनशीलता यांची वाढ खुंटते आणि समाजजीवनातील ज्ञानाच्या ऊर्जेची पातळी खालावते. असे असूनही इंग्रजी माध्यमाचे स्तोम राज्यात सर्वत्र वाढते आहे. माहिती-तंत्रज्ञान हा आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचा विषय असून त्याचा अंतर्भाव शालेय अभ्यासक्रमात करण्याबाबत दुमत संभवतच नाही. पण तो तसा अंतर्भूत करताना त्याला पर्याय म्हणून जेव्हा मराठी भाषा हा विषय दिला जातो तेव्हा राज्यकर्त्यांची मराठी भाषेबद्दलची कुत्सित वृत्तीच त्यातून व्यक्त होते !

मराठी भाषेला आधुनिक काळाची व नवनवीन ज्ञानशाखांमधील अभिनव संकल्पनांची आव्हाने पेलण्याची क्षमता प्राप्त व्हावी या हेतूने महाराष्ट्र राज्याच्या उषःकाली सुरू करण्यात आलेल्या उपक्रमांची सद्यःस्थिती निराशाजनक आहे. सुरुवातीला प्रचंड टिंगलटवाळी झाली तरीही इंग्रजी-मराठी पारिभाषिक कोशकार्याचे अनेक प्रकल्प संबंधित समित्यांनी यशस्वीपणे पूर्ण केले हे चांगलेच झाले. पण इतर अनेक प्रकल्प मात्र नुसतेच धूळ खात पडून आहेत.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ त्याच्या मूळ उद्दिष्टांपासून खूपच दूर गेले आहे. दर्जेदार ग्रंथांची निर्मिती किंवा अनुवाद करवून प्रसिद्ध करणे, संशोधनपर ग्रंथांच्या प्रकाशनार्थ अर्थसहाय्य करणे, संशोधन प्रकल्प चालवणे इत्यादी कामांसाठी नियुक्त करण्यात आलेले जाणकारांचे मंडळ असे त्याचे स्वरूप इतिहासजमा झाले असून राजकारण्यांच्या मर्जीतल्या मंडळींचा अतिविशाल मेळावा असे स्वरूप या मंडळाला प्राप्त झाले आहे. त्याच्या कामकाजात स्वाभाविकच गांभीर्यापेक्षा लोकानुरंजनाचा भाग जास्त झाला आहे. त्यातून बाहेर काढण्यात आलेल्या मराठी विश्वकोश मंडळाची समस्या तर अधिकच चिंताजनक आहे. विश्वकोशासारख्या बृहत प्रकल्पासाठी नेमलेल्या या मंडळातही सर्वच वरचढ राजकारण्यांनी केलेली नामांकने सामावून घेताना याही मंडळाचा आकार प्रचंड फुगला आहे. दहा-पंधरा वर्षात या मंडळाने विश्वकोशाचा फक्त एक खंड प्रकाशित केला आहे. तोसुद्धा तयार कधीचाच झाला होता पण प्रकाशन समारंभांची तारीख देणे मंत्रिमहोदयांना शक्य न झाल्यामुळे दोन वर्षे तसाच पडून होता. तूर्त तर चक्क एका राजकारणी व्यक्तीकडेच या मंडळाची धुरा सोपवण्यात आल्यामुळे मराठी विश्वकोशाच्या उर्वरित खंडांना सूर्यप्रकाश दिसण्याची शक्यता पुरतीच संपली आहे. देशात फक्त महाराष्ट्राने सुरू केलेल्या आणि अर्धाअधिक पूर्ण केलेल्या एका भव्य ज्ञानप्रकल्पाची अशी शोकांतिका व्हावी यापरती दुःखाची दुसरी बाबच असू शकणार नाही. मराठीतून सर्व जिल्ह्यांची गॅझेटीयरे तयार करण्याचे कामही अत्यंत रखडतरखडत सुरू आहे.

मराठी भाषा आणि संस्कृतीची ही अशी दुर्दशा पाहिल्यानंतर "याचसाठी का आपण संयुक्त महाराष्ट्र लढ्याचा अट्टहास केला होता?" असा प्रश्न सर्वस्वाचा त्याग करून त्या लढ्यात झोकून देणाऱ्यांना पडला तर ते अगदीच स्वाभाविक ठरेल.

प्रादेशिक दुराव्यांचे वाढते प्रमाण

समान भाषेच्या आधारे एकत्र आलेले पण परस्परांबद्दल साशंक असलेले विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि उर्वरित किंवा पश्चिम महाराष्ट्र यांच्यातील विकासात्मक असमतोल विशेष प्रयत्नांद्वारे दूर करता येईल आणि त्यांच्यातील दुरावा नष्ट करता येईल असा आशावाद यशवंतरावांच्या प्रारंभिक भाषणांमुळे व घोषणांमुळे बळावला होता. पण तो प्रत्यक्षात आला नाही. नागपूर करारातील तरतुदींप्रमाणे महाराष्ट्र विधिमंडळाचे वर्षातून एक अधिवेशन नागपूरला भरत राहिले पण त्यात विदर्भाचे प्रश्न अग्रक्रमाने हाताळले गेले असे मात्र घडले नाही. तुलनात्मकदृष्ट्या अविकसित असलेल्या विदर्भ व मराठवाडा या भागांच्या विकासासाठी खास प्रयत्न करण्याचे या करारातील आश्वासन पाळले गेले नाही. यामुळे त्यांचे विकासाचे अनुशेष सतत वाढतच गेले. १९६० ते २००० या काळात

महाराष्ट्राचा जो औद्योगिक विकास झाला त्यातून प्रादेशिक असमतोल तर कमी झाला नाहीच, उलट वाढत्या शहरीकरणामुळे अनेक सामाजिक व राजकीय तणाव निर्माण झाले आहेत- असा निष्कर्ष पन्नालाल सुराणा यांनी काढला आहे. १९६१ आणि १९८५ या दोन वर्षांत जे कारखाने निघाले त्यांची प्रदेशवार आकडेवारी देऊन सुराणा सांगतात की "सगळयात अधिक वाढ पुणे विभागात झाली आहे. कोकणातील वाढीचे प्रमाण मोठे दिसते, पण त्यात ठाणे जिल्ह्याचा पश्चिम तर रायगडचा उत्तर भाग यातच दाटी झाली आहे. रायगडचा दक्षिण भाग, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत कारखाने फार कमी प्रमाणात वाढले आहेत. दुसरे असे की, मुंबई, उत्तर कोकण, पुणे आणि नाशिक या भागांत उद्योगांचे केंद्रीकरण फार मोठ्या प्रमाणावर झाले; त्यामानाने मराठवाडा, (औरंगाबाद विभाग), विदर्भ (अमरावती व नागपूर विभाग) यात वाढीचे प्रमाण फार कमी आहे. राज्यनिर्मितीच्या वेळेला जे प्रदेश कमी विकसित होते तेथे चाळीस वर्षांतही उद्योगांच्या वाढीचे प्रमाण कमीच राहिले" (पन्नालाल सुराणाः "महाराष्ट्रातील औद्योगिक विकास", भोळे/ बेडकिहाळ संपादित, पूर्वोक्त, ७५).

मानव विकास अहवालात विकासाच्या संदर्भात राज्यांतील जिल्ह्यांची चार गटांत विभागणी केली आहे ती अशी; पहिल्या अतिगरीब गटात धुळे, जालना, उस्मानाबाद, नांदेड, यवतमाळ, लातूर, बुलडाणा, व परभणी या आठ जिल्ह्यांचा समावेश होत असून महाराष्ट्राच्या एकूण ठोक उत्पादनातील त्यांचा वाटा अकरा टक्के एवढाच आहे. दुसरा गट कनिष्ठ मध्यम प्रकारात येणाऱ्या सात जिल्ह्यांचा असून त्यात रत्नागिरी, भंडारा, अहमदनगर, बीड, सातारा, अकोला व जळगाव हे जिल्हे आहेत. राज्याच्या एकूण ठोक उत्पादनात त्यांचा १४.३ टक्के वाटा आहे. तिसऱ्या उच्च मध्यम गटात वर्धा, गडचिरोली, अमरावती, सोलापूर, चंद्रपूर, औरंगाबाद, सिंधुदुर्ग व सांगली हे आठ जिल्हे असून त्यांचा वाटा १४.८ टक्के एवढा आहे. उरलेले सात जिल्हे श्रीमंत गटात मोडतात. राज्याच्या एकूण ठोक उत्पादनातील ६० टक्के वाटा ते उचलतात. नाशिक, कोल्हापूर, पुणे, नागपूर, रायगड, ठाणे व मुंबई हे जिल्हे त्यात आहेत. राज्याच्या एकूण मिळकतीत मुंबई (२५ टक्के), ठाणे (१० टक्के), पुणे (९ टक्के) व नागपूर (५ टक्के) या चार नागरीकरण आलेल्या जिल्ह्यांचा हिस्सा ५० टक्के तर अमरावती विभागातील बुलडाणा, अकोला, अमरावती, व यवतमाळ या चार जिल्ह्यांचा वाटा केवळ ७ टक्केच आहे. यावरून राज्याच्या विकासातील जिल्हानिहाय विषमतेचे विदारक चित्र आपल्यासमोर येते (मानव विकास अहवाल-महाराष्ट्र २०००, ३६) गरिबीचे प्रमाण सर्वात कमी (७.८४ टक्के) मुंबई जिल्ह्यात, तर सर्वात जास्त (४९ टक्के) धुळे जिल्ह्यात आढळते.

प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न हा मूलतः राजकीय प्रश्न असून त्याचे उत्तर राजकीय संरचनेद्वारे मिळू शकते ही यशवंतराव चव्हाणांची धारणाच मुळात चुकीची होती असे सांगून जयंत लेले यांनी प्रादेशिक विषमतेचे आकृतिबंध राजकीय वर्चस्व आणि सामाजिक दुय्यमपणा यांच्यात मिसळून जात-वर्गीय संबंधात कसे विलीन होतात ते स्पष्ट केले आहे (लेले, पूर्वोक्त, ३०). राजकारणातील तसेच समाजजीवनातील प्रादेशिक आणि जातीय वर्चस्व मराठ्यांच्या आर्थिक व सांस्कृतिक वर्चस्वात कसे बेमालूम मिसळून जाते हे पाहणे त्यांना या संदर्भात महत्त्वाचे वाटते. मराठ्यांचे धुरीणत्व हा चव्हाण समजत होते तसा केवळ सामाजिक मुद्दा नव्हता तर त्याचे राजकीय-आर्थिक पैलू तेवढेच मौलिक महत्त्वाचे होते.

लेल्यांच्या मते महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांच्या राजकीय अर्थव्यवस्था (पोलिटिकल इकॉनॉमीज्) मूलतः एकमेकांपेक्षा निराळ्या होत्या आणि राज्याच्या राजकीय ऐक्याला ती भिन्नताच नेत्यांच्या व्यक्तिगत महत्त्वाकांक्षांपेक्षा किंवा गाऱ्हाण्य/ंपेक्षा अधिक प्रमाणात कारणीभूत झाली होती. यशवंतराव प्रत्यक्ष सत्तेवर होते, तोपर्यंत मराठा वर्चस्वाच्या आवरणाखाली या प्रादेशिक तफावती लपल्या; पण ते तिथून बाजूला होताच त्या उफाळून वर आल्या. मराठा जातिसमूहाचे संख्याबळ महाराष्ट्राच्या विविध भागांत जवळपास सारखेच असले तरी अभिजनवर्गाचे जनसामान्यांशी असलेले परस्परसंबंध ठिकठिकाणी तेथील सामाजिक व राजकीय इतिहासपरंपरेनुसार वेगवेगळे होते. त्यामुळे संपूर्ण राज्यासाठी एकच एक जातीय संतुलनाचा फॉर्म्यूला उपयुक्त ठरणे शक्यच नव्हते. यशवंतरावांनी पश्चिम महाराष्ट्रातील अनुभवांच्या आधारे पक्के केलेले सूत्र वापरून सर्वत्र गटजोडणी करण्याचा प्रयत्न केला. त्यात फार काळ यश मिळण्याची शक्यताच नव्हती. पश्चिम महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळीच्या प्रभावामुळे पाटील व देशमुख यांच्यात व्यापक गठबंधन पूर्वापार झाले होते. त्याचा उपयोग तिकडे बहुकेंद्री राजकारणाच्या उतरंडवजा संरचनांचा विकास सुलभ करण्यात बराच झाला. अशी 'नागरी' वृत्ती विदर्भ-मराठवाड्यातील मराठा श्रेष्ठींमधील विविध स्तरांमध्ये अगदीच अपवादाने होती. पश्चिम महाराष्ट्रात कुणबी हा प्रवर्ग जवळपास अस्तंगत झाला होता तर विदर्भ-मराठवाड्यात मराठा व कुणबी यांच्या स्वतंत्र अस्मिता टिकून होत्या (कित्ता, ४९) मराठवाड्यातील प्रस्थापित देशमुख नेतृत्वाचाही यशवंतरावांवर रोष होता. ग्रामीण अभिजनांना सत्तेत वाटेकरी करून घेण्याचे आणि त्यांच्यापैकी जे विशेष क्रियाशील असतील त्यांना प्रादेशिक राजकारणात सामावून घेण्याचे यशवंतरावांचे धोरण देशमुखश्रेष्ठींना अमान्य होते. सत्तेपर्यंत पोचण्याच्या किंवा सत्तेवर दबाव टाकण्याच्या रचना मराठवाड्यात उपलब्ध नसल्यामुळे तेथील राजकारणी परस्परांशी प्रभावी स्पर्धा करून राज्याच्या संसाधनांमधील अधिकाधिक वाटा स्वतःच्या पदरात पाडून घेऊ शकले नाहीत. प्रदेशाचा आर्थिक विकास झाला तर

ग्रामीण श्रेष्ठींची सत्तेचे मलिद्यापर्यंतची पोच वाढेल आणि मग त्यांची आपल्याशी स्पर्धा वाढेल त्यापेक्षा मागासलेपणा तसाच राहिलेला बरा, त्यामुळे मराठवाड्यातील सत्तेचा पारंपरिक आकृतिबंध तरी कायम राहतील अशी बराच काळ प्रस्थापित श्रेष्ठींची भूमिका होती. त्यांच्या दृष्टीने प्रदेशाच्या मागासलेपणालाच एक कार्यात्मक मोल प्राप्त झाले होते.

पुढे हे चित्र अर्थातच पालटले, कारण एकतर संपूर्ण राज्यभर सर्वत्र सारखी सरकारी यंत्रणा अस्तित्वात आली; दुसरे असे की, श्रेष्ठींनीच काढलेल्या शाळा-कॉलेजातून पदवीधर झालेली स्थानिक मराठ्यांची तरुण पिढी उदयास आली. मराठवाड्याच्या मागासलेपणाचा मुकाबला करण्याच्या रूढ प्रणाली आणि त्यातील करारमदार परिणामदृष्ट्या कुचकामी आहेत याची या पिढीला जाणीव झाली. कोरडवाहू शेती. लहरी निसर्ग, दुष्काळी परिस्थिती, वाढती महागाई आणि बेकारी यांची प्रत्यक्ष झळ लागलेल्या या तरुणांमधील सद्यःस्थितीबद्दलचा असंतोष तीव्र झाला. अभिजनांना तरुणांच्या या असंतोषाची चाहूल लागून १९६४ साली त्यांनी मराठवाडा जनता विकास परिषद भरवली. संविधानातील तरतुदीनुसार मराठवाड्यासाठी वैधानिक विकास मंडळ स्थापन करावे, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यामधील विकासात्मक तफावत दूर करावी, गोदावरीच्या पाण्याचा न्याय्य वाटा मराठवाड्याला मिळावा, मराठवाड्यात विद्युत निर्मितीप्रकल्पांच्या उभारणीस चालना द्यावी, येथे कृषिउद्योग व अन्य सार्वजनिक उद्योग सुरू करावेत, शैक्षणिक विकासाला चालना द्यावी अशा काही मागण्या या परिषदेने केल्या होत्या. राज्यातील मागास भाग कोणते आहेत हे तेथील लोकसंख्येतील वर्गनिहाय, प्रमाण, कारखान्यांची संख्या, विजेवरील खर्च, शिक्षणाचा दर्जा, तंत्रशिक्षण संस्थांची संख्या, साक्षरतेचे प्रमाण, कामगारांचे जीवनमान, लोकांची क्रयशक्ती, रेल्वे व सडकांची लांबी या निकषांवरून ठरवावे असेही या परिषदेने सरकारला आवाहन केले होते; पण सरकारने ते निकष वापरून विभागनिहाय तुलना करायचे नाकारले.

जनता विकास परिषदेचा प्रयत्न निष्फळ झाल्यावर विद्यार्थी चळवळी रस्त्यावर उतरल्या. दलित-दलितेतर बहुजन विद्यार्थ्यांचे नोकऱ्यांच्या संधी मागणारे १९७२ चे आंदोलन यातूनच उभे राहिले. प्रस्थापित श्रेष्ठींनी या आंदोलनाचे क्रांतिकारकत्व अचूक हेरले. त्यांनी स्वार्थी राजकारणासाठी ते आंदोलन वापरून घेण्याचा घाट घातला. शिक्षण संस्थांवरचे आपले वर्चस्व वापरून प्रगतिशील युवाशक्तीच्या एकजुटीच्या सुप्तक्षमता आणि उग्र संघर्षाच्या शक्यता त्यांनी मोडीत काढल्या. गटबाजीसाठी त्यांनी विद्यार्थ्यांना वापरले. या बदलत्या सत्ताकारणाला प्रतिसाद देऊ शकेल अशी स्पर्धात्मक उतरंड मराठवाड्यातील ग्रामीण आणि प्रादेशिक अभिजनांतील ऐतिहासिक दुराव्यामुळे तेव्हा आणि नंतरही साकार

होऊ शकली नाही. प्रस्थापित मराठाश्रेष्ठींनी या आंदोलनाला तरुणांच्या विशिष्ट मूळ प्रश्नांवरून लक्ष काढून घेऊन प्रादेशिक विकासाच्या अत्यंत संदिग्ध मागणीवर त्याचा रोख नेण्यात यश मिळवले. प्रदेशाचा मागासलेपणा हा त्यांनी राजकारणाचा मुद्दा करून टाकला. अशाप्रकारे मराठवाड्याच्या विकासाच्या प्रश्नांचा येथील मराठा वर्चस्वाच्या स्वरूपाशी जवळून संबंध कायमच राहात आला आहे. येथे मराठाश्रेष्ठींनी गरीब मराठ्यांना आणि मधल्या जातींना अनुसूचित जातींविरुद्ध वापरण्यासाठी नेहमीच लोकानुरंजनी राजकारणाचा अवलंब केल्याचे आढळते. १९७२ च्या आंदोलनात जे झाले तेच पुढे मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर-आंदोलनातही प्रत्ययास आले.

मागास प्रदेशांपैकी विदर्भातही असेच विकासाच्या ठोस प्रश्नांना डावलून अस्मितांचे लोकानुरंजनी राजकारण करण्यावरच नेतृत्वाचा भर राहिला. महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या वेळेपासून आजतागायत स्वतंत्र विदर्भ राज्य करावे या मागणीवर वारंवार आंदोलने उभी राहिली आहेत. कधी फॉर्वर्ड ब्लॉकने, तर कधी असंतुष्ट काँग्रेसजनांनी, कधी अमराठी अभिजनांनी, तर कधी हिंदुत्वाच्या कैवाऱ्यांनी स्वतंत्र विदर्भाच्या आंदोलनाची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली. प्रारंभी त्या आंदोलनाला भरभरून प्रतिसाद देणाऱ्या वैदर्भी जनतेचा मात्र क्रमशः भ्रमनिरास होत गेला आणि आता राजकारण्यांनी त्या आंदोलनाचा आवाज उठवला तर तो चार घडींच्या करमणुकीचा विषय ठरतो अशी अवस्था झाली आहे. पण याचा अर्थ विदर्भाच्या विकासाचे ज्वलंत प्रश्न सुटले, असा मात्र मुळीच नाही. सर्व नैसर्गिक संसाधने विपुल असूनही राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे विकासाच्या सर्वच कसोट्यांवर मागासलेपणाची लांछनमुद्रा विदर्भाच्या कपाळी कायमच राहिली आहे.

बाहेर सगळे ज्याला विदर्भ या नावाने एक संकलित प्रादेशिक एकक म्हणून ओळखतात तो वस्तुतः दोन वेगळ्या परंपरांच्या भूप्रदेशांत विभक्त असलेला विभाग आहे. नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि वर्धा हे जिल्हे पूर्वी मध्यप्रांताचे घटक होते. त्यांचा राजकीय इतिहास इतर जिल्ह्यांपेक्षा निराळा आहे. तेथे महसूलांची जमीनदारी पद्धती अस्तित्वात होती आणि कोरडवाहू शेतीतून मुख्यतः धान्योत्पादन होते. उलट वऱ्हाड प्रांत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अकोला, अमरावती, बुलडाणा व यवतमाळ या जिल्ह्यांत रयतवारी पद्धती प्रचलित होती आणि कापूस हे तेथील मुख्य उत्पादन आहे. वऱ्हाडातल्यापेक्षा मध्यप्रांतातून आलेल्या जिल्ह्यांत मराठा व कुणबी या जातिसमूहांतील आर्थिक व सामाजिक-सांस्कृतिक अंतर जास्त आहे. दोन्ही भागांचे काँग्रेसचे मूळ पुढारपण ब्राह्मण जमीनदार, सरकारी अधिकारी व व्यावसायिक या वर्गांकडे होते. पुढे वऱ्हाडात त्याची जागा देशमुख-मारवाडी युतीने घेतली. देशमुखांचे महाराष्ट्रातील नेत्यांशी नातेसंबंध असल्याने मराठा

श्रेष्ठींशी ते सहज जोडले जाऊन महाराष्ट्राचे पक्षपाती झाले. देशमुख-मारवाडी वर्चस्वाखाली वरकरणी शांतता दीर्घकाळ नांदताना दिसली तरी सधन कापूस व्यापारी आणि नगदी पिके काढणारे शेतकरी, लहान धान्योत्पादक शेतकरी व शेतमजूर यांच्या हितसंबंधांत मूलगामी संघर्ष कायमच होते. एकूण पाहता पश्चिम महाराष्ट्रापेक्षा विदर्भात मराठाश्रेष्ठी व जनसामान्य यांच्यात जास्तच सामाजिक-आर्थिक अंतर पडलेले होते. मध्यम जाती व मराठा जातिसमूह यांच्यातही असेच अंतर असल्यामुळेच देशमुख-मारवाडी वर्चस्वाखालच्या काँग्रेसच्या विरोधात मध्यम जाती स्वाभाविकपणे उभ्या राहतात. संयुक्त महाराष्ट्रात मराठाश्रेष्ठींची सत्ता-मत्ता लक्षणीय प्रमाणावर वाढली. याची प्रतिक्रिया म्हणून निम्न जातीय मतदारांनी फुटीरतावादी स्वतंत्र विदर्भाच्या पक्षपाती उमेदवारांच्या बाजूने नेहमीच कमीअधिक प्रमाणात मते दिलेली दिसून येतात.

एक गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे की, संयुक्त महाराष्ट्राशी संलग्न होत असताना विदर्भ व मराठवाडा या प्रदेशांच्या ज्या अपेक्षा होत्या त्या पूर्ण झालेल्या नाहीत. १९८४ साली महाराष्ट्र शासनाने मागासलेल्या प्रदेशांचे मागासलेपण मोजण्यासाठी अर्थतज्ज्ञ वि.म. दांडेकरांच्या अध्यक्षतेखाली एक सत्यशोधन समिती नेमली होती. त्या समितीने असा निष्कर्ष काढला आहे की मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या तिन्ही विभागांचा १९८२ सालच्या किमतीवर आधारित एकत्रित अनुशेष ३१८६ कोटी रुपयांचा आहे. त्यात मराठवाड्याचा वाटा २३ टक्के, विदर्भाचा ३९ टक्के तर पश्चिम महाराष्ट्राचा ३७.५ टक्के दाखवलेला होता. हा अनुशेष कमी करण्याचा प्रयत्न या पुढच्या पंचवार्षिक योजनेत केला जावा आणि दर पाच वर्षांनी पुन्हा अनुशेषाचा आढावा घेतला जावा ही दांडेकर समितीची रास्त शिफारस महाराष्ट्र सरकारने मान्य केली नव्हती. प्रस्तुत समितीने संविधानातील मागास विभागांसाठी वैधानिक मंडळ नेमण्याच्या तरतुदीचा विचार केला नव्हता, शिवाय अनुशेष ठरवताना फक्त मूलभूत घटकांवरच लक्ष केंद्रित करून इतर घटकांकडे कानाडोळा केला होता, खाजगी गुंतवणुकीचा विचार केला नव्हता आणि अनुशेष दूर करण्यासाठी क्रमबद्ध कार्यक्रम सुचवला नव्हता- अशा कारणांसाठी काही सदस्यांनी अहवालाला आपल्या भिन्नमतपत्रिका जोडल्या होत्या. विकासात मागे पडलेल्या लोकांकडून वाढत्या प्रमाणात आलेल्या दबावामुळे ३० एप्रिल १९९४ रोजी मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र यांच्यासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळे महाराष्ट्र सरकारने स्थापन केली. त्या मंडळांमुळे सत्तारूढ पक्षाच्या काही मुखंडांची सोय लागली असली तरी त्यांच्यामुळे मागास भागांची विकासाची भूक काही भागली नाही. उलट अशा मंडळांच्या नेमणुकीमुळे महाराष्ट्राचे ऐक्य संकटात सापडेल अशी रास्त भीती त्यांच्या निर्मितीच्या वेळी व्यक्त करण्यात आली

होती. अनुशेष भरून काढण्याच्या संदर्भात विकास मंडळे फारशी समाधानकारक ठरलेली नाहीत, हे नंतर नेमलेल्या समित्यांच्या अहवालांवरून स्पष्ट झालेच आहे. १९९७ च्या निर्देशांक व अनुशेष समितीचा अहवाल, तसेच २००२ चा आर.पी. कुरुलकर यांचा अनुशेषविषयक अभ्यास यावरून असे दिसते की दांडेकर समितीने दाखवलेला अनुशेष भरून काढण्याचे सरकारी प्रयत्न फारच तोकडे आहेत. नियोजनासाठी होणाऱ्या खर्चापैकी जेमतेम पंधरा टक्केच भाग अनुशेष भरून काढण्याच्या कामी वापरला जातो; उर्वरित भाग मात्र प्रादेशिक विकासातील असमतोल वाढवण्यालाच हातभार लावतो. परिणामी अनुशेषाचे प्रमाण घटण्यापेक्षा वाढतच चाललेले दिसून येते. आज शिक्षण, रस्ते, सिंचन, आरोग्य, कृषि, औद्योगिकीकरण रोजगाराच्या संधी इत्यादी प्रत्येक क्षेत्रात विदर्भ-मराठवाडा यांची प्रगती पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत कमी झाली आहे. १९९७ च्या शर्मा समितीने देशातून निवडलेल्या अतिदरिद्री अशा शंभर जिल्ह्यांत महाराष्ट्राचे दहा जिल्हे होते, आणि त्या दहांमध्ये मराठवाड्यातील सगळे म्हणजे आठही जिल्हे होते. २००२ चा मानवविकास अहवाल याची साक्ष देतो की, साक्षरता, शिक्षण, आरोग्य, बालमृत्यूंना प्रतिबंध या मानव विकासाच्या चारही निर्देशांकाबाबत, तसेच दरडोई उत्पन्न, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण व बेरोजगार याही कसोट्यांवर मराठवाड्याचे सर्व जिल्हे राष्ट्रीय सरासरीपेक्षा खालीच आहेत. विदर्भाचीही परिस्थिती वेगळी नाही.

यावरून हे स्पष्ट होते की यशवंतराव चव्हाणप्रणीत विकासाची बहुकेंद्री सुधारणावादी व्यूहनीती महाराष्ट्राच्या भिन्न भागांमधील दुरावा कमी करण्यापेक्षा वाढवण्यालाच कारणीभूत ठरली. लोकानुरंजनी राजकारण आणि केंद्रीय हस्तक्षेप या कारणांनी तिचा विचका झाला. प्रादेशिक अस्मितांचे संकुचित राजकारण आज महाराष्ट्राच्या एकात्मतेच्याच जिवावर उदार झाले असून महाराष्ट्रनिर्मितीच्या वेळी राज्यात पसरलेले आशावादाचे चैतन्य पार लोप पावण्याच्या बेतात आले आहे. त्यात जनतेच्या आर्थिक विकासाबद्दलचा कळवळा किती आणि लोकप्रतिनिधी म्हणवणाऱ्या राजकारण्यांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षांचा भाग किती हा प्रश्नच आहे !

●●●

निवडक संदर्भ-ग्रंथ

यशवंतराव चव्हाण यांचे लेखन व भाषणे

१. **शिवनेरीच्या नौबती,** संपा. गोविंद तळवलकर व अ. ह. लिमये, भाषणसंग्रह, व्हीनस बुक स्टॉल, पुणे १९६१

२. **सह्याद्रीचे वारे,** भाषणसंग्रह, प्रकाशन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, १९६२

३. **ऋणानुबंध,** लेखसंग्रह, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, १९७९.

४. **कृष्णाकाठ,** आत्मचरित्र खंड-१, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, १९८४.

५. **युगांतर,** भाषणसंग्रह, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे.

6. India's Foreign Policy
Winds of Change, Collection of Addresses and Articles, Somaiya Publications Pvt. Ltd., Bombay, 1973.

यशवंतराव चव्हाण : चरित्रे, अभिनंदनग्रंथ व इतर

१. बाबूराव काळे, **यशवंतराव चव्हाण,** चरित्र, ना. द. रेगे (प्रका.), मुंबई, १९५९

२. कृ. भा. बाबर, **'यशवंतराव चव्हाण - व्यक्ती व कार्य',** ठोकळ प्रकाशन, पुणे १९६०

३. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ** जन्मदिन सत्कार समिती, नागपूर, १९६१.

४. रामभाऊ जोशी, **यशवंतराव : इतिहासाचे एक पान,** चरित्र, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६.

5. Welles Hangen, **After Nehru, Who?** Rupert Hart-Davis, London, 1963

6. T. V. Kunhi Krishnan, **Chavan and the Troubled Decade,** Somaiya Publications, Bombay, 1971

7. D. B. Karnik, **Y. B. Chavan : A Political Biography,** United Asia Publishers, 1972